## दासबोध

केवळ वृद्धावस्थेतच वाचायचा ग्रंथ कां?

निश्चित नाही. दासबोध? कोणी कांहीही व्याख्या करो. मी म्हणेन दासबोध म्हणजे माणसालाच पूर्ण माणूस बनवण्याचा साचा. साचा उत्तम असला की सुबक मूर्ती एकापोठापाठ एक तयार होतात.

सद्गुरुकृपा प्रसादाने ५ बालके महंत म्हणून सार्वजनिक कार्य करण्यासाठी संस्कारक्षम होऊ शकतात. असा प्रयत्न या वेचक ओव्या घेऊन केला आहे. छोट्यांना सुद्धा दासबोध उपयुक्त ठरतोच ठरतो.

# पडवीवरचा दासबोध

कु. आक्का वेलणकर



# पडवीवरचा दासबोध

## दिवस १ ला

'सुटलो बुआ एकदाचा' हातवारे करीत गणपती वाड्यात आला. पडवीवर आल्यावर तर नाचायलाच सुरुवात केली.

गद्र्यांचा गणपती, काळ्यांचा विलास, गोऱ्यांचा मधुकर, जमलं त्रिकूट.

'आम्ही पण सुटलो. चला, आता कसं मोकळ मोकळं वाटतयं. आरडाओरडीने पडवी चांगलीच दुमदुमली.

'निकाल लागला की काय? आजच तर परीक्षा संपल्या. 'सुटलो, सुटलो' काय?' त्यांच्याच वयाची साठ्यांची सुधा बाहेर येत म्हणाली.

'म्हटलं आजीबाई, कटकटीतून सुटलो. सकाळी वर्ग - दुपारी शाळा - संध्याकाळी खेळावं म्हटलं तर अभ्यासाचं लफडं, जरा म्हणून मोकळीक नाही. सुटलो या कटकटीतूनच'. गणपती एका दमात बोलला, व लागला पुन्हा नाचायला.

'अरे, पण जरा हळू ओरडा. आंत आजी पोथी वाचत आहेत.' सुधा समजावणीच्या सुरांत म्हणाली.

तोच आजी हातात दासबोध घेऊनच बाहेर आल्या.

'बसा बाळांनो, ऐकलं मी सारं. विलास, कसली रे कटकट?

'मी नाही म्हणालो. हा गण्या, गण्या म्हणाला कटकट' विलासने खुलासा केला.

'धपू!' पाठीत धपाटा बसला विलासच्या.

'अरे अरे कां मारतोस त्याला?' आजी म्हणाल्या.

'तो बघा नं मला गण्या म्हणतो.' गणपतीची तक्रार.

'मला 'विल्या' म्हणतोस ते नाही सांगितलंस?' विलास त्याला मारण्यासाठी सरसावला.

शहाणी सुधा दोघांना सावरीत दोघांच्या मध्ये जाऊन बसली.

'हे पहा बाळांनो, देवाने गोड वाणी दिली आहे. तिचा वापर सरळच करावा. आजच करु या आपण निश्चय. सगळयांनी एकमेकाला सरळ नावानेच हाक मारायची. ठरलं हं. आणि गणपती अभ्यासाला कटकट म्हणायचं कां? आजींनी विचारले.

गणपती म्हणाला, 'कटकट नाहीतर काय? सकाळी सहा नाही वाजत तोवरच 'उठ क्लासला जायचंय'. बाबांनी पांघरूण काढून घ्यावे. कसे बसे उरकून क्लासला जाऊन यावे. तोच 'पाणी जाईल. आंघोळ करुन घे लवकर'. आईचे टुमणे, जरा तासभर जात नाही तोच मार सायकल, शाळा लांब. 'शाळा सुटल्यावर क्लास करुनच ये.' ताईचे दरडावणे. वैतागलो मी, दिवसभराचा दमलो तरी 'उद्याचा अभ्यास करुन ठेव मग नीज.' आई गरजलीच कटकट शिंची!'

आजी हसत म्हणाल्या, 'तुमच्या हितासाठीच ना मोठी माणसे सांगतात. पहाटे उठायची सवय लावलीत, अभ्यास नियमित केलांत तर वर्गाला शिकवणीला जायची गरजच काय? हे बघ पुढील वर्षाची तयारी आत्तापासूनच सुरु करु या. मग कटकट वाटणार नाही.

या दासबोधात समर्थ लहानानांच काय पण मोठ्यांना सुद्धा सांगत आहेत. 'प्रातःकाळी उठावे'.

थांबा. तुम्हाला दाखवतेच म्हणजे पटेल'. आजींनी द. ११ स ३ उघडला, हे बघा.

'बघू बघू' मधुकर पुढे सरसावला. आजींचा दासबोध हाती घेतला. पाने परतली गेली. बोटाला थुंकी लावून तो पाने पुढे मागे करु लागला.

'मधूदादा, पोथीला थुंकी नको लावूस.' सुधाने सुचवले.

तिला 'शाबास' म्हणत आजींनी नेमकी ओवी दाखविली.

मधुकरने वाचली.

***प्रातः काळी उठावे । कांही पाठांतर करावे ।***
***येथानुशक्ती आठवावें । सर्वोत्तमासी ।।११/३/१५।।***



आजी म्हणाल्या, 'मधुकर, दासबोधच काय? कोणतेही पुस्तक, ग्रंथ, वही थुंकी लावून उघडू नये. घाण सवयी टाकाव्यात. पुस्तकांची, वह्यांची काळजी घेऊन वापरणे ही देवपूजाच ठरेल.'

इतक्यात सान्यांची जया पळतच आली.

'आजी, आज ६ वी गोष्ट संपली. तुम्ही सांगितलंत मला फार आवडलं. केशव पण रंगतोय. आज ऐकतो. दुसरे दिवशी तीच गोष्ट मला सांगतो. चांगलं लक्षात रहात त्याच्या. आमचे सहज दोन तास जातात.' जया म्हणाली.

''कोण केशव? तो आंधळा होय, काळे नी फाटके कपडे असतात त्याचे. बाबा म्हणतात, 'गरीब, भिकारी, त्याची मैत्री नको'.'' विलास पटकन बोलून गेला.

जया म्हणली, ''विलास, तो पैशाने गरीब असेल. पण मनाने - विचाराने श्रीमंत आहे. खूप शिकेन ही त्याची जिद्द आहे. त्याची शाळा व पुस्तके वेगळी आहेत. त्याला अवांतर ज्ञानाची गरज आहे. ज्याला ज्याची गरज असते ते त्याला देणं हे खरं दान. होय की नाही आजी?''

आजी म्हणाल्या, 'विलास, जयाचं म्हणणं बरोबर आहे. ती परीक्षा संपल्यापासून त्याला दुपारचे वाचून दाखवते. ही तिची देव पूजाच. अशी भक्ती देवाला फार आवडते.

'पण भक्ती कां करायची?' मधुकरने हळूच विचारले.

सुधाने दासबोध उघडला, 'आजी यांत आहे नाही कां? भक्ती का करायची?'

'हो तर - हे बघ द-१ स-१, वाच तूच.' आजींनी ओवी दाखविली.

***भक्तिचेन योगें देव । निश्चये पावती मानव ।***
***ऐसा आहे अभिप्राव । ईये ग्रंथी ।।१/१/४।।***

'म्हणजे आम्हाला समजेल असं दासबोधात आहे तर!' गणपती उत्सुकतेने म्हणाला.

'होय तर! ही दुसरी ओवी वाच.' आजींनी दासबोध त्याचे हातात दिला.

***'जयाचा भावार्थ जैसा । तयास लाभ तैसा ।***
***मत्सर धरी तो पुंसा । तयास तेंचि प्राप्त ।।१/१/३८।।***

'शाब्बास, छान वाचलेस.' आजी म्हणाल्या. 'केशवला वाचून दाखवून त्याचे ज्ञान वाढवले तर देव तिलाही ज्ञानांत कमतरता येऊ देणार नाही. कारण ती शुद्ध भावाने, शुद्ध विचाराने देवाचीच पूजा करीत आहे. हीच पूजा देवाला आवडते.

'मग मी ही त्या पांगळ्या शेखरला माझ्या सायकलवरुन शाळेत किंवा त्याचे दुकानात पोहोचवत जाईन. मग ती देवपूजाच ठरेल. कां?' गणपतीने विचारले.

'नक्कीच' आजी ठामपणे म्हणाल्या.

जरा दबल्या आवाजातच विलासने विचारले, 'आजी एक विचारु? तुम्हाला देव व देवपूजा खरी कोणती हे कळलं. मग आम्हाला ते का कळत नाही.?'

आजी हसल्या, 'छान विचारलेस. सगळयांना बुद्धी देतो त्या गणपतीचा उत्सव तुझ्या घरी होतो ना?'

'हो तर!' विलास म्हणाला, '१० दिवस असतो गणपती मखरांत. खूप मजा येते. आरत्या, प्रसाद, मिरवणूक, मजाच मजा.'

'हे बघ विलास,' आजी म्हणाल्या, 'आरतीचा आरडा ओरडा नी प्रसादाची चंगळ यासाठी नसतो, आणि नसावा गणपती उत्सव. त्या गणेशाची मनोभावे पूजा करून त्याची कृपा हा खरा प्रसाद मिळवायचा असतो.

'हो पण आजी,' मधुकरने विचारले, 'असले कसले विचित्र देव हो. एकाला तीन तोंडं, एकाला लांबलचक सोंड. ते नाक म्हणे त्याचं. एकाला शेपूट. त्यांची पूजा करुन प्रसाद मिळवायचा?'

'बरं झालं विचारलंस,' आजी म्हणाल्या. 'ही त्या त्या शक्तीची काल्पनीक रुपे मानवानेच दिली. त्यांचे अर्थ कळायला हवेत. त्यासाठी बुद्धी हवी, ही बुद्धी देणारी शक्ती म्हणजेच गणपती.'

'आजी मी सांगू?' सुधा आजींना थांबवत म्हणाली. 'त्या गणपतीचे सुपासारखे कान सारखे हलतात. म्हणजे वाट्टेल ते ऐकू नका. घाण विचार उडवून लावा. व चांगले ते ऐका. त्याचे बारीक डोळे सांगतात की बारकाईने सगळीकडे पहा. मोठे पोट सांगते की . . . . '



तिला थांबवत विलास म्हणाला, 'खूप खा, लठ्ठ व्हा.' सगळेच खदखदून हसले.

आजींनी दासबोध त्याचे हाती देत म्हटले, 'हे बघ विलास, समर्थ म्हणतात - वाच तू.' विलासने वाचले.

***जयाचें आठवितां ध्यान । वाटे परम समाधान ।***
***नेत्रीं रिघोनियां मन । पांगुळे सर्वांगीं ।।१/२/७।।***

'समजलं!' आजी म्हणाल्या. 'बुद्धीला तरतरी आणून देणाऱ्या गणपतीचे जर मनोभावे पूजन केले, दर्शन घेतले तर खूप समाधान लाभते. आनंद होतो. थट्टा मस्करी, अभद्र बोलणे, यातून मन बाहेर पडते. व डोळयातच येऊन रहाते. कोण? आपले मन, म्हणजे मनांत सारखी तीच मूर्ती येऊन ठसते. चित्त एकाग्र होते. मग आपसूकच सगळी कामे कशी छान पार पाडतात.

सुधाने मध्येच हात वर केला. ती म्हणाली, 'हे बघा आजी,'

***जयासी ब्रह्मादिक वंदिती । तेथे मानव बापुडे किती ।***
***असो प्राणी मंदमती । तेहीं गणेश चिंतावा ।।१/२/२७।।***

स्वच्छ मनाने ब्रह्मा विष्णू महेश हे देवादिक ज्याला वंदन करतात त्यापुढे मानवाची काय पाड? मानव देवांच्या पेक्षा कमी शक्तीचा कमी बुद्धीचा. त्याने गणेशाला वंदन करावेच. ज्याची बुद्धी मंद असेल त्याने तर गणपतीची उपासना जरुर करावी.'

सुधा म्हणाली, 'आजी तुम्ही आम्हाला गणपती अथर्वशीर्ष शिकवाल कां? आम्ही सगळेच पाठ करु. होय नारे?'

सर्वांनी 'होऽऽऽ' म्हणून हात वर केले.

शंकेखोर विलास हळूच म्हणाला, 'पण आजी, विद्येची देवता सरस्वती. मग गणपतीची उपासना पूजा प्रार्थना करायची की सरस्वतीची?'

'छान विचारलेस.' आजींनी उत्तर दिले. 'विलास, सरस्वती हे गणपतीचेच एक अंग. ती शारदा काय करते, माहीत आहे? वाच ही ६ वी ओवी.'

विलासने ओवी वाचली -

***जे अनंत ब्रह्मांडें घडी । लीळा विनोदेचि मोडी ।***
***आपण आदिपुरुषीं दडी । मारून राहे ।।१/३/६ ।।***

'शाब्बास.' आजी म्हणाल्या, 'गमतीचा खेळ म्हणून मुली भातुकलीचा खेळ खेळतात ना? तशी ती सारी विश्वरचना करते. प्राणी, पशू, पक्षी सारे अगदी आकाशातले चंद्र सूर्य सुद्धा निर्माण करते. व मनांत आले की सारे मोडते. मुली खेळ आवरून बोळकी टोपल्यात ठेवतात. तस्सेच माया करते. पुन्हा मोठ्या देवाच्या इच्छेने केले म्हणून नामानिराळी होते. विश्वजननीच ती.'

सुधा म्हणाली, 'माझा पत्त्याचा बंगला मधुदादाने फुंकरीने मोडला व साबासुबा आजोबांच्या जवळ जाऊन बसला. तस्सच नां?'

'बाईसाहेब' तिला अडवीत मधू म्हणाला, 'पत्त्याचा बंगला बांधलास तू. मोडला मी. तसं नाही हे. तीच बंगले बांधते. तीच मोडते असे आजी म्हणतात. कळलं! होय की नाही आजी?'

'होय. ती महामंगला अचाट कर्मे करते.' आजी म्हणाल्या.

विलास पुढे सरसावून म्हणाला, 'थांबा आजी, आत्ता ही महामंगला कोण आली? मघाशी सरस्वती म्हणालांत. मग शारदा म्हणालांत. लगेच विश्वजननी म्हणालांत. आत्ता महामंगला म्हणता. किती नावे ही. एकीचीच की या सगळया वेगवेगळया आहेत?'

'हे बघ विलास, तू कमलताईंना काय म्हणतोस?' आजींनी विचारले.

'ती माझी आई आहे. मी आई म्हणतो.' विलासने उत्तर दिले.

'ठीक, हा मधू काय म्हणतो त्यांना?' आजींनी विचारले.

'विलासच्या आई, असे म्हणतो.' विलासने सांगितले.

'आणि सुमन, तुझी मुंबईची बहीण काय म्हणते?' आजी.

'काकू' विलास म्हणाला.

'आजी मी त्यांना मावशी म्हणते. सुधा म्हणाली, 'आई नी कमल मावशी बहिणी सारख्या वागतात.'



गणपतीने हटकले, 'तू बोलू नको मधे मधे. सांगा आजी. पुढे?'

आजी म्हणाल्या, 'हे बघा कोणी आई, कोणी मामी, कोणी काकू तर कोणी आत्या कोणी मावशी तर कोणी वन्स, कोणी वहिनी तर कोणी ताई माई बाई. काहीही म्हटले तरी कमलताई एकच. तशी शारदा अनेक नावांनी ओळखली गेली तरी चैतन्य शक्ती एकच. ही ओवी पहा. सुधाने ओवी वाचली.

***जें जें दृष्टीने देखिले । जें जें शब्दे बोळखिलें ।***
***जें जें मनास भासलें । तितुकें रूप जयेचें ।।१/३/२४।।***

आजी म्हणाल्या, 'आपण जे डोळ्यांनी पाहतो ते तिचेच रूप. शब्दाने जे कळते ते तिचेच रूप. मनाने कल्पिले ते तिचेच रूप. अशी ही सरस्वती. तिची उपासना केली की कटकट शब्दच रहात नाही.

आता ५ वाजायला आलेत. थोडे मोकळ्या हवेत फिरा व दिवे लागणीचे आंत आपापल्या घरी परता.'

गणपती झटकन उठून म्हणाला, 'मग आम्ही उद्या पण येऊ कां? आमच्या करीता दासबोधात काय आहे ते कळेल.'

'या. या बरं' आजींनी दासबोध बासनांत बांधला व त्या पण उठल्या.

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**

## दिवस २ रा

'अरे, मीच पहिला आलो कां? अजून कोणीच आले नाही.' गणपती पडवीवर चढता चढताच म्हणाला.

सुधा माजघरांतून बाहेत येत म्हणाली, 'मधुदादा नी मी आधी आलोय म्हटलं.' इतक्यांत विलास पण आला.

आजी माजघरांत भजन म्हणत होत्या. 'गुरु महाराज गुरु जय जय परब्रह्म सद्गुरू.' सगळेच तेथे थांबले. आजींचे भजन आटोपले.

'या बाळांनो, आपण पडवीवरच उजेडात बसू या.' असे म्हणत त्या उठल्या.

पडवीवर सगळेजण आपापली जागा घेऊन बसले.

विलास म्हणाला, 'आजी, तुम्ही काय म्हणत होतात?'

'आज गुरुवार आहे ना? मी गुरुदेवांचे भजन म्हणत होते.' आजी.

'गुरुदेव! आजपर्यंत ब्रह्मदेव नाव ऐकलं चार तोंडे त्याला, महादेव ऐकलं. आई बेल वहाते त्याला. मग हे गुरुदेव कोण?' विलासने विचारले.

'सगळ्या देवतांच्यापेक्षाही मोठे.' आजी म्हणाल्या, 'मोठे म्हणजे उंच व धिप्पाड असे नव्हे. प. पूज्य गुरुनाथ देव, देव हे त्यांचे आडनांव. मी लहानपणीच त्यांच्याकडून मंत्र घेतला. म्हणून जप करते त्या मंत्राचा.'

गणपतीने विचारले. 'त्या मंत्राचा जप केल्याने अभ्यास येतो कां? पैसे मिळतात कां? मनुष्य श्रीमंत होतो कां?

'छान विचारलंस,' आजी आनंदाने म्हणाल्या. 'सद्‌गुरु स्वतः तर तरतातच. पण शिष्यांनाही तारतात. जगांत सगळं नाहीसं होईल. पण सद्‌गुरुपद नाहीस होणार नाही. तूं म्हणतोस ते सगळं सगळं मिळतं. हे बघ समर्थ म्हणतात,

***हरीहर ब्रह्मादिक । नाश पावती सकळिक ।***
***सर्वदा अविनाश येक । सद्‌गुरुपद ।।१/४/२९।।***

अशा सद्‌गुरुंची कृपा होण्यासाठी सतत संत संगत असावी.'

'हो. पण आजी संत शिष्ठच असेल तर संगत कशी धरणार? माझ्या वर्गातला अजित संत बोलतच नाही कोणाशी. खेळायला पण थांबत नाही. त्याची संगत कशी करावी?' मधुने विचारले.

'अजित आडनावी संत आहे.' आजी हसून म्हणाल्या. मी आडनावी संताबद्दल बोलत नाही. जे वागणुकीने, गुणांनी आदर्श असतात ते संत. परोपकार वृत्ती असते ज्यांची ते संत. क्रोध लोभ ज्यांनी जिंकले ते संत. अशी कितीतरी संतांची नावे तुम्हाला माहीत असतील.

सुधा म्हणाली, 'रागाला जिंकलेले संत एकनाथ महाराज. त्यांचा फोटो आहे आमच्याकडे.'



'आणि परोपकार करुन दुसऱ्याला पण चांगल्या मार्गाला लावणारे गोंदवलेकर, त्यांना तर ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज म्हणतात. ते पण संतच न?' मधू म्हणाला, 'शिर्डीचे साई बाबा, शेगावचे गजानन महाराज हे पण संतच.'

'पुरुषच संत असतात असे नाही म्हटलं,' सुधा म्हणाली, 'संत जनाबाई, कान्होपात्रा, मीराबाई कितीतरी नांवे देता येतील.'

'ही झाली होऊन गेलेल्या संतांची नांवे' आजींनी मूळ धागा पकडला. 'अलिकडच्या काळात सुद्धा संत नाहीत कां? संत स्वतः आनंदरूप असतात. पूर्ण तृप्त असतात. हे पहा संत रामदास स्वामी दासबोधात सांगतात.

***संत आनंदाचें स्थळ । संत सुखचि केवळ ।***
***नाना संतोषाचें मूळ । ते हे संत ।।१/५/१६।।***

अशा संतांच्या सहवासात दुःख सगळं विसरायलाच होतं.'

'ते संत असं काय देतात आपल्याला?' विलासने शंका विचारली.

'बाबा रे, संत काय देतात? किती देतात? हे घेणाऱ्याच्या कुवतीवर अवलंबून असते.' आजींच्या डोळयातून दोन टपोरे थेंब बाहेर आले. संत श्रेष्ठ सद्‌गुरु माऊली. अनाथांची सावली. सुधा वाच ही ओवी.'

***मोक्षश्रिया आळंकृत । ऐसे हे संत श्रीमंत ।***
***जीव दरिद्री असंख्यात । नृपती केले ।।१/५/२१।।***

'छान', आजी म्हणाल्या, 'दुसऱ्याला दुःखातून. संशयापासून, अज्ञानातून मुक्त करायचे. आनंदी करुन सोडायचे. हेच दागिने त्यांचे अंगावर असतात. ते वृत्तीने श्रीमंत असतात. ते संत विषयासक्त व अज्ञानी, त्यामुळे दरिद्री अशा भाग्यहिनांना श्रीमंत करुन सोडतात. राजासारखे वैभवशाली बनवतात. आत्मज्ञानाने परिपूर्ण करुन सोडतात. खरे वैभव प्राप्त करुन देतात. मात्र ते वैभव गणपती म्हणतो तसे पैशाचे नव्हे हं ! खरे वैभव कोणते सांगू? पूर्ण समाधान. परम शांती, अखंड आनंद. हे खरे वैभव. हे संताकडून सद्‌गुरुकडून मिळते.

'पण त्यासाठी काय करावे? ते कसे मिळवावे?' मधुकरने विचारले.

'हे बघ. समर्थांनी किती सोपा मार्ग सांगितला आहे. वाच.' आजी म्हणाल्या.

मधुकरने दासबोध आपल्या मांडीवर घेतला. आजींच्याकडे पाहून नमस्कार केला आजींनी दाखवलेली ओवी तोडत वाचली.

*आपुले शक्तिनुसार । भावें पुजावा परमेश्वर ।*
*परंतु पुजूं नये हा विचार । कोठेंचि नाहीं ।।१/६/१३।।*

'मग आजी, त्या परमेश्वराची पूजा घरातली सगळीच माणसे करु लागली, तर फुले, निरांजनाच्या वाती, उदबत्त्या कितीतरी लागतील?' मधूला शंका आलीच. त्याने ती विचारली पण!

सुधा म्हणाली,' देवघरांतल्या देवांची पूजा सगळ्यांनी नाही करायची. माझे बाबा सकाळी पूजा करतात. मग आईचे अंग धुणे झाले की ती देवाला फूल पान वहाते. तुळशीला पाणी घालते, आजी जपाला देवापाशी बसते. ती पण फूल पान वहाते. मला प्रार्थना म्हणायला शिकवते. मग मी नमस्कार करते. आजी, अशी सगळयांनी पूजा केली तर चालते की नाही?

'चालते बरं!' आजी म्हणाल्या, 'फक्त देवघरातल्या देवांची पूजा म्हणजे परमेश्वर पूजा नव्हे. विलासने परवा आपले वाढदिवसाचे दिवशी केशवला सदरा चड्डी दिली ही परमेश्वराचीच पूजा. अशी पूजा वर्षातून एकदा घडली तरी पुरे. जया त्याला वाचून दाखवते ती पण पूजाच. गणपती शेखरला सायकल वरुन दुकानांत पोहोचवतो ती पण पूजाच दाखवते.' आजींनी मधूकडून दासबोध घेतला. नी ओवी वाचली.

*मागां वाल्मीक व्यासादिक । जाले कवेश्वर अनेक ।*
*तयांपासून विवेक । सकळ जनासी ।।१/७/२३।।*

*परोपकारा कारणें । नाना निश्चय अनुवादणें ।*
*सेखीं बोलिले पूर्णपणे । संशयातीत ।।१/७/२७।।*

'बाळांनो, कवी म्हणजे ईश्वरी शक्तीच. केवळ जगांतील अज्ञानी लोकांचे अज्ञान जावे, सर्वांना ईश्वराची ओळख व्हावी, म्हणून त्यांनी आपापल्या काव्यातून सुंदर सिद्धांन्तमांडले. त्यानुसार आपण वागलो तर कोट कल्याण होईल. वाल्मीकीने कोणता ग्रंथ रचना बरं?'



जया चटकन म्हणाली, 'रामायण आणि व्यासांनी महाभारत रचले. खूप पुराणे लिहिली. तुम्ही विचारणारच. म्हणून मी आधीच सांगितले.'

'अगाऊच नाहीतर काय? स्वतःला शहाणी समजते ना?' विलासने शेरा मारला.

'पण तुला कोणी विचारलंय मी कशी आहे ती?' आधी स्वतः शहाणा हो.' जयाने टोला मारला.

'भांडू नका' आजींनी जयाला खुणावले, 'विलास मी खरंच विचारणार होते. तिचे म्हणणे खोटे नाही. व्यासांनी जगाला किती भरभरून ज्ञान दिले. त्यांची स्मृती म्हणून आपण वर्षातून एक दिवस त्यांची पूजा करतो. केव्हा बरं?'

'सांगा, विलासराव सांगा ना आता.' जया म्हणाली, 'आता का खाली बघता?'

सुधाने पटकन सांगितले. 'आषाढात पौर्णिमेला. व्यासपौर्णिमा म्हणतात त्या दिवसाला. कोणी कोणी गुरुपौर्णिमा म्हणतात.'

'शाब्बास,' आजी म्हणाल्या, 'वाल्मीकींनी, व्यासांनी, पुष्कळ ग्रंथ कर्त्यांनी आपल्यावर उपकार केले आहेत. त्यांच्या अनुभव ज्ञानाने आपले सगळे संशय दूर होतात. अज्ञान नष्ट होते. बुद्धी स्वच्छ होते, देवाची खरी पूजा होते. हातून परोपकार घडतो, मैत्रीची भावना वाढीस लागते. उत्तम गुण अंगी येतात. हे बघा आठव्या समासात समर्थ काय म्हणतात.'

आजींच्या तोंडून शब्द बाहेर पडायचा अवकाश विलासने चटकन दासबोध हाती घेतला. जरा खालीवर पाहिले व ओवी वाचली.

*जेथें भगवंताच्या मूर्ती । तेथें पाविजे उत्तम गती ।*
*ऐसा निश्चय बहुतां ग्रंथीं । महंत बोलिले ।।१/८/२८।।*

मी अर्थ पण सांगतो आजी, 'ऐका, श्रोतेहो, मी काय सांगतो ऐका. या दासबोधात रामदास म्हणतात. (जीभ चावून) नाही नाही. श्रीसमर्थ रामदास स्वामी म्हणतात की आज पर्यंत थोर थोर ग्रंथकारांनी खूप ग्रंथ लिहिले. सर्वांनीही आपापल्या ग्रंथात ठामपणे सांगितले आहे की ज्या ठिकाणी भगवंताची मूर्ती असेल म्हणजे देऊळच असायला हवे कां? येथे आपला गणपती आहेच (गणपतीच्या मांडीवर चापटी मारून) हं तर काय मी म्हणत होतो - जेथे भगवंताची मूर्ती असेल, आपापल्या घरी भगवंताची पूजा होत

असेल, जेथे भजन पूजन चालू असेल तेथील लोकांना म्हणजे पूजा करणाऱ्याला हं उत्तम गती मिळते.'

सुधाने हसतच विचारले, 'पण बुआ गती म्हणजे काय हो?'

ग्रंथ आजींच्या हातात देत विलास म्हणाला, 'एवढंही कळत नाही कां? गती - गती - गती म्हणजे वेग. समजलं ?'

आजी हासल्या, 'सुधा, मी सांगते, उत्तम गती मिळते म्हणजे जीवाला ध्येय प्राप्त करुन घेता येते. जीवनात सर्व श्रेष्ठ वस्तू कोणती असेल तर खऱ्या देवाला ओळखणे. सर्वात मौल्यवान वस्तू म्हणजे ब्रह्म. परब्रह्म परमात्मा म्हणजेच खरा मोठा देव. त्याला ओळखणे म्हणजेच शाश्वत संपत्ती मिळवणे. ही संपत्ती हे वैभव ज्याला मिळते त्याला उत्तम गती मिळाली म्हणतात.'

जया म्हणाली, 'आजी, आपण प्रयत्न केला तर आपल्याला मिळेल का ते वैबव? कोणते? पूर्ण शांती, परम आनंद - - -'

तिला मध्येच अडवीत विलास म्हणाला, 'ह्यः! चुकलं साफ चुकलं, पूर्ण समाधान, परमशांती, अखंड आनंद, आजी बरोबर आहे ना?'

'होय, बरोबर, सतत हाच विचार मनांत ठेवला तर काय अवघड आहे?' आजी म्हणाल्या, 'गणपती ही ओवी वाच.'

गणपतीने दासबोध घेतला. घसा खाकरला. नमस्कार केला.

***आहे तरी परम सुगम । परी जनासी जाला दुर्गम ।***
***कां जयाचें चुकलें वर्म । सत्समागमाकडे ।।१/९/२।।***

'छान, आजी म्हणाल्या, 'खरं तर परमार्थ म्हणजे उच्च ध्येय गाठणं. उत्तम वैभव मिळवणं. सोपं आहे. पण संत समागम घडत नाही. संत सान्निध्यात परमार्थ सहज घडतो. मार्ग सापडतो. चाचपडावे लागत नाही. हो! आणखी एक गंमत पहा. समर्थ म्हणतात -

***अनंत जन्मीचें पुण्य जोडे । तरीच परमार्थ घडे ।***
***मुख्य परमात्मा आतुडे । अनुभवासी ।।१/९/२४।।***



मधुकरने शंका विचारली. 'मागच्या जन्मीचे पुण्य आहे की नाही हे कसे ओळखावे? म्हणजे आम्ही गोटेच राहणार कां?'

'नाही. दंगामस्ती ऐवजी उन्हाचे वेळी थोडा दासबोध अभ्यासूया असे सांगितल्यावर ऐकलेत. ते मागचे काही पुण्य गाठीस होते म्हणूनच. निराश नाही व्हायचं. प्रयत्न केल्यावर साधत नाही असे जगांत कांहीच नाही' आजी म्हणाल्या, 'आपल्याला धडधाकट मनुष्य देह मिळाला आहे. घरची आर्थिक स्थिती बरी आहे. शाळेत शिक्षण घेत येत आहे. दोन वेळचे जेवण आनंदाने घेता येत आहे. कमतरता नाही. म्हणून आपण लक्षात ठेवायचे. सांगते हं. आजींनी ओवीवरून नजर फिरवली. हं सापडली.

***सांग नरदेह जोडलें । आणी परमार्थ बुद्धि विसर्ले ।***
***तें मूर्ख कैसें भ्रमलें । मायाजाळीं ।।१/१०/३३।।***

आपल्या ठिकाणी काहीही व्यंग नाही. म्हणून २४ तासांपैकी काही भाग तरी परमार्थाकरिता देह वापरावा. समर्थांनी किती पोट तिडकीने सांगितल आहे पहा.

***देह परमार्थी लाविलें । तरीच याचें सार्थक जालें ।***
***नाहीं तरी हे वेर्थचि गेलें । नाना आघातें मृत्यूपंथें ।।१/१०/६१।।***

'म्हणून बाळांनो, लहानपणापासूनच चांगल्या सवयी लावून घेऊ या. खरं ज्ञान मिळवू या. उच्च ध्येय गाठू या. देहाचे सार्थक करु या. आवडेल ना तुम्हाला?'

गणपती म्हणाला, 'आवडेल ना म्हणजे काय? आवडलाच हो. आत्ताच करु या सुरुवात. काय म्हणायचं ग सुधा? हं आठवलं.

गुरु महाराज गुरु । जय जय परब्रह्म सद्गुरु । गणपतीच्या म्हणण्यास सर्वांनीच दुजोरा दिला. पाच मिनीटे भजन रंगले. नमस्कार करुन घोष केला.

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**

## दिवस ३ रा

गणपती धावतच आला. पण पडवीच्या पायरीवरच थबकला पडवीवरची त्याची आवडती जागा विलासने आधीच पटकावली होती. दोघे एकमेकांकडे पहातही नव्हते.

मधुकर आला पण दराशीच घुटमळला.

'ये ना मधुदादा.' सुधाने हाक मारली.

'हो. येतो.' मधु पुटपुटला. पण पायरीवर गणपती होता बसलेला.

इतक्यात आजी बाहेर आल्या.

'आज झालंय काय तुम्हाला? तिघांचा हा असा त्रिकोन कधी पाहिला नव्हता.' सुधा म्हणाली.

गणपती पायरीवरून उठला. आजींच्या उजवीकडे बसला. तेव्हा मधुकर दारातून वर आला. पण विलासच्या शेजारी न बसता जरा बाजूलाच बसला.

आजींनी ताडलं, काहीतरी बिनसलंय तिघांचं.

'बसा! कोण बरं यायचं राहिलय?' आजींनी विचारले. पण कोणीच उत्तर देईना,

सुधाच म्हणाली, 'जयू येईल आत्ता. केशवच्या घरी गेलेली मी पाहिली दुपारी.'

'आज मुगाचे लाडू खाल्ले कारे सगळयांनी?' आजींनी विचारले.

'म्हणजे काय आजी?' सुधा म्हणाली.

'अगं मुगदळाचे लाडू खाल्ले की असा चिकटा बसतो तोंडाला, तिघं कसे लांब लांब बसलेत. काहीतरी खदखदतं आहे. गणपती, तूच सांग. काय झालं?' आजींनी गणपतीला बोलकं केलं.

'आजी, मी सांगतो खरं ते. (विलासकडे बोट दाखवून) मी याच्याकडे गोष्टीचं पुस्तक मागायला गेलो. तर खोट बोलला, 'पुस्तक नाही माझ्याकडे.' पण ते चक्क टेबलावरच होतं. म्हणून मी म्हटलं ए खोटारड्या, हे काय पुस्तक आहे इथं. वाचून झालं की मी परत करीन? पण त्याने दिले नाही. मी बोलणार नाही त्याचेशी.

'नको बोलूस जा. इथं कोणाचं अडलंय?' विलासला चेव आला. 'आजी, हा शिष्टच समजतो स्वतःला, गोष्टी खूप वाचतो. सांगतो छान. म्हणून मी काल याला क्लबमध्ये चलतोस कां? विचारले, तेथे गोष्ट सांगण्याचा कार्यक्रम होता. तर चक्क नाही म्हणाला. मी तर त्याला आणतोच म्हणून निघालो होतो. मी खोटा ठरलो. माझा अपमान झाला. काय भाव खातो. (तोंड वाकडे करीत) 'म्हणे बोलणार नाही.' गेला



उडत!!! आजी दोघांच्या मध्येच बसल्या होत्या. त्यांनी दोघांच्या मांडीवर हात ठेवले. बाळांनो, दोघ चुकत आहात. असं वागणाऱ्याला समर्थ काय म्हणतात माहीत आहे? सुधा, तू वाचतेस? आजींनी ओवी दाखविली.

***'अक्षरें गाळून वाची । का ते घाली पदरिचीं ।***
***नीधा न करी पुस्तकाची । तो एक मूर्ख ।।२/१/७०।।***

***आपण वाचीना कधीं । कोणास वाचावया नेदी ।***
***बांधोन ठेवी बंदीं । तो एक मूर्ख ।।२/१/७१।।***

गणपतीची कळी खुलली.

आजी म्हणाल्या, 'पुस्तके म्हणजे ज्ञानाचे भांडार. पुस्तके हवी तशी वापरू नयेत. काळजी घ्यावी. त्याला आवरण घालावे. स्पष्ट आवाजात छान वाचावे. स्वतः तर वाचावेच पण दुसऱ्याला देखील वाचायला द्यावे. असे जो करत नाही तो मूर्ख ठरतो.'

विलासचा चेहरा पडलेला पाहून आजी समजावणीच्या सुरांत म्हणाल्या, 'विलास तुला एक गंमत सांगू? हे बघ. समर्थ म्हणतात, 'जो बालंबाल गप्पा घरात झोडतो, सारखी बडबड चालू असते. मित्रपरिवारात आपले तेच म्हणजे दडपत असतो. खरा तर धीट पण चार चौघांत व्यासपीठावरून बोल म्हटलं की माघार घेतो लाजतो तो पण . . . .'

'मूर्ख!' मधुने वाक्य पूर्ण केले. आजी म्हणाल्या, 'मधुकर ही ओवी वाच. मधुने दासबोध घेतला. नमस्कार केला. ओवी वाचली.

***घरीं विवेक उमजे । आणी सभेमध्यें लाजे ।***
***शब्द बोलतां निर्बुजे । तो एक मूर्ख ।।२/१/१८।।***

आजी हसून म्हणाल्या, 'झाली फिट्टंफाट! दोघंही सारखेच मग रुसता कशाला?'

गणपती आजींना म्हणाला, 'आजी, तो पहा न (मधूकडे बोट करुन) हंसतोय आम्हाला.'

'गणपती, त्याची पण गंमत सांगते. सांगू कां रे?' सुधाने मधुकराला विचारले.

मधूने नाकावर बोट ठेवले.'आता कां? दुसऱ्याला हसतांना बरं वाटतं नाही कां?

सांग सुधा सांग. काय झालं? विलासला उसळीच आली.

'आजी' सुधा म्हणाली, 'याला दोन दिवसांपूर्वी बरं नव्हतं. चक्कर येते म्हणाला. म्हणून आईने चाटण तयार करुन त्याला देण्यासाठी मला पाठवले. तर त्याने चक्क त्यात पाणी मिसळून टाकून दिले. 'मला नको चाटण-बिटण' म्हणाला. मला रागच आला त्याचा. मी वाटी घेऊन घरी गेले आईने विचारलेच. 'चाटलं का ग त्याने?' 'जरा तोंड वाकडं केलं असेल. पण गुण येईल.' खरं सांगितलं असतं तर तिला किती वाईट वाटलं असतं? मी तोंड वळवलं. वाटी जागेवर ठेवावी म्हणून तेथून आंतच गेले. तेव्हापासून तो आमच्याकडे आलाच नाही. नाहीतर नाही जा. येथे कोणाचे अडलंय?'

'सुधा, हे बघ, मीच सांगते समर्थ काय म्हणतात ते,' आजी म्हणाल्या.

***औषध नेघे असोन व्यथा । पथ्य न करी सर्वथा ।***
***न मिळे आलिया पदार्था । तो एक . . . मूर्ख ।।२/१/२२।।***

सगळेच जण एकदम म्हणाले 'मूर्ख'.

सुधा म्हणाली, 'म्हणजे हा सगळा मूर्खांचाच बाजार. पण आजी आम्ही जे नेमके चुकलो ते समर्थांना आधीच कसे कळले? त्यांनी तर दासबोध कधीच रचला.'

आजी म्हणाल्या, 'सुधा, आजच काय? समर्थांच्या काळाचे आधी सुद्धा समाजात असे मूर्खपणाने, अज्ञानाने वागून आपलेच नुकसान करुन घेणारी माणसे खूप होती. आज आहेत. पुढे असणार आहेत. म्हणून ७४ ओव्यांचा समास मूर्ख लक्षणाचा लिहीला. कां माहीत आहे? या लक्षणांचा त्याग घडावा. व समाज सुधारावा. किती उदात्त विचार संतांचा? मग आपण त्यांचा अवमान करायचा कां? आपला मूर्खपणा म्हणजे चूक आपल्याला कळली की ती दुरुस्त करायची. आपली एकी, संघशक्ती कायम ठेवायची. कसं वाटतं तुम्हाला? तुम्ही काय करणार?

'आम्ही मूर्खपणा सोडणार !' सगळे एकदन म्हणाले.

'गणपतीला मी पुस्तक देतो वाचायला' विलास म्हणाला, 'आम्ही सगळेच आळीपाळीने वाचू. पुस्तक न फाडता छान वापरू.'

'मी पण पुढच्या महिन्यात क्लब मध्ये जाऊन गोष्ट दणक्यांत सांगेन. आजी, मी सभासदच होईन क्लबचा.' गणपतीने आजींच्या हातावर हात मारूनच म्हटले.



'आजी', मधू जरा हळूच म्हणाला, 'मला औषधाचा कंटाळा आहे खरा. पण मी पथ्याने वागेन. हयगय करणार नाही.'

'मग आपण सगळे शहाणे होणार.' सुधा म्हणाली.

'व्हाल व्हाल'. आजी म्हणाल्या. 'पण त्यासाठी सुद्धा एक पथ्य आहेच.

***अति क्रोध करुं नये । जिवलगांस खेदूं नये ।***
***मनीं वीट मानूं नये । सिकवणेचा ।।२/२/१०।।***

हे सगळयांनीच लक्षात ठेवावे. 'अति राग - भीक माग' असं होतं. मैत्री तोडायची सोपी असते. जोडायला वेळ लागतो. थोडी सहनशीलता शिकावी. लहान असो मोठा असो कोणी काही सुचवले किंवा शिकवले तर रागावू नये. नीट विचार करावा.

रागाच्या भरांत दुरुत्तरे केली जातात. तोंडात शिवीसुद्धा येते. म्हणून समर्थ पुढे म्हणतात,

***तोंडीं सीवी असों नये । दुसऱ्यास देखोन हासों नये ।***
***उणें अंगीं संचरों नये । कुळवंताचे ।।२/२/२७।।***

मधु म्हणाला, 'उणे अंगी संचरो नये' मला नाही कळलं ....'

'सांगते,' आजी म्हणाल्या, 'पुष्कळांना अशी सवय असते. दुसऱ्याचे अवगुण वेशीला टांगायचे. एखादा मनुष्य खानदानी घराण्याचा असेल तर त्याच्या कांही टाकावू सवयी प्रगट करुन त्याच्या बद्दलचा तिरस्कार आपण निष्कारण निर्माण कां करा? दुसऱ्याला हीन लेखण्यात आपला काय फायदा? त्याची कमाई कष्टाची नाही. हे बडबडून जगाला पटवण्याचा उद्योग कां करा? त्याने का आपली कीर्ती वाढणार आहे? समर्थ प्रेमळ इशारा देतात बघ.

***अपकीर्ति ते सांडावी । सद्‌कीर्ति वाढवावी ।***
***विवेकें दृढ धरावी । वाट सत्याची ।।२/२/४१।।***

'समजलं बाळांनो, जगात सत्य फक्त भगवंत. त्याच्या प्राप्तीचाच प्रयत्न करावा. जेणे करुन आपला नाव लौकीक राहील असाच प्रयत्न व्हावा. यासाठी विवेक जागा हवा.'

'आजी, जगांत आपल्याला सर्वांनीच मानावे असे तर वाटत असते. मग सगळे कीर्ती वाढेल असे कां वागत नाहीत?' गणपतीने शंका विचारली.

'गणपती, चांगली शंका विचारलीस.' आजी त्याची पाठ थोपटीत म्हणाल्या, 'गीतेत १६ व्या अध्यायात दैवी संपत्ती व आसुरी संपत्ती यांचे वर्णन आहे. त्यातली आसुरी संपत्ती म्हणजे कुविद्या. ती आड येते. त्या कुविद्येतलं एक लक्षण पहा.

गणपतीच्या हाती दासबोध आला. त्याने दाखवलेली ओवी वाचली.

***नेणे आणी नायके । न ये आणी न सीके ।***
***न करी आणी न देखे । अभ्यास दृष्टी ।।२/३/११।।***

'हे आमचेच वर्णन लिहिले आहे कां?' विलासने विचारलेच.

'विलास, या वृत्तीची माणसे खूप असतात.' आजी म्हणाल्या. 'म्हणून आपण कीर्तीमान होण्यासाठी या कुविद्येचा त्याग करावा. मधू आता २री गोष्ट तू वाचतोस?'

मधुकरने दासबोध घेतला. तोंडाकडे बोट गेले. पण सदऱ्याला पुसून ओवी वाचली.

***समयो नेणे प्रसंग नेणे । प्रेत्न नेणे अभ्यास नेणे ।***
***आर्जव नेणे मैत्री नेणे । कांहींच नेणे अभागी ।।२/३/३८।।***

आजी म्हणाल्या, 'असे अभागी आपण व्हायचे नाही.'

'मग त्यासाठी काय करावं?' जयाने विचारले.

'आता तूच वाच' आजींनी तिला ओवी दाखवली.

***नरदेहाचें उचित । कांहीं करावें आत्महित ।***
***यथानुशक्त्या चित्तवित्त । सर्वोत्तमीं लावावें ।।२/४/१३।।***

आजी, सर्वोत्तम म्हणजे भगवंतच न? 'सांगू का रे आजींना?' तिने सर्वांची संमती घेतली. आजी, आम्ही एक गंमत केली. परवा पुस्तकाबद्दल सांगितलेत ना? मग आम्ही सर्वांनी आपापली वाचून झालेली, पण घरांत पडून राहिलेली पुस्तके जमवली. त्यांना आवरण घातले - ५० पुस्तके झाली. ती शाळा सुरु झाल्यावर शाळेच्या वाचनालयास देणार. ही सर्वोत्तमाची पूजा ठरेल कां?'



आजींनी होकार दिला. 'जया हे भगवद् भक्तीचेच काम झालं हं! पण त्याचबरोबर आत्महित म्हणजे स्वतःचे पण हित साधले असेही कार्य रोज व्हावे ही पुढची ओवी बघ.'

***परगुणाचा संतोष नाहीं । परोपकारें सुख नाहीं ।***
***हरिभक्तीचा लेश नाहीं । अंतर्यामीं ।।२/४/२५।।***

जया म्हणाली, 'आजी म्हणजे असे वागणे नको. असंच ना?'

'बरोबर समजलं' आजी म्हणाल्या, 'ज्याला स्वतः शहाणे व्हायची इच्छा आहे, त्याला दुसऱ्याच्या चांगल्या गुणांचा आनंदच वाटावा. परोपकाराची एकही संधी दवडू नये. दिवसाकाठी थोडे तरी भगवंताचे भजन करावे, गाजावाजा नको पण मनापासून सकाळ संध्याकाळ नमस्कार करावा.

'आजी, आम्ही सगळेच आता पुस्तकांत पाहूनच पण स्नान झाल्यावर अथर्वशीर्ष म्हणतो.' विलासने सांगितले. आजींना आनंद वाटला.

'बाळांनो, मला खरंच आनंद वाटला हं.' आजी म्हणाल्या, 'हे त्या शारदेचेच कौतुक हं. प्रत्येकाचे ठिकाणे सत्व, रज, तम तीन गुण असतात.

***सत्वगुणें भगवद्भक्ती । रजोगुणें पुनरावृत्ती ।***
***तमोगुणें अधोगती । पावति प्राणी ।।२/५/२।।***

आपल्यातला चांगला गुण वाढीला लागला तर शुद्ध भक्ती साधते. रजोगुणाने वासना वाढतात. पुन्हा जन्म घ्यावा लागतो. तमोगुणाने मनुष्याला पुन्हा हीन योनीत जावे लागते. यासाठी सावध रहा. म्हणून लाल दिवा दाखवला.'

'बघू तो लाल दिवा' विलास उद्गारला. आजींनी ओवी दाखवली. विलासने वाचली -

***दुसऱ्याचें सर्व जावें । माझेंचि बरें असावें ।***
***ऐसें आठवे स्वभावें । तो रजोगुण ।।२/५/१६।।***

'लक्षांत आलं कां?' दुसऱ्याचे वाईट चिंतून आपले चांगले असावे असे स्वाभाविकपणे वाटणं शक्य असते. तेथे सावध रहावे.' आजी म्हणाल्या.

सुधाने विचारले, 'सावध रहायचे म्हणजे काय करायचे?'

'हे बघ बटण दाबले. लाल दिवा गेला, हिरवा दिवा आला. तोही मार्ग समर्थांनी दाखवला आहे बघ.' आजींनी ओवी शोधली.

'मी वाचतो' गणपती म्हणाला.

***काया वाचा आणी मनें । पत्रें पुष्पें फळें जीवनें ।***
***ईश्वरीं अर्पूनिया मनें । सार्थक करावे ।।२/५/३७।।***

आजींनी खुणेने सांगितले. पुढची पण वाच.

***येथानुशक्ती दान पुण्य । परी भगवंती अनन्य ।***
***सुखदुःखें परी चिंतन । देवाचेंचि करावें ।।२/५/३८।।***

'शाब्बास' आजी म्हणाल्या, 'समजलं जया. पुस्तके द्या किंवा सदरा चड्डी द्या. खाऊतला खाऊ द्या किंवा भुकेल्याला अन्न व तहानलेल्याला पाणी द्या. पण भगवंताला देत आहोत हा भाव असू दे. म्हणजे ती भक्ती ठरते. सुखाचे, आनंदाचे काळातंच भक्ती घडते. दुःखात त्याचा विसर पडतो. हा दुःखाचा प्रसंग काही विशिष्ट हेतूनेच घडवून आणला असे समजून त्याही प्रसंगी त्याचे स्मरण करावे.'

'आजी,' सुधा म्हणाली, 'लोकमान्य टिळकांनी मंडालेच्या तुरुंगात सुद्धा स्नान संध्या सोडली नाही, गीता रहस्य हा ग्रंथ लिहिला'

'आणि सावरकरांचे तर हालच हाल' मधू म्हणाला, 'तरी अंदमानात त्यांनी कमला काव्य रचले. कोळशाने दगडी भिंतीवर लिहून मुखोद्गत केले.'

'येईल त्या परिस्थितीला तोंड द्यायचे. पण भक्ती सोडायची नाही. असे तुकारामांचे चरित्र सांगते.' जया म्हणाली.

'खरं आहे, ईश्वरी कृपा ही' आजींनी हात जोडले.

'आजी, आम्हाला आशीर्वाद द्या. आम्हीपण असे मोठे होऊ.' गणपती म्हणाला.

सगळयांनीच आजींना नमस्कार केला.

'व्हाल. व्हाल बरं!' आजी अश्रूपूर्ण नेत्रांनी म्हणाल्या.

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**



## दिवस ४ था

'पैज . . . . पैज' गणपती म्हणाला.

'हो हो. पैज! कशाची? ते बोल आधी.' विलास म्हणाला.

'पण पैजे पर्यंत कां आलात?' मधुकर दोघांच्यात मिसळला.

विलास म्हणाला, 'मी आजींना आत्ता अर्ध्या तासापूर्वी टांग्यातून उतरतांना पाहिले. नुकत्याच गावाहून आल्या. मग आज त्या दासबोधाला सुटीच सांगतील.'

गणपती म्हणाला, 'मी पैजेवर सांगतो. आजींना आळस नाही. कंटाळा नाही. थकवा नाही. त्यांना ज्ञानदान म्हणजे आनंद वाटतो. त्या नक्की नेहमी सारख्याच पडवीवर येणारच मला खात्री आहे. म्हणून पैजेवर बोलत होतो.

तिघे अंगणातच बोलत आहेत तोपर्यंत आजी हात पुसत बाहेर आल्याच. 'या बाळांनो, आंगणातच कां घोटाळलात?'

विलास म्हणाला, 'मला वाटलं आज सुटीच मिळेल. गणपती पैज लावून बोलत होता. 'आजींचा उत्साह दांडगा. त्या सुट्टी घेणार नाहीत. त्याचं खरं झालं.'

'बसा. सुट्टी कशाला?' आजी म्हणाल्या, 'आत्ताच गावाहून आले म्हणून? त्यांत काय झालं? थकवा कसला? मी का पायी आले? गाडीतले कपडे बदलायचे. म्हणून हातपाय धुतले. कपडे बदलले. आज एकादशीच आहे. जेवणाचा प्रश्नच नाही. बसा. सुधा सापडला का दासबोध? वरच्याच पिशवीत आहे.'

'म्हणजे? सुधा आमच्या आधीच आली की काय? जया सुद्धा आली. आजी तुम्ही गावाला जातांना पण दासबोध बरोबर नेता?' विलास एका दमात सारे बोलला.

'विलास, दासबोध माझा मित्रच. आनंद मिळतो वाचतांना. समर्थांशीच बोलत आहोत असं वाटतं. हे पहा एकदा निश्चय केला की तो कधीही मोडायचाच नसतो.

मधुकर म्हणाला, 'ते खरं पण थोडी विश्रांती म्हणून झोप तरी!'

'झोप आणि दुपारी? हे तर पक्के आळसाचे लक्षण.' आजी म्हणाल्या. 'आलीच

सुधा. सापडला नं! आण. समर्थ काय म्हणतात त्याला दाखवते.'

आजींनी चटकन दासबोध उघडला. नेमके पान काढले.

'बघ. मधू, समर्थ काय म्हणतात.' आजींनी त्याचे हाती दासबोध दिला.

गधूने ओवी वाचली.

***अखंड भ्रांती पडे । केला निश्चय बिघडे ।***
***अत्यंत निद्रा आवडे । तो तमोगुण ।।२/६/८।।***

आजी म्हणाल्या, 'आलं लक्षात? केलेला निश्चय बिघडला, मोडला, झोपेच्या आधीन झाला, सारखा संशयांत गुरफटला की समजावं तो माणूस पक्का तमोगुणांत सापडला. तमोगुण जीवाला देहसुखाकडे सारखा खेचत असतो. मग सत्वगुणामुळे होणारी चांगली कामे बारगळतात. पुढे पुढे तर . . . . मधू, तूच वाच ही पुढची ओवी

***सत्कर्मे ते नावडती । नाना दोष ते आवडती ।***
***पापभय नाहीं चित्तीं । तो तमोगुण ।।२/६/१८।।***

'बाळांनो,' आजी म्हणाल्या, 'चांगली कामे हातून होता होता करु नये असे तीव्रतेने वाटले की समजावे या आळसाने शरीराला घेरलंय. मग मनुष्य शुद्ध अशुद्ध, योग्य अयोग्य विचारच करीत नाही. हवे तसे वागतो. गैरकर्मे हातून घडणे म्हणजे पापच.'

'पण आजी,' त्यांना थांबवत विलास म्हणाला, 'अशी माणसे तर आनंदात राहतात. रहायला बंगले असतात. दाराशी मोटारी असतात. पैशाची लयलूट असते.'

'बरोबर आहे तुझ म्हणणं' आजी म्हणाल्या, 'पण तो बेगडी आनंद, क्रोधाला पोसत असतो. संतांची शिकवण तर सोडच. जगाचं तर सोडच, पण प्रत्यक्ष आई वडिल भाऊ बहिण कोणाचीच शिकवण त्याला हिताची वाटत नाही. कोणाचेच चांगले वागणे त्याला पटत नाही. फट्ट म्हटले की तट्ट होतो. आपल्याच पायावर आपणच धोंडा पाडून घेतो. समर्थ म्हणतात . . . . '

गणपती पुढे सरसावला, 'मी सांगतो म्हणजेच वाचतो समर्थ काय म्हणतात ते!'

'वाच वाच.' आजी म्हणाल्या, 'ज्येष्ठ बंधू' अशी सुरवात बघ.'



***ज्येष्ठ बंधु बाप माये । त्यांचीं वचनें न साहे ।***
***सीघ्र कोपी निघोन जाये । तो तमोगुण ।।२/६/२६।।***

'शाबास,' आजी म्हणाल्या, 'ऐसा हा तमोगुण पतनास कारण म्हणून त्याच्यापासून लांबच रहावे हे बरे.'

जया म्हणाली, 'तमोगुणापासून लांब रहायचं. रजोगुणाला फार थारा द्यायचा नाही. मग आपोआपच काय होईल?'

सुधा म्हणाली, 'चांगला असलेला सत्वगुण वाढीस लागेल. सत्वगुणाचे लक्षण कोणते आजी?'

'सांगते . . .

***संसार दुःख विसरवी । भक्तिमार्ग विमळ दावी ।***
***भजनक्रिया उपजवी । तो सत्वगुण ।।२/७/१०।।***

या सत्वगुणाने जीवनातल्या सर्व दुःखांचा शेवट होतो.'

गणपती जरा भीतभीतच म्हणाला, 'म्हणजे समजा आपण नापास झालो तर सत्वगुणामुळे दुःख होणार नाही कां?'

'नापासच काय?' आजी म्हणाल्या, 'चोरी होणं, आग लागणं, काही वस्तू हरवणं, जवळचं प्रेमाचं माणूस मरणं या सगळ्या दुःखी घटनांकडे तो सत्वगुणी माणूस वेगळ्या नजरेने पहातो. दुःख कमी होते. कारण त्याचे दुःख करणारे मन भगवंताचे भक्तीकडे वळलेले असते. दुःखाच्या प्रसंगात पण त्याचे भजन रहात नाही. आपणही भजन करतो व दुसऱ्याला करायला लावतो. असा असतो सत्वगुण. विलास, तो सत्वगुणी माणूस बोलतो, चालतो कसा? वाचतोस?'

'वाचतोस कां म्हणून का विचारता? वाच, असेच म्हणा. आणा तो दासबोध.' विलासने दासबोधाचे पान उलटवले. घसा खाकरला.

'शब्द कठीण न बोले . . . . हं. म्हणजे मी रागावून कधी कधी फटकन बोलतो म्हणून आजींनी ही ओवी मला दाखवली हं!'

सगळेच हसले. विलासही मोकळेपणी हसला.

***शब्द कठीण न बोले । अतिनेमेंसी चाले ।***
***योगी जेणें तोषविले । तो सत्वगुण ।।२/७/३७।।***

'आलं लक्षात. सत्वगुणी व्हायचं म्हणजे कठोर शब्द, दुसऱ्याला लागेल असा शब्द कधी बोलायचाच नाही. केलेला नेम म्हणजे नियम चुकवायचा नाही. पण हे 'योगी तोषविले' म्हणजे काय?'

आजी म्हणाल्या, 'कोणी संत महात्मे, आदर्श व्यक्ती, वडिल, ज्येष्ठ श्रेष्ठ माणसे, भक्ती भावाने वागणारे या साऱ्यांना संतोष होईल, आनंद वाटेल असे वागणारा तो सत्वगुणी समजावा. त्याच्याजवळ आणखी कोणते चांगले गुण असतात माहीत आहे?'

गणपतीने दासबोध विलासकडून घेतला, 'सांगा मी वाचतो. बावन्न कां? अं. हं . . .हं . . . सापडली.'

***शांति क्ष्मा आणि दया । निश्चये उपजे जया ।***
***सत्वगुण जाणावा तया । अंतरीं आला ।।२/७/५२।।***

पण हे 'क्ष्मा' काय भानगड आहे?'

'क्ष्मा म्हणजे क्षमा.' आजींनी उलगडा केला. 'शांत रहाणे, क्षमा करणे, दयाळू वृत्तीने वागणे जमले की तो सत्वगुणी झालाच. सोप आहे हे. अशा सत्वगुणाने आत्मज्ञान लवकर होते.'

***श्रवण आणी मनन । निजध्यासें समाधान ।***
***शुद्ध जालें आत्मज्ञान । तो सत्वगुण ।।२/७/६१।।***

संतांची शिकवण ऐकावीशी वाटते. त्यावर विचार करावासा वाटतो. सारखा छंदच लागतो. स्वस्वरूपाचे, आतल्या दिव्य चैतन्याचे ज्ञान होते. असा आहे हा सत्वगुण.

विलास म्हणाला, 'आजी, हे दिव्य चैतन्य बैतन्य मला काहीच कळलं नाही. पण मी एक विचारतो. काल आमच्या घरासमोर ५/६ मुले गोट्या खेळत होती. त्यांच्यात भांडण झाले. एका लहान मुलाला आळीपाळीने दुसरी मुले मारीत होती. मी सोडवायला निघालो आई म्हणाली, 'जाऊ दे. रानवट मुले ती. झोपडपट्टीतील मुले. तुलाही मारायला कमी करणार नाहीत. नको जाऊस बाहेर.' पण मला रहावलं नाही. मी हळूच बाहेर पडलो. त्यांचे भांडण सोडवले. त्या लहान मुलाला आनंद वाटला. मी त्यांना गोट्याचा



खेळ समजावून दिला. मग मी चांगलं केलं की वाईट?

आजी म्हणाल्या, 'दासबोधातच याचं उत्तर आहे बघ.'

***कोणी येकास मारी । तयास जाऊन वारी ।***
***जीव बंधन मुक्त करी । तो सत्वगुण ।।२/७/७५।।***

बाळांनो, वारी म्हणजे निवारण करतो, भांडण मिटवतो. समर्थांनी किती बारीक बारीक लक्षणे सांगितली. विलास, अशी भांडणे केव्हा मिटविता येतात माहीत आहे? दुसऱ्यावर आपली छाप केव्हा बसते? सुधा आठवा समास काढ.' सुधाने ओवी वाचली.

***सत्यवचनी शुभवचनी । कोमळ वचनी येकवचनी ।***
***निश्चय वचनी सौख्यवचनी । सर्वकाळ ।।२/८/१७।।***

'छान,' आजी म्हणाल्या, 'तो नेहमी खरेच बोलतो. शुभ चांगले प्रसन्न वाटेल असेच बोलतो. तो चांगल्या गुणांची खाणच जणू!'

सुधा म्हणाली, 'असा मनुष्य सगळ्यांचाच मित्र होईल. यांत काय नवल?'

आजी म्हणाल्या, 'खरं आहे तुझं म्हणणं. पुढचीच चौथी ओवी वाच.'

***मित्रपणें परहितकारी । वाग्माधुर्य परशोकहारी ।***
***सामर्थ्यपणें नेत्रधारी । पुरुषार्थे जगमित्र ।।२/८/२१।।***

सुधाची ओवी वाचून झाल्याबरोबर मधुकर म्हणाला, 'मी सांगतो अर्थ, असा चांगल्या गुणांचा मनुष्य सगळ्यांशी मित्रभावाने वागतो. हा मित्र तो शत्रू असा भेद नाहीच. मित्रभावामुळे दुसऱ्याचे दुःख निवारण करावे हीच त्याची तळमळ असते. तो अतिशय गोड बोलतो. व दुसऱ्याचा शोक, दुःख दूर करतो.'

जया मध्येच म्हणाली, 'आजींच्या सारखंच म्हण की!'

'हो, हो तस्संच. बरोबर आहे. असा मनुष्य आपल्या सत्तेमुळे सामर्थ्यामुळे सर्वावर प्रेम करुन आपली शक्ती प्रस्थापित करतो. सज्जन, अनाथ सगळ्यांनाच तो प्रेमाने वागवतो. हाच त्याचा पुरुषार्थ. लहानपणापासून शिवाजी राजेंना हे जमलं म्हणून ते महाराष्ट्राचे राजे म्हणून मान्यता पावले. होय ना आजी?'

'मधू बरोबर आहे तुझं म्हणणे!' आजी म्हणाल्या.

***रूप लावण्य अभ्यासितां नये । सहज गुणास न चले उपाये ।***
***कांहींतरी धरावी सोये । अगांतुक गुणाची ।।२/८/३१।।***

आजींची ओवी पूर्ण झाल्याबरोबर मधू म्हणाला, 'आजी, ही ३१वी ओवी तुमची पाठच आहे की! न वाचता म्हणालांत.'

'मधू, नुसती ओवीच नव्हे. त्याचा अर्थ रोजच लक्षांत ठेवावा व तसे वागावे हाच तर दासबोधाचा हेतू. मी अर्थ सांगू?' आजी म्हणाल्या.

'नको, नको. आम्ही उद्या लिहून आणू. तो पर्यंत ओवी पण पाठ करु.' मधू म्हणाला.

विलास हळूच म्हणाला, 'पण ते अगांतुक काय ते नाही मला कळलं.'

सुधा म्हणाली, 'मी सांगू आजी? जे गुण, अर्थात चांगले गुण हं, ते आज आपल्यात नाहीत ते. त्यांना अगांतुक गुण म्हणतात. असा एकेक तरी चांगला गुण अर्थ लिहितांना ठरवू या व आत्मसात पण करू या.'

'संकल्प छान सोडलांत हं. असंच अभ्यास करत करत पुढे जाण्यासाठी काय कराव माहीत आहे?' आजींनी जयाच्या हाती दासबोध दिला. 'वाच ही ओवी.'

***स्नान संध्या जप ध्यान । तीर्थ यात्रा भगवद्भजन ।***
***नित्यनेम पवित्रपण । अंतर शुद्ध असावें ।।२/९/२०।।***

विलासने शंका विचारली, 'हे सगळे शाळा करता करता कसे जमावे?'

आजी हसल्या, 'स्नान करतोसच ना? तेव्हा अर्थशीर्ष म्हणतोस ना? तो संपल्यावर २ मिनीटे शांत चित्तपणे देवाला नमस्कार हेच संध्या ध्यान. संध्याकाळी रामरक्षा म्हणतोस ना? नियमाने वागायचे असे आता आपण ठरवतोच आहोत. अशा वागण्याने आपले अंतःकरण शुद्ध पवित्र होतेच होते. मग काय होते? विरक्तता आपोआप येते.

***विरक्तें समय जाणावा । विरक्तें प्रसंग वोळखावा ।***
***विरक्त चतूर असावा । सर्व प्रकारे ।।२/९/२८।।***

'समर्थांनी इशारा देऊन ठेवलाय. प्रसंगमान पाहून वागावे. वेळ कशी आहे ते पाहून चातुर्याने, शहाणपणाने, विचारपूर्वक वागावे.'



गणपती म्हणाला, 'पण हे विरक्ते विरक्ते काय आहे?'

आजी हसल्या, 'गणपती, प्रांजलपणे भगवंताची भक्ती करता करता थोड्या प्रमाणांत कां होईना पण जगातला खोटेपणा, वाईटपणा ओळखता येतो मन भक्ती मार्गात रमू लागलं की त्याला जगातलं बेगडी प्रेम नकोच वाटतं. तो वागतो इतरांसारखाच. पण आतून सतत भगवंताचे स्मरण चालू असते. त्याला 'विरक्त' म्हणतात. असा विरक्त कीर्तीमान होतोच होतो. चातुर्याने वागल्यामुळे कोठेही फसत नाही.'

मधुकर म्हणाला, 'पण आपल्याला तर अनुभव असा येतो की, बरीचशी माणसे व्यवहारांत फसतातच. ते कां?'

आजी म्हणाल्या, 'सांगते. कांही माणसे दुसऱ्याची पारख न करता बुद्धी चातुर्य न वापरता वागतात म्हणून फसतात. व काही पढतमूर्खाप्रमाणे वागतात म्हणून फसतात. पढतमूर्ख म्हणजे स्वतःलाच फार शहाणे समजणारे, पण शहाणपणाने न वागणारे. त्यांना पढतमूर्ख म्हणतात. अंगी गुण नसताही समाजात प्रतिष्ठा वाढवायचा प्रयत्न करतात ते पढतमूर्ख. त्यांच्याबद्दल समर्थ म्हणतात . . .

***नाहीं भक्तीचें साधन । नाहीं वैराग्य ना भजन ।***
***क्रियेविण ब्रह्मज्ञान । बोले तो येक पढतमूर्ख ।।२/१०/२३।।***

असा पढतमूर्खपणा अंगी केव्हा चिकटतो माहीत आहे . . .

***रात्रंदिवस करी श्रवण । न संडी आपुले अवगुण ।***
***स्वहित आपलें आपण । नेणे तो येक पढतमूर्ख ।।२/१०/३०।।***

चांगलं चांगलं वाचून, चांगलं चांगलं शिकून, चांगलं चांगलं ऐकून सुद्धा जो अवगुण सोडत नाही तो पढतमूर्ख, आपले कल्याण कशात आहे हे जो जाणून घेत नाही. तो एक पढतमूर्ख. असं पढतमूर्ख आपल्याला व्हायचं आहे का?

'नाही, नाही, नाही.' सगळयांचा एक आवाज आला.

आजींना आनंद वाटला. दासबोध मिटला.

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**

## दिवस ५ वा

आज सगळे उल्हसित मनानेच आले होते. प्रत्येकाच्या हातात कागद होता. कालच्या ओवीचा अर्थ सगळयांनीच लिहून आणला होता. प्रत्येकाला वाटे माझा कागद आजींनी प्रथम पहावा. जो तो कागद पुढे पुढे करु पाही.

आजी हसल्या, 'हे पहा आपण गंमत करु या. सगळेच स्पर्धक. सगळेच परीक्षक होऊ या. आणा कागद. सगळयांचे एकत्र करु या. आजींनी पत्ते पिसतात तसे कागद २/३ वेळा मागपुढे केले. प्रत्येकाचे हाती एकेक कागद दिला. जयूचा गणपतीकडे गेला. गणपतीचा सुधाकडे आला. असे कागद वाटल्यावर आजी म्हणाल्या, 'हा निबंध नाही. साधा ओवीचा अर्थ आहे. मी सांगते तसेच नको पण जरा आसपास तसाच अर्थ आहे की नाही हे प्रत्येकाने आपल्याला मिळालेल्या कागदावर पहायचे. शुद्ध लेखनाच्या चुका बघत बसू नका. फक्त अर्थ पहा.'

सगळयांना आनंद झाला. सगळयांचाच अर्थ बरोबर होता. पुन्हा कागद ज्याचा त्याला दिला. कोणीच चुकले नव्हते. आळसही कोणी केला नव्हता. तरी गणपतीची तक्रार होती.

'आजी, विलासने पण छान लिहिले न? पण तो म्हणत होता की त्याला नीट येणार नाही. तो आज येणारच नव्हता.'

आजी म्हणाल्या, 'विलास, आपण सारे भगवंताचेच अंश आहोत. सर्वांना बुद्धी आहेच आहे. भगवंताचे जर अखंड स्मरण ठेवूं तर आपण पुण्यवान. जर त्याला विसरून कर्म करु तर आपण पापी,

आपला जन्म व्हायच्या आधीच आपल्या मातेच्या उदरांत असतानाच आपल्याला आपण कोण? हे ज्ञान झालेले असतेच. त्याला स्वस्वरूपाचे ज्ञान म्हणतात. अगदी तुला मला सगळयांना सारखेच ज्ञान असते. पण जन्म झाल्यावर वातावरण, भोवतालची परिस्थिती बदलते. संस्काराप्रमाणे बुद्धी कोणाची विकास पावते कोणाची मंद होते. समर्थांनी स्पष्टच केलय बघ



***जन्म कर्माची आटणी । जन्म पातकाची खाणी ।***
***जन्म काळाची जाचणी । निच नवी ।।३/१/२।।***

मागच्या जन्मी केलेल्या कर्माचे भोग भोगण्यासाठीच हा जन्म मिळाला. भोवतालचे जग जीवाला आपल्याकडे खेचून घेते. मग जीव सुखाच्या मागे लागतो. देवाला विसरतो.'

विलासने विचारलेच, 'पण देव तर दिसत नाही. मग देवाचे स्मरण तरी कसे करायचे? व कां करायचे?'

'छान, सांगते हं.' आजी म्हणाल्या, 'तुला भूक लागते की नाही? थोडी भूक असली तर लाडू चिवडा खातोस. पुष्कळ भूक असली तर जेवतोस. बरोबर ना? त्यातून तुला आनंद होतो. किती काळ टिकतो?'

'पुन्हा भूक लागेपर्यंत.' विलासने उत्तर दिले.

'म्हणजेच खाण्याचे वा जेवणाचे सुख फार काल टिकत नाही. पुन्हा खावेसे वाटते. पण जो भगवत भजनात रमतो त्याची तहान भूकच हरपते.

जीव पूर्ण सुखी व आनंदी असून जन्म घेऊन या देहात अडकतो. आणि भगवंताच्या ज्ञानाचा विसर पडतो. ही बघ ओवी'

सुधाने दासबोध उघडलाच. 'जन्म सुखाचा विसर असे असेल बघ.' 'सापडली' सुधा म्हणाली.

***जन्म सुखाचा विसर । जन्म चिंतेचा आगर ।***
***जन्म वासना विस्तार । विस्तारला ।।३/१/५।।***

आजी म्हणाल्या, 'गणपती, अभ्यास झाला नाही. पेपर लिहिले. पण चांगले लिहिले गेले की नाही ही भीती. म्हणून चिंता वाटू लागली. मग काळजी जन्माला आली. मी पास होईन की नाही?

विलास, ओवीचा अर्थ कसा लिहावा ही भीती? त्यामुळे मला लिहिता येईल की नाही ही चिंता. पण प्रयत्न केला तर येत ना?'

मधुकर म्हणाला, 'म्हणजे भीतीच्या पोटीच चिंता उत्पन्न होते. मग भीतीच घालवून टाकायची. म्हणजे काळजीच करायला नको. असंच ना?'

'शाबास. अस्संच. वासना म्हणजे इच्छा. इच्छा अगदी सूक्ष्म व चिकट असते. तिलाच कोणी कल्पना म्हणतात. या वासनेमुळेच जीवाला जन्म घ्यावा लागतो. तो देह धारण करतो. मातेच्या उदरांत असतो तोपर्यंत म्हणतो. काय म्हणतो?'

***गर्भी म्हणे सोहं सोहं । बाहेरी पडतां म्हणे कोहं ।***
***ऐसा कष्टी झाला बहु । गर्भवासी ।।३/१/४७।।***

विलास म्हणाला, 'हे सोहं, सोहं काय भानगड आहे?'

मधुकर म्हणाला, 'भानगड बिनगड नाही. आत्ताच आजींनी सांगितले नाही कां? जीव ईश्वराचाच अंश. सोहं म्हणजे 'मी ईश्वर आहे' कोहं म्हणजे 'मी कोण आहे?'

विलास म्हणाला, 'मग सांगायच की मी विलास आहे, मी मधुकर आहे.'

आजी हसल्या, 'विलास हे देहाचे नाव. देहाला ठेवलेले नांव. जीवाचे नव्हे. हे कोणाला कळते माहीत आहे?' आजींनी जयाला ओवी दाखवली.

***जो भगवंताचा भक्त । तो जन्मापासून मुक्त ।***
***ज्ञानबळें विरक्त । सर्वकाळ ।।३/१/५२।।***

विलास म्हणाला, 'आजी, विरक्त म्हणजे जो कशातच गुंतत नाही तोच ना? भगवंताचा भक्त जर गुंतत नाही तर सगळेच कां भक्त होत नाहीत? सगळेच कां मुक्त होत नाहीत?'

'छान विचारलेस,' आजी म्हणाल्या, 'असे विचारल्यानेच आपले अज्ञान दूर होते. आपल्याला ज्ञान होते.'

गणपती म्हणाला, 'त्याच्या विचारण्याने आम्हाला पण कळते.'

'थांब तू मधे मधे बोलू नकोस. आजी सांगा, सगळेच कां भक्त होत नाहीत?'

'सांगते,' आजी समजावू लागल्या. 'जन्माच्या आधी मी ईश्वर हे जीवाला माहीत असते. पण विसरतो हे सांगितलेच. पुढे जरा १२/१५ दिवसाचा झाल्यापासून काय होते?

***सुख पावे मातेजवळी । दुरी करितांचि तळमळी ।***
***अतिप्रीति तये काळीं । मातेवरी लागली ।।३/२/१५।।***



प्रेमाचा विषय बदलला, माताच प्रिय वाटू लागली. कोठपर्यंत? चार मुलांच्यात मिसळण्या इतके वय होईपर्यंत. मग त्याला खाऊ, खेळणी, मित्र म्हणजे बरोबरीची मुले मुली हेच सदैव प्रिय वाटू लागले.

बालपण दुखण्याशिवाय जातच नाही. दात येणे, गोवर - कांजिण्या - खोकला - अपचन. एक ना दोन! मरतो का जगतो असे होता होता औषधपाणी केले. गुण आला. आता तो चांगला मोठा झाला.

'आजी, तो तो म्हणजे कोण? त्याला कांही नांव नव्हते कां?' मधुने विचारले.

'मधू, समर्थांनी एका सामान्य माणसाचे उदाहरण दिले आहे. ती गोष्ट तुम्हाला सांगते आहे.' आजी म्हणाल्या, 'नावच म्हणतोस तर आपण त्याला गोविंदा म्हणू. चालेल?'

'चालेल' जया म्हणाली, 'आजींना गोविंदा नांव फार आवडते.' आजी हसल्या.

'हं मग काय झालं?' आजी म्हणाल्या, 'गोविंदा मोठा झाला. लग्न ठरले.

***नोवरी आलियां घरा । अती हव्यास वाटे बरा ।***
***म्हणे मजसारिखा दुसरा । कोणीच नाहीं ।।३/२/३९।।***

'वारे गोविंदराव, म्हणजे आता तो बायकोवर प्रेम करु लागला. असच ना?' गणपती म्हणाला.

'हो.' आजी म्हणाल्या, 'पण पुढे दैवगती अशी की -

***ऐसी अंतरप्रीती जडली । सर्वस्वाची सांडी केली ।***
***तव ते मरोन गेली । अकस्मात भार्या ।।३/२/५८।।***

गणपतीच्या मांडीवर थाप देऊन विलास म्हणाला, 'अरेरे!'

'फार वाईट झालं नाही!' गणपतीने त्याच्या पाठीवर दोन थापट्या मारल्या.

सुधाच्या, जयाच्या हे लक्षात आलं. दोघी हसल्या.

मधु म्हणाला, 'आजी पुढं काय झालं?'

आजी म्हणाल्या, 'काय व्हायच? पुन्हा शुभ लग्न सावधान.' सगळयांनी टाळया वाजवल्या.

'तिच्या प्रेमापोटी भजन पूजन घडेना. कथा कीर्तन जाणे बंद. गोविंदराव दान धर्म कांहीच करेनासा झाला. देह व्याधींनी पीडला. चैनच चैन, कर्ज झाले. घरांत चोरी झाली. चारी बाजूंनी दुःखच दुःख. मोठे दुःख पाळणा हलला नाही.'

'म्हणजे काय आजी? विलास म्हणाला.

'आजींच्या हाताकडे बघना! त्याला बाळ हवे होते. ते झाले नाही. असेच ना आजी?' गणपती म्हणाला.

आजींनी होकारार्थी मान हलवली. 'खूप नवस सायास केले. उपास तापास केले. देव पावला एकदाचा.

***लेंकुरें उदंड जालीं । तों ते लक्ष्मी निघोन गेली ।***
***बापडी भिकेसी लागलीं । कांहीं खाया मिळेना ।।३/४/१।।***

गोविंदरावांचा खर्च तर खूप वाढला. मुले मोठी झाली. मुली लग्नाच्या झाल्या. मुलांची लग्ने झाली. मुलींच्या लग्नाकरिता खर्च करायला पैसा नाही. कर्जही कोणी देईना. म्हणून गोविंदराव कामधंदा बघायला दूर गांवी गेले.

कष्ट कर करुन मिळवले. घरी आले तो गाठोड्यापाशी लेकरांची झटापट. बायकोचा तगादा सुरु झाला. 'हे आणलेत ते आम्ही खर्चाला वापरु. हे संपत नाही तो पर्यंत पुन्हा मिळवून आणा.'

गोविंदराव विचार करु लागले. 'कुठे गेले प्रेम?' 'थकलास बाबा!' असं म्हणायला आई तरी जवळ असायला हवी होती. कोणालाच कींव येत नाही. जातो बिचारा!'

पुन्हा गाठोडी जमवली. घरी येतो तो दुष्काळ. पाऊस नाही. पीक नाही. अन्न नाही. मुले पण पटापट दुखण्याने गेली. बायकोपण अन्नान्न करीत उपासमारीने मेली. दोन चार मुले उरली. गोविंदराव कपाळाला हात लावून बसले.

'मग पुन्हा लग्न करायचे!' विलास म्हणाला. सगळे हसले.

आजी म्हणाल्या, 'तस्संच झाले. आता गोविंदराव म्हातारे झाले. बायको तरुण रुपवती. घरांत सावत्रपणा वाढला. त्यामुळे भांडणे सुरु झाली. कशाला या फंदात पडलो असे झाले.'



मुलांनी वेगळे बिऱ्हाड थाटले. गोविंदरावांना घराबाहेर घालवले. तरुण बायको. म्हातारा नवरा. आता गंमत ऐका.

***अकस्मात धाडी आली । कांता बंदीं धरून नेली ।***
***वस्तभावही गेली । प्राणीयांची ।।३/५/२८।।***

बायको मुसलमानांनी पळवली. बाटवली. किती दुःख करणार? रड रड रडले गोविंदराव. आता गोविंदरावांना आठवले.

***द्रव्य नाहीं कांता नाहीं । ठाव नाहीं शक्ती नाहीं ।***
***देवा मज कोणीच नाहीं । तुजवेगळें ।।३/५/३४।।***

बाळांनो, मला सांगा दिवस चांगले असतांना, शक्ती असतांना देवाला भजले पुजले नाही. जप जाप्य नाही. आता देव पावेल कां?

देह थकला. रोगांनी जोर केला. पेलाभर पाणी द्यायला पण जवळ कोणी नाही. फक्त मृत्युने जवळ करावे तर तोही लवकर येईना.

हालच हाल. अशी हाल अपेष्टांची पाळी आपल्यावर येऊ नये म्हणून संत इशारा देत आहेत. 'कोणी नाही कोणाचे रे । सारे सुखसंपत्तीचे ।'

विलासने विचारले, 'आजी, त्या गोविंदरावांना कोणी आजी भेटल्या नाहीत कां?'

आजी हसून म्हणाल्या, 'भेटल्या असतीलही. पण मनुष्य देह सुखाला लालचावला की तो कोणाचीही शिकवण मनात धरत नाही. कोणाला मानतच नाही. म्हणून या यातनेतून सुटावे. अशी इच्छा असेल तर समर्थ म्हणतात . . . '

आजी पुढे काही बोलणार तोच जया म्हणाली, 'आज त्या गोविंदरावांच्या गोष्टीमुळे आम्हाला वाचनच घडले नाही. आजी, मला सांगा कोणती ओवी वाचू?'

'वाच, ५६ वी वाच' आजी म्हणाल्या, 'फारच गोड इशारा'

***भगवद्भजनावांचुनी । चुकेना हे जन्म योनी ।***
***तापत्रयांची जाचणी । सांगिजेल पुढे ।।३/५/५६।।***

विलासला शंका आलीच. 'आजी भगवंताचे भजन केले की पुन्हा जन्म येतच

नाही कां? असे जर असेल तर नेमके कोणते भजन करावे? आणि ते शाळाशाळातून पाठ का करुन घेत नाहीत? दुसरंच कशाला भाराभर शिकवत बसतात.

सुधा म्हणाली, ' विलास, भजन म्हणजे नुसती वन्दे मातरम् । सारखी प्रार्थना नव्हे. सध्या,' या भारतात बंधूभाव नित्य असू दे.' मुले मुली शाळाशाळातून म्हणतातच न? पण वर्गात आल्याबरोबर बंधूभाव कितपत टिकतो? मारामारी भांडणे चालूच.

विलास म्हणाला, 'लहान मुलेच काय मोठी माणसे पण खूपच भांडतात.'

आजी म्हणाल्या, 'म्हणूनच आपण नेकीने वागू. भगवंताचे नित्य स्मरण, भजन म्हणजे काय? हे दासबोधातून समजावून घेऊ या. आयुष्यभर तसे वागू या. ५ घरे तरी सुधारतील की नाही?'

'नक्कीच सुधारतील. पाच घरे नाही तरी आम्ही ५ जण सुधारुच.' मधू म्हणाला. आजींना आनंद झाला. हात जोडले.

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**

## दिवस ६ वा

मधुकर आजींना सकाळीच सांगून गेला. 'मी लवकरच येतो. पण मी आल्याशिवाय दासबोध सुरु करु नका.'

गणपती, विलास, जया, सुधा चौघेही वेळेवर आले. मधुकरला थांबू या म्हटले तर शिस्तीचे उल्लंघन केल असे होईल. मग आजींनी युक्ती काढली.

'गणपती आज संकष्टी आहे. पुन्हा अंगारिका चतुर्थी आहे.' आजी म्हणाल्या.

'अंगारिका म्हणजे काय?' विलासने विचारले.

'मंगळवारी संकष्टी असली की त्याला अंगारिका संकष्टी म्हणतात.' सुधाने खुलासा केला.

'बरोबर, तुम्ही अथर्वशीर्ष रोज म्हणता न? बघू या बरं, कोणाकोणाचे पाठ आहे ते!' आजींनी विचारले.



'आम्ही दोघे एकदम म्हणतो.' विलास म्हणाला, 'माझं पाठ आहे पण एकटा म्हणू लागलो की चुकतो. आम्ही दोघे रोज एकत्र म्हणतो.'

'चालेल.' आजी म्हणाल्या.

दोघांचे म्हणून झाल्यावर 'आता आम्ही दोघी एकदमच म्हणतो.' जया म्हणाली, दोघींचे म्हणून होते न होते तो मधू पळतच आला.

'स्वारी कोठे गेली होती?' गणपतीने विचारले.

मधुकरने घाम पुसला. 'सांगतो,' मधू सांगू लागला, 'सकाळीच सुहासकडे गेलो होतो. तो तापाने आजारी आहे. त्याला दवाखान्यात नेले. तेथेच चार दिवस ठेवणार आहेत. त्याचे जवळ २ तास बसलो. आजी त्याच्या घरांत सगळेच कसे आजारी हो. त्याच्या लहान बहीणीच्या डोक्यात उवा झाल्याचं निमित्त. फोड आले आहेत. औषध लावतांना रडते. वडीलांच्या पायाला भेगा पडल्या आहेत. जळवात आहे म्हणे. त्यात माती शिरली आहे. पाय् सुजलाय. ठणकतो सारखा. चालता येत नाही.

सुहासची आई सगळयांचं करुन करुन दमते. त्यांना दमा सर्दी खोकला. सारखं कांही ना कांही होत असतंच. सगळेच त्रस्त. पैसा आहे. पण सुख नाही.'

'परस्पर दवाखान्यातून आलास कां? पाणी पी जरा.' आजी म्हणाल्या, 'बाळांनो, या सगळया भोगांना, दुःखांना काय म्हणतात माहीत आहे?'

विलास म्हणाला, 'हा सगळयांचा भोग. दुसरं काय?'

'ते खरंच.' आजी म्हणाल्या, 'समर्थ दासबोधात त्याला अध्यात्मिक ताप म्हणतात. ही बघ ओवी.'

सुधाने दासबोध उघडला. आजींनी ओवी दाखवली.

***देह इंद्रिये आणी प्राण। यांचेनि योगें आपण ।***
***सुख दुःखें सिणे जाण। या नाव अध्यात्मिक ।।३/६/१३।।***

'यांत ताप कोठे आहे?' गणपतीने विचारले.

आजी हसल्या. 'गणपती या देहावर जे प्रतिकूल आघात होतात. त्यांना ताप म्हणतात. आत्ता सुहासचा ताप म्हणजे त्याच्या शरीरातली उष्णता वाजवीपेक्षा जास्त

वाढली. तोही अध्यात्मिकच ताप. नाना तऱ्हेची देहाची दुखणी, यादीच करायची म्हटली तर घामोळया पासून गंड माळा पर्यंत, नखुर्ड्यपासून कुष्ठरोगापर्यंत सर्व दुखणी या अध्यात्मिक तापात येतात. पैसा असून मनुष्य दुःखीच असतो.

'यातून कोणीच मोकळा नसतो. नाही कां?' जयाने शंका विचारली, 'काही ना काही कुरकुर असतेच प्रत्येकाची. याचं कारण काय बरं?' आजी म्हणाल्या,

***ऐसा अध्यात्मिक ताप । पूर्व पापाचा संताप ।***
***सांगता सरेना अमूप । दुःख सागर ।।३/६/५५।।***

विलास म्हणाला, 'पूर्व पाप म्हणजे मागील जन्मातले पाप कां? मागची सत्कर्मांची फळे म्हणजे सुख व दुष्कर्मांची फळे म्हणजे नाना दुखणी असेच ना?'

'शाब्बास.' आजी म्हणाल्या, 'आता बरंच कळायला लागलं हं. कोणतेही कर्म चांगलं अगर वाईट त्याचं फळ भोगावच लागत. बरं एवढ्यानेही भागत नाही. पुढे पहा समर्थ काय म्हणतात . . . .'

विलासने ओवी वाचली.

***सर्व भूतांचेनि संयोगें । सुख दुःख उपजों लागे ।***
***ताप होतां मन भंगे । या नांव आदिभूतिक ।।३/७/२।।***

'ही भूतं कोण?' विलासने विचारले.

मधुकर म्हणाला, 'घाबरलास कां भूताला. अरे ही झाडावरची भुते नव्हेत.' सारीच हसत हसत टाळया वाजवू लागले.

आजी म्हणाल्या, 'मुंगी पासून शिंगी पर्यंत कोणाचेही चावणे म्हणजे अधिभूतिक म्हणजेच आधिभौतिक ताप. पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश यांच्यापासून होणाऱ्या त्रासाला काय म्हणायचं?'

'अधिभौतिक ताप.' सुधाने सांगितले.

आजी म्हणाल्या, 'इतकेच नव्हे तर –

***हारवे विसरे आणी सांडे । नासे गाहाळे फुटे पडे ।***
***असाध्य होये कोणीकडे । या नाव आदिभूतिक ।।३/७/४५।।***



वस्तू हरवतात. विसरून रहातात. पुन्हा मिळत नाहीत. नासधूस होते, कांही वस्तू गहाळ होतात, काही खाद्य पदार्थ नासतात. काही फुटतात. तुटतात. तो पण एक तापच. काही वेळेला वस्तू कोठे आहे हे माहीत असते पण मिळणे दुरापास्त होते तो पण आदिभौतिक तापच.

विलास म्हणाला, 'कालच्या गोष्टीत गोविंदरावांची बायको मेली. पोरे मेली ते स्वतः खूप म्हातारे झाले. आजारी पडले तो कोणता ताप?'

'हे बघ विलास,' आजी म्हणाल्या, 'समर्थांनी ते पण सांगितलंय. किती सूक्ष्म निरीक्षण श्रोत्यांना वा ग्रंथ वाचकाला कोणतीच शंका राहू नये. अशी काळजी घेतलीय समर्थांनी. याला म्हणतात जन कल्याणाची तीव्र तळमळ. वाच तूच.' आजींनी ओवी दाखवली.

***बाळपणीं मरे माता । तारुण्यपणीं मरे कांता ।***
***वृद्धपणीं मृत्य सुता । या नांव आदिभूतिक ।।३/७/८०।।***

अबबब! ८०च नव्हे ८७ ओव्या. प्रत्येक ओवीत ५/५ ६/६ दुखण्यांची नावे! काय मेंदू होता समर्थांचा!' विलासने मान हलवीत नमस्कार केला.

'अरे एवढ्याने काय भागतंय? पुढे बघ समर्थ काय म्हणतात ते.' आजी म्हणाल्या.

***शुभाशुभ कर्मानें जना । देहांतीं येम यातना ।***
***स्वर्ग नर्क भोग नाना । या नाव आदिदैविक ।।३/८/२।।***

'आजी थांबा,' गणपती म्हणाला, 'पहिला - देहाची दुःखे, दुखणी पाणी काय नाव? अध्यात्मिक. दुसरा - इतर माणसे पशू पक्षी वनस्पती निसर्ग यांच्यापासून होणारा त्रास - आदिभौतिक आणि आता हा आदिदैविक. तीन तीन ताप. तीन डिग्री तापापेक्षा जास्तच की हो!'

'होय ना बाबा!' आजी दुजोरा देत म्हणाल्या. तरी माणूस सावध होतो आहे कां? पुन्हा गर्तेतच पडतो आहे. काय करतो तो . . .?' मधुने वाचले –

***डोळे झांकून स्वार्थ बुद्धी । नाना अभिळाश कुबुद्धी ।***
***वृत्ति भूमिसि सांधी । द्रव्य दारा पदार्थ ।।३/८/६।।***

'हे वृत्ति भूमिसि' नाही कळलं.' गणपती म्हणाला.

'सांगते.' आजी म्हणाल्या. 'पोट भरण्याचे मुख्य साधन जमीन म्हणजे शेती. शेती व्यवसाय करणारी माणसे स्वार्थ बुद्धीने भाऊ असो. नातलग असो वा शेजारी असो. दोघांच्या जमीनीची सीमा म्हणजे हद्द या हेतूने ठेवलेले दगड दर नांगरणीला फूट फूट सरकवतात. २/४ वर्षात कैक एकर जमीन हडप केली जाते. मोजणी वार दर दहा बारा वर्षांनी मोजणी करतात तेव्हा हे उघडकीला येते. असे कारणाऱ्यास यम यातना भोगाव्याच लागतात.

दुसऱ्याचे द्रव्य चोरणे, बायको पळवणे म्हणजे अपहरण करणे पापच. वस्तू लांबवणे, फसवणूक करणे पापच. त्याने सुद्धा यमयातना भोगाव्या लागतात.

'आजी,' त्यांना थांबवत विलास म्हणाला, 'मी काल आईबरोबर ब्रह्मपिता ब्रह्मकुमारी यांचे प्रदर्शन बघायला गेलो होतो. 'यम यातना' काय भयंकर चित्रे होती. ती 'जीव' म्हणून एक म्हातारा माणूस दाखवला होता - शिंगे व शस्त्र असलेले यमदूत त्याला कसा त्रास देत होते. हे चित्रांत होते.

आजी, एका चित्रात त्याला उलटे टांगून खालून त्याच्या नाकातोंडात धूर जाईल असा तिखट कडू धूर केला होता. दुसऱ्या चित्रात त्याचे हात पाय एकाच वेळी चौघेजण सुतार लाकूड कापतो ना तसे करवतीने कापत होते. तिसऱ्या चित्रात लोखंडी पत्रा तापवून लालबुंद केला होता. त्यावरून त्याला सरपटत जायला लावत होते. तसा तो न गेल्यास काटेरी तारेने त्याला मारत होते. खूप चित्रे होती. मला पहाता पहाता भीतिच वाटली. खरं आहे का हो हे! त्यावेळी त्या जीवाला 'मी विलास होतो.' 'मी हे पाप केले म्हणून असे भोगावे लागते.' हे आठवते का हो!'

विलास अगदी रडवेला झाला. सगळेच गंभीर चेहऱ्याने बसले.

आजी म्हणाल्या, 'असली पाप कर्मे आपले हातून होऊ नयेत म्हणून तर भगवंताचे स्मरण करायचे. त्या चैतन्य शक्तीला साक्ष ठेवून काम केले तर आदिदैविक ताप भोगावाच लागणार नाही. आणि हे बघ यमनगरी लांब कोठे नाही. या मृत्यू लोकातच नीच योनीत जो हा त्रास भोगावा लागतो तोच यमयातनेचा प्रकार.

हे बघ, मध मिळवण्यासाठी मोहोळ जाळतात. म्हणजे खालून जाळ करुन



भाजून काढणेच नव्हे कां? तापलेल्या डांबरी सडकेवर बाज (खाट) आपटली की ढेकूण खाली पडतात. तडफडतात व मरतात.

हे तापलेल्या भूमीवरून चालण्यासारखेच झाले. नाना तऱ्हेचे घाण पदार्थ खाऊनच जीवन जगणारे प्राणी आपण पहातोच. असला जन्म आपल्याला नकोच. म्हणून मृत्यू येण्यापूर्वीच देवाला आपलासा करायचा.

'पण आजी, मृत्यू केव्हा येणार हे कसे कळायचे?' जयाने विचारले.

'बाई ग,' आजी म्हणाल्या, 'हे कळत नाही. हीच तर मोठी समस्या! जन्म भगवंताच्या हातात. केव्हा कोठे कसा होणार हे त्यालाच माहीत. जीवाचा जन्म पण जीव जाणत नाही. तसेच मृत्यूचे. राव असो रंक असो. मृत्यूच्या तावडीतून कोणीच सुटत नाही. तो केव्हा कोठे कसा येणार हे पण कळत नाही. हे पण भगवंताच्या इच्छेवर. विवाह योग पण त्याचेच इच्छेनुसार.

भगवंताच्या सतत स्मरणाचा अभ्यास जर माणूस करील तर त्याला मृत्यूचे भय वाटणार नाही. नीच योनीत जावे लागेल हे पण भय नको. पुण्य कर्मच हातून होतील.'

***मृत्य न म्हणे थोर थोर । मृत्य न म्हणे हरि हर ।***
***मृत्य न म्हणे अवतार । भगवंताचे ।।३/९/४०।।***

अस जरी आहे तरी समर्थ दिलासा देतात.

***असो ऐसे सकळहि गेले । परंतु येकचि पाहिले ।***
***जे स्वरुपाकार जाले । आत्मज्ञानी ।।३/९/५९।।***

टाळी वाजवूबन विलास म्हणाला, 'मग आजी, ते स्वरुपाकार होणे म्हणजे काय? तेच वाचू या. म्हणजे आपल्याला मृत्यू . . . . '

त्याला थांबवत सुधा म्हणाली, 'हं विलास, मृत्यू येणार नाही असे नको म्हणूस. आपली उन्नती होईल. हा देह जरी पडला तरी देव पुन्हा चांगले काम करायला चांगला देह देईल. देवाचे विस्मरण होणारच नाही.

'आजी, आई सांगत होती एका बाईने एक माकड नी एक कोंबडा पाळला होता. ती देवभक्त होती. ती भजन करायची तर कोंबडा व माकड पण नाचायचे.

दोघांना मरण आलेच. पण एक राजपुत्र झाला. एक प्रधानपुत्र झाला. कळू लागल्यापासून ते देवाचे भजन पूजन आवडीने करायचे.'

जया म्हणाली, 'अग, ती बाई म्हणजे महानंदा. छान आहे ती गोष्ट. मी वाचली. आपल्या पुस्तकाच्या संचात आहे ते पुस्तक.'

आजींनी मूळ मुद्दा जोडला, 'म्हणून बाळांनो, ही उदाहरणे लक्षांत ठेवून आपण शुद्ध भक्ती करुया.'

***भगवंत भावाचा भुकेला । भावार्थ देखोन भुलला ।***
***संकटी पावे भाविकाला । रक्षितसे ।।३/१०/१०।।***

भाव म्हणजे काय कळलं कां? विलासने अंगठा हलवला.

आजी म्हणाल्या, 'देव आहेच अशी मनाची खात्री पक्की असणं याला म्हणतात श्रद्धा. ही पक्की श्रद्धा वाढीस लागणे म्हणजे भाव. हा शुद्ध भाव पाहून देव धावून येतो. संकटकाळी भक्ताला तारतो.'

गणपती म्हणाला, 'पण खोटी वर वर श्रद्धा दाखवून भक्ती केली तर?'

***जरी भाव असिला माईक । तरी देव होये महाठक ।***
***नवल तयार्चे कौतुक । जैशास तैसा ।।३/१०/१४।।***

आजी अगदी गहीवरून म्हणाल्या, 'देवापाशी खोटेपणा चालत नाही. बाळांनो तुम्ही अजून लहान आहांत. जगाचे बरेच बरे वाईट अनुभव तुम्हाला यायचे आहेत. म्हणून आत्ताच लक्षात ठेवू या. सुधा वाच - '

सुधाने वाचण्यापूर्वी दासबोधाला नमस्कार केला.

***जो अन्न देतो उदरासी । शेरीर विकावे लागे त्यासी ।***
***मां जेणें घातर्ले जन्मासी । त्यासी कैसें विसरावें ।।३/१०/५५।।***

पगार घेऊन नोकरी केली की शरीर विकल्यासारखेच झाले. सुटी असली तरी कोठे जातो? का जातो? हे सांगून जावे लागते. कामावर केव्हा बोलावतील याचा नेम नाही. वरिष्ठांना जर इतके मानतो तर देवाला कां न मानावे?'

'पण आजी,' विलास म्हणाला, 'त्या भगवंताला प्रसन्न करण्याकरिता भगवंताचे



भजन कसे करावे?'

'छान, समर्थच जाणीव देतात बघ.'

***विषय जनित जें जें सुख । तेथेंचि होतें परमदुःख ।***
***पूर्वी गोड अंतीं शोक । नेमस्त आहे ।।३/१०/६५।।***

म्हणून विषयसुखांत खाण्यापिण्यात चैनीत गुंतून न पडता नेमाने भगवंताचे भजन करावे. आज मधुने देवाची उत्तम पूजा केली. तसे परोपकाचे काम मनापासून करावे. संधी वाया दवडू नये. म्हणजे भगवंत आपल्यासाठी काय करतो याचा अनुभव आपल्याला येईलच.

आजी, 'आम्ही सगळेच तसे वागू.' सर्वजण म्हणाले.

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**

## दिवस ७ वा

गणपती, विलास, मधुकर तिघे तीन रस्त्याने आले. पण वाड्यात एकदमच एकत्र पोहोचले.

'अगदी कसे ठरल्यागत निघालो आपण.' विलास म्हणाला.

मधुकर म्हणाला, 'तुम्ही कांही म्हणा. पण दुपारचे जेवण झाल्यापासून चैनच पडत नाही. केव्हा एकदा बाहेर पडतो असे होते. उन्हाची जाणीव पण होत नाही. आजी सांगतात त्याचेच विचार सारखे चालू होतात.'

गणपतीने पण दुजोरा दिला. 'आज काय सांगणार असे सारखे वाटू लागते. ती बघ जया व सुधा पण आली. जशी कृष्णा व कोयना समोरासमोरून एकमेकीला भेटल्या.'

वा! वा! हा संगम कऱ्हाडजवळ तू पाहिलस वाटतं?' असे म्हणतच आजी बाहेर आल्या.

विलास म्हणाला, 'आम्ही बोलत होतो ते ऐकलंत तुम्ही. इतकं हळू बोलतोय तरी!'

'बाळांनो,' आजी म्हणाल्या, 'तुम्हाला जशी ओढ लागलीय न, तसं माझंही मन तुमच्याकडे ओढलं जातच कीं! हेच मन जर भगवंताचेच चिंतन करील भगवंताचेच कार्य करील, तर ती भगवंताची सेवाच ठरेल. सेवेच्या फळाची इच्छा न धरता समाधानी रहाता आलं की त्याचे नाव भक्ती.'

'आजी, मी एक विचारु कां?' विलास जरा संकुचित मनाने बोलला, 'सगळेच संत सांगतात 'ईश्वराची भक्ती करावी.' पण भक्ती करायची म्हणजे नक्की काय करायचे.मला घोटाळाच वाटतो.'

'विलास,' आजी म्हणाल्या, 'विचारलेस ते छान केलेस. हे बघ ज्या दिव्य शक्तीचे आपण अंश आहोत त्या दिव्यशक्ती बद्दल, म्हणजेच त्या शक्तीच्या अस्तित्वाबद्दल इतकाही म्हणजे खसखशी इतकाही संशय मनात नसावा. त्यालाच शुद्ध भाव म्हणतात. त्या शुद्ध भावातूनच भक्ती निर्माण होते.

'मी आईचा नाही. बाबांचा नाही. मित्रांचा नाही, आजींचा नाही मी फक्त देवाचा आहे. हा विश्वास पक्का झाला की त्याचे नाव भक्ती. त्या विश्वचालवणाऱ्या शक्तीला आपण भगवंत म्हणतो. त्या भगवंताला आपला स्वामी मानले की विद्याशक्ती उदय पावते. तेच भक्तीचे फळ.'

'पण त्यासाठी काय करायचे?' मधून विचारले.

'त्यासाठी श्रवण हाच एकच उत्कृष्ट उपाय, उत्कृष्ट मार्ग.' आजींनी दासबोध उघडतच म्हटले. 'समर्थांनी वासनेचा क्षय, भीतीचा लय पण प्रेमाचा उदय होण्यासाठी नऊ प्रकारच्या भक्तीचे वर्णन केले आहे. ही बघ भक्तीची १ ली पायरी. विलास तूच वाच.

विलासने दासबोध हाती घेतला ओवी वाचली.

***प्रथम भजन ऐसें जाण । हरिकथा पुराण श्रवण ।***
***नाना अध्यात्म निरूपण । ऐकत जावे ।।४/१/७।।***

'शाबास,' आजी म्हणाल्या, 'भगवंताची लीला, त्याचे कर्तृत्व. ऐकता ऐकता श्रवण भक्ती घडते. दासबोधासारखेच संतांनी लिहिलेल्या ग्रंथाचे सावकाश वाचन केले तरी श्रवण भक्ती घडते. ग्रंथ म्हणजे ज्ञानाचे भांडार. गणपती, काय काय ऐकावे, तूच



वाच आता.'

गणपतीने दाखवलेली ओवी वाचली.

***नाना पिंडांची रचना । नाना भूगोळ रचना ।***
***नाना सृष्टीची रचना । कैसी ते ऐकावी ।।४/१/१५।।***

आजी म्हणाल्या, 'जगात एका सारखेच दुसरे असे काहीच नाही. किती नानात्व आपण सहाच जण येथे आहोत. पण सगळ्यांचे रंग रूप भिन्न भिन्नच आहेत. त्यात एकत्व साधले या श्रवणानेच. आवडीने येता ....'

आजींना थांबवीत विलास म्हणाला, 'आई म्हणते, बरे आहे आजींच्याकडे जातोस ते. उन्हात खेळणे, पाणी ढसाढसा पिणे, गाऽऽऽर पाणी पिणे, मग सर्दी खोकला दुखणे, औषध घेणे, बिल भरणे, सारे सारे थांबतंय!!'

आजी म्हणाल्या, 'ते तर खरंच. पण कांही औषधे माहीतही असावीत –

***कोण्या दोषें कोण रोग । कोणा रोगास कोण प्रयोग ।***
***कोण्या प्रयोगास कोण योग । साधे तो ऐकावा ।।४/१/२३।।***

'आजी', सुधा म्हणाली, 'मी काल आईला तुळशीचं बी नको म्हणाले. मला मोरावळा आवडतो. तो मागितला, तर आई म्हणाली, पित्त फार झाले तर मोरावळा खायचा. उन्हाळ्यात तुळशीचेच बी चांगले. उन्हातून जाताना खिशांत, हातात कांदा ठेवावा. मुले टोपी घालत असतील तर डोक्यावर कांदा ठेवून टोपी घालावी. ऊन बाधत नाही. हे तिला श्रवणानेच कळलं. वाचनाने समजलं. ती खूप जणांना औषधे देते. तस्सेच देते, पैसे नाही घेत.'

'फारच छान.' आजी म्हणाल्या, 'ही उत्तम भक्ती.'

विलास म्हणाला, 'खूप श्रवणाने मनुष्य पंडितच होईल की!'

'होय. होईल.' पण समर्थ म्हणतात, तूच वाच आता.

***ऐसें हें अवघेंचि ऐकावें । परंतु सार शोधून घ्यावें ।***
***असार तें जाणोनि त्यागावें । या नाव श्रवण भक्ती ।।४/१/२९।।***

'बाळांनो,' श्रवण खूप झाले तरी भाव शुद्ध हवा.'

***बहुत करावें पाठांतर । कंठीं धरावें ग्रंथातर ।***
***भगवत्कथा निरंतर । करीत जावी ।।४/२/३।।***

विलास चुळबुळला. 'पाठांतराचे नावाने इथे बोऱ्या. मग किर्तन काय करणार?'

आजी म्हणाल्या, 'विलास हताश होऊ नकोस. पेटी तबला टाळ घेऊनच कीर्तन करायचे असे नाही. भगवंताची कीर्ती गाणे म्हणजे कीर्तन. कठीण ग्रंथाचा अभ्यास करणे. त्याचा अर्थ प्रवचन पद्धतीने दुसऱ्यास सांगणे म्हणजे सुद्धा कीर्तनच. भगवंताचे कर्तृत्व अवतार कथा सांगाव्यात. जेणे करुन भक्ती मार्ग वाढीस लागेल असा आपापल्यापरी प्रयत्न करावा. कारण सांगू?'

***कीर्तनें महादोष जाती । कीर्तने होये उत्तमगती ।***
***कीर्तनें भगवत् प्राप्ती । येदर्थीं संदेह नाहीं ।।४/२/२७।।***

हे बघ, असे हरिगुण गाता गाता आपले पण दोष आपल्याला स्पष्ट जाणवतात. अर्थातच ते टाकावेत असेच वाटते. आपण जसजसे दोषहरित होऊ तसतसे भगवंताचे नाम मुखात येऊ लागते. भगवंतच खरा आहे व त्याच्याच सत्तेने जग चालते हे ज्ञान पक्के होते. ही जाणीव अखंड रहाणे म्हणजेच नामस्मरण. नामस्मरणाने भगवंताचा विसर पडत नाही.

विलासने शंका विचारली, 'नाम म्हणजे नाव. भगवंत तर शक्तीरूप. त्याला तुमच्या आमच्या सारखा आकार नाही. मग नाव कसे आले? कोणत्या नावाने त्याला ओळखायचे?

'वा - वा! विलास, छान विचारलेस!' आजी म्हणाल्या, 'हे बघ, त्या अनंत ज्ञान रूप, प्रकाश रूप शक्तीला एकदा मी (आहे) मी (आहे) अशी स्फूर्णा झाली. त्या स्फुर्णेतच, तीव्र इच्छेतच अनेकत्वाची शक्ती आली. त्या स्फूर्णेला नाद असतो. ओठ बंद कर. आणि घशातून हवा नाकावाटे बाहेर ढकल. कसा आवाज येतो?'

विलासने तसे केले. 'हं हं' असा आवाज निघतो. हे अनुभवले. सगळयांनीच तसे करुन पाहिले.

आजी म्हणाल्या, 'हा जो हं हं नाद तोच अहं. त्यालाच ओंकार असे म्हणतात. त्या ॐ मधून सारे विश्व उत्पन्न झाले. जीवाला आनंद देणारा हा नाद हेच त्या भगवंताचे



प्रथम नांव. सगळेच शांतपणे म्हणू या. ॐ ऽ ऽ ऽ ! आजींच्या पाठोपाठ सर्वांनी म्हटले. आता जरा दीर्घ उच्चार करुन म्हणू या. म्हणून झाल्यावर कसे मोकळे मोकळे वाटते. शांत वाटते. स्वतः सह जगाचा विसर पडतो. क्षणभर कां होईना पण आनंद वाटतो. डोळे आपोआप अर्धे बंद होतात.

सगळयांनी तसे करुन पाहिले. क्षणभर सगळे शात शांत वाटले.

विलास म्हणाला, 'आजी असं रोज म्हणू या.'

आजी म्हणाल्या, 'हे बघ समर्थ म्हणतातच . . .

***स्मरण देवाचें करावें । अखंड नाम जपत जावें ।***
***नामस्मरणें पावावें । समाधान ।।४/३/२।।***

अशा समाधानातून आनंद मिळतो. आनंद हे त्या भगवंताचेच लक्षण.

'पण आजी अखंड नाम घ्यायचे हे कसे जमावे?' मधुकरने विचारले.

'मधुकर, समर्थांनी ते पण सांगितलं आहे बघ. वाच ओवी.' आजी म्हणाल्या.

***चालतां बोलतां धंदा करितां । खातां जेवितां सुखी होतां ।***
***नाना उपभोग भोगितां । नाम विसरों नये ।।४/३/७।।***

आजी म्हणाल्या, 'तुम्ही गोष्टीची पुस्तके वाचलीत ना? असे नामस्मरण करुन कोण कोण पावन झाले बरं!'

'ध्रुव' गणपती म्हणाला, 'थांब मी सांगतो दुसरा प्रल्हाद' विलासने सांगितले.

मधुकरने गजेंद्राचे नाव सांगितले.

'आणि आजी,' जया म्हणाली, 'रामायण लिहिणारे वाल्मीक ऋषी! त्या वाल्याला सरळ राम राम पण म्हणता येत नव्हतं. पण नारद मुनींनी त्याला युक्ती सांगितली. 'मरा मरा' म्हण. पण सातत्याने म्हण. चालेल. तसे म्हणता म्हणता 'मरा' चे 'राम' झाले. वाल्या पार बदलला. वाल्मीक ऋषी झाला.'

'आजी, हा नामाचा प्रभाव की नारदांची कृपा?' सुधाने शंका विचारली.

'नाम तर तारक आहेच.' आजी म्हणाल्या, 'पण नारद मुनींच्या म्हणजेच सद्गुरुंच्या

वचनावर श्रद्धा ठेवली. सातत्य राखले. त्याचा हा परिणाम.

मधुकर म्हणाला, 'सद्गुरु कां म्हणायचं नारदांना?'

'सांगते. ज्यांच्या मुखी सदैव परमात्म्याचे म्हणजेच भगवंताचे नाम असते, ध्यानी मनी माणसांच्या उद्धाराचाच विचार असतो ते देहावर प्रेम कमी करुन देवावर जास्त प्रेम करतात, जे स्वतः करता जीवन न जगता जनता जनार्दनाच्या कल्याणाची तळमळ बाळगून जीवन जगतात ते सद्गुरु! त्यानांच सद्गुरु म्हणावे.' आजी म्हणाल्या, 'मधुकर, अशा सद्गुरु बद्दल हृदयांत अखंड प्रेम असले की पादसेवन भक्ती घडते. आपण स्वतः होईल तितकी त्यांची सेवा करावी व मनाने त्यांच्या बोध वचनाचा स्वीकार करून त्याप्रमाणे वागावे म्हणजे पादसेवन भक्ती घडते.'

'या भक्तीने काय साधते?' जयाने शंका विचारली.

आजींनी तिच्या हाती दासबोध दिला. जयाने दाखवलेली ओवी वाचली.

***पादसेवन तेंचि जाणावे । काया वाचा मनो भावें ।***
***सद्गुरुचे पाय सेवावे । सद्गतिकारणें ।।४/४/२।।***

'शाबास,' आजी म्हणाल्या, 'सद्गती म्हणजे भगवत्प्राप्ती. त्यासाठी संगत्याग घडावा.'

'संगत्याग म्हणजे काय?' विलासने विचारले.

'सांगते.' आजी म्हणाल्या, 'एक भगवंतच हवा. त्यापुढे दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची आवड, प्रेम न वाटणे म्हणजे संग त्याग. दुसरी गोष्ट अहंकार रूपी 'मी' देवाला अर्पण करणे त्याला निवेदन म्हणतात.'

'या दोन गोष्टी साधल्या तर काय होईल?' सुधाने शंका विचारली.

आजींचे उत्तर अगदी ओठावरच होते. 'अग विदेह स्थिती प्राप्त होते. देह असून नसल्यासारखा. देहावरचे प्रेम कमी होते. . . . . . '

'पुढे मी सांगतो,' गणपती म्हणाला, 'देवावर प्रेम जडते. पण मनातून जगातील हव्या वाटणाऱ्या वस्तूवरचे प्रेम कमी व्हायला हवे! त्याचं काय ?'

'पाहिलेली वस्तू हवी वाटणे म्हणजे वासना न?' सुधा म्हणाली. 'मग ती वासना



म्हणजे हवे वाटणे संपले की आपण खूप सुखी होऊ.'

'होय, त्यालाच अलिप्तपणा म्हणतात.' आजी म्हणाल्या, 'असा अलिप्तपणा साधला की सुख नी दुःख येवो वा जावो अगदी सहजपणे मनुष्य त्याचा स्वीकार करतो. त्या सुख दुःखाचा त्याच्यावर परिणामच होत नाही. याला समर्थ सहजस्थिती म्हणतात.'

'म्हणजे आजी,' विलास म्हणाला, 'दुसरे दोन देश क्रिकेट खेळत असता कोणीही जिंको, कोणीही हरो. आपण ना सुख ना दुःख असे पहातो. तसेच ना?'

'अगदी बरोबर. आणि विलास,' आजी म्हणाल्या, 'तो खेळ पहाताना खेळाडू हार जीत सर्व विसरून खेळातला आनंद ज्या आतल्या शक्तीमुळे मिळतो त्या आत्म्याचा अनुभव क्षणभर कां होईना येतो ना? त्याला म्हणतात. उन्मनी अवस्था. त्यावेळी दुसरे कसलेही भान असत नाही. फक्त आनंद आनंद आनंद !!! आणि बाळांनो, 'हे आत्म्याचे म्हणजेच आपल्या देहातील चैतन्याचे दर्शन कारणा कारणाने झाले तर तो अनुभव पक्का होतो. त्यालाच अनुभव सिद्ध ज्ञान असे म्हणतात. तेच ज्ञानाचे विज्ञान होय.

विलास म्हणाला, 'आम्ही प्रयोग शाळेत प्रयोग करतो. प्रयोगाने प्रमेय सिद्ध करतो. तसच हे दिसतंय.'

'होय, पण ते झालं ज्ञान!,' आजी म्हणाल्या 'त्या ज्ञानाचा स्वतःला आंत अनुभव आला म्हणजे होते विज्ञान.'

जया म्हणाली, 'म्हणजे आजी, साखर गोड असते हे ज्ञान व खाल्ल्यावर कशी गोड असते हे कळते ते विज्ञान असंच ना? पण आजी सद्गुरुकडून हे सारे कळते. आम्ही अजून लहान आहोत. आता सद्गुरु प्राप्त होई पर्यंत आम्ही काय करावे?'

'अग, समर्थांना वाटलंच की पुढे मागे जया असा प्रश्न विचारणारच. त्यांनी आधीच लिहून ठेवलंय बघ. वाच तूच. जयाने दाखवलेली ओवी वाचली.'

***देव ब्राह्मण महानुभाव । सत्पात्र भजनाचें ठाव ।***
***ऐसिये ठाईं सद्भाव । दृढ धरावा ।।४/४/२३।।***

आता मी सांगतो पाचही भक्तींची नावे. १) श्रवण २) कीर्तन ३) विष्णूचे नामस्मरण ४) पादसेवन ५) अर्चन. आता राहिल्या चार.

'त्या आता उद्या पाहू!' आजींनी दासबोध बंदच केला. नमस्कार केला. सगळेच हसले व नमस्कार करुन उठले.

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**

## दिवस ८ वा

विलास नी गणपती खडीसाखरेचा पुडा घेऊनच आले होते. मधुकर आल्यावर त्यांनी हस्तांदोलन केले.

'आजी,' विलास आनंद ओसंडतच म्हणाला, 'आज मधूला तुमच्या हातानेच खाऊ द्या.'

'असं काय केलं त्याने?' सुधाने विचारले.

'तुला माहीत नाही?' जया म्हणाली, 'त्याने सूर्यनमस्कार स्पर्धेत भाग घेतला होता. १०८ सूर्यनमस्कार त्याने न दमता घातले. पाहिले बक्षीस मिळाले त्याला.'

आजी म्हणाल्या, 'बसा बाळांनो, मधुकर घे हा खाऊ. तो सुद्धा योग्यच आहे हं. खडी साखर आहे ना? पेढ्यापेक्षा प्रकृतीला छान.'

आजींनी मधुला खडीसाखरेचा पुडा दिला. मधुने तो स्विकारला. व आजींना परत देत म्हणाला, 'तुम्हीच सगळ्यांना २/२ खडे द्या व उरलेली खडीसाखर गुरुवार प्रसादासाठी तुमच्याजवळ ठेवा.'

आजींनी त्याचे कौतुक केले. 'दासबोध केवळ वाचण्यसाठी नाही आचरण्यासाठी आहे. हे आज तुम्ही प्रत्यक्ष दाखवलेत. मधुने पण खाऊ माझा. म्हणून घरी नेला असता तर गैर कांही नव्हते. त्याची त्यागाची वृत्ती खाऊ पुरती कां होईना पण तयार झाली हाही एक आनंदच.'

गणपती म्हणला, 'आजी, खरा आनंद आणखी वेगळाच आहे. सांग ना मधू तूच सांग. आमचं मघाशीच ठरलं तसं.'


मधूने उलगडा केला. 'आजी, मला बक्षीस म्हणून सुंदर मारुतीची मूर्ती मिळाली. आहे. बाबांना दाखवायची म्हणून मी आज आणली नाही. तुम्हाला पण आवडेल.



आम्ही असं ठरवलंय की उद्या शनिवार आहे. सकाळीच या पडवीवरच्या कोनाड्यात आपण मारुती ठेवू या. त्याच्यासमोर दासबोधाचा अभ्यास. चालेल ना तुम्हाला. तुम्ही हो म्हणणार हे आम्ही गृहीतच धरलंय.'

आजींनी मान हलवली. सर्वांनी टाळ्या वाजवल्या.

विलास म्हणाला, 'आणि आजी नुसता मारुती येथे ठेवून गप्प नाही बसायचं. मधूने आम्हाला पद्धतशीर नमस्कार घालायला शिकवायचे. आम्ही १२/१५ करीत करीत सहा महिन्यात १०८ नमस्कार घालू अशी तयारी करायची.'



जया व सुधा दोघी म्हणाल्या, 'आम्ही पण शिकू की?'

'वा वा. मग फारच छान.' गणपती म्हणाला.

'बाळांनो, तुम्हा सर्वांना वंदन भक्ती साधणार हं.' आजी म्हणाल्या, 'हे बघ समर्थ काय म्हणतात.' सुधाने दासबोध उघडला.

***पशुपति श्रीपति आणी गभस्ती । यांच्या दर्शनें दोष जाती ।***
***तैसाचि नमावा मारुती । नित्य नेमें विशेष ।।४/६/६।।***

'गभस्ती म्हणजे . . . . . आजी विचारणार तोच जया म्हणाली, 'मी सांगते. गभस्ती म्हणजे सूर्य. शंकर विष्णू सूर्य या सर्वांना नमस्कार करावा. मारुतीला विशेष नमस्कार करावा. तो आता कोनाड्यात येणार.'

आजी म्हणाल्या, 'खरंच आनंदाची गोष्ट आहे. नमस्काराने आपले दोष म्हणजे अवगुण जातात. अंगी नम्रपणा येतो. कोणालाही नमस्कार करतांना तो बाह्यांगाला नसून त्याच्या आतल्या भगवंताला आहे हा भाव पक्का होतो. व व्हावा. पुन्हा गंमत अशी की,

***नमस्कारास वेचावें न लगे । नमस्कारास कष्टावें न लगे ।***
***नमस्कारास काहीच न लगे । उपकर्ण सामग्री ।।४/६/२२।।***

'पुन्हा दुहेरी फायदा असा, मधू म्हणाला, 'दुर्गुण गेले की पाप पण लयाला जाते. नियमाने नमस्कार घातले तर शरीर पण निरोगी रहाते.

आजी म्हणाल्या, 'आणि दास्य भक्तीचा पाया पक्का होतो.'

'आजी मी वाचतो दास्य भक्ती.' आजींनी ओवी दाखवली. विलासने वाचली.

***सातवें भजन तें दास्य जाणावें । पडिलें कार्य तितुकें करावें ।***
***सदा सन्निधचि असावें । देवद्वारीं ।।४/७/२।।***

मधू म्हणाला, 'दास्य म्हणजे दास व्हायचे. पण कोणाचे? मारुती रामाचा दास होता. समर्थ पण रामाचे दास म्हणवून घेत. संत ज्ञानेश्वर निवृत्ती नाथांचे दास म्हणून ओळखले जात.'

'आपण कोणाचे दास व्हायचे?' विलासची शंका, 'दास्यत्व पत्करायचे म्हणजे २४ तास नोकरी सारखे राबायचे कां?'

'विलास, आजी म्हणाल्या, 'आपण जनता जनार्दनाचे दास. म्हणजेच पर्यायाने भगवंताचेच दास होऊ या. त्यासाठी काय करायचे?'

***वचनें बोलावीं करुणेचीं । नाना प्रकारें स्तुतीचीं ।***
***अंतरें निवती सकळांचीं । ऐसें वदावें ।।४/७/२६।।***

'बस्स. अखंड साधना घडेल. जगमित्र होता येईल.'



सुधा म्हणाली, 'जगमित्र नावाच्या भक्ताला सर्व प्राणी मात्रांत भगवंतच दिसत होता. तो जगाशी फारच प्रेमळ बोले. बादशहाने त्याला जंगलातून वाघाला आणायला सांगितले. बादशहाचे मनांत वाघ याला खाईल. लोक याला फार मानतात. परस्पर काटा काढू. पण उलटेच झाले. जगमित्राने जंगलांत जाऊन वाघाची प्रार्थना केली. भला मोठा वाघ डरकाळी फोडत आला. भक्ताने मात्र त्याला नमस्कार केला. बादशहाच्या दर्शनाकरिता येण्याबद्दल विनवले. कुत्रा कसा माणसाबरोबर चालतो तसा वाघ त्याचे मागोमाग चालत गावात आला. मज्जाच मज्जा. बादशहा पुरा घाबरला. मस्त आहे गोष्ट.'

आजी म्हणाल्या, 'खरंच आहे. त्याने भगवंताशी इतके सख्य जोडले की भक्ताची इच्छा जाणून भगवंतच वाघाच्या रुपांत प्रगटले. बादशहाला पुरा धडा शिकवला. भगवंत, एक दिव्य शक्ती, दिसत नसली तरी भक्ताची इच्छा ओळखून तो व्यक्त रुपांत प्रगटतो. भक्ताची संकटे दूर करतो. म्हणून आपण काय करावे?'

गणपतीने हातात दासबोध घेतला. 'सांगा कोणती ओवी वाचू?'

***देवासी परम सख्य करावें । प्रेम प्रीतीनें बांधावें ।***
***आठवें भक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ।।४/८/२।।***

देवाशी सख्य करायचे म्हणजे काय करायचे? गणपतीने विचारले.

'भगवंताला आवडेल असेच वागायचे.' आजी म्हणाल्या, 'भगवंताला कथा कीर्तने आवडतात. त्याने तल्लीनता येते. तेवढा काळ आयुष्याचा सार्थकी लागतो. फालतु गप्पा गोष्टी पेक्षा भगवंताचे लीला चरित्र गाइल्याने भक्ती दृढ होते. इच्छा पूर्ती साठी भगवंताचे भजन नको. देव कृपेचा सागरच आहे. शरण आलेल्या भक्ताला देव कधी दूर लोटत नाही. देव भक्त एकच होतात. बाळांनो,

***सख्य देवाचें तुटेना । प्रीती देवाची विटेना ।***
***देव कदा पालटेना । शरणांगतासी ।।४/८/३०।।***

ही शरणागती आली की, 'बुद्धी तल्लख होते. खरा देव कोण? राम, कृष्ण, मारुती देव नाहीत कां? गणपती शंकर देव नाहीत कां? असे चिंतन आत चालू रहाते.'

जया म्हणाली, 'आजी सापडली ओवी. मी वाचते.'

***तस्मात विचार करावा । देव कोण तो बोळखावा ।***
***आपला आपण शोध घ्यावा । अंतर्यामीं ।।४/९/७।।***

विलास म्हणाला, 'आजी हरवलेले शोधतात. गणित चुकले, शास्त्राचा प्रयोग चुकला तर मार्गदर्शकांत शोधतात. आपला आपण शोध घ्यायचा म्हणजे आपण कां हरवले आहोत?'

'होय. समर्थ अनुभव ज्ञानाने ठामपणे सांगतात. आपण कोण? म्हणजेच मी कोण? हे आपल्याला कळत नाही. आपण देहालाच मी म्हणतो. विलास आपण सारी. माणसे आहोत ना? माणूस म्हणजे काय? देह + मन + आत्मा मिळून माणूस होतो. देह पाच भूतांचा. भूते कोणती?'

सुधा म्हणली, 'मी सांगते. पृथ्वी आप, तेज, वायू आणि आकाश.'

'बरोबर.' आजी म्हणाल्या, 'देह नाश पावतो. मरतो. मन वायूत मिसळते. कारण ते वायुरूप. मग रहातो आत्मा. तोच खरा देव. आत्मा हा खरा 'मी'. मधुकर आता तू हे वाच.'

मधुकरने दासबोध घेतला. तोंडाकडे बोट गेलेच. पण जीभ चावली. बोट सदऱ्याला पुसले व वाचले,

***आपण मिथ्या, साच देव । देव भक्त अनन्य भाव ।***
***या वचनाचा अभिप्राव । अनुभवी जाणती ।।४/९/२२।।***

'छान' आजी म्हणाल्या, 'एकदा कां आपल्याला हे पक्के कळले की कान मी नाही. कान जातो. ऐकू येत नाही. डोळे मी नाही. देह असतानाच डोळे जातात सारेच अवयव थकतात. तुटतात. फुटतात. निष्क्रीय होतात. फक्त आत्मा तुटत नाही. फुटत नाही. तो खरा देव. तोच देहाला सांभाळतो. देहाकडून काम करवून घेतो.

त्या खऱ्या देवाशी एकरूप होणे म्हणजेच आत्मनिवेदन. आत्म निवेदन भक्तीने देव भक्त वेगळेपणा पार नष्ट होतो. ऐक्याची भावना वाढते शुद्ध भक्ती साधते. आत्ताच आपल्याला अनुभव आला नाही कां? मधूच्या कष्टाने, तालीम, सराव करुन त्याने १०८ सूर्य नमस्कार घातले. बक्षीस त्याला मिळाले. पण त्याने तुम्हाला आनंद झाला. दासबोध श्रवणाने अतूट मैत्रीचा आनंद खडी साखर आणून तुम्ही प्रगट केलांत न?



मधूला बक्षीस मिळाले. तो मारुती पूर्णपणे त्याच्या मालकीचा. पण येथे कोनाड्यात स्थापन करु हे पण प्रीतीचेच लक्षण नव्हे कां? त्याने त्याचा आनंद सर्वांना वाटला. पडवीला नुसतीच शोभा नाही तर देवळाचे स्वरूप येईल. हा आनंद झरा, हे ऐक्य सतत टिकले की आत्म्याचे दर्शन, आत्मानुभव दूर नाही.

बाळांनो, अशी भक्ती करता करता ज्याला मुक्ती म्हणतात ती अगदी सहज प्राप्त होते. मधूचा मारुती आपणा सर्वांचा झाला नं? तस्सा मुक्तीचा आनंद सर्वांना मिळेल.'

विलास म्हणाला, 'पण आजी मुक्ती म्हणजे काय?'

'सांगते,' आजी म्हणाल्या, 'काळजीतून मुक्त होणे म्हणजे मुक्ती. संशयातून बाहेर पडणे म्हणजे मुक्ती. संकटांचा बाऊ न वाटणे म्हणजे मुक्ती. अज्ञानातून मोकळे होणे म्हणजे मुक्ती. वासनेच्या जाळ्यातून सुटणे म्हणजे मुक्ती. मुक्तीचेच दुसरे नाव आहे मोक्ष.

'माझ्याकडे आहे मोक्षपट.' विलास म्हणाला. 'चिंचोक्याच्या चार दळांनी दान टाकून सोंगटी त्या मोक्षपटावर फिरते व मोक्ष मिळतो.'

'विलास, ते खेळातलं मोक्षपद मिळवायचे सुद्धा कठीणच.' आजी म्हणाल्या, 'मोक्षाच्या अलिकडे सापाचे तोंड असलेले घर असते. दान योग्य पडले नाही तर सापाचे तोंडातून पार खाली पहिल्या ओळीत म्हणजे रसातळांत जावे लागते. हा साप म्हणजेच मोह हे विश्व हाच मोक्षपट. येथे जीवाचे कर्तव्य रूपी दान यथायोग्य पडले नाही. तर मोहरूपी सर्प वासनेच्या गर्तेत पाडतो व माणूस अधोगतीला जातो. वागू नये तसा वागतो.

म्हणून भक्तीतून ज्ञान उदयाला येईपर्यंत सतत प्रेमोत्कर्ष साधायचा. म्हणजे मुक्ती मिळते.

मुक्ती तरी कोणती हवी? सुधा, ही बघ ओवी. वाच.

***लोकी रहावें तें सलोकता । समीप असावें तें समीपता ।***
***स्वरूपचि व्हावें तें स्वरुपता । तिसरी मुक्ती ।।४/१०/२४।।***

हे पहा बाळांनो, भगवंताचे भक्त रहातात तेथे सगुण दर्शन सतत होते तेथे

रहाणे म्हणजे सलोकता.

देह पतनानंतर भक्ती केल्यामुळेच भगवंताच्या सन्निध कोणत्याही रुपाने राहणे म्हणजे समीपता. मग फुलांच्या माळा वा दागिने रुप कोणतेही असो. सुगंधीत वस्तू, पशू, पक्षी या कोणत्याही रुपात देवाजवळ रहाणे म्हणजे समीपता.

देवासारखेच रूप, दागदागिने मिळून त्याच्या सेवकांत राहणे ही स्वरूपता. पण या तीनही मुक्ती नाशिवंत आहेत. वागण्यात चूक झाली, तेथला आनंद ओसरला, आपला पुण्य संचय संपला किंवा तेथेही सूक्ष्म वासनेच्या गर्तेत सापडलो की पुन्हा भूतलावर जन्म घ्यावा लागतो.'

गणपती म्हणाला, 'मग आजी, मला पुन्हा माणूसच कर. म्हणजे माणसाचाच जन्म दे. म्हणावे. पुन्हा देवाचे भजन पूजन करीत आनंदात रहावे हे बरे नाही कां?'

'चांगली आहे तुझी कल्पना.' आजी म्हणाल्या, 'गणपती भक्ती करता करता भक्ताची अत्यंत प्रेम वस्तू कोणती?'

'भगवंत.' गणपतीने उत्तर दिले.

'बरोबर, मग त्या प्रेम वस्तूशी एकरूप झाल्यावर भगवद्स्वरूप बनणे जास्त चांगले नाही कां? भगवंतच व्हायचे. या जन्म मृत्यू लाभ हानी साऱ्या कटकटीतून मिटायचे. याला म्हणतात सायुज्य मुक्ती ही चौथी मुक्ती. मधुकर, तू वाचतोस. ३० वी ओवी बघ.

***निर्गुणीं अनन्य असतां । तेणें होये सायुज्यता ।***
***सायोज्यता म्हणजे स्वरूपता । निर्गुण भक्ती ।।४/१०/३०।।***

'पण आजी स्वस्वरुपांत समरस होणे, निर्गुण भक्ती हे नाही काही लक्षात आलं' विलास म्हणला.

'येईल. येईल हं. उद्या त्या बुद्धीमतां वरिष्टम् ची स्थापना करीत आहात न? तो देईल बुद्धी.' आजी म्हणाल्या.

'आजी, आम्ही ६ वाजता सकाळी येऊ.' मधुकर म्हणाला.

विलास म्हणाला,'मी कोनाडा सुशोभित करीन.'



जया म्हणाली, 'मी रांगोळी काढून पडवीला छान शोभा आणीन,'

गणपती म्हणाला, 'मी मारुतीची गोष्ट सांगेन. कीर्तन भक्ती हं.'

सुधा म्हणाली, 'मी भीमरुपी स्तोत्र म्हणेन आजी पूजा सांगतील. मधुकर पूजा करील .मग आपण आरती करून प्रसाद वाटू.'

'पण मारुतीची आरती कोणला येतीय ?' विकास म्हणाला.

'अरे आजी आहेत न आपल्या ?' मधू म्हणला सगळेच हसले.

**।। जय जय रघूवीर समर्थ. ।।**

## दिवस ९ वा

मधू वाड्यात आला. तेव्हा आजी दगडी डोण स्वच्छ करून त्यांत पाणी भरत होत्या. मधूने पटकन त्यांच्या हातातली बादली घेतली. दोन तीन बादल्यांनी डोण भरली. त्यावर पत्र्याचे झाकण ठेवले. सुधाने नारळाच्या करवंटीची गोल वाटी त्या डोणीवर ठेवली. मुले हातपाय धुवूनच पडवीवर आली. संस्कार बसवला की बसतो.

कोनाड्यात मारुतीराय विराजमान झालेच होते. कसा सुशोभित झाला होता कोनाडा. मारुतीला वंदन करून, आजींना वंदन करून मुले आपापल्या जागी बसली. आजींनी पण मारुतीला नमस्कार केला व स्थानापन्न झाल्या.

'मारुतीरायाचं आगमन झालं. कसं प्रसन्न वाटत ना ? आजी म्हणाल्या, ' तुम्हा सगळ्यांना ज्ञानमार्ग प्राप्त होऊन प्रसन्नता वाटावी अशी प्रार्थना करते मारुतीजवळ.'

विलास म्हणाला, 'म्हणजे आम्ही आत्ता ज्ञान नाही मिळवत कां ?

कालच्या चारही मुक्ती सांगू ? १) सलोकता २) समीपता ३) स्वरूपता ४) सायुज्यता. सायुज्यमुक्तीत आपण भगवंत झाल्याचा आनंद असतो हे ज्ञान नव्हे कां?'

विलास , हे आत्ता आपल्याला शब्दाने कळलंय. शुध्द ज्ञान मार्ग नी भक्तीमार्ग भिन्न आहेत. पोहोचायचे ठिकाण एकच आहे. आपण नवविधा भक्तीचा अभ्यास केला. आपला भक्तीमार्ग हळूहळू वाढीस लागेल. मग ------ आजींना थांबवत गणपती म्हणाला 'आजी आमचा श्लोक पाठ झालाय म्हणू मी ?'

आजींच्या होकार नकार न पहाताच त्याने म्हणायला सुरूवातही केली.

***श्रवण कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम्।***
***अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ।।***

'छान. मन लावून ऐकता. मला आनंद वाटतो.' आजी म्हणाल्या. ' भक्ती मार्गात प्रगती करतांना अनेक गुरू भेटतील. पण भगवंताचे ज्ञान करून देणारे मात्र सद्गुरू भेटतील असेही सांगता येत नाही. ईश्वरी योगायोगाने जमते ते.

' आता आपण अभ्यास करीत आहेत तो भगवद्भक्तीचाच आहे नं ?' मधुकरने शंका विचारली.

'बरं विचारलंस' , आजी म्हणाल्या. ' भगवंताची दोन रूपे, १) सगुण २) निर्गुण. विश्वचालक दिव्य शक्ती भक्तासाठी नानाविध रूपे घेऊन भूतलावर अवतरते. ती सारी सगुण रूपेच. मारूतीराय पण सगुणच राम कृष्णादिक सगुणच. मधुकर आपण सारे सगुणचं सगुणानेच सारे विश्व भरले आहे.

सगुणाची भक्ती करता करता गुणातीत असणारे भगवंताचे निर्गुण रूपाचे ज्ञान ते शुद्ध ज्ञान. त्यालाच म्हणतात ब्रह्मज्ञान. म्हणजेच ------'

आजींना मध्येच थांबवून विलास म्हणाला, 'म्हणजेच खऱ्या देवाचे ज्ञान न ? ते ज्यांच्याकडून मिळते त्यांना सद्गुरू म्हणतात कां? सद्गुरू भेंटलेच नाहीत तर ?'

'थांब तुला समर्थ वचनच दाखविते. हे बघ' आजींनी म्हटले.

***सद्गुरूविण ज्ञान कांहीं । सर्वथा होणार नाहीं***
***अज्ञान प्राणी प्रवाहीं । वाहातचि गेले ।। ५/१/२१ ।।***

'खुद्द भगवंताचे दर्शन व्हावे असे ज्याला वाटते त्याने सत्संग जरूर धरावा. सद्गुरूंना अनन्यतेने शरण जावे व ब्रह्मज्ञान प्राप्त करुन घ्यावे. कारण पुढे बघ समर्थ काय म्हणतात', आजी म्हणाल्या.

***जंव नाहीं ज्ञान प्राप्ती । तंव चुकेना यातायाती ।***
***गुरुकृपेविण अधोगती । गर्भवास चुकेना ।।५/१/३५।।***

'सद्गुरुंची भेटी होणे ही ईश्वराची कृपा, व खरा भगवंत कोण हे कळणे,



आयुष्याचे सार्थक होणे ही सद्गुरुंची कृपा असे आहे हे कोडे, परस्परावलंबी. खऱ्या ज्ञानाची ओढ लागली की सद्गुरुंची गाठ भेट होतेच.'

मधुकर म्हणाला, 'पण आपले आईवडील आपल्याला शिकवतात. ते सद्गुरु नव्हेत कां?'

आजी म्हणाल्या, 'हे बघ समर्थांनीच उत्तर दिलंय.

***आपली माता आणी पिता । तेहि गुरुची तत्वता ।***
***परी पैलपार पावविता । तो सद्गुरु वेगळा ।।५/२/७।।***

ज्यांच्या ज्यांच्याकडून आपण विशेष कांही शिकतो ते गुरू. शाळेत तुम्ही शिकता ते शिक्षक तुमचे गुरुच. पण -

***जो कोणी ज्ञान बोधी । समूळ अविद्या छेदी ।***
***इंद्रिये दमन प्रतिपादी । तो सद्गुरु जाणावा ।।५/२/२२।।***

गणपतीने शंका विचारली, 'पण बाकीचे जे देतात ते ज्ञानच असते ना? मग ...'

'बरोबर आहे तुझे म्हणणे' आजी म्हणाल्या, 'त्या सर्व ज्ञानाचा पैसा मिळवण्यासाठी उपयोग होतो. येथे ज्ञान म्हणजे स्वस्वरूप ज्ञान. स्वस्वरूप ज्ञान म्हणजे ब्रह्मज्ञान. या ज्ञानाने मी कोण हे कळते. अज्ञान दूर होते. आपली इंद्रिये नाक कान डोळा जीभ इ. सारखी विषय सेवनाकडे वळतात त्यांना त्यांचे विषय प्रमाणात देऊन त्यांना ताब्यात कसे ठेवावे हे सद्गुरु सांगतात.

ते साधना करण्यास सांगतात. त्या सांगण्यामागे त्यांची तपस्येची शक्ती असते.

***मुख्य सद्गुरुचें लक्षण । आधीं पाहिजें विमळ ज्ञान ।***
***निश्चयाचें समाधान । स्वरुपस्थिती ।।५/२/४५।।***

विमल ज्ञान म्हणजे शुद्ध ब्रह्मज्ञान. त्यामुळे ते अत्यंत समाधानी असतात. म्हणून शिष्यांची संकटे दूर करून त्यांना पूर्ण समाधान कसे लाभेल हे सद्गुरु सांगतात.

आपले सद्गुरु काळे का गोरे असे पाहू नये. रंगावर ज्ञान अवलंबून नसते. तसेच वयावर पण ज्ञान अवलंबून नसते. त्यांचे नाक चपटे की सरळ हे पाहू नये. हा देहाचा आकार आपल्या स्वाधीन नसतो. कदाचित पुस्तकी विद्येच्या बाबतीत ते अक्षर

शत्रूही असतील . . . .'

विलासने विचारले, 'अक्षर शत्रू म्हणजे?'

जयानेच उत्तर दिले, 'अजिबातच लिहिता वाचता न येणारे. शाळेची पायरीसुद्धा न चढलेले. त्यांना अक्षर शत्रू म्हणतात.'

'बरोबर,' आजी म्हणाल्या, 'तरी ते ब्रह्मज्ञानाने परिपूर्ण असू शकतील. बोली भाषा अशुद्ध असेल. पडक्या मातीच्या खोपटीत किंवा झाडाखाली झोपडीत राहत असतील, त्यांना तुमच्या आमच्या सारखा नातेवाइकांचा समुदाय भोवताली नसेलही. तरी त्यांच्या ज्ञानांत उणेपणा येत नाही. ते शिष्याला बोट धरून धैर्याच्या मार्गाने बोट धरून संशय रहित करुन सोडतात.

आपण सध्या सगळे बद्ध आहोत. म्हणजेच पूर्ण ज्ञान स्वस्वरूप ज्ञान आपल्याला झाले नाही. थोडा थोडा भक्ती मार्ग चालू लागलो आहोत. अशांनी सद्गुरुंनी सांगितलेली साधना निष्ठेने करायला हवी. कारण -

'सांगा, मी वाचते आजी,' सुधा म्हणाली.

***सेत पेरिलें आणी उगवलें । परंतु निगेविण गेलें ।***
***साधनें विण तैसें जालें । साधकांसी ।।५/३/९।।***

आजी म्हणाल्या, 'शाळेत गुरुजींनी शिकवले तरी घरी अभ्यास करावा लागतोच ना? तसेच परमार्थात मार्ग कळला तरी चालावे लागते आपल्यालाच. आळसाने अज्ञान फोफावते. व अज्ञानाने म्हणजे अविद्येने आत्मज्ञान मंदावते. म्हणून शिष्याने काय करावे?'

'मी वाचतो' विलास म्हणाला.

***मुख्य सच्छिष्याचें लक्षण । सद्गुरु वचनीं विश्वास पूर्ण ।***
***अनन्य भावें शरण । त्या नांव सच्छिष्य ।।५/३/१९।।***

हे 'अनन्यभावे शरण' म्हणजे काय करायचे ते नाही कळलं!'

'सांगते ना,' आजी म्हणाल्या, 'लहान बाळ आईवर सर्वस्वी अवलंबून असते की नाही? आईने मारले. आपण त्याला जवळ घेऊन त्याचे रडे थांबवले. तरी त्याला



आईनेच जवळ घ्यावे असे वाटते की नाही? तसे आपल्या सद्गुरुबद्दल आपल्या मनात सतत प्रेम असावे. त्यांचा प्रत्येक शब्द हृदयांत साठवावा. आज्ञापालन तंतोतंत व्हावे. मग सद्गुरु आपली सगळी ज्ञानशक्ती शिष्याकडेच वळवतात. त्याच्या आयुष्याचे कोट कल्याण होईल असेच करतात.'

'रामकृष्ण परमहंस आणि विवेकानंद असेच होते नाही कां?' सुधा म्हणाली, 'आणखी सांगू? जनार्दन स्वामी आणि एकनाथ, निवृत्तीनाथ आणि ज्ञानदेव या आदर्श गुरु-शिष्य जोड्या होत्या. असे आई सांगत होती.'

'अगदी बरोबर.' आजी म्हणाल्या, 'तुझी आई प्रपंच पण छान करते व परमार्थात पण चांगले लक्ष आहे. समर्थ म्हणतातच.'

***प्रपंच सुखें करावा । परी काहीं परमार्थ वाढवावा ।***
***परमार्थ अवघाचि बुडवावा । हें विहित नव्हे ।।५/३/१०३।।***

गणपतीने शंका विचारली, 'पण परमार्थ कशाने वाढतो?'

आजी म्हणाल्या, 'सद्गुरु उपदेश करतात. शिष्याला बोध करतात. म्हणजेच सद्गुरु व शिष्य यांचा जो अध्यात्मिक संवाद चालतो त्याला उपदेश म्हणतात. त्या उपदेशाप्रमाणे तंतोतंत वागणे म्हणजे परमार्थ वाढवणे.'

'बाळांनो, नाना तंत्र नाना मंत्र जगांत आहेत. पण आत्मज्ञानासरखे श्रेष्ठ दुसरे कांहीच नाही.'

***या कारणें ज्ञानासमान । पवित्र उत्तम न दिसे अन्न ।***
***म्हणौन आधी आत्मज्ञान । साधिलें पाहिजे ।।५/४/३२।।***

मधुकर म्हणाला, 'आत्मा हा त्या महान दिव्य शक्तीचा अंश. असेच सद्गुरु सांगणार. तेच आत्मज्ञान कां? मग ते आम्हालाही आता कळले.'

आजी म्हणाल्या, 'येवढ्या सांगण्याने नाही भागत बाबा! तसे असते तर सगळेच सद्गुरु. सगळेच शिष्य. सगळेच जग उद्धरले असते. आज भोवताली जी दारुण दुःखद परिस्थिती दिसते ती दिसली नसती.'

जीव या भोवतालच्या दृष्यातील स्थूल नाशिवंत वस्तूवर अगाध प्रेम करतो. तेच

सर्वस्व मानतो. तुला काय सांगू? क्रिकेट सारखा खेळ टि.व्ही. वर पहात असताना पट्टीचा खेळाडू १ल्याच चेंडूला बाद झाला तर क्रिकेट रसिक बेशुद्ध पडतो. आता याला काय म्हणावे? खेळ आहे हा. हार जीत असणारच. म्हणून शाश्वत टिकणाऱ्या आत्म्यावरच प्रेम असावे.

जगात किती तऱ्हेचे ज्ञान आहे? गणपतीला गोष्टी छान सांगता येतात. हावभाव उत्तम आहे म्हणून तो ज्ञानात पारंगत म्हणता येईल कां?'

मधुकरला बासरी वादन छान येते. तरी ते पूर्ण ज्ञान म्हणता येत नाही.

जया भरतकाम वीणकाम छान जाणते ते शुद्ध पूर्ण ज्ञान म्हणावे कां?

'माझं नका काही सांगू! मला काहीच करता येत नाही.' विलास म्हणाला.

'नाही कसं!' गणपती म्हणाला, 'भांडता येतं छान. सारखा बहिणीशी भांडत असतो.'

'हो, पण भांडणही सोडवतो. समेट घडवून आणतो. दोन्ही येतं तरी त्याला ज्ञान म्हणता येत नाही.' आजी म्हणाल्या. समर्थांनी तर खूपच मोठी यादी दिली आहे.'

'आजी,' मधुकर म्हणाला, 'नृत्यकला, वादन, गायन हे जर ज्ञान नव्हे तर त्यांत माणसे आयुष्यन् आयुष्य घालवतात. कला जोपासतात. दुसऱ्याला त्या कलेत पारंगत करतात. म्हणूनच त्या कला जीवंत आहेत ना? नाहीतर लोपच पावल्या असत्या.'

'तुझे म्हणणे बरोबर आहे,' आजी म्हणाल्या, 'त्या त्या कलेचे ते ज्ञान. या ज्ञानाने कीर्ती वाढेल, नाव लौकीक राहील. पण जीवाचा उद्धार होणार नाही.'

सुधा म्हणाली, 'आजी मी बारावीनंतर मेडीकललाच जावे असे बाबा म्हणतात. पण ती वैद्यकी म्हणजे सुद्धा जर ज्ञान नसेल तर कशाला शिकायचे?'

'सुधा, आजी म्हणाल्या, 'त्या ज्ञानाने पैसा मिळतो. परोपकार घडतो. दानधर्म करुन नाव राखता येते. लोकांची दुःखे दूर होतात. त्यातही आनंद असतो. पण त्याला आत्मज्ञान म्हणता येणार नाही. असे समर्थांना ठासून सांगायचे आहे.'

***असो सकळ कळा प्रवीण । विद्यामात्र परिपूर्ण ।***
***तरी ते कौशल्यता, परी ज्ञान । म्हणोच नये ।।५/५/३२।।***



कारण या सर्व ज्ञानाने भ्रम दूर होत नाही.'

'पण हा भ्रम निर्माण करतो कोण?' विलासने विचारले.

'आजींनी मागेच सांगितले,' सुधा म्हणाली, 'विसरलास कां? भगवंताची चैतन्य शक्ती खेळ मांडते. खेळ मोडते! तीच माया खऱ्याचे खोटे करते. खोटे ते खरे वाटते. यालाच भ्रम म्हणतात. होय ना आजी?'

'शाबास, तो भ्रम ज्या ज्ञानाने जातो त्याला आत्मज्ञान म्हणतात.' आजी म्हणाल्या.

विलास म्हणाला, 'आजी या खोक्यात माल भरायचा जरा अवघडच!' आपल्याच डोक्यावर थापट्या मारत राहिला.

'बघ आत्ताच तू भ्रमाने बोलतो आहेस.' आजी म्हणाल्या, 'डोक्याला हात लावतोस नी खोक म्हणतोस. जरा अवघड वाटेल. पण तसं नाही अवघड. आपण युक्ती करु या. हा बसलाय न वकील. त्याच्यावर सोपवूया. तो आपली फिर्याद, तक्रारी नीट ऐकून घेऊन वकीली करील.'

'पण त्याला फी द्यावी लागेल ना?' विलास म्हणाला.

'मग द्यायची की भरपूर!' आजी म्हणाल्या.

***मारुतीराया बलभीमा । भजना लागो द्या प्रेमा ।।***

मधुने टाळीचा ताल धरला. ठेक्यात सगळयांनीच भजन म्हटले. 'मारुती राया बलभीमा। भजन लागो द्या प्रेमा ।'

'थांबा. दोन तीनदा म्हणून झाल्यावर गणपतीला स्फूर्ती आली.

तुझी लेकुरे आम्ही सुजाण । सहज पचावे आत्मज्ञान ।।

शाब्बास, शाब्बास, सर्वच म्हणाले. टाळया वाजवल्या.

आजी म्हणाल्या -

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**

## दिवस १० वा

सगळे अगदी वेळेवर आले. मारुतीरायाला वंदन केले. सारे स्थानापन्न झाले. विलासने सुरुवात केली. 'आजी, आज एक गंमत झाली.'

'काय झालं?' आजींनी विचारले.

'मी सकाळी मावशीकडे गेलो होतो.' विलास सांगू लागला. 'मावशी दासबोध वाचणार म्हणून नुकतीच आसन घालून बसली. मी काल झालं त्याच्या पुढचं आत्मज्ञान प्रकरण पहावे म्हणून दासबोध उघडला . . . '

'त्यात गंमत कसली?' गणपतीने हटकले.

त्याच्या मांडीवर चापटी मारून विलास म्हणाला, 'जरा ऐक तर खरं. आजी, मी तुम्हाला सांगतोय. पहिलीच ओवी वाचली.

***ऐक ज्ञानाचें लक्षण । ज्ञान म्हणजे आत्मज्ञान ।***
***पहावें आपणासि आपण । या नाव ज्ञान ।।५/६/१।।***

जवळच कपाटाला आरसा होता. मी त्यात निरखून निरखून पाहिले. आपण आरशात रोजच पहातो. हेच का आत्मज्ञान!'

मावशीने हटकलेच. 'काय पहातोस एवढा!' 'काही नाही' म्हणत वेळ मारून नेली. काम उरकून घरी आलो. आजी, बस्स आपण आपल्याला पाहिलं . . . . '

'आरशात नव्हे' आजी म्हणाल्या, 'आरशात देहाचे प्रतिबिंब दिसते. ते तरी आहे तसे दिसते कां? उजवी बाजू डावीकडे. डावी उजवीकडे असे दिसते. हा तुझा सदऱ्याचा खिसा कोणत्या बाजूला दिसतो. असे देहाचे प्रतिबिंब पहाणे म्हणजे आत्मज्ञान नव्हे. 'आपणासि' म्हणजे खऱ्या 'मी' ला पहाणे. आपल्या मूळ स्वरूपाला पहाणे. म्हणजेच शोधणे. तात्पुरते नाशिवंत आहे ते सोडणे. टिकावू जे निश्चित असे आहे ते हृदयातच आहे. त्या अनुसंधानांत अखंड रहाणे म्हणजे आत्मज्ञान.'

विलासने कपाळावर हात मारला.

'त्यालाच शुद्ध ज्ञान म्हणतात.' आजी म्हणाल्या.



सुधा म्हणाली, 'आजी ही पहा शुद्ध ज्ञानाची ओवी.'

***ऐक शुद्ध ज्ञानाचें लक्षण । शुद्ध स्वरुपचि आपण ।***
***या नाव शुद्ध स्वरूपज्ञान । जाणिजे श्रोती ।।५/६/१०।।***

आजी म्हणाल्या, 'आपण ज्याला परमात्मा भगवंत म्हणतो त्याचेच आपण अंश आहोत. म्हणजे त्या चैतन्याचाच एक कण. तो आपल्या हृदयांत आहेच आहे. तेच बुद्धीला उजळा देते. देहाकरवी कार्य करवते. तेच आपण आहोत हा अनुभव सदैव घेत रहावे. त्या अनुभवांतच डुंबणे याला स्वरूप ज्ञान म्हणतात.'

'आजी, मधुकरने शंका विचारली, 'हा परमात्म रूप शुद्ध ज्ञानाचा झरा जर हृदयांतच आहे तर आपण आनंदात न राहता दुःखी कष्टी अपयशी वैतागलेले असे कां रहातो?'

'छान विचारलेस,' आजी म्हणाल्या, 'मधुकर आपण त्या रुपाला विसरतो. विस्मरण हे अगदी विचित्र असते. कां विसरतो? कसे विसरतो?'

जया म्हणाली, 'या विसरण्याची गंमत सांगते. परवा आजोबा तासभर काहीतरी शोधत होते. काय हवं हे कोणाला सांगतच नव्हते. पण शोधतच होते. शेवटी बाबांनीच विचारले, 'काय शोधत आहांत?' 'मी चष्मा शोधतोय. कुठे ठेवला. मला आठवत नाही.' तेव्हा छोटी आजोबांच्या जवळ जाऊन म्हणाली, 'तो ताय तुमत्या तपालावलच आहे!' आजोबा खळखळून हसले. त्यांना सवय आहे. वाचायच नसेल तेव्हा कपाळावर चष्मा सरकवतात. स्वतःच्याच कपाळावर चष्मा आणि शोधत होते घरभर. छोटीने सांगितल्यावर हात कपाळाकडे गेला नी चष्मा मिळाला. म्हणजे हरवला नव्हताच.

आजी म्हणाल्या, 'अगदी तस्संच आपलं होतं. ती दिव्य शक्ती, आत्मा जवळच हृदयातच जन्मापासून मरेपर्यंत असतो. पण ओळख पटत नाही. सद्गुरू ती ओळख करुन देतात. तेच आत्मस्वरूप सगळया जगाचे, विश्वाचे मूळ आहे. हा विश्वास पक्का होणे म्हणजे ज्ञान.

गणपती म्हणाला, 'या ज्ञानाने काय होते?'

'तूच वाच नं! ही पन्नासावी ओवी!' आजी म्हणाल्या.

***ज्ञान वन्ही प्रगटे । तेणें दृश्य केर आटे ।***
***तदाकारें मूळ तुटे । भिन्नत्वाचे ।।५/६/५०।।***

'दृश्य केर आटे म्हणजे काय?' विलासने विचारले.

'सांगते' आजींना आनंदच वाटला. 'दृश्य म्हणजे डोळयांना जे जे दिसते ते. अगदी तू मी सुद्धा. हे सगळे आज ना उद्या नाहीसे होणारच. त्यांनाच आपण चांगले, माझे असे म्हणत कवटाळून बसतो. म्हणून या शुद्ध कैवल्य ज्ञानाला विसरतो. पण एकदा का स्वस्वरूपाचे ज्ञान झाले की, कचरा कसा अग्नीत जळून जातो तसे असूनही दृश्य जळल्यागत नाहीसे होते. सगळ्या विश्वाची राख व्हावी लागत नाही. परमात्मा व आपण म्हणजे खरा मी यात जे जे आड येते ते नष्ट होते. मनातून नाहीसे होते व आत्ता जे आपणास देव वेगळा व मी वेगळा असं वाटतंय ते वाटणं बंद होऊन 'मीच तो' असा अनुभव येतो.'



जया म्हणाली, 'हा अनुभव लवकर यावा म्हणून काय करायचं?'

'हे बघ,' आजी म्हणाल्या, 'ही ओवी तूच वाच.'

***अखंड घडे श्रवण मनन । तरीच पाविजे समाधान ।***
***पूर्ण जालियां ब्रह्मज्ञान । वैराग्य भरे आंगीं ।।५/६/५९।।***

तिचे वाचून झाल्याबरोबर गणपती म्हणाला, 'श्रवणाचे मनन घडते हा अनुभव



हळू हळू येतोय. त्याने आनंद वाटतो. पुढचं पुढचं ऐकू अशी ओढ वाटते. हा आनंद म्हणजेच समाधान कां?'

'होय.' आजी म्हणाल्या, 'या समाधानाने फक्त आनंदच हवा बाकी काही नकोसे वाटते. जगातील वस्तू नाहीशाच व्हाव्या असे नाही. त्यांच्या बद्दलचा हव्यास नाहीसा होतो. हे एकाएकी जमत नाही. यासाठी साधना हवी. म्हणजेच अभ्यास करावा लागतो. सुधा, साधना केली नाही तर? वाच तू -'

***साधन न मने जयाला । तो सिद्धपणें बद्ध झाला ।***
***त्याहूनि मुमुक्षु भला । ज्ञानाधिकारी ।।५/६/७३।।***

विलास म्हणाला, 'हे बद्ध मुमुक्षु सिद्ध ही काय भानगड आहे?'

'विलास, भानगड बिनगड नाही.' मधुकर म्हणाला, 'आजी छान समजावून सांगतील. सांगा आजी.'

'बाळांनो, आजी म्हणाल्या, 'आधी बद्ध कोणाला म्हणतात हे दासबोधातूनच पाहू या. कोण वाचणार बरं!'

'मीच वाचतो,' विलास म्हणाला -

***जयासि नाहीं आत्मज्ञान । हें मुख्य बद्धाचें लक्षण ।***
***तीर्थ व्रत दान पुण्य । कांहींच नाही ।।५/७/१८।।***

'छान, कळल ना आता,' आजी म्हणाल्या, 'परमार्थ नको वाटतो पैसा खर्च होऊ नये म्हणून कोठे यात्रेला जातच नाही. देवधर्म दान काहीच करीत नाही. सत्संग नको. सारासार विचार नाही. अशा माणसांना बद्ध म्हणतात. जया, तू पुढचे वाच.'

***जागृति स्वप्न रात्रिंदिवस । ऐसा लागला विषये ध्यास ।***
***नाहीं क्षणाचा अवकाश । या नाव बद्ध ।।५/७/४८।।***

'मी सांगू कां अर्थ?' जया म्हणाली, जो माणूस जागेपणी, स्वप्नात दिवसा रात्री सारखा इंद्रियांना आवडते तेच देत रहातो. त्याचा त्याला कधी कंटाळाच येत नाही. पण परमेश्वराचे नाव घ्यायला त्याला वेळच नसतो. अशा माणसाला बद्ध म्हणतात. खाऊन पिऊन टामटूम. हसणे फिरणे धामधूम. परोपकार सामसूम.'

आजी म्हणाल्या, 'हा आनंद टिकाऊ नसतो. सुखा पाठोपाठ दुःख टपलेलेच असते. पशुसारखे जीवन न जगता देव होण्याचा प्रयत्न करावा.'

विलासने विचारले, 'असा प्रयत्न करणारास काय म्हणतात?'

'समर्थ तेच सांगत आहेत.' आजी म्हणाल्या. 'दुःखाच्या खाईत सापडला की त्याला पश्चाताप होतो. मी काहीच चांगले केले नाही. ज्या मूर्ती पूजेत ठेवल्या, पूजा केली त्याच विकून कर्ज भागवायचा प्रयत्न केला. कथा कीर्तने केली तरी पैसा मिळवण्यासाठी. आता? आता आयुष्य संपत आले. वाच. सुधा, आता तू वाच.'

***कोण उपाये करावा । कैसा परलोक पावावा ।***
***कोण्या गुणें देवाधिदेवा । पाविजेल ।।५/८/१७।।***

सुधा म्हणाली, 'आजी हे कसं झालं? शाळेत बरीच मुले पास झाली. व आपण नापास झालो की कळतं. 'मी खेळण्यात वेळ घालवला. मी वेळेवर अभ्यास केला नाही. आता काय करुं? रडा. दुसरं काय करणार?'

आजी म्हणाल्या, 'खरी जर मनापासून चूक पटली तर सहामाहीची भर वार्षिकला भरून निघते. मात्र खेळातला स्वार्थ सोडावा लागतो. सारखा अभ्यासाचा ध्यास लावावा लागतो. तसेच -

***स्वार्थ सांडून प्रपंचाचा । हव्यास धरिला परमार्थाचा ।***
***अंकित होईन सज्जनाचा । म्हणे तो मुमुक्षु ।।५/८/४३।।***

मुक्त होण्याची इच्छा करणारा असे करतोच. प्रपंच्यातले म्हणजे मुलाबाळावरचे प्रेम ओसरते घरादावरचे प्रेम ओसरते. सज्जनांची संगत धरली की तो मुमुक्षु. पण त्यासाठी काय करावे?'

गणपती म्हणाला, 'मला सांगा. मी वाचतो. त्याने दासबोध घेतला.'

***अवगुण त्यागी दिवसेंदिवस । करी उत्तम गुणाचा अभ्यास ।***
***स्वरूपी लावी निजध्यास । या नांव साधक ।।५/९/१४।।***

'छान,' आजी म्हणाल्या, 'आधी हे दुर्गुण आहेत हे कळावे लागते. मग ते टाकावेत हा प्रयत्न करावा लागतो. एक दुर्गुण गेला की दोन सद्गुण जमा होतात



त्यामुळे आत्मज्ञानाकडे मन वळते. मग त्या मुमुक्षुचाच साधक होतो. साधकाला जगाचे खोटेपण लक्षात आले की त्याच्या मनाचा निश्चय पक्का होतो. तो मोठेपणाला दूर झुगारून देतो. लौकीक वैभवाला तुच्छ मानतो. . . . .'

'म्हणजे त्याला खरे वैभव समजते म्हणा न! मी सांगतो खरे वैभव. विलास म्हणाला, 'पूर्ण समाधान, परम शांती, अखंड आनंद. बरोबर ना?'

'अगदी बरोबर.' आजी म्हणाल्या, 'तो साधक साधना करता करता मान सन्मान सर्व बाजूलाच सारतो.'

गणपती टाळी वाजवून म्हणाला, 'आजी ही बघा ओवी.'

***थोरपणासि पाडिलें । वैभवासि लिथाडिलें ।***
***महत्वासि झिंझाडिलें । विरक्ती बळे ।।५/९/३८।।***

'छान छान. 'झिंझाडिले' किती योग्य शब्द वापरला समर्थांनी. अंगावर झुरळ चढले तर ते जसे चटकन आपण दूर करतो तो व्यवहारातच नव्हे तर परमार्थांतही अतिशय सावध न तत्पर असतो. चूक होऊ देत नाही. शाश्वत अशाश्वताचा विचार करतो. . . . .'

'थांबा आजी, मी काढली ओवी.' विलास म्हणाला.

***सावध, दक्ष तो साधक । पाहे नित्यानित्य विवेक ।***
***संग त्यागूनि, येक । सत्संग धरी ।।५/६/५६।।***

'आता विलासने बाजी मारली हं.' आजी म्हणाल्या, 'मी हीच ओवी सांगणार होते. एकदा का दुर्गुणांचा, विषयांचा संग सुटला की सत्संग लाभायला वेळ लागत नाही.'

मधुने शंका विचारली, 'सत्संग लाभला की दुर्गुणांचा संग सुटतो की दुर्गुण गेल्यावर सत्संग घडतो?'

'छान शंका विचारलीस,' आजी म्हणाल्या, 'मला असं सांग सूर्य उगवल्यावर अंधार जातो की अंधार गेल्यावर सूर्य उगवतो?'

गणपती म्हणाला, 'दोन्ही एकदमच होणार की! जेथे प्रकाश तेथे अंधार राहीलच

कसा?'

आजी म्हणाल्या, 'होय ना? तस्संच आहे हे! एकदा का संतांची आदर्श व्यक्तीची संगत घडली की एकेक दुर्गुण काढता पाय घेतो. चांगले गुण आपोआप चिकटतात. अंगी पक्के बाणतात. त्याला प्रत्यक्ष प्रमाण येथेच नाही कां? दासबोध श्रवण हा आपला सत्संग चालू आहे. उशीरं होतोय कुणाला यायला? चपला बघा कशा ओळीने ठेवल्या आहेत न? न बोलता पाण्याची सोय केल्यावर पाय धुवून बंसा सांगावे लागले कां? मारुती रायाचं वंदन घडतयं ना आपोआप. मी सांगायच्या आधीच ओव्या पण सापडू लागल्या. म्हणजे माझ्या मनातले पण ओळखता येऊ लागले तुम्हाला!'

'बद्धाचा कोण होतो?' आजींनी विचारले.

'मुमुक्षु' सर्वांनी एकदमच उत्तर दिले.

'मुमुक्षुचे साधक होतो.' विलासने सांगितले.

'शाब्बास, साधक उत्कृष्ट साधना करु लागला की तोच सिद्ध होतो. सिद्ध म्हणजे जे साध्य करून घ्यायचे ते परमात्मरूप आपणच आहोत. हा पूर्ण अनुभव घेणारा. त्यालाच समर्थ साधु म्हणतात. सुधा वाच ओवी.' आजी म्हणाल्या.

***साधु वस्तु होऊन ठेला । संशय ब्रह्मांडाबाहेरि गेला ।***
***निश्चये चळेना ऐसा जाला । या नाव सिद्ध ।।५/१०/१०।।***

'बाळांनो, वस्तु म्हणजे परब्रह्म. सिद्ध पुरुष ब्रह्मरूपच होतो. मी देह आहे हा भ्रम उडतोच व निश्चयात्मक मी ब्रह्म आहे असा त्याला अनुभव येतो.

***आत्मबुद्धि निश्चयाची । तेचि दशा मोक्षश्रीची ।***
***अहमात्मा हें कधींचि । विसरो नये ।।५/१०/३८।।***

विलास अगदी हुरळून गेला. 'आजी मी पक्क लक्षात ठेवीन. मी आत्मा आहे', विलास म्हणाला, 'नव्हे मी आत्माच आहे. तुम्ही केव्हाही विचारा. झोपेत, म्हणजे मी झोपलो असेन तेव्हा विचारलेत तरी मी सांगेन 'मी आत्माच आहे. मग आपण सिद्धाच्या टप्प्यापर्यंत गेलो हे वेगळे सांगायलाच नको.'

इतक्यात 'वा! वा! विल्या सिद्ध झाला.' गणपती हळूच म्हणाला.



'आजी, बघा न हा मला 'विल्या' म्हणाला,' विलासची तक्रार.

'म्हणजे आपण अजून देहबुद्धीत आहोत. विलासराव', सुधा म्हणाली.

'झोपेत कशाला? मी विल्या नाही. विलास या देहाचे नाव आहे. माझे नाव विलास हेच आधी विसरायला हवे. मला नावच नाही. मी आत्मरूप आहे. हे अंतर्यामी जाणायला अभ्यास हवा. खूप अभ्यास हवा. तो पर्यंत चार नांवे तरी लक्षात ठेवू या!'

'हां थांब. मी ती नक्की सांगतो. १) बद्ध २) मुमुक्षु ३) साधक ४) सिद्ध.' विलास म्हणाला.

'शाब्बास विलासराव' गणपतीने पाठीवर शाबासकी जरा जोरातच दिली.

टाळया वाजवीत सारे म्हणाले -

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**

## दिवस ११ वा

मधुकर सत्यनारायणाचा प्रसाद घेऊन आला होता. मारुतीपुढे डबा ठेवून त्याने सर्वांनाच वंदन केले. आजी सगळयांना नमस्कार करुन जागेवर बसतात हे त्याने निरखून पाहिले होते.

'आज विशेष', गणपतीने विचारले.

'आमचेकडे आज सत्यनारायणाची पूजा झाली.' मधू म्हणाला, 'आईने सर्वांना देण्याकरिता प्रसाद दिला. तो घेऊन आलो. दासबोध अभ्यासून झाला की वाटू या.

आजींच्यासह सर्वांनी होकार दिला.

'आजी, मी आज सुरुवातीपासून अगदी आरतीपर्यंत पूजा पाहिली. तोंडाने आपण सत्यनारायण म्हणतो. पण बाबांनी बाळकृष्णाचीच मूर्ती ताम्हणांत ठेवली होती. तोच नारायण कां? तोच तेवढा सत्य कां? बाकीचे देव कां असत्य?'

गणपती म्हणाला, 'असे कसे म्हणतोस? आमचेकडे सत्य विनायकाची पूजा झाली होती. म्हणजे विनायक पण सत्यच. मग शंकर सत्य नाही कां? देवी सत्य नाही

कां? सत्य मारुतीची पूजा कधी कोणी ऐकली आहे?'

त्यांना थांबवून आजी म्हणाल्या, 'किती किती प्रश्न हे? बाळांनो, देवघरांत सर्वच मूर्ती आपण आपल्या आवडीप्रमाणे पुजतो. पण समर्थ म्हणतात,

***ब्रह्मा विष्णू आणि हर । त्यांसी निर्मिता तोचि थोर ।***
***तो वोळखावा परमेश्वर । नाना येत्नें ।।६/१/१२।।***

बाकीच्यांचा अनादर करु नये. खरा देव जाणता येत नाही तोपर्यंत भक्तीभाव वाढीस लागेल ते जरूर करावे.' आजींनी दासबोध उघडून ओवीपाशी बोट ठेवले मात्र. आजींच्या हातातच दासबोध. तरी जयाने वाचले -

***जो जाणेल भगवंत । तया नाव बोलिजे संत ।***
***जो शाश्वत आणी अशाश्वत । निवाडा करी ।।६/१/१६।।***

'बरोबर', आजी म्हणाल्या, 'देवघरातल्या मूर्ती नीट जपल्या तरच पिढानुपिढ्या रहातात. नाहीतर एखादी मूर्ती निर्माल्याबरोबर गायब होते.

'आमच्या कडचा नर्मदा गणपती असाच हरवला.' मधुने पुष्टी दिली.

आजी म्हणाल्या, 'मातीची मूर्ती, काचेची मूर्ती तुटते - फुटते. पाण्याने खराब होते. त्यांना देवाच्या प्रतिमा मानू या. पण ते खरे देव नव्हेत. जो कायम टिकतो तो खरा देव. त्याला ओळखणे ही खरी विद्या. बाकीच्या पोटभरू विद्या.'

पोटभरू उच्चारल्याबरोबर सुधाने दासबोध हातात घेतला.

***येवं पोट भराव्याची विद्या । तयेसी म्हणो नये सद्विद्या ।***
***सर्वव्यापक वस्तु सद्या । पाविजे, तें ज्ञान ।।६/१/२३।।***

'ठीक', आजी म्हणाल्या, 'या शुद्ध ज्ञानानेच म्हणजे आत्मज्ञानाचेच परब्रह्म शक्तीला ओळखायचे. ही कला संतापाशीच शिकायची.'

गणपती या पुढच्या दोन्ही ओव्या तूच वाच.' आजींनी त्याच्या हातात दासबोध दिला. गणपतीने घसा खाकरला व वाचले -

***जें शस्त्रें तोडितां तुटेना । जें पावकें जाळितां जळेना ।***
***कालवितां कालवेना । आपेंकरूनी ।।६/२/१६।।***



***जें वायोचेनि उडेना । जें पडेना ना झडेना ।***
***जें घडेना ना दडेना । परब्रह्म तें ।।६/२/१७।।***

विलास म्हणाला, 'मी अर्थ सांगतो. जे शस्त्राने तुटत नाही. पावके . . . . पावके म्हणजे'

आजींनी सुचवले, 'पावक म्हणजे अग्नी.'

विलास म्हणाला, 'हं बरोबर, जे अग्नीने जळत नाही. पाण्याने भिजत नाही. वाऱ्याने उडून जात नाही. जे कधी पडत नाही. म्हणजे घरं पडतात, झाडे पडतात तसं जे पडत नाही, झिजत नाही, जे कधी घडवलं म्हणजे तयार केलं जात नाही. जे लपून रहात नाही त्याला परब्रह्म म्हणतात.

'बरोबर,' आजी म्हणाल्या, 'मनुष्य जेवढे पहातो ते सत्य खरे टिकावू समजतो. उलट ही परब्रह्म शक्ती व्यापक, सर्वत्र असलेली पण डोळ्यांनी दिसत नाही त्याला लोक जाणत नाहीत. यासाठी विवेक ही शक्ती वाढवावी. विवेकाने, खोल चिंतनाने त्या परब्रह्मास ओळखावे. तसे साधले की,

***संसारी पुंडावें चुकलें । देवा भक्ता ऐक्य जालें ।***
***मुख्य देवास वोळखिलें । सत्संगें करुनी ।।६/२/४५।।***

या संसारातील हिसका हिसकी, हेवे दावे, देणे घेणे सारे कांही चुकते. विराम पावते. विचार शांत होतात. देव व भक्त एकच होतात आणि मुख्य देव सापडल्याचा आनंद होतो.

मधुकर, कळला आता खरा नारायण? ही बघ ओवी समर्थ सांगतात.

मधुने ओवी वाचली -

***अविनाश ते ब्रह्म निर्गुण । नासे ते माया सगुण ।***
***सगुण आणि निर्गुण । कालवले ।।६/३/६।।***

'छान.' आजी म्हणाल्या, ' जे कधी नाश पावत नाही ते परब्रह्म निर्गुण. व जी नाश पावते ती माया सगुण. ती माया परब्रह्मातूनच निर्माण झाली. म्हणून तिच्यात २ अंगे १) निर्गुण २) सगुण. आपण सगळे दोन्हींच्या मिश्रणातच आहोत.

गणपती म्हणाला, 'म्हणून आपण त्या मिश्रणातले चांगले ते घ्यायचे व वाईट ते टाकायचे असच ना?'

'उसातला रस घ्यायचा, चोयट्या टाकायच्या.' विलास म्हणाला.

'शहाळातलं पाणी घ्यायचं, शहाळ टाकायचं.' जया म्हणाली.

'नारळातलं खोबरं घ्यायचं करवंटी टाकायची.' सुधा म्हणाली.

आजी हसल्या. 'अगदी बरोबर आहेत दृष्टान्त. रस, पाणी, खोबरं घेतलं की चोयट्या, शहाळं, करवंटी त्याज्य असे आपण व्यवहारांत म्हणतो पण त्यातही परब्रह्म शक्ती असतेच. ही बघ ओवी. जया वाच.'

***जें जें कांहीं निर्माण जालें । ते तें आधींच ब्रह्में व्यापिलें ।***
***सर्व नाशतां उरलें । अविनाश ब्रह्म ।।६/३/१८।।***

'म्हणजे आजी,' जया म्हणाली, 'विहीरीत बादली सोडली. तिच्या आतपण पाणी बाहेरपणपाणी. बादली वर ओढून घेतली तरी विहीरीत पाणी आहेच आहे.

'बरोबर. अगदी तस्संच!' आजी म्हणाल्या, 'विहीरीतलं पाणी बादलीत. बादलीतलं पाणी घंघाळांत. घंगाळ्यातलं लोटीत. लोटीतलं पाणी वाटीत. तरी पाणी तेच.'

'हे पाणी जसं चार पाच ठिकाणी विभागलं तसं परब्रह्माचं काय झालं?' विलासने शंका विचारली.

'सांगते.' आजी म्हणाल्या, 'परब्रह्मातून स्फूर्ती रुपाने माया निर्माण झाली. मायेने पोकळी म्हणजे आकाश व्यापले. हालचाल झाली. तो वायू उत्पन्न झाला. वायूपासून अग्नी उत्पन्न झाला. अग्नी म्हणजे तेज. अग्नीपासून पाणी, पाण्याला म्हणतात आप. पाण्यापासून पृथ्वी तयार झाली. पृथ्वीवर वनस्पती, प्राणी पशूपक्षी मानव तयार झाले. खेळच खेळ मायेचा.

या खेळांत जो गुंततो तो म्हणतो कोहं. आणि विवेकी म्हणतो . . .

सुधा म्हणाली, 'थांबा आजी, ही पहा ओवी -

***तत्वी गुंतला म्हणे कोहं । विवेक पाहातां म्हणे सोहं ।***
***अनन्य होता अहं सोहं । मावळली ।।६/३/३५।।***



विलास, अनन्य भावाने कोणाला नमन करायचे? त्याने काय होते?'

'सांगतो,' विलास म्हणाला, 'नुसत नमन नाही. शरण जायचं. त्यांच्या वचनावर विश्वास ठेवायचा. कोणाच्या? संतांच्या. म्हणजे आत्ता समर्थांच्या वचनावर विश्वास ठेवून ऐकायचं. म्हणजे कोहं सोहं बंदच. कोहं म्हणजे मी कोण? आणि सोहं म्हणजे तो मीच. संत वचनामृताने सर्वच मिटले. मी आत्मा.'

'छान,' आजींनी शाबासकी दिली. 'आता थोडा खेळ हं. ब्रह्माच्या अगदी विरुद्ध मायेची लक्षणे आहेत. मी जे लक्षण सांगेन त्याच्या विरुद्धचे लक्षण बोटाने विचारेन त्यानेच सांगायचे. गोंधळ करायचा नाही.'

सारे नीट सावरून बसले. आजींचे बोट कोणाकडे येते, इकडे लक्ष

आजी - ब्रह्म निर्गुण

विलास - माया सगुण

आजी - ब्रह्म दिसेना - भासेना

गणपती - माया दिसते, भासते. भ्रम निर्माण करते.

आजी - ब्रह्म उपजेना, मरेना.

जया - माया उपजे. माया मरे म्हणजे नासे. नाश पावते.

आजी - माया तुटे, विटे.

मधु - ब्रह्म तुटेना विटेना.

आजी - माया विकारी, सर्वकरी

सुधा - ब्रह्म अविकारी, काहीच न करी.

'पण आजी एक विचारु? ब्रह्माच्या आज्ञेशिवाय माया काहीच करु शकत नाही ना? म्हणजे सर्व कांही करतो तो ब्रह्मच. आणि काहीच करत नाही हे तरी कसं म्हणायचं?'

'हिने मध्येच खेळ थांबवला.' विलासची तक्रार.

'असू दे.' आजी म्हणाल्या, 'शंका मनात ठेवून ऐकू नये. सुधा परब्रह्म मायेला

फक्त आज्ञाच देतो असं नव्हे. शक्तीही पुरवतो. तिच्यावर सारे सोपवतो व आपण अलिप्त रहातो. हे अलिप्तपण आपल्यात आले की आपण ज्ञानी झालो म्हणायचे! परब्रह्माला हे सहज जमते. म्हणून त्याला म्हणतात ब्रह्म अलिप्त.'

आजींनी विलासकडे पाहिले. विलास बोल - ब्रह्म अलिप्त.

विलास चुळबुळ करु लागला. खट्टू झाला.

सुधा म्हणाली - माया लिप्त.

विलास मनातच लिप्त अलिप्त २/३ वेळा म्हणत राहिला.

आजी- ब्रह्म थोर

विलास - माया लहान

आजी - माया प्रत्यक्ष

मधुकर - ब्रह्म अप्रत्यक्ष

आजी - माया लक्ष

गणपती - ब्रह्म अलक्ष

आजी - माया अल्प

सुधा - ब्रह्म विशाल

विलास मध्येच म्हणाला, 'सुधाला कसं चटकन येतं . मग मीच का गांगरतो? आजी मी घेऊ कां खेळ?'

'घे, घे', आजी म्हणाल्या.

विलास - ब्रह्म कोमल

गणपती - माया कठीण

विलास - ब्रह्म अविनाशी

मधुकर - माया नासे

विलास - ब्रह्म घडे



गणपतीने त्याच्या मांडीवर एक चापटी मारली. विलासराव, ब्रह्म 'घडेना' म्हणा. आता मी सांगतो, 'माया घडे'

विलासनेपण त्याला चापटी मारत म्हटले, 'मी मुद्दामच उलटे सांगितले. म्हटलं तुझं लक्ष आहे की नाही?'

आजी हसल्या. सगळेच हसले.

आजी म्हणाल्या, 'बाळांनो आपण नदीकाठी गेलो. काठावरच घाटाच्या पायरीवर बसलो व नदीच्या पात्राकडे पाहिले की काय भास होतो?'

गणपती म्हणाला, 'पाण्यात झाडे उलटी दिसतात. पलीकडच्या काठावरची माणसे पण पाण्यात उलटी दिसतात.'

मधुकर म्हणाला, 'इतक्या उंचीवरचं आकाश पाण्यात दिसत. पण ते तर पाण्यापासून किती अलिप्त दूर अंतरावर असतं.'

आजी म्हणाल्या, 'तस्साच परमात्मा म्हणजे परब्रह्म अगदी काय म्हणायचं विलास लिप्त की अलिप्त?'

'कोण माया की परब्रह्म?' विलासने विचारले.

गणपती म्हणाला, 'आता प्रश्न ब्रह्माचा चालला आहे. लक्ष कुठे आहे तुझं!'

विलास म्हणाला, 'मी तेच घोकत होतो लिप्त अलिप्त. ब्रह्म लिप्त. नाही नाही. ब्रह्म अलिप्त. माया लिप्त.' पुन्हा सगळे हसले.

'आजी हसू दे सगळयांना. मी एकटाच सांगतो. 'ब्रह्म अखंड माया खंडित. ब्रह्म पडेना माया पडे. ब्रह्म विकारी - जीभ चावत - नाही. नाही - ब्रह्म अविकारी माया विकारी. ब्रह्म अरूप - माया रुपधारी. ब्रह्म निश्चळ - माया चंचळ. ब्रह्म अभंग - माया भंगते. आणखी - आणखी - '

आजी म्हणाल्या, 'खूप सांगितलेस व छान सांगितलेस. संत महिमा अगाधच. आपल्याला येत नाही असं वाटतं. पण संत कृपा झाली की बुद्धीला उजळा मिळतो, बुद्धी सूक्ष्म होते. ब्रह्म सूक्ष्म '

विलास म्हणाला, 'माया स्थूल.'

'शाबास,' आजी म्हणाल्या, 'आला लक्षात संतांचा मोठेपणा! जगांत आंत बाहेर भरून असलेला परमात्मा ते प्रचितीला आणून देतात.'

'पण आजी आत्ता तर दासबोध रूपाने समर्थ आहेत. प्रचिती कोणती?' विलास म्हणाला.

'नाही लक्षात आलं?' आजी म्हणाल्या,'बोलता बोलता मी सूक्ष्म म्हटल्याबरोबर तुला 'स्थूल सूक्ष्म' असे स्फुरले ना? ते आत्मशक्तीच्याच प्रेरणेने. बुद्धी विचारशील झाली की योग्य तेच स्फुरते. बुद्धीची सूक्ष्मता मनाला खेचून घेते. त्यामुळे मन स्वच्छ नी सुंदर बनते. या क्षणाला एवढी प्रचिती पुरे.

जसा जसा अभ्यास वाढेल तसा तसा ज्ञानाचा अनुभव येईल. अधिक अधिक येईल. मग आनंदच आनंद.

आज खेळातून आनंद मिळाला. आज प्रसाद विलासच वाटेल.'

सगळ्यांनी होकार दिला. प्रसाद वाटप झाले.

आजींनी नमस्कार केला.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

## दिवस १२ वा

आज विलासचा चेहरा पडलेला दिसला. आजींनी सर्वांना वंदन केले. स्थानापन्न झाल्या. त्यांनी विचारले, 'विलास, आज तुला बरं वाटत नाही कां? काय होतंय?'

गणपती म्हणाला, 'मी सांगतो, तो त्याच्या बाबांच्यावर रागावला आहे. त्याचे बाबा त्याला स्कूटर घेऊन देत नाहीत.'

'होय रे विलास, खरं कां हे?' आजींनी प्रेमळपणाने विचारले.

'आजी, बाबा म्हणाले, तू अजून अज्ञानी आहेस. सज्ञान हो मग स्कूटर घेऊन देतो.' विलास खुलासा करू लागला. 'आजी रोज मी दासबोध वर्गाला येतो. उन्हातलं हुंदडणं बंद झालं. आईशी पण हल्ली वादावादी करीत नाही. आईच म्हणाली तसं. तरी



बाबा म्हणतात मी सज्ञान नाही. आजी मी देह नाही. मी आत्मा आहे ह आता कळू लागल्यावरही मी सज्ञानी नाही कां?'

आजी हसल्या, 'येवढंच होय! हे बघ विलास कायद्याच्या चौकटीतला सज्ञानी व अध्यात्मातला सज्ञानी यांत फरक आहे. वाहन चालवण्यास, मतदान करण्यास, विवाहास कायद्याने वयाचे बंधन असते. त्या वयोमर्यदिनंतरच तुला कायदेशीर सज्ञानी म्हणतील. रागावू नकोस बाबांच्यावर. त्यांनी तुझ्या हिताचंच सांगितलं आहे. कायद्याच्या कचाट्यात सापडून दंड शिक्षा नाचक्की सगळंच थांबेल. असं कितीसं थांबावं लागेल? वर्ष दोन वर्षच न? आत्ता जातील दोन वर्ष.

त्याच्या आत आपण दासबोध संपूर्ण अभ्यासून ज्ञानी होऊ या. अज्ञानी सज्ञानी असे दोन प्रकार माणसांचे आढळतात. ज्यांना आत्मज्ञान झाले नाही ते अज्ञानी. ज्यांना आत्मज्ञान झाले ते ज्ञानी म्हणजेच सज्ञानी. जरा मोठा झालास की स्कूटरच काय मोटार सुद्धा चालवशील. या म्हातारीला लांबच्या राम मंदिरांत घेऊन जाशील होय ना?

हे बघ, अज्ञानी काय म्हणतो, हे सगळं जग जर डोळ्याला दिसतय तर तो खोटं कसं? तुला कळलं ना आता खोट म्हणजे काय ते!'

'हो तर!' उल्हासाने विलास म्हणाला, 'जरी आज हे जग म्हणजे सगळी सृष्टी, पशू पक्षी तुम्ही आम्ही वनस्पती सजीव, हालते बोलते दिसलो तरी त्यांत बदल होणार, नाहीसे होणार. जुने जाणार नवे येणार. म्हणून जग खोटे. आहे तस्से रहाणार नाही. म्हणून खोटे.'

'बरोबर!' आजी म्हणाल्या, 'पण अज्ञानी पुन्हा आड रानांत शिरतात जर जग मिथ्या आहे. तर स्नान संध्या पोथी वाचन भजन पूजन का करायचे? म्हणून विचारतात.

ज्ञानी मनुष्य संयमशील असतो. तो शांतपणे सांगतो. खरा देव पंचमहाभूतांच्या पलिकडे आहे. तरी सुद्धा . . . . '

'आजी, मी सांगतो पुढचं - ' मधुकर म्हणाला, 'तरी सुद्धा स्वतःला पक्का अनुभव येईपर्यंत उपासना हवीच.'

आजी म्हणाल्या, 'खरं आहे. पण त्यांत गुंतून न पडता अंतरंगातून खरा देव शोधत रहावे.' सुधालाओवी दाखवली. 'वाच तू!'

***सृष्टीपूर्वी सृष्टीचालतां । सृष्टी अवघी संव्हारतां ।***
***शाश्वत देव तत्वता । आदि अंती ।।६/६/४८।।***

आजी म्हणाल्या, 'मधुकर आता आले कां ध्यानात? जो सृष्टीपूर्वी होताच. आत्ता आहे. पुढेही सृष्टी नाश पावली तरी जो असणारच तोच खरा देव. तोच सत्य. तोच नारायण. तोच सत्यनारायण. हे ज्ञान ज्याला पक्के होते तो ज्ञानी. म्हणजे सज्ञान. कळलं कां विलास?

पण हे एकाएकी जमणार नाही. म्हणून समर्थ म्हणतात - '

विलासने ओवी वाचली.

***सगुणाचेनि आधारें । निर्गुण पाविजे निर्धारें ।***
***सारासार विचारें । संतसंगे ।।६/६/५५।।***

आजी म्हणाल्या, 'आत्मज्ञानी होण्याकरिता तीन गोष्टी हव्यात. सांगल कोणी?'

गणपती म्हणाला, 'सगुणाची उपासना, सारासार विचार व सत्संग.'

त्याच्या पाठीवर शाबासकी देत विलास म्हणाला, 'बरोबर'.

आजी म्हणाल्या, 'शब्दाने थोडेसे कळले की कांही माणसांना वाटते आपण खूप ज्ञानी झालो. त्या अहंकाराने भजन पूजन देवकृत्ये पूर्वी जी करीत असत ती पण बंद पडतात. विलास मला सांग की एकदा संतांना शरण गेल्यावर त्यांची आज्ञा पाळायला हवी कां नको?'

'हवी तर!' विलास म्हणाला, 'त्याचं ऐकायचंच नसेल तर शरण जायचंच कशाला?'

'म्हणून समर्थ म्हणतात. वाच तूच' आजी म्हणाल्या.

***गुरुचें वचन प्रतिपाळण । हें मुख्य परमार्थाचे लक्षण ।***
***वचन भंग करिता विलक्षण । सहजेंचि जालें-।।६/७/१०।।***

'छान,' आजी म्हणाल्या, 'जीवनात उलटा सुलटा अनुभव येण्यापेक्षा आपले कोट कल्याण करणाऱ्यावर दृढ विश्वास असावा - कारण

***मी थोर वाटे मनीं । तो नव्हे ब्रह्मज्ञानी ।***
***विचार पहातां देहाभिमानी । प्रत्यक्ष दिसे ।।६/७/२५।।***



सूर्याचे उगवणे मावळणे, सागराची भरती ओहोटी, पर्जन्य काळातील पाऊस इ. विश्वातील गोष्टा ज्या भगवंताच्या सत्तेने चालतात तोच ह्या देहाचा मालक आहे. कर्ता भोक्ता तोच हा निश्चय पक्का असावा;

गणपतीने शंका विचारली, 'तो कर्ता म्हणजे आपण कांहीच करायचे नाही कां ?

मधुकर म्हणाला, 'गणपती तुझ्या लक्षात नाही आलं. भगवंत प्रत्यक्ष काही करीत नाही, कार्य आपणच करायचे, पण त्याला स्मरून करायचे. यश अपयश त्याचे हाती. आपण पोष्टमनच जणू ! पत्रांचे धनादेशाचे वाटप केले की पोष्टमन स्वस्थ. असंच ना आजी ?

'होय' आजी म्हाणाल्या.

'आजी त्याला स्मरून अभ्यास केला. पेपर लिहिला पण नापास झालो तरी स्वस्थच रहायचे कां ? दु:ख नाही मानायचे कां ? गणपतीने विचारले.

सुधा म्हणाली गणपती, मन लावून त्याला स्मरून अभ्यास केला की नापास होणारच नाही हा विश्वास हवा, कारण उत्तम उत्तरे लिहिण्याची बुध्दी तोच देतो'. आजींनी सुधाला ओवी दाखवली.

***मी कर्ता ऐसे म्हणसी । तेणें तूं कष्टी होसी ।***
***राम कर्ता म्हणतां पावसी । येश कीर्ती प्रताप ।।६/७/३६।।***

आजी म्हणाल्या, 'कर्तृत्व आपल्याकडे घेतलें की अहंकार वाढतो. त्यामुळे आपण भगवंताला विसरतो. पण त्याचे अखंड स्मरण ठेवले तर ? त्याची कृपा अनुभवास येते.

विलासने शंका विचारली. 'त्याची कृपा म्हणजे काय होते?'

आजींनी खुलासा केला. 'यथार्थ ज्ञान होणे ही त्याची कृपा'

***मिथ्या साचासारिखें देखिलें । परी तें पाहिजे विचारिलें ।***
***दृष्टी तरळतां भासलें । तें साच कैसें मानावें?।।६/८/१३।।***

आजी म्हणाल्या, 'विचारले'म्हणजे विचार करावा. पिवळे दिसते ते सगळेच सोने नसते. जगातील मायिक वस्तू खऱ्या अशा वाटतात. त्यांचा नाशिवंत पणा लक्षात घ्यावा . विलास तू वाच ही ओवी -

***दृष्टीसि दिसे मनासि भासे । तितुकें काळांतरी नासे ।***
***म्हणोनि दृष्यातीत असे । परब्रह्म तें ।।६/८/४७।।***

अशी ब्रह्माची खूण पटणे हीच कृपा. कृपा म्हणजे पैशाचा पाऊस नव्हे. आजी म्हणाल्या,'बाळांनो, जगांत जास्त घात कशाने होत असेल तर पैशाने, मिळणारी सुखे माणसाला गर्तेत पाडतात. म्हणून विवेकाने काय करावे ? जया ही ओवी वाच.

***रायाचे सन्निध होतां । सहचचि लाभे श्रीमंतता ।***
***तैसा सत्संग धरितां । सद्वस्तू लाभे ।।६/९/२०।।***

'सद्वस्तू म्हणजे परब्रह्म ना ?' जयाने विचारले.

आजी म्हणाल्या,'होय. व्यवहारांत पण आपण पहातो, घरी कोणी परके येणारसे कळले की घर कसे नीट नेटके आवरलेले स्वच्छ करतो. शाळेत मोठे साहेब येणार म्हणून कळले की बाके धुण्यापासून स्वच्छता, जेथे गबाळेपणा तेथे अव्यवस्थता. जेथे नेटकेपणा तेथे आनंदाचे मूळ परब्रह्म.

राजाचे संगतीत वैभव भोगायला मिळते. तसे संताच्या संगतीत खरे वैभव भोगायला मिळते.

विलासने शंका विचारलीच, 'राजाचे वैभव तरी कुठे शाश्वत असते? मग त्याच्या संगतीतले वैभव पण अशाश्वतच.'

आजी म्हणाल्या, 'म्हणूनच ज्ञानाची विचारांची श्रीमंती ज्यांचे जवळ आहे. त्यांचीच संगत धरावी. म्हणजे अक्षय ठेवा जे ब्रह्मज्ञान ते प्राप्त होते. हीच भगवंताची कृपा.

बाळांनो, समर्थांना केवढा आत्मविश्वास आहे पहा! ते म्हणतात,

***ये गोष्टीस करी अनुमान । तो सिद्धचि पावेल पतन ।***
***मिथ्या वदे त्यासी आण । उपासनेची ।।६/९ ।।***

जया म्हणाली, 'ज्या उपासनेची शपथ घेऊन बोलतात, सांगतात त्या उपासनेने काय मिळते?'

'सांगते.' आजी म्हणाल्या, 'समर्थांचेच शब्दात ऐक.'



***जें बोलास आकळेना । बोलिल्याविणाहि कळेना ।***
***जयासि कल्पितां कल्पना । हिंपुटी होये ।।६/१०/७।।***

***ते जाणावें परब्रह्म । जें वेदांचें गुह्य परम ।***
***धरितां संत समागम ।.सर्वहि कळे ।।६/१०/८।।***

आजी म्हणाल्या, 'बाळांनो, वेद म्हणजे ज्ञान, ते परम गुह्य आहे. संत संगतीत ते शुद्ध ज्ञान ध्यानांत येते. वृत्ती समाधान पावते. पूर्ण समाधान हे परब्रह्म स्वरूप असते.

परब्रह्म नामक दिव्य शक्तीला आपण या डोळयांनी पाहू शकत नाही. शब्दांनी कितीही वर्णन केले तरी ते अपुरेच समजावून देण्याचे साधन शब्दच. 'नको हो, कशाला' एवढेच खुणांनी समजू शकतो. बाकीचा व्यवहार शब्दातच चालतो. ते शब्दच खुंटतात. कल्पना चालत नाही. असे परब्रह्म संत संगतीत ध्यानांत येते. त्याचा अनुभव कसा घ्यावा हे कळते.

गणपती म्हणाला, 'आजी, आपल्या शरीरांत असणाऱ्या दिव्यत्वाचाच अनुभव ना? त्यालाच ज्ञान म्हणतात कां?'

आजी म्हणाल्या, 'होय. आता तूच वाच.'

***दुजेविण अनुभव । हे बोलणेंचि तो वाव ।***
***या कारणें नाहीं ठाव । अनुभवासी ।।६/१०/२९।।***

***अनुभवें त्रिपुटी उपजे । अद्वैतीं द्वैतचि लाजे ।***
***म्हणौनि बोलणें साजे । अनुर्वाच्य ।।६/१०/३०।।***

आजी म्हणाल्या, 'छान, हे बघा. पपई गोड आहे की नाही हे केवळ रंगावरून, आकारावरून कळेल कां?'

विलास म्हणाला, 'नाही. पपई कापून एक फोड का होईना पण खाऊन पहायला हवी. तरच कळेल गोड आहे की नाही।'

'बरोबर' आजी म्हणाल्या, 'हे स्वतःला कळणे म्हणजे अनुभव. या अनुभवासाठी पपई व खाणारा दोघे हवेतच. याला वेगळेपण म्हणतात. खाणारा तोच पपई किंवा पपई तोच खाणारा असे असत नाही. आत्मस्वरूपाचा अनुभव आला की वेगळेपणा संपलाच.

विलास चटकन म्हणाला, 'सोहं! तोच मी, येथे अनुभव घ्यायला मी वेगळा रहात नाही. असंच ना!'

आजी म्हणाल्या, 'अगदी बरोबर, अनुभव, ज्याचा अनुभव घ्यायचा ती वस्तू व अनुभव घेणारा या तीन गोष्टी वेगळ्या असतात. त्याला त्रिपुटी म्हणतात. त्रिपुटीत वेगळेपणा असतो. स्वरूपज्ञानांत वेगळेपणा नाही.'

मधुकर म्हणाला, 'म्हणजे मी अनुभव घेतो असे म्हणायला मी वेगळा रहात नाही. तो मी म्हणजेच परब्रह्म. असंच म्हणायचं कां?'

आजी म्हणाल्या, 'होय आणि ही एकरूपता आली की शब्दाने काय सांगणार? ते शब्दाने सांगता येत नाही म्हणून - '

सुधा म्हणाली, 'अनुर्वाच्य! म्हणजे वाचेने बोलून सांगता येत नाही.'

गणपती टाळी वाजवून म्हणाला, 'आता या डोक्यात थोडस शिरलं.'

आजी हसल्या, 'विलास ही ओवी वाच.'

***तुज वाटे ही जागृती । मज जाली अनुभव प्राप्ती ।***<br>
***या नांव केवळ भ्रांती । फिटलीच नाहीं ।।६/१०/५५।।***<br>
***जागृती या पैलिकडे । तें सांगणें केवि घडे ।***<br>
***जेथे धारणाचि मोडे । विवेकाची ।।६/१०/५९।।***

'झोपेतून जागेपण व अज्ञानातून जागेपण आलं ना ध्यानांत.' आजी म्हणाल्या.

'खरं जाग होण म्हणजे सज्ञान. माझ्या आलं लक्षात असं म्हटलं की लक्षात येणारा देहात्म बुद्धीतला मी शिल्लक राहिला.

'समजलं तरी आंत अनुभवायचं. तोंडाने बोलायचे नाही. आनंदात रहायचे. असेच ना?' मधुकरने विचारले.

'शाब्बास, आजी म्हणाल्या. आज शब्दाने कळले. सतत अभ्यासाने अनुभव आला की खरे ज्ञानी झालो. खुंटले. बोलणेच खुंटले. व्यवहारांत बोलायचे पण अंतरंगात अनुसंधान कायम ठेवायचे. अखंड आनंदात रहायचे.'

विलास म्हणाला, 'जरा अवघडच आहे आजी. जमेल का हो आम्हाला? म्हणजे मला जमेल का म्हणतो मी!'



आजी म्हणाल्या, 'दृढ प्रयत्नाने काय जमत नाही? साधणारच ते साधावे म्हणून तर प्रार्थना. कोणाची?'

सुधा म्हणाली, 'मारुती रायाची. मी म्हणू का मारुती स्तोत्र?'

सुधाने 'भीमरूपी महारुद्र' स्पष्ट आवाजात म्हटले.

'आजी, आता अथर्वशीर्ष आमचं पाठ झालं. आम्ही आता हे स्तोत्र पाठ करू.' विलास म्हणाला.

'करा. करा. असेच उमेदीने पुढे या.' आजी म्हणाल्या.

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**

## दिवस १३ वा

चौघेजण वेळेवर आले. गणपतीला थोडासा पण उशीर झाला. त्याला बसायला सांगून आजींनी विचारपूस केली. थोडाच पण का बरं उशीर झाला?

'सांगतो.' आजी माझा मामेभाऊ सकाळी आला. तो म्हणाला, 'आपण दोघे क्रिकेट खेळू.' मी म्हटले. आमचा आत्ता दासबोध वर्ग असतो. छान गमती जमती कळतात. तू पण चल. आजी, तो माझ्या पेक्षा मोठा आहे. तो म्हणाला मराठीतल्या ग्रंथात कसलं आलंय ज्ञान? ज्ञानाचे ग्रंथ संस्कृतात असतात. गीता, रामायण, महाभारत. सगळे ग्रंथ संस्कृतात आहेत. आपण मोठे होऊन संस्कृत कळू लागलं की पाहू! तो पर्यंत खेळातला आनंद लुटू.'

मी त्याला पटवू शकलो नाही. 'तू येऊ नको वाटल्यास. पण मला अडवू नकोस. ही गोष्टीची पुस्तके वाच. तो पर्यंत मी येतो. मग आपण खेळू या. असे सांगून मी पळालो. मी पायरीवर आलो. तेव्हा तुम्ही डोळे मिटून नमस्कार करीत होतात. म्हणून मी थांबलो. इतका मन लावून नमस्कार कोणाला करीत होतात?'

'मी नं?' आजी म्हणाल्या, सांगते -

***विद्यावंतांचा पूर्वजु । मत्ताननु येकाद्विजु ।***<br>
***त्रिनयेन चतुर्भुजू । फरशपाणी ।।७/१/१।।***

सांग बघू कोणाचे ध्यान हे!

गणपती म्हणला, 'विद्यावंत चतुर्भुज फरशपाणी यावरून गणपती असावा. पण 'येकद्विजु' नाही कळलं!'

मधुकर म्हणाला, 'एकच दात. दाताला द्विज म्हणतात. दोनदा जन्म दातांचा. पहिले दुधाचे दात. मग ते पडून जरा भक्कम दात येतात. ते पडल्यावर मात्र बोळकं. आता कळलं एकद्विजु!'

'कळलं. पण तुझ्या कसं लक्षात आलं?' गणपती म्हणाला, मी द्विज म्हणजे ब्राह्मण समजत होतो.' गणपती म्हणाला.

'तेही बरोबर,' सुधा म्हणाली, 'उपनयन संस्काराचे आधीचा एक जन्म व उपनयन संस्कारानंतरचा जन्म. तेव्हाच मुलगा ब्राह्मण होतो. पण आजींनी वंदन केले गणपतीला.

आजी म्हणाल्या, 'त्यानंतर परब्रह्म शक्तीला, शारदेला वंदन करुन सद्गुरुंना वंदन केले. कारण सांगशील?'

मधुकर म्हणाला, 'मी सांगतो. सद्गुरू शिष्याला अज्ञानातून बाहेर काढतात. आत्मज्ञानाने परिपूर्ण करतात. ज्ञान सूर्याचा उदय त्यांच्या बोधामुळेच होतो.'

'शाब्बास,' आजी म्हणाल्या. ही ओवीं वाच.

***ज्ञानसूर्य मावळला । तेणे प्रकाश लोपला ।***
***अंध:कारें पूर्ण जाला । ब्रह्म गोल अवघा ।।७/१/२१।।***

आजी म्हणाल्या, 'बाळांनो, आकाशातला सूर्य मावळला म्हणजे कसा सगळीकडे अंध:कार होतो. तसा समर्थ म्हणतात ज्ञानाचा लोप झाला म्हणजे सगळीकडे अज्ञानाचं साम्राज्य सुरुं होतं.'

'मी एक विचारू?' विलास म्हणाला. 'सूर्य तर एकच आहे. पृथ्वी सूर्याभोवती पण तशीच स्वत:भोवती पण फिरते. पृथ्वीचा भारत देशाचा भाग सूर्यापासून दूर गेला की सूर्य मावळला म्हणतो. पुन्हा पृथ्वी सूर्यासमोर आली. म्हणजे भारताचा भाग सूर्यासमोर आला की प्रकाश मिळतो. इथे तर ज्ञान सूर्य म्हटले. हे कसे?'



आजी म्हणाल्या, 'ज्ञान म्हणजे ब्रह्मज्ञान होय ना?' सर्वांनी माना हलवल्या. 'आता पहा पृथ्वी म्हणजे तुम्ही आम्ही मानव ज्ञानापासून चलित होऊन विरुद्ध बाजूला वळतो. म्हणजे ज्ञानाचे विरुद्ध. अज्ञान. अज्ञानाने म्हणजेच देहात्मबुद्धीने करू नये ते करतो. फसतो, रडतो पडतो. ज्ञानोदय झाला की अज्ञान नाहीसे होते. दृष्टीच बदलते जगाकडे पहायची! हे बघा समर्थ काय म्हणतात.

***माया ब्रह्म वोळखावे । तयास अध्यात्म म्हणावे ।***
***तरी ते मायेचे जाणावे । स्वरूप आधी ।।७/२/५४।।***

परब्रह्म रूपी सूर्याचा प्रकाश पडण्यासाठी मायेचे स्वरूप समजावे. हे दोन्ही समजण्याचा मार्ग म्हणजे अध्यात्म.

सुधाचे लक्ष दासबोधातच होते. आजी, ही बघा ओवी!

***माया बहुरुपी बहुरंग । माया ईश्वराचा संग ।***
***माया पहातां अभंग । अखिल वाटे ।।७/२/५८।।***

'शाबास,' आजी म्हणाल्या, 'एका नाण्याच्या दोन बाजू असतात. तशी ही माया. ब्रह्मावर झाकण घालते.'

मधुकर म्हणाला, 'मग हे झाकण काढलं की ब्रह्मदर्शन होईल.'

आजी म्हणाल्या, 'खरंय, तुझं म्हणणं. कपाटाचं दार लावलेलं आहे. त्याला कुलूप आहे. किल्ली शिवाय कुलूप उघडता येईल कां? कुलूप काढले की कपाटातल्या हव्या त्या वस्तू मिळतात. तर तस्सच आहे हे. ही किल्ली कोणती?'

***सद्गुरु कृपा तेचि किली । जेणें बुद्धी प्रकाशली ।***
***द्वैत कपाटें उघडली । येकसरीं ।।७/२/१५।।***

आजी म्हणाल्या, 'जोपर्यंत आपल्या मनात मी तू हा भेद आहे तोपर्यंत एकच व्हायचे कठीण असते. सद्गुरुंच्या बोधाने बुद्धी शुद्ध होते. आनंदघन कोण ते एकदा कळले की वेगळेपणा नष्ट होतो. आपण सहा घरचे सहा जण आहोत. पण समर्थ कृपा कसे वेळेवर श्रवणाला जमतो. श्रवणाचे वेळी सहाही जणांचा विचार एकच असतो. हे आपण रोज अनुभवतोच ना?'

विलास म्हणाला, 'आजी इथेच असे नाही. आता आमच्या दोघांच्यातली

भांडाभांडीपण बरीच कमी झाली. होय नारे? गणपतीला जोरांत धक्का देऊनच त्याने विचारले. पण आजी, अजून पक्के कळलेच नाही. अज्ञान गेले की ज्ञान होते. ते अज्ञान म्हणजे काय जायला हवे?'

मधुकर म्हणाला, 'पीर चुकला. पुन्हा मशिदीतच आला. आजी सांगतात तरी . . .'

मधू, विचारू दे. त्याला अडवू नकोस. अशी जिज्ञासा उत्पन्न होणे हे ज्ञानाचेच लक्षण आहे.' आजी म्हणाल्या, 'विलास ही ओवी वाच.'

***मी कोण ऐसें नेणीजे । तया नाव अज्ञान बोलीजे ।***
***अज्ञान गेलियां पाविजे । परब्रह्म तें ।।७/२/२२।।***

'शाबास वाचलेस ना? मी विलास, मी गणपती, मी मधुकर असे आज आपण देहाचे नाव सांगतो. म्हणजे खरा मी आपण जाणत नाही.

विलास म्हणाला, 'देहाचे नाव म्हणजे मी नाही. म्हणजेच देह मी नाही. मग मी आत्मा. तो देहाला उठवतो, बसवतो. तोच परब्रह्म कां? आत्ता आलं लक्षात. आता नाही विसरणार!'

आजी म्हणाल्या, 'हे जे विसरायला होत. लक्षात रहात नाही. किंवा पटत नाही, किंवा करायचं काय हे समजून असं जे वाटतं ते सारे देहात्मबुद्धीने. समर्थ सांगतात -

***म्हणौनि देहबुद्धि हे झडे । तरीच परमार्थ घडे ।***
***देहबुदद्धीनें बिघडे । ऐक्यता ब्रह्मीची ।।७/२/३९।।***

'आजी सोहं सोहं सारखं म्हणत राहिलो तर ऐक्यता मोडणार नाही.' गणपतीने विचारले.

आजी हसल्या. 'बाळांनो, नुसत्या घोकंपट्टीने नाही साधणार. हे बघ समर्थांनी कांहीच सांगायचे बाकी ठेवले नाही. तुझ्या प्रश्नाचे उत्तर बघ.

***आपुलेन अनुभवें । कल्पनेसि मोडावें ।***
***मग सुकाळीं पडावें । अनुभवाचे ।।७/३/४८।।***

मी आत्मा आहे. म्हणजेच मी ब्रह्म आहे असा स्वस्वरुपाचा अनुभव पक्का



व्हावा म्हणून साधना करावी लागते. ती योग्य तऱ्हेने केली की मी देह आहे ही कल्पना साफ मोडून पडते. देहबुद्धी नष्ट झाली की सर्वत्र ब्रह्मच ब्रह्म! या गोड अनुभवात सतत रहाता यावे म्हणून समर्थांनी कल्पनेतून ज्याला ज्याला ब्रह्म म्हणता येईल ती ती १४ ब्रह्म संकेत पुढे मांडले व ते ब्रह्मापेक्षा उणेच म्हणून मोडून दाखवले. म्हणजे उकल केली. बुद्धीला भरकटू देऊ नये. एक शुद्ध ब्रह्माचा निश्चय पक्का करावा.

'म्हणजे आजी,' विलास म्हणाला, 'सगळं जेवण संपल्यावर मी श्रीखंड खातो. तस्संच समर्थांनी केलं.' सगळेच खळखळून हसले.

नाना तऱ्हेच्या कल्पना तरंगात मनुष्य गुरफटतो. आजी म्हणाल्या,

***शेरीर अवघें व्यापलें । परी तें नाहीं आडळलें ।***
***जवळिच दुरावलें । नवल कैसे ।।७/४/३३।।***

सर्व ब्रह्माडांत अणूरेणूत भरलेले ब्रह्मतत्व आपल्या शरीराला व्यापून आहे तरी दिसत नाही. जवळ असून दूर असल्यासारखे भासते.

सुधाने विचारले, 'पण आजी असं का व्हावं? भगवंताची तर इच्छा आहे की भक्ताने आपल्याकडे यावे. मग तो सगळ्या मानवांना आपल्याकडे कां वळवून घेत नाही?'

'सुधा,' आजी म्हणाल्या, 'त्याने मानवाला बुद्धी शक्ती दिली आहे. पण ती योग्य ठिकाणी न वापरता मानव आपली शक्ती दुसरेच ठिकाणी वापरतो. ती शक्ती वाया जाते. मग माणूस फसतो.

मधुकर म्हणाला, 'त्यावर कांही उपाय तोड नाही कां?'

'आहे तर!' आजी म्हणाल्या. प्रत्येकाला मन नावाची शक्ती आहेच की नाही? ते मन उन्मन करायचं. सध्या सर्व साधारणपणे आपले मन खाण्यापिण्यात रमलेलं असतं ना? तेच मन थोडे थोडे विषयापासून काढून भजन पूजन याकडे वळवावे.

'त्याला भक्ती म्हणतात ना?' विलासने विचारले.

'होय. तीच भक्ती का करतो हे समजून उमजून करायची. करता करता बाह्य उपचारापेक्षा बाह्य अवडंबरापेक्षा मन शांत होऊन पूर्णावस्थेला जाईल असे करायचे. हे

बघ पाण्याचे टाकीत नाणे पडले. पाणी हलतय. तोपर्यंत तळाशी असून नाणे दिसत नाही. तेच पाणी स्थिर असले तर तळाशी असलेले नाणे दिसते. पटत का तुला?'

'खरंय आजी' गणपती म्हणाला. 'आईची अंगठी टाकीत पडली होती. ती टाकीतच आहे ना पण? हे पाहाण्याकरिता बाबांनी नळ बंद केला होता. पाणी स्थिर झाले. अंगठी दिसली. बाबा टाकीत उतरले व अंगठी काढली.'

'छान, अंगठी किंवा नाणे हातात घ्यायची वस्तू म्हणून काढून हातात घेता येते. ब्रह्म हातात न घेता अनुभवायचे असते. मनाच्या पूर्ण अवस्थेत, मन शांत असताना, कल्पनारहित असतांना ब्रह्माचा छान अनुभव येतो. गणपती वाच तू.

***जयास द्वैत भासलें । ते मन उन्मन जालें ।***
***द्वैताअद्वैताचें तुटलें । अनुसंधान ।।७/५/१२।।***

आजींनी विचारले, 'द्वैत म्हणजे?'

जयाने उत्तर दिले, 'वेगळेपण.'

'आणि अद्वैत म्हणजे?' आजींनी विचारले.

'ऐक्य' गणपती व विलास एकदम बोलले व टाळीपण दिली.

'वा! वा! मन पूर्णावस्थेला गेले की वेगळेपण तर गेलेच. पण ऐक्य ही भावना पण गेली. ज्याच्याशी ऐक्य करायचे ते आपणच की!' आजी म्हणाल्या.

'हो, पण हे कसे जमावे?' मधुकरने विचारले.

आजींनी ओवी दाखवली. मधूने वाचली.

***श्रवण आणी मनन । निजध्यासें समाधान ।***
***मिथ्या कल्पनेचें भान । उडोन जाय ।।७/५/२७।।***

'किती साधा नी सोपा मार्ग सांगितला आहे.'

गणपती म्हणाला, 'श्रवण घडतंय. पण मनन?'

'आपण काय श्रवण केलं याची. आठवण रहाते की नाही?' आजी म्हणाल्या, 'आईने विचारले तर सांगता येते की नाही? दोघे एकत्र जमलांत तर यावरच बोलता की नाही? यालाच मनन म्हणतात.'



'आणि निजध्यास म्हणजे?' विलासने विचारले.

'आपण कोण याचे सतत स्मरण.' सुधा म्हणाली.

'मी पाठ केलंय, सोहं सोहं सोहं.' विलास म्हणाला.

आजी म्हणाल्या, 'आता त्या सोहंचा अनुभव येईल असे करायला हवे. खोट्या कल्पनेतून मन उडायला हवे. पूर्णपणे उडायला हवे.'

'म्हणजे आजी,' मधू म्हणाला, 'श्रीखंडा ऐवजी नाथाघरचा श्रीखंड्या लक्षांत ठेवायला हवा.'

'कळला मला टोला मारलास तो.' विलास म्हणाला, 'आजी आजच श्रीखंड खाऊन आलो. म्हणून मला चटकन आठवलं. तसं रोज रोज श्रवण घडलं की चटकन भगवंत आठवेल. नाही कां?'

आजी म्हणाल्या, 'मनातून निश्चय पक्का राहील तर द्वैताची भावना कधी उत्पन्नच होणार नाही. मी व भगवंत वेगळा आहे असे वाटले रे वाटले की समजावे ज्ञान मलीन झाले.'

सुधा म्हणाली, 'ज्ञान मलीन होणे म्हणजे अज्ञानाने डोके वर काढणे.' 'अगदी बरोबर, वाच ही ओवी,' आजी म्हणाल्या.

***तैसें ज्ञान होता मळिण । अज्ञान प्रबळे जाण ।***
***या कारणें श्रवण । अखंड असावे ।।७/५/४२।।***

गणपती म्हणाला, 'आजी आम्ही काय ठरवलंय! . . . .'

'तू नको सांगूस. मी सांगतो.' त्याला अडवून विलास म्हणाला, 'आम्ही ठरवलंय, सुटीनंतर शाळा सुरु झाली तरी रोज शाळा सुटल्यावर आम्ही येत जाऊ. मधुकर पण येईल. चालेल न? पण त्या दोघी?'

जया म्हणाली, 'का रे, बाबा द्वैत आलं तुझ्या मनांत? चांगल्या संकल्पाला कोण नको म्हणेल. आम्ही पण येऊ?'

आजी म्हणाल्या, 'छान आहे संकल्प. परमार्थाची गोडी वाढतीय. खडी साखरेचा डबा आण. प्रसाद वाटू या.'

विलास म्हणाला, 'नको. खडीसाखर नको. मी श्रीखंड आणलंय सगळयांना द्यायला.'

सगळयांनी टाळया वाजवल्या. श्रीखंडाचा प्रसाद घेतला. आजी म्हणाल्या -

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**

## दिवस १४ वा

आज शनिवार. मारुतीला नुसताच नमस्कार न करता स्थानापन्न होऊन सर्वांनी शांतपणे एका सुरांत 'भीमरूपी महारुद्र' स्तोत्र म्हटले. सर्वांचेच चेहरे आनंदाने फुलले होते. किती लवकर आपले पाठ झाले. हाच भाव जणू प्रत्येकाच्या चेहऱ्यावर होता.

आजी म्हणाल्या, 'बाळांनो, असाच अभ्यास ध्येयाप्रत पोहोचेपर्यंत जर कायम ठेवाल तर सगळेच एकदम ब्रह्मज्ञानांतला आनंद लुटाल. वेदविद् व्हाल.'

'वेदविद् म्हणजे काय?' विलासने विचारले.

'विद्' म्हणजे जाणणे.' आजी म्हणाल्या, 'वेद्विद् म्हणजे वेदातले ज्ञान जाणणारे, असे व्हाल. वेद हे आपल्या सनातन धर्माचे आद्यग्रंथ आहेत.

'मी सांगतो वेदांची नांवे' मधुकर म्हणाला, 'ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद, एकूण ज्ञानाच्या गठ्ठ्यांचे चार भाग व्यासांनी केले. त्यांना आपण 'वेदो व्यासः' असे म्हणतो न?'

'होय. पण मधू, 'या वेदात कांही सामर्थ्य नाही' असे म्हणणारे पण कांही पढतमूर्ख समर्थांना आढळले.' आजी म्हणाल्या, 'म्हणून समर्थांनी ठासून सांगितले.

***वेदाआंगी सामर्थ्य नसे । तरी या वेदास कोण पुसे ।***
***म्हणौनि वेदी सामर्थ्य असे । जन उधरावया ।।७/६/२९।।***

'मानव देहातील जीवाला ब्रह्मज्ञान करुन देण्याचे सामर्थ्य वेदात आहे. ब्रह्मज्ञानाने जीव मुक्त होतो. जया तू वाच पुढची ओवी.' आजी म्हणाल्या.

जयाने दासबोधाला वंदन केले व वाचले.



***वेद शास्त्र पुराण । भाग्यें जालिया श्रवण ।***
***तेणे होईजे पावन । हें बोलती साधु ।।७/६/३१।।***

आजी म्हणाल्या, 'साधू म्हणजे - - - -

विलासने त्यांचे वाक्य पूर्ण केले. साधू म्हणजे नुसते दाढी जटा वाढविलेले बैरागी नव्हेत. साधु म्हणजे संत, सज्जन, ब्रह्मानुभवी - समर्थांच्या सारखे, ज्ञानेश्वर, एकनाथ, गोंदवलेकर यांच्यासारखे. ब्रह्मभेट साधून देतात त्यांना साधू म्हणतात.'

'बरोबर'. आजी म्हणाल्या, 'संतांचे म्हणणे असे की वेदाचा वरवर अभ्यास करून चालत नाही. त्यातला गूढार्थ कळायला हवा. तो जर पूर्ण कळला नाही तर धड ना प्रपंच, धड ना परमार्थ अशी स्थिती होते.

विलास म्हणाला, 'आम्हाला कुठे आहे प्रपंच?'

आजी म्हणाल्या, 'बाळांनो, तूर्तास, शाळा घर खेळ अभ्यास हाच तुमचा प्रपंच - सध्या तुम्ही एकीने वागता, ओढीने येता, प्रेमाने दासबोधाचा अभ्यास करता. थोडे थोडे अध्यात्मिक शब्द पण कळू लागले आहेत. पुस्तकी ज्ञानापेक्षा जरा वेगळे ज्ञान वाढावे ही जिज्ञासा उत्पन्न होऊ लागली आहे.

आता शाळा सुरु झाल्यावर देहात्म बुद्धीमुळे या स्वस्वरूपाचा म्हणजे ज्ञानाचा विसर पडला तर आपण पुन्हा खेळांत, खाऊत बुडू. ध्येय गाठण्याचे प्रयत्न अपुरे पडतील. हीच बद्धता.

'आजी, पण -' मधुकर म्हणाला, 'जर आपण या मिळवलेल्या 'सोहं' ज्ञानाचा विसर पडू दिला नाही तर थोडे इतरांच्यातही मिसळू. थोडे खेळू. पण सतत अभ्यास करुन ध्येय गाठू. म्हणजे आम्ही काय साधले म्हणायचे?'

'जीवनमुक्तता' आजी म्हणाल्या, 'सध्या विद्यार्थी दशेतली ही जीवनमुक्तताच. इतरांच्यासारखे वावरलो तरी आत विस्मरण होऊ द्यायचे नाही. आपल्याला झालेल्याज्ञानाचा गवगवा पण करायचा नाही. शाळेतला व्यावहारिक ज्ञानाचा अभ्यास व सकाळ संध्याकाळ हा पारमार्थिक अभ्यास दोन्ही चालू ठेवलांत की कृतार्थ व्हाल. जीवन सार्थकी लागेल.

पण धोका कुठे आहे माहीत आहे? समर्थांनी ती धोक्याची जागा पण दाखवली आहे. 'मी वाचतो' गणपती म्हणाला.

***मुक्तपणाची पोटीं शिळा । बांधता जाईजें पाताळा ।***
***देहबुद्धीचा आगळा । स्वरुपीं न संटे ।।७/६/५३।।***

'छान' आजी म्हणाल्या, 'पोटाला. दगड बांधून कधी कोणाला पोहता येईल कां?'

'नाही, तो बुडणारच.' विलासने उत्तर दिले.

'तस्सेच मी मुक्त. हा अहंकाराचा दगड जीवन सागरांत बुडवणारच' आजी म्हणाल्या, 'देह बुद्धीचा अडसर स्वस्वरुपाकडे जाऊ देत नाही. म्हणून काय करावे?'

***तत्वज्ञाता परम शुद्ध । तयासी नाहीं मुक्त बद्ध ।***
***मुक्त बद्ध हा विनोद । माया गुणें ।।७/६/५६।।***

शुद्ध ब्रह्मज्ञानी, बद्ध मुक्त भेद मानीतच नाही. ही त्या मायेच्या गुणांची करामत आहे. असे समजतो व ध्येयाला सोडीत नाही.

जया म्हणाली, 'पण आजी, आम्हाला हे कसे जमेल?'

'जमेल जमेल' आजी म्हणाल्या.

***सवे लावितां सवे पडे । सवे पडतां वस्तु आतुडे ।***
***नित्यानित्य विचारें घडे । समाधान ।।७/७/१५।।***

मनाला जशी सवय लावावी तशी लागते. ब्रह्म चिंतनाची संवय लावली तर. ब्रह्मसाक्षात्कार होईलच. पण नित्य काय अनित्य काय हेही कळेल. त्यामुळे समाधान अखंड राहील. पण सध्या आपण कोणत्या स्थितीत आहोत? वाच विलास, तू वाच.'

***मनास कल्पायाचि सवे । मनें कल्पिलें तें नव्हे ।***
***तेणें गुणें संदेह धावे । मी पणाचेनि पंथें ।।७/७/४३।।***

'शाबास, आजी म्हणाल्या. मन जी जी कल्पना करील ते ब्रह्म नव्हे. असं समजता समजता कल्पना खोटी ते पटते. मग मी पणाचा जोर वाढतो. संशयाचे भूत मानगुटीवर बसते.

विलास चटकन म्हणाला, 'भूत प्रेत समंधादि रोगव्याधी समस्तही ।'

हसत हसत आजी म्हणाल्या, 'ते खरंच. पण सारखातरी मारुतीरायांना त्रास



कशाला द्या? मी पणाच घालवला की काम सोपे.'

गणपती म्हणाला, 'हो पण तो कसा घालवायचा?'

आजींनी सुधाला ओवी वाचायला सांगितली.

***मी पण जाणोनि त्यागावें । ब्रह्म होऊन अनुभवावें ।***
***समाधान ते पावावें । निःसंगपणें ।।७/७/५२।।***

'बघा,' आजी म्हणाल्या, 'तीनच गोष्टी लक्षात ठेवायच्या आहेत. १) मीपणा समजून घेऊन त्याचा त्याग करायचा. २) आपण ब्रह्म स्वरूप होऊन त्याचेशी तदाकार व्हायचे. ३) माझेपणाने कोणत्याही दृश्य वस्तूत अडकायचे नाही.

देहबुद्धी असते तो पर्यंत मीपणा असतो. भगवंतच माझेकडून सारे काही करवून घेतो. अशी भावना पक्की झाली की जे समाधान मिळते ते उच्च कोटीतले असते. त्याकरता समर्थ एक तोडगा सांगतात.'

'तोडगा म्हणजे काय?' विलास म्हणाला.

'तोडगा म्हणजे उपाय. वाच तू.' विलासने वाचले.

***पदीहून चळों नये । करावें साधन उपाये ।***
***तरीच सांपडे सोये । अलिप्तपणाची ।।७/७/५९।।***

आजी म्हणाल्या, 'वा, वा! ब्रह्म स्वरूप हे आपले मूळचे पद. हे पक्के ध्यानांत ठेवले, की कश्शात न गुंतता, मीपणांत न अडकता, अलिप्त कसे रहावे ही युक्ती कळते.'

ही युक्ती आत्मसात होण्यासाठी समर्थ म्हणतात,

***श्रवणें निश्चयो घडे । श्रवणें ममता मोडे ।***
***श्रवणें अंतरीं जडे । समाधान ।।७/८/४।।***

'मी सांगतो अर्थ.' विलास म्हणाला, 'समर्थ म्हणतात. नित्य श्रवण घडले. अध्यात्म ज्ञानाचे ग्रंथ वाचले, किंवा ऐकले, तर निश्चय करण्याची शक्ती वाढते. निश्चय पक्का होतो. दृश्याबद्दलचा माझेपणा नाहीसा होतो. म्हणजे माझंच पहा ना? हे पुस्तक माझंच आहे. मी नाही देणार कोणाला असे जे म्हणत होतो. ते श्रवणाने पटले की असे

म्हणू नये. नित्य श्रवणाने अंतरंगात समाधान लाभते. मुख्य वैभवातले १ले वैभव पूर्ण समाधान.

आजी म्हणाल्या, 'समर्थांना श्रवणाचे महत्व फार पटले होते. खूप खूप फायदे श्रवणाने होतात. पण जर कां आळस डोकावला तर?'

***आळसाचे संरक्षण । परमार्थाची बुडवण ।***
***या कारणें श्रवण । केलेंचि पाहिजे ।।७/८/४९।।***

आळसाला थारा न देता खऱ्या खऱ्या अभ्यासकाने म्हणजे साधकाने पुन्हा पुन्हा अभ्यास करावा. स्वतः वाचावे किंवा ऐकावे. पण 'वाचलंय एकदा, ऐकलंय एकदा' असे उडवून लावू नये. पुन्हा पुन्हा ऐकतांना काहीतरी नवीन कळू लागते. त्याने समाधान वाढते. आणि होऽऽ कोठे कसा अभ्यास करावा. हे पण सांगायला समर्थ विसरले नाही. कोण बरं वाचेल?'

सगळेच मी मी म्हणू लागले. विलास गणपती एकमेकाला ढकलू लागले. आजींनी सुधापासून 'अरिग मिरींग लवंगा तिरींग' मोजायला सुरुवात केली. शेवटी मधुकर राहिला.

***आत्मज्ञानी येक चित्त । तेणें पाहाणें अद्वैत ।***
***येकांत स्थळी निवांत । समाधान ।।७/९/२७।।***

आजी म्हणाल्या, 'एकाग्र चित्त हे फार महत्वाचे. अभ्यासाचे पुस्तक सुध्दा एकान्तात एकाग्र चित्ताने वाचले तर अभ्यास चांगला होतो. तसेच अध्यात्म ग्रंथाचे आहे.'

विलास म्हणाला, 'आजी, दासबोधाला पुस्तक कां नाही म्हणायचं? ग्रंथ आणि पुस्तक यांत काय फरक आहे?'

'विलास तुझी शंका. तूच ओवी वाच.' आजी म्हणाल्या.

***जेणें परमार्थ वाढे । आंगीं अनुताप चढे ।***
***भक्ती साधन आवडे । त्या नाव ग्रंथ ।।७/९/३०।।***

आजी म्हणाल्या, 'ग्रंथात करमणूक नसते. थट्टा विनोद नसतो. केवळ अध्यात्म ज्ञान प्रतिपादन केलेले असते. भक्ती मार्ग वाढीला लागेल. अशी साधना त्यात सांगितलेली असते. परोपकार वृत्ती वाढीस लागते. धैर्य उत्पन्न होते. चुका लक्षात येतात. कृतकृत्याचा पश्चाताप होतो. हे ज्यांत अधिक करुन सांगितलेले असते त्यांना ग्रंथ म्हणतात.



आणि बरं का बाळांनो, एक लक्षात ठेवू या.

***जितां नाहीं भगवद्भक्ती । मेल्यां कैंची होईल मुक्ती ।***
***असो जें जें जैसे करिती । तें तें पावती तैसे ।।७/१०/२२।।***

जीवंतपणी भगवंताचे भजन पूजन केले नाही. पण उत्तम ठिकाणी, चांगल्या तीर्थाला, सुटीच्या वारी सकाळी, पलंगावर, सर्व माणसे भोवताली असतांा मृत्यू आला म्हणजे तो जीव मुक्त झाला असे म्हणता येईल कां?

या मृत्यूलोकांत आपण ज्या ज्या भावनेने जे जे कर्म करु त्या त्या प्रमाणेच आपल्याला फळ मिळणार. म्हणून साधकाने नक्की काय करावे?

आजींचे बोट कोठे आहे ते पाहून जयाने वाचायला सुरुवात पण केली.

***जो ये ग्रंथीचा विवेक । विवंचूनि पाहे साधक ।***
***तयास सापडे येक । निश्चय ज्ञानाचा ।।७/१०/४५।।***

'आजी, विवंचुनि म्हणजे विचार करुन असंच कां? मग मी सांगतो अर्थ.' विलास म्हणाला, 'या दासबोधात समर्थ म्हणतात हं. या दासबोधात जे जे विचार मांडले आहेत. त्यावर साधकाने नीट विचार करावा. विचाराअंती साधकाला नक्की कळेल की आत्मज्ञान म्हणजेच स्वस्वरूप ज्ञान. समर्थांनी हे वारंवार पटवून दिले आहे.

आजी म्हणाल्या, 'छान अर्थ सांगितलास. दासबोध मराठीत असला तरी संस्कृत ग्रंथात जे ज्ञान आहे ते सर्व या ग्रंथात आहे. ही ओवीच वाच ना?'

सुधाने ग्रंथ आपल्याकडे घेतला. 'कोणती वाचू?' विचारले,

आजींनी बोटाने दाखविले.

***प्राकृते वेदांत कळे । सकळ शास्त्री पाहातां मिळे ।***
***आणी समाधान निवळे । अंतर्यामी ।।७/१०/४७।।***

आजी म्हणाल्या, 'बाळांनो, संस्कृत ग्रंथाचे आकलन व्हायला वेळ लागेल. शब्दांच्या अर्थाची उकल सहजी लक्षांत येणार नाही. म्हणून संतांनी आपल्यावर केवढे उपकार

करुन ठेवले आहेत. तरी आम्हाला कळत नाही म्हणणारे महाभाग आहेतच.'

ज्ञानेश्वरांनी संस्कृत गीतेचा अर्थ मराठीत स्पष्ट करुन सांगितला. ग्रंथाच नाव 'भावार्थ दीपिका' पण त्याला म्हणतो ज्ञानेश्वरी.

त्याहीपेक्षा सोप्या रोजच्या बोली भाषेतल्या मराठीत समर्थांनी दासबोध रचला. त्यांत काय नाही? थोरांच्यासाठी पोरांच्यासाठी खूप खूप विचार सांगितले. विशेष म्हणजे स्वतः प्रपंच जरी केला नाही, तरी नेटका प्रपंच करतानाच परमार्थ कसा साधेल ते युक्ती युक्तीने सांगितले.'

गणपती म्हणाला, 'आणि आता ते आपण अभ्यासतो आहोत. मला आत्तापर्यंत वाटत होतं या दासबोधांत मुलांच्या करिता काय असणार? मोठ्या माणसांनी वाचायचा ग्रंथ हा.

मधुकर म्हणाला, 'भ्रमाचा भोपळा फुटला. आता आपण ग्रंथ अभ्यासून सोडून नाही द्यायचा. ते विचार आचरणांत आणायचे.

'मी'पणाचा त्याग करायचा.' विलास म्हणाला.

'ब्रह्मरुपाशी तदाकार व्हायचं' सुधा म्हणाली.

'माझे पणाने कशातही अडकायचे नाही.' गणपती म्हणाला.

'दिवसाकाठी एकान्तात एकाग्रचित्त थोडा वेळ तरी भगवंताचे स्मरण करायचे.' जया म्हणाली.

'केलेला निश्चय शेंडी तुटो नाहीतर पारंबी तुटो बिघडवायचा नाही.' मधुकर म्हणाला.

'शाब्बास' आजींनी टाळ्या वाजवल्या. सर्वांनाच आनंद झाला. सर्वजण एकदम म्हणाले.

महारुद्र हनुमान की जय ।

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**



## दिवस १५ वा

'नाही, नाही. मी म्हणते खरं!' विलास तावातवाने म्हणाला.

'ह्यां! बुधवार विठोबाचाच. आपण आजींनाच विचारू याना! गणपती व विलास बोलत बोलतच पडवीवर आले. बोलण्याच्या नादांत पाय धुवायचे विसरणारच होते. पण मधूने खूण केली. विलासच्या लक्षात आले. दोघांनी पाय धुतले. मारूतीला नमस्कार केला. आजींना नमस्कार केला. सर्वांनाच नमस्कार करून दोघे बसले.

आजी म्हणाल्या,'कसला वाद चालला होता, विलास?'

'आजी, हे देव तरी किती हो!पण न भांडता त्यांनी वाराची वाटणी केली. ते प्रमुख देव कां ? देवात पण श्रेष्ठ कनिष्ठ असतं कां ? आम्ही वारावाराचा देव कोणता ते बोलत होतो.

आजी म्हणाल्या,'मग गाडी कुठे अडली ?'

गणपती म्हणाला,'रविवार सूर्याचा मी म्हणत होतो रामाचा. आणि देवीला मंगळवार शुक्रवार दोन वार कां ?सोमवार शंकराचा,वादच नाही. मी म्हणालो बुधवार कृष्णाचा तर हा म्हणतो 'नाही, बुधवार विठोबाचा',आता तुम्हीच सांगा खंर कोणाच ?

आजी म्हणाल्या,'दोघांचेहि खरे. कृष्णाचा जन्म बुधवारी झाला. म्हणून बुधवार कृष्णाचा. पण तोच कृष्ण विठोबा रूपांत कलियुगांत अवतरला म्हणून बुधवार विठोबाचा'.

'आजी, विलास म्हणाला,'कृष्ण जसा विठोबा होऊन आला तसा रामाने का नाही दुसरे रूप घेतले? गुरूवार दत्तात्रयाचा. पण शानिवारी पुन्हा वादच. शनिवार शनीराजाचा की मारूतीचा?

जया म्हणाली, 'शनिवार शनीदेवाचा'.

मधुकर म्हणाला,'आजी, प्रत्येक दिवशी वेगवेगळया देवाची, वेग वेगळया पध्दतीने पूजा केली की कोणत्या देवाची कृपा झाली म्हणून समजायचे ? का सगळेच देव सभा घेतात नी एकमताने कृपा करतात'.

'बाळांनो, तुमच्या सगळया प्रश्नांची उत्तरे दासबोधात आहेत.

*'पावावया भगवंतातें । नाना पंथ नाना मतें ।*
*तया देवाचें स्वरूप तें । कैसें आहे ।।८/१/७।।*

भगवंताची प्राप्ती व्हावी, त्याची कृपा व्हावी असे तर सर्वांनाच वाटते. पण अनेक पंथ अनेक मते. कोणचा कोणाशी मेळ नाही. ज्याला जसा प्रत्यय आला. त्याला तसा देव आवडला. ज्याच्या त्याच्या भावनेतून कल्पनेतून नाना देव निर्माण झाले. समर्थांचे म्हणणे, कोणत्याच देवाला तुच्छ मानू नये. पण खरां देव कोणता? ते आधी ओळखले पाहिजे.

सुधा समर्थांनी किती सोप्या शब्दात समजावले आहे पहा.

*देव कोणासी म्हणावें । कैसें तयासी जाणावें।*
*तेंचि बोलणें स्वभावें । बोलिजेल ।।८/१/१६।।*

*जेणें केलें चराचर । केले सृष्ट्यादि व्यापार ।*
*सर्व कर्ता निरंतर । नाम ज्याचे ।।८/१/१७।।*

विलास म्हणाला, 'रामाने रावणाचा नाश केला. तो अयोध्येचा आदर्श राजा झाला. त्याने कांही ही सृष्टी रचली नाही. म्हणजे मग तो देव नाही कां?'

गणपती म्हणाला, 'कृष्णाने द्वारका निर्मितीचे वेळी एका शक्तीची प्रार्थना केली. ती देवी की विश्वकर्मा? काय मंत्र म्हणाले कोणास ठाऊक? पण समुद्रात द्वारका शहर तयार झाले. म्हणजे कृष्ण सुद्धा देव नाही कां?'

मधुकर म्हणाला, 'मारुती तर रामाचा दास. शक्ती देवता, बुद्धीमान म्हणून आपण त्याला मानतो. पण तो कृपा रामाकरवी करवतो. स्वतः तो कांही करत नाही. मग तो देव कसा म्हणावा?

सुधा पण चुळबुळ करु लागली. 'आजी, शुक्रवार व्रत केले की धन धान्य सुबत्ता प्राप्त होते. आत्मज्ञान नाही. मग देवी पण खरी नाही कां? पैशाच्या, खोट्या, वैभवाच्या राशीवर बसवते तिला देव म्हणावे कां?'

'बाळांनो, तुमच्या शंका अगदी बरोबर आहेत.' आजी म्हणाल्या, 'सामान्य माणसे इथेच गडबडतात. राम कृष्ण दत्त मारुती विठोबा या दिव्य शक्तीच्या अवतार प्रतिमा. आज आपण त्या आदर्श पूजनीय अवतारी पुरुषांची स्त्रियांची मूर्ती रुपाने पूजा



करतो. जया, समर्थ काय म्हणतात तू वाच -'

*पदार्थ वस्तू नासिवंत । हें तों अनुभवास येत ।*
*या कारणें भगवंत । पदार्था वेगळा ।।८/१/४६।।*

आजी म्हणाल्या, 'पाहिलंत. जगातील सर्व वस्तू नाहिशा होतात. अगदी आपला देहच काय अवतारी पुरुष सुद्धा नाश पावतात. त्यांना देव कसे म्हणावे? भगवंत त्याहून वेगळा आहे.'

आता गंमत अशी की ज्या भगवंताच्या इच्छेने, त्याच्या स्फूर्णेतून विश्व उत्पन्न झाले त्याचे आकलन न झाल्याने तो आहे की नाही? ते तर्क सुरू झाले. भगवंताच्या १ल्या स्फूर्णेला माया म्हणतात. तिने सर्व विश्व निर्माण केले म्हणावे तर ती भगवंताच्या आज्ञेत वागणारी स्वतंत्र नाही.

आणि मायेने निर्माण केलेले तर नाश पावते. म्हणून ज्ञानी माणसांचा विचार असा -

*सर्व मिथ्या एकसरें । उरलें तेंचि ब्रह्म खरें ।*
*ऐसीं वाक्यें शास्त्राधारें । बोलती येक ।।८/२/४३।।*

मधुकर म्हणाला, 'आजी घर बांधतांना वाळू सिमेंट विटा दगड हे साहित्य वापरले. गडी मजूर गवंडी सुतार यांनी श्रम घेतले. पण पैसा कोणाचा? इनामदारांचा. इच्छा कोणाची? इनामदारांची. म्हणून घर नव्हे, हा मोठा वाडा कोणाचा? इनामदारांचा. वास्तविक यांत इनामदारांनी काय केलं? ते तर दूरच राहिले. तस्सेच ही. माया ठेकेदार झाली'

आजी म्हणाल्या, 'अगदी बरोबर.'

*परमात्मा परमेश्वरू । सर्व कर्ता जो ईश्वरू ।*
*तयापासूनि विस्तारू । सकळ जाला ।।८/३/१२।।*

सुधा म्हणाली, 'मग खरा देव कोण? हे जे सर्व दिसते ते जगत कोणी निर्माण केले? हा गोंधळ माजायचे कारण काय?'

आजी म्हणाल्या, 'मूळ परमेश्वर म्हणजे चैतन्य एकच. पण अज्ञानाने तो देहात रहातो म्हणून जीव म्हणतात. ज्ञान व अज्ञान अशा मिश्रीत मायेमुळे त्यालाच शिव

म्हणतात. तो शिवस्वरूप भगवंत विश्वात रहातो. तेच ब्रह्म किंवा विश्वात्मा.'

विलास म्हणाला, 'देहापेक्षा जगत मोठे. म्हणून जीवापेक्षा शिव मोठा. मोठा म्हणजे व्यापक असे म्हणायला काय हरकत आहे?'

आजी म्हणाल्या, 'बरोबर, त्या चैतन्यासच ज्ञान व शक्तीरुपास अनुसरून देव किंवा परमेश्वर म्हणतात. हे चैतन्य सर्वात मोठे म्हणून. परम + आत्मा = परमात्मा किंवा परम + ईश्वर = परमेश्वर म्हणतात.

त्या परमात्म्याच्या ज्ञानमय अंगाला मूळ पुरुष म्हणतात. व शक्तीमय अंगाला मूळ माया म्हणतात. एकाच नाण्याच्या दोन बाजू. तोच खरा देव. तोचें खरा ईश्वर.

मघाशी मधू म्हणाला न? तोच दृष्टान्त घेऊ या. मोठे इनामदार दूर असले तरी त्यांच्या इच्छेनेच व त्यांनी पुरविलेल्या पैशानेच हा वाडा बांधला.

वाडा म्हणजे दृश्य विश्व. मोठे इनामदार म्हणजे परब्रह्म. त्यांची इच्छा म्हणजे मूळ माया. वाडा बांधला. पूर्ण झाला माणस राहू लागली. मुले खेळू लागली. दासबोध वर्ग चालतो. तरी त्याचा इनामदारांना काहीही त्रास नाही. ते आहेत तस्सेच आहेत. त्याच जागी शांतपणे मुंबईत आहेत. पत्र फोन निरोप यामुळे दूर असून सदैव वाड्यात असल्या सारखेच आहेत.

मोठे इनामदार अधून मधून एखादे दिवशी येतात. काम झाले की जातात. तसा हा भगवंत अवतार घेतो. काम आटोपले की अवतार संपवतो. म्हणजे मूळ स्थानाला जातो. इनामदार मुंबईला जातात तसे. मुंबई हे नांव समजण्या करिता घेतले.

आता कोणाला वाटेल या आनंदपुरात इनामदारांचा वाडा बांधावा हे कां वाटलं? याचे उत्तर इनामदारांशिवाय दुसऱ्या कोणालाच देता येणार नाही. केवळ त्यांच्या इच्छेनेच घडले इतकेच आपण म्हणू शकू. त्यांना हा वाडा नको वाटला तर ते मोडून पाडून जमीनदोस्तही करु शकतील.

सुधा म्हणाली, 'आलं लक्षात. मोठ्या इनामदारांचे जवळ अनेकाकडून कामे करुन घेण्याची शक्ती आहे. आपण कल्पना करु या. मोठे इनामदार आराम खुर्चीत बसले आहेत. त्यांना एकाएकी आनंदपुरात वाडा बांधू असे वाटले. त्याबरोबर केव्हा कोठे कसे केवढे सारे विचार छान जुळले. व आतल्या समाधानाचे दीर्घ श्वास घेऊन हं.



असे म्हणाले असतील. - -

मधु म्हणाला, 'त्यालाच आपण म्हणू या अहं ही स्फूर्ण परब्रह्माला झाली.

'तीच मूळ शक्ती म्हणजे मूळ माया.' सुधा म्हणाली.

गणपती म्हणाला, 'मग मी सांगतो. छोटे इनामदार काका (मोठ्या इनामदार काकांच्या) त्यांच्या संमतीने प्रत्यक्ष काम करून घ्यायला आले. - - -'

आजी म्हणाल्या, 'ते ब्रह्मच म्हणजे इनामदारच. पण इच्छा परब्रह्माची म्हणजे मोठ्या इनामदारांची घेऊन आले म्हणून ते ईश्वर. तो ईश्वरच अनेक रुपाने भासतो तेच हे दृश्य विश्व म्हणजे हा वाडा. सुधा या ओव्या वाच.

***पंचभूतिक ब्रह्मगोल । जेणें कळे हा प्रांजळ ।***
***दृश्य सांडून, केवळ । वस्तूच पाविजे ।।८/४/५७।।***

***माहाद्वार वोलांडावे । मग देव दर्शन घ्यावें ।***
***तैसें दृश्य हे सांडावें । जाणोनियां ।।८/४/५८।।***

विलास म्हणाला, 'आता कळलं वाड्याचा मोठा दरवाजा ओलांडला की आम्ही आत्तापर्यंत चौक, चारही बाजूच्या पडव्या, खांब, मधले कारंज. हे सारं पाहून यांतच रमत होतो. नी खेळत होतो. आता या दासबोधामुळे सरळ दिंडी दरवाज्यातून आत आलो की पाय धुवून पडवीवरच मारुतीरायांसमोर येतो. तसेच भोवतालच्या विश्व पसाऱ्याला विसरून म्हणजे तिकडे न बघता आत काय बरं. हं. आठवलं सोहं सोहं हेच पहायचे. अस्संच ना?'

आजी म्हणाल्या, 'शाबास, बरंच लक्ष देऊन ऐकता हं. आता थोडी परीक्षा हं. मायेने दृश्य निर्माण केले. पाच जणांच्या मदतीने. पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश. जे जे कठीण व जड ती पृथ्वी. आत्ता येथे बसल्या बसल्याच पृथ्वी कशा कशा रुपात आहे बरं?'

सुधा म्हणाली, 'हा वाडा, हे लाकडाचे खांब, ही सतरंजी, आणि आजी, आपलं शरीर म्हणजे सुध्दा पृथ्वीच कां?'

'होय.' आजी म्हणाल्या, 'आता जे जे मृदु आणि ओले ते आप - आता कोण

सांगेल?'

'मी सांगतो' विलास म्हणाला, 'डोणीतले पाणी, डोळ्यातले पाणी, तोंडातली लाळसुद्धा पाणीच, पावसाचे, नदीचे पाणी इतकेच काय नाना तऱ्हेची सरबते, बासुंदी, कढी सुद्धा आपच.'

'शाब्बास.' आजी म्हणाल्या, 'जे जे गरम आणि प्रकाश युक्त ते तेज आता जया म्हणाली मी सांगते, 'सूर्य, अग्नी, होमातला, चुलीतला, स्टोव्हचा अगदी समईतली ज्योत पण अग्नीच.'

'छान,' आजी म्हणाल्या, 'जीवंतपणा आणि हालचाल हे वायूचे लक्षण.'

'मी सांगतो', गणपती म्हणला, 'वारा सोसाट्याचा असो वा पंख्याचा श्वास घेतो सोडतो तो पण वाराच तोंडातली फुंकर तो पण वाराच.'

'पोकळपणा आणि अवकाश हे आकाशाचे लक्षण.' आजी म्हणाल्या.

मधुकर म्हणाला, 'ज्या पोकळीत आपण वावरतो. ते आकाशच. जमिनीत खड्डा खणला विहीर आड यातली पोकळी आकाशच.'

'शाब्बास, सगळे पास हं.' आता या दोन ओव्या लक्षात ठेवू या.'

***खोटे खऱ्या सारिखें भाविती । परी परीक्षावंत निवडिती ।***
***कां कुरंगें देखोन भुलती । मृगजळासी ।।८/५/६४।।***

***आता असो हा दृष्टान्त । बोलिला कळाया संकेत ।***
***म्हणौनि भूत आणी अनंत । येक नव्हेती ।।८/५/६५।।***

विलासने शंका विचारली, 'कुरंगे म्हणजे काय?'

'सांगते,' आजी म्हणाल्या. कुरंगे म्हणजे हरणे. सूर्य किरणांनी हवा तापते. ही तापलेली हवा हलली की पाण्यासारखी वहातांना दिसते. त्याला हरणे भुलतात. लांब लांब पळत जातात. दमतात. त्या पाण्याच्या भासाला मृगजळ म्हणतात. हरणे फसतात. विलास फसेल कां? तो ओळखतो. हा भास आहे. तसा मायिक पसाऱ्याला जो जाणतो तो ज्ञानी. दृश्य पसारा खरा भासला तरी - - -'

'तो नाशिवंत.' विलासने वाक्य पूर्ण केले.



आजी म्हणाल्या, 'म्हणून हे दृश्य ईश्वर नव्हे. अनंत नव्हे. ब्रह्म नव्हे.'

गणपती म्हणाला, 'आता समजलं, देह म्हणजे आत्मा नव्हे. ब्रह्म नव्हे. देह नाशिवंत. आत्मा शाश्वत.'

विलास म्हणाला, 'तो आत्मा म्हणजेच देव ना? मग त्याचा वार कोणता?'

मधुकर म्हणाला, 'विलास पूजापाठा साठी आपण मानवांनीच मूर्ती कल्पिल्या. वारांची नांवे ठरवली. आता आत्मा हा मोठा देव. मग सगळेच वार त्याचे. वारच काय घेऊन बसलास, तूही त्याचाच. मीही त्याचाच. सगळेच त्याचे. तो सगळयांचा.

आनंदच आनंद.

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**

## दिवस १६ वा

मधुकर गणपती विलास जरा लवकरच जमले. पण शिस्त पाळायची म्हणून वाड्याच्या बाहेरच, सावलीत थांबले.

'मधू, काल तू म्हणालास आपण सारे त्याचेच' विलासने विचारले. मान्य आहे. पण बघ. मी आईचा. आई माझ्यावर प्रेम करते. मला खायला देते. मी बाबांचा. बाबा माझे. ते मला पैसे पुरवतात. माझे लाड करतात. मला खेळ आणून देतात. तसा देव जर आपला व आपण जर देवाचे तर देव आपले लाड कां करत नाही? आपल्यावर प्रेम कां करत नाही?

मधुकर म्हणाला,'करतो तर! हे बघ त्याने आपल्याला किती सुंदर शरीर दिले आहे. त्या शरीराला नाक कान डोळे तोंड हात पाय दिले ही त्याचीच कृपा. रात्री आपण झोपतो. रात्रभर तो श्वास चालवतो. हे त्याचे आपल्यावर प्रेम आहे म्हणूनच ना? बाबा खेळ देतात. तसे आपल्या भोवती बघ केवढे सुंदर खोळच खेळ दिले आहेत. त्याच्याकडे कसे जायचे. त्याला कसे पहायचे. हे आजींच्या कडूनच शिकू या आपण. चल सुधा व जया पण आलीच. सगळे एकदमच पडवीवर जमले.

आजींना पण आनंद झाला. 'या बाळांनो, तुम्ही किती ओढीने नी गोडीने येता,

ही आभ्यासाची गोडी हं. तुम्हाला पाहिले की अगदी राम, कृष्ण भेटल्याचा आनंद होतो मला.बसा.

एकमेकांना नमस्कार करून सर्व बसले.

मधुकर म्हणाला, 'आजी आमची अशी शंका आहे की तो मोठा देव आपल्या हृदयांतच जर आहे तर त्याचे दर्शन का होत नाही ? म्हणजे तो दिसत कसा नाही? आणि त्याचे आपल्यावर आई वडिलांप्रमाणे प्रेम आहे हे दिसल्या शिवाय कसे कळावे?

आजी म्हणाल्या,'छान विचारलेस, उन्हात खेळायच्या ऐवजी आपण समर्थांचा दासबोध अभ्यासूया असे मी सुचवले बरोबर ना!'

सर्वांनी माना डोलावल्या.

आजी म्हणाल्या,'सगळे जमू लागलांत मनाच्या ओढीने आपण समर्थांच्या समर्थ विचारांच्या सान्निध्यात असतो. हाच सत्संग. सत्संग घडणे, ज्ञानांत वाढ होणे हाच भगवंताकडून मिळालेला खाऊ म्हणजेच प्रसाद.

आता त्या ज्ञानाला आत साठविण्याची काळजी तोच घेतोय. त्याने आपल्याला ऐकण्यासाठी क्रान,पहाण्यासाठी डोळे, बोलण्यासाठी तोंड,दिले. एवढे देऊनही तो थांबला नाही. जे ऐकलं, जे पाहिल ते आठवावं व बोलता .यावं यासाठी बुध्दी दिली. आई बाबांना सुध्दा करता येणार नाही असे त्याचे हे प्रेम आहे बरं! जगात सगळ्या गोष्टी पैशानं घेता येतील. मिळवता येतील. पण ही जी जाणीव शक्ती भगवंताने दिली ती कोणत्याही बाजारांत मिळणार नाही. म्हणून आता आपण काय करायचे?'

'मन लावूनं अभ्यास करायचा', गणपती म्हणाला.

'एकाग्र चित्ताने ऐकायचं' मधुकर म्हणाला.

'होय बरोबर आहे', आजी म्हणाल्या,'समर्थ बघ काय म्हणतात.

***अर्थांतर पाहिल्यावीण । उगेचि करी जो श्रवण।***
***तो श्रोता नव्हे पाषाण। मनुष्यवेषें ।। ८/६/७।।***

आपण काय ऐकले? त्याचा भावार्थ लक्षात ठेवून अभ्यास करावा. पण तो सगळयांनाच जमत नाही. कारण - गणपती तू वाच ओवी.'



***दुश्चीतपणें नव्हे ज्ञान । दुश्चीतपणें न घडे भजन ।***
***दुश्चीतपणें नव्हे ज्ञान । साधकांसी ।।८।६।२२।।***

'छान. आलं ना लक्षात!'आजी म्हणाल्या,' चित्त जर एकाग्र नसेल तर अभ्यास होणार नाही. झाला तरी लक्षात कांही रहाणार नाही. मग ज्ञान कसे होणार? ज्ञान म्हणजे?

विलास म्हणाला, 'ज्ञान म्हणजे आत्मज्ञान. ऐकायची आवड आहे. मग आजी, चित्त ऐकण्याकडे का न लागावं?'

'विलास, ही ओवीच सांगते बघ.'आजी म्हणाल्या. विलासने ओवी वाचली.

***आळसें नित्य नेम राहिला। आळसें अभ्यास बुडाला।***
***आळसें आळस वाढला । असंभाव्य ।।८।६।३२।।***

अगदी खरंय आजी, दररोज दुपारची शाळा असते. पण शनिवारी सकाळी असते. लवकर उठायचा आळस येतो. मग शाळेची घंटा होईल म्हणून आंघोळीचा आळस येतो. सगळेच काम बिघडते.' विलास म्हणाला.

'बाळांनो हे सगळं लक्षात घेऊनच समर्थ सांगतात बघ. आजी म्हणाल्या जया, तू वाच ओवी.

***निद्रा आळस दुश्चीतपण । हेंचि मूर्खाचें लक्षण ।***
***येणें करितां निरूपण । उमजेचिना ।।८।६।३६।।***

आजी, या तीन गोष्टीपासून जर आपण दूर राहिलो तर हृदयस्थ देवाची भेट नक्की होईल कां? जयाने शंका विचारली.

'शंकाच नको' आजी म्हणाल्या, आळस, झोप व दुश्चितपणा ज्याचेजवळ नाही त्याचे हातून पुण्यकर्म म्हणजे चांगलेच कर्म घडणार. पाप कर्म घडणारच नाही. पापाचे फळ-----

विलास म्हणाला,'थांबा आजी, पापाचे फळ ते दुःख। पुण्याचे फळ ते सुख.'

'आणि पुढे? आजी म्हणाल्या - 'आता पुढचं तुम्हीच सांगा' - विलास म्हणाला सगळेच हसले. आजी पण हसण्यांत सामील झाल्या.

***पापाचें फळ तें दुःख। आणी पुण्याचे फळ ते सुख ।***
***पाप पुण्य आवश्यक । भोगणें लागे ।।८७।७।।***

आणि गंमत अशी की

***पाप पुण्य समता घडे । तरीच नरदेह जोडे।***
***येरवीं हा जन्म न घडे । हे व्यास वचन भागवतीं ।।८।६।२१।।***

मागच्या अनेकानेक जन्मातील पापपुण्य समान झाले की, हा सुबक नरदेह मिळतो. पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये पण या देहाला प्राप्त झाली आहेत.

'मी सांगतो ज्ञानेंद्रियांची नांवे, गणपती म्हणाला,'डोळे, कान, नाक, जीभ, त्वचा'.

'मी कर्मेंद्रिये सांगते,' सुधा म्हणाली,'हस्त म्हणजे हात, पाद म्हणजे पाय, वाणी म्हणजे जीभ गुद आणि ---- आणि---

मधु म्हणाला,'शिश्न'.

आजी म्हणाल्या बरोबर. या दहांचा चांगला उपयोग करून घेतला की आत्मदर्शन झालेच म्हणून समजा. मधू तू वाच.'

***देवास वोळखों जातां । तेथें जाली तद्रूपता ।***
***देव भक्त विभक्तता । मुळींच नाहीं ।।८/८१५।।***

'ठीक' आजी म्हणाल्या, 'लहान बालकाने, 'आई, आई म्हणून आक्रोश करावा. आईचा शोध घ्यावा व आई सापडल्यावर आईच्या मांडीवर विसावावे आईला घट्ट धरून तिच्या कुशीत शिरावे. मग त्याला तहान नाही. भूक नाही. आई मिळाली. पूर्ण समाधान. आईशी एकरूपता. तसा भक्त जर भगवंताचा मनापासून शोध घेऊ लागला तर त्याच्याशी एकरूपता सहजच घडेल. मग आनंदच आनंद. समाधान भंग पावतच नाही. दुःखाचा वारा शिवतच नाही.'

'आजी तुम्ही बोलता न?' विलास म्हणाला, 'तेव्हा अगदी असं वाटतं की खरंच आपल्याला देव भेटलाच. पण घरी गेलं की - - - '

सुधा म्हणाली, 'विसरायला होत कां?'



विलास म्हणाला, 'विसरायला होत नाही. पण शंकाच शंका कां? केव्हा? कसं? केव्हा आजींना विचारु अस होत.'

आजी हसल्या. 'विलास, आत्ता आपण अभ्यास करतोय. अभ्यास पूर्णत्वाला गेला, अनुभव येऊ लागला की तू पार बदललास असे तुझं तुलाच कळेल. समर्थ म्हणतात,

***प्राप्त जालियां आत्मज्ञान । तैसें दृश्य देहभान ।***
***दृष्टीं पडतां समाधान । जाणार नाहीं ।।८/८/४२।।***

आत्मज्ञान होणं हीच भगवंताची कृपा. ज्ञान झाल्यावर समाधान कायम टिकणे हाच त्याच्या प्रेमाचा अनुभव. बरं का विलास, असा अनुभव ज्यांना सतत येतो. त्यांना म्हणतात सिद्ध.

'आजी, आत्ता आपण कोण? आपण म्हणजे मी. कोण?' विलासने विचारले.

'सारखी शंका विचारतोस ना? मग तू सध्या बद्धच.' गणपती म्हणाला.

'त्याला हिणवू नकोस रे.' सुधा समजावणीच्या सुरांत म्हणाली, 'विलास आपण ज्ञानाची इच्छा करीत अभ्यास करीत आहोत. म्हणून आपण मुमुक्षु.'

'पण आजी,' जया म्हणाली, 'श्रवण करीत आहोत. नाम घेत आहोत. स्तोत्र म्हणत आहोत. शंका विचारून ज्ञान वाढवीत आहोत. म्हणजे आपण साधक आहोत म्हणायला काय हरकत आहे?'

'शाब्बास,' विलास म्हणाला, 'जया म्हणते ते बरोबर. आता फक्त साधकाचे सिद्ध व्हायचे. बस्स.'

मधुकर म्हणाला, 'निदान आज आजी पुढे काय सांगतात ते ऐकायला सिद्ध होऊ या. मग खरी सिद्धावस्था येईल तेव्हा येवो.'

आजी हसल्या, 'मधू, विलास,

***संदेह रहित साधन । तेचि सिद्धांचें लक्षण ।***
***अंतर्बाह्य समाधान । चळेना ऐसें ।।८/९/१३।।***

शंका आणि संशय यांत फरक आहे. शंकांचे निरसन झाले की ज्ञान दृढ होते.

संशयाने मन दोलायमान होते. निश्चय ढळतो म्हणून संशय रहित साधना करायला हवी. मधुकर ही पुढची ओवी वाच.'

***अभ्यासाचा मुगुटमणी । वृत्ती राही निर्गुणीं ।***
***संतसंगे निरूपणी । स्थिती बाणे ।।८/९/२१।।***

'बस्स! आजी हाच अभ्यास पक्का हवा. मनात विचारपण ब्रह्माचेच असावेत. बुद्धीने सद्ग्रंथातील ज्ञान ग्रहण करावे. चित्ताने परमेश्वराचे चिंतन करावे. संतांच्या संगतीत नेहमी रहाता यावे. श्रवण घडावे ही सदैव इच्छा असावी मग नक्कीच साधेल.'

आजी म्हणाल्या, 'मारुतीराय पाठीशी असल्यावर तो खंड पडू देणार नाही. ही शक्ती पाठीशी असावी म्हणून सगुण उपासना.'

ज्ञान मिळवता मिळवता कोणी म्हणतात, 'क़शाला रोज उपासना करा. गुरुवारी भजन म्हणू म्हणजे झालं! पोट लागलंय ना पाठीला. ती सोय आधी पहायला हवी.' कोणी म्हणतात, 'पुण्य असेल पाठीशी तरच नाम येईल ना मुखातून?' आणि आत्तापासून कशाला नामस्मरण करा? अंतकाळी मुखांत नाम आले की साधले.'

कोणी म्हणतात, 'कशाला हवा देवधर्म? कशाला करा तीर्थ यात्रा? भक्त पुंडलिकाने आईवडलांची सेवा केली. श्रेष्ठ ठरला. कशाला हवेत दुसरे देव? किती विचारांचा गोंधळ हा! जितकी माणसे तितके विचार!'

या विचार वादळांत सापडलो की करीत असलेली साधना पण बंद पडायची भीती. विलास, त्याच वेळी कृपाळू देव माऊली प्रमाणे धावून येतो. भक्ताला पडता पडता सावरतो. हाताशी धरून योग्य मार्गाला लावतो.'

विलास म्हणाला, 'तेच, तेच मला विचारायचं आहे. हा भगवंत पडणाऱ्याला सावरतो, उभा करतो, मार्गी लावतो, पण पुन्हा बाजूला का जातो? एकदम पोटाशी धरून आपल्यातच मिळवून कां घेत नाही?'

आजी म्हणाल्या, 'हे बघ विलास, तुला आत्ता सातवीत इंग्रजीत साठ, गणितात सत्तर - - -'

'नाही. आजी, इंग्रजीत ८५ सायन्स ९० इतर सर्व विषयांत ७५ चे पुढेच मार्क आहेत पण गणोबाच का गचकतो. जेम तेम ५० विलास म्हणाला.



'ते राहो! माझे आकडे चुकले असतील.' आजी म्हणाल्या, 'पण मला असं म्हणायचं आहे की इतके चांगले गुण असल्यावर एकदम बीए पास कां म्हणत नाहीत? ७ वी तून ८ वी. ८ वी तून ९ वी करायलाच हवं ना? म्हणजेच थोडा थोडा अभ्यास वाढवून पुढे जाणे योग्य. होय ना? तस्सच परमार्थात आहे बघ! साधकाची प्रगती ज्याच्या त्याच्या कुवतीप्रमाणे हळू हळू होऊन तो एकरूपतेस पात्र झाला की भगवंताला हाक मारावीच लागत नाही.

गणपतीने विचारले, 'पण अशी अवस्था येईपर्यंत काय करावे?'

'तूच वाच ओवी.' आजी म्हणाल्या.

***संत वचनीं ठेवितां भाव । तोचि शुद्ध स्वानुभव ।***
***मनाचा तैसाच स्वभाव । आपण वस्तु ।।८/१०/७७।।***

'छान'. आजी म्हणाल्या. 'एक निष्ठेने संताच्या वचनावर विश्वास ठेवावा. तसे आचरण करावे. मग स्वरुपानुभव येऊ लागतो. मन पालटत जाते. आपले अज्ञानाचे वागणे बदलते. आपण परब्रह्मरूप आहोत हा मनाला पडताळा येतो. मग आपण काय? सगळे दृश्यच परमात्मररूप दिसते.

विलास म्हणाला, 'हे विश्वचि माझे घर' असे श्री संत ज्ञानेश्वर माऊली म्हणतात. तसे आपल्याला पण ठासून म्हणता येईल कां?'

'का नाही?' आजी म्हणाल्या, 'नुसत्या म्हणण्यापेक्षा तसे वागता येईल म्हण. हेच पूर्ण ऐक्य. हेच खरे समाधान हाच खरा आनंद. हे खरे वैभव बरं!'

'बस्स! आपण ते मिळवणारच! सगळे एकदमच वैभव शिखरावर जाऊ! मग आनंदाचे डोही आनंद तरंग!

आजी म्हणाल्या, 'छान. यशस्वी व्हाल.'

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**

## दिवस १७ वा

आजींचे भजन अगदी रंगात आले होते. 'गुरु महाराज गुरु जय जय परब्रह्म सद्गुरु । चारी मुक्ती दायक दाता उदार कल्पतरू ऽऽ गुरु -

सगळीजण पडवीवर जमले. आजींच्या भजनाचा ठेका धरून चक्कफेर धरून भजनही म्हणू लागले. त्या आवाजानेच आजी बाहेर आल्या. तरी मुले फेर धरून भजन म्हणण्यात रंगली होती. आजी म्हणाल्या - 'वा वा वा! सद्गुरुनाथ महाराज की जय ।'

महारुद्र हनुमान की जय ।

जय जय रघूवीर समर्थ ।

मोठ्या आनंदाने एकमेकास नमस्कार करुन सर्वजण स्थानापन्न झाले. सुधा म्हणाली, 'आजी, मी दासबोध बाहेर आणला. आज काय खूण पहावी म्हणून उघडला. तो काय? नि नि नि अ अ अ बाई बाई किती शब्द हे. हे कोणाचे वर्णन?'

आजी म्हणाल्या, 'ज्याच्या सत्तेने व इच्छेने आपल्या प्रयत्नाला यश येणार त्या परब्रह्माचे वर्णन हे. आज तुम्ही भजनांत रमलात. आता खेळच घेऊ या. नि म्हणजे नाही. व अ म्हणजे पण नाही. मी शब्द सांगते. बोट दाखवीन त्याने अर्थ सांगायचा. चालेल?'

'हो हो चालेल नाही चुकणार आम्ही.' विलास म्हणाला, 'हं सुरु हं आजी - निराकार'

गणपती - आकार नाही

आजी - निराभास

जया - भासच नाही

आजी - निःकाम

विलास - कामच नाही, काम म्हणजे वासना.

आजी - निःकलंक



मधू - कसलाही कलंक नाही

आजी - निःसंग

सुधा - कशाचाही संग नाही

असा बराच वेळ खेळ चालला. विलास म्हणाला, 'आजी हे नाही नाही हे समर्थांनी कोणाबद्दल सांगितले?'

आजी म्हणाल्या, 'ज्या परब्रह्माची सत्ता विश्वावर चालते त्याचे असे 'नाही' शब्दातच वर्णन करणे भाग पडते. कारण तो या दृश्य विश्वाच्या पलीकडे आहे.

त्याच्या सारखा तोच. पण सद्गुरु माऊली त्या परब्रह्माचा अनुभव आत कसा घ्यायचा ते सांगते. विलास तू वाच.'

***परब्रह्म म्हणजे सकळां परतें । तयांस पाहतां आपणचिते ।***
***हें कळे अनुभव मतें । सद्गुरु केलियां ।।९/१/२९।।***

'सामान्य माणसांना वाटते आपणास परब्रह्म दर्शन व्हावे. पण ते जवळ असून दिसत नाही?' आजी म्हणाल्या, 'जया तू वाच.'

***दृश्य सबाह्य संचलें । परी ते विश्वास चोरलें ।***
***जवळिच नाहीसें जालें । असतचि कैसें ।।९/२/५।।***

'छान,' आजी म्हणाल्या, 'हेच त्या परब्रह्माचे वैशिष्ट्य, विश्वातील सर्व पाण्याला ते व्यापून आहे तरी - - - '

'तरी ते भिजत नाही.' गणपतीने वाक्य पूर्ण केले.

आजी म्हणाल्या, 'सर्व अग्नीला व्यापून आहे पण -

विलास - पण ते जळत नाही.

आजी - ते वाऱ्यात आहे पण

मधुकर - पण ते उडून जात नाही.

आजी - ते सोन्यात आहे पण

सुधा - पण त्याचे दागिने करुन घालता येत नाही. शाब्बास, मी देह आहे हे

अज्ञान, कल्पना, भ्रम दूर जायला हवा तसच मी ब्रह्म आहे. ही पण कल्पनाच. कल्पनेला मर्यादा असते. परब्रह्म व्यापक आहे. मर्यादे पलीकडे आहे.'

'मग ते परब्रह्म सापडेल कसे? अनुभवायचे कसे?' गणपतीने शंका विचारली.

'समर्थच युक्ती सांगतात बघ' आजींनी गणपतीला दासबोध देऊन ओवी दाखवली.'

***अन्वये आणि वीतरेक । हा शब्द भेदकोणी येक ।***
***नि शब्दाचा अंतर विवेक । शोधिला पाहिजे ।।९/२/२१।।***

आजी म्हणाल्या, 'मोगरीच्या फुलांत परब्रह्म वास रुपाने असतो. पाण्यांत चव रुपाने असतो. असे त्याला दृश्यांत पहाणे याला अनवय म्हणतात. फूल सुकते. वास येत नाही. पण दुसऱ्या फुलांत वास असतोच. जगाच्या पाठीवरचा वास सर्वस्वी गेला असे कधीच होत नाही. पाणी संपलं, आटल किंवा सांडल तरी दुसऱ्या पाण्याला चव असतेच. असे दृश्याला म्हाणजे दिसणाऱ्या वस्तूला बाजूला सारुन जे असतेच असते ते परब्रह्म असे पहाणे म्हणजे व्यतिरेक.

'वास कसा शब्दाने सांगता येतो कां?' आजींनी विचारले.

'नाही' सगळयांनी एकदम उत्तर दिले.

आजी म्हणाल्या, 'जे शब्दाने सांगता येत नाही तेथे गप्प राहून आंत अनुभव घ्यायचा याला विवेक म्हणतात.'

***आतां मौन्य न भंगावे । करुन कांहींच न करावें ।***
***असोन नि शेष नसावे । विवेक बळे ।।९/२/४१।।***

विवेकाने मौनात राहून सर्व कांही करुन अलिप्त असावे सगळयात असून कशातही अडकून पडू नये.'

मधुकर म्हणाला, 'म्हणजे कमळासारखे म्हणाना चिखलांत असून अलिप्त, निर्मळ.'

'कमळ कुठे सगळयांना पहायला मिळते?' जया म्हणाली.

'आजी मी सांगते. परब्रह्म लोण्यासारखे. ताकांत असून ताकापासून अलिप्त. ताकात न मिसळता राहणे.'



मधुकर म्हणाला, 'आजी, जरा अवघडच आहे हे करुन अकर्ता भोगून अभोक्ता. तो असतो तरी कसा?'

आजी म्हणाल्या, 'हे बघ, समर्थांनी किती योग्य शब्दात वर्णन केले आहे -

***तैसा साधू आत्मज्ञानी । बोधे पूर्ण समाधानी ।***
***विवेकें आत्म निवेदनी । आत्मरूप ।।९/३/३२।।***

खरा खरा आत्मज्ञानी म्हणजे स्वस्वरूप जाणणारा, सद्गुरु बोधाने, परिपूर्ण ज्ञानाने, पूर्ण अनुभवी असतो. पूर्ण समाधानी असतो विवेकाने आत्म निवेदन केल्यामुळे तो आत्म स्वरुपाकार बनतो.

'आजी, माझी एक शंका आहे.' गणपती म्हणाला, 'अभ्यासाने जर हे सहज शक्य आहे तर सगळेच का तसा अभ्यास करीत नाहीत?'

आजी म्हणाल्या, 'छान विचारलंस हो!'

***येका जाणण्यासाठी । लोक पडिले अटाटी ।***
***नेणपणें हिंपुटी होती । जन्म मृत्ये ।।९/३/४४।।***

ज्ञानप्राप्ती व्हावी असे तर सगळयांनाच वाटते. पण गंमत काय होते, खटपट करुनही अज्ञान आड येते. देहात्मबुद्धी अज्ञान वाढवते. देहात्मबुद्धीची प्रजा वाढते. मनुष्य जन्म मृत्यूच्या फेऱ्यात अडकतो. यातून बाहेर पडायचा एकच सोपा मार्ग आहे. विलास तू वाच.'

***जाणता तो कार्य करी । नेणता कांहीच न करी ।***
***जाणता तो पोटभरी । नेणता भीक मागे ।।९/४/६।।***

'मीच सांगतो अर्थ' विलास म्हणाला, 'जाणता म्हणजे आत्मज्ञानी उद्योग करतो. नेणता म्हणजे अज्ञानी आळसांत दिवस घालवतो. उद्योगधंदा नाही मग पोट कसे भरणार? उद्योगी मनुष्य नीटनेटके पोट भरतो. आळशी मात्र भीक मागत फिरतो.'

आजी म्हणाल्या, 'ठीक. म्हणजे जीवनांत काय करायला हवे ते कळले. जया आता तू वाच.'

***प्रपंच अथवा परमार्थ । जाणता तोचि समर्थ ।***
***नेणता जाणिजे वेर्थ । निःकारण ।।९/४/१९।।***

जयानेच अर्थ सांगितला. 'प्रपंचात काय किंवा परमार्थात काय ज्ञान हे असायलाच हवं. ज्ञानी मनुष्यचं प्रपंच चांगला करील व त्याला परमार्थही उत्तम साधेल. अज्ञानी माणूस मात्र दोन्हीकडे फजित पावेल. त्याचे आयुष्य वाया जाईल.'

विलास म्हणाला, 'आपले आयुष्यच असे वाया जायला नको. होय ना गणपती?

गणपती म्हणाला. 'आपल्याला वैभव शिखर गाठायचं आहे.'

आजी म्हणाल्या, 'मग त्यासाठी लक्षात ठेवायला हवे. मधू ओवी वाचेल.'

***जेथे जाणपण खुटले । तेथे बोलणेही तुटले ।***
***हेतु रहित जालें । समाधान ।९।४।४२।।***

मधू म्हणाला, 'आजी, हे पथ्य तुम्हीच समजावून सांगा.'

'सांगते,' आजी म्हणाल्या. 'मी देव आहे हा अनुभव येणे हे खरे ज्ञान. हा अनुभव जितका पक्का होत जाईल तितक्या प्रमाणांत 'मी देह आहे' हे अज्ञान दूर होईल. अज्ञानाचा विचार लोप पावतो हे ठीक आहे. पण ज्ञानाचा विचार फोफावला तर तेही घातकच. हे अनुभवाचे ज्ञान आहे. त्याची आताच जोपासना करायची. तो ज्ञानाचा विचार ब्रह्मानंदात मिसळून टाकता आला पाहिजे. मग बोलणे खुंटतेच. वासना क्षीण होते. हाव नष्ट होते. लोभाची नांगी पडते. मोह गळून जातो व खरे खरे समाधान पदरी पडते.

तरी संत संगती हवीच. नाहीतर घसरण सुरू होण्याची भीती असते. भोवताली असलेल्या ज्ञानी अज्ञानी माणसांच्या वल्गनेत सापडलो तर ? फजितीच.

तर्काचे, अनुमानाचे ज्ञान खरे नव्हे. कोणी वादंग घालतील, कोणी भलतेच प्रश्न विचारतील तरी गांगरून जाऊ नये. सद्गुरूवर हवाला टाकावा. उपास्य देवतेचा आदर्श डावलू नये. शांत राहून विचार करावा.

'जे ब्रह्मांडी ते पिंडी' या न्यायाने पिंडांत छपन्न कोटी देवता पिंडात कोठे आहेत? असे कोणी हटकले तर?

तारतम्य विचार करावा. शब्दाला शब्द अर्थ न घेता साधर्म्य विचार पहावा.

ब्रह्मांडाला आधार पंचमहाभूतांचा तसाच पिंडाला म्हणजे देहाला पंचमहाभूतांचा



आधार आहे. 'आजी, ही पाचही भूते शरीरांत कशी? मी सांगू? जया म्हणाली' आजी हो म्हणाल्या.

'दृश्यात जशी जमीन डोंगर वनस्पती आहे तशी देहात मास हाडे केस आहेत.'

जया सांगू लागली, 'बाहेर नद्या आहेत तशा शरीरांत रसवाहिन्या रक्त वाहिन्या आहेत.'

'या नद्या म्हणजे आप तत्व झालं' गणपती म्हणाला.

मधुकर म्हणाला, 'बाहेर सूर्य आहे तसा देहात पण तेज म्हणजे अग्नी आहे. पोटात जठराग्नी आहे. आपलं सगळ शरीर गरम असते कारण रक्तात तेज आहे. या तेजामुळेच इच्छा वासना उत्पन्न होतात. कधी कधी शरीरांतला अग्नी भडकला तर क्रोध उफाळतो. डोळे लाले लाल होतात.'

सुधा म्हणाली, 'आजी ज्ञानाला पण अग्नीच म्हणतात न?'

आजी म्हणाल्या, 'होय, ज्ञान जर सतेज असेल, तर ज्ञानचक्षू उघडला म्हणतात.'

'मी आता वायू तत्व सांगतो,' गणपती म्हणाला,' आपला श्वास उच्छ्वास तो वायूच. वायू मुळेच उचकी लागते. ढेकर येतो. आणि आजी आपण हवा सरकली म्हणतो (गणपतीने विलासच्या अंगावर कलून मांडी वर करून चक्क कृती दाखवली) तो पण वायूच' सगळेच हसले.

'आपल्या शरीरांतली पोकळी ते आकाश तत्व,' विलास म्हणाला.

'छान सांगितलत हं' आजी म्हणाल्या, 'बरंच लक्षात ठेवलंत. यालाच खरे श्रवण म्हणतात. श्रवणानेच मनन घडते. मननांत श्रवण केलेला विषय पक्का होतो. आणखी एक मोठ्ठा फायदा कोणता?

***जितुके अनुमानाचे बोलणें । तितुके वमन प्राये त्यागणें ।***
***निश्चयात्मक तेंचि बोलणें । प्रत्ययाचे ।।९।५।३९।।***

अनुमान व अनुभव यात फरक आहे बरं! सत् श्रवणाने अनुमानाला म्हणजे तर्काला वावच मिळत नाही. संतांचे अनुभवाचे बोल आपल्या खोट्या कल्पनांना उडवून लावतात. जो जो चिंतन घडेल तो तो आत अनुभव येत राहील. अनुभव ज्ञानाने

आपला आत्म ज्ञानाचा पाया पक्का होईल.

मग तार्कीक ज्ञानाकडे कोणीही आपल्याला खेचले तरी समर्थ ठामपणे सांगतात, असले बोलणे ओकारी प्रमाणे त्याज्यच समजावे. जराही मनावर घेऊ नये. आंत निश्चय पक्का असावा. कोणता?'

'सो हं -' विलास म्हणाला.

'मी देह नाही' गणपती म्हणाला

'मी देवच आहे' जया म्हणाली.

'प्रचितीचे ज्ञान तेच खरे ज्ञान ' मधुकर म्हणाला.

'सद्गुरूंना अनन्यभावाने शरण जावे. त्यांनी दाखवलेल्या मार्गाने चालावे' सुधा म्हणाली.

आजी म्हणाल्या ,' चारी मुक्ती दायक दाता । उदार कल्पतरू । गुरू महाराज गुरू जय जय परब्रह्म सद्गुरू .'

मुलांनी आजींच्या भोवतीच फेर धरला व भजन रंगले. आनंदाने गर्जना केली.

महारूद्र हनुमान की जय .

सद् गुरूनाथ महाराज की जय.

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**

## दिवस १८ वा

विलास व गणपती वाड्याबाहेरच चर्चा करीत होते.

'मी आजींना विचारू कां ? आपले शरीर पंचमहाभूतांचे, पण भूते आली कोठून?' विलास गणपतीला म्हणाला.

गणपती म्हणाला, 'मला पण विचारावेसे वाटते की एकमेकात मिसळूनही ती कार्य कशी करतात?

इतक्यात मधुकर पण आला 'वा वा! मला पण विचारायचं आहे की ही भूते



एकामागून एक किती किती दिवसांनी, महिन्यांनी तयार झाली?

इतक्यात सुधा व जया पण आली, 'कसली रे वाटाघाट चालली आहे?' सुधाने विचारले.

जया म्हणाली,'मला प्रश्न पडला की परब्रह्म काहीच करीत नाही तर त्याचे स्वामित्व तरी कसं मानायचं?

सुधा म्हणाली, 'चला आता. वेळ झाली. आजी पायरीवर' आल्या बघ.'

पाचहीजण हातपाय धुवून पडवीवर आले. वंदनादिक आटोपले. सर्व स्थानापन्न झाले.

'बाळांनो, आज बराच कांही विचार करून येताहात!' आजी म्हणाल्या.

सुधा म्हणाली, 'आजी न सांगता तुम्हाला कसं कळलं?'

'अग त्यात गुपीत कांहीच नाही.' आजी म्हणाल्या, 'तुमच्या मनांत काहीतरी विचारायचं आहे हा भाव चेहऱ्यावर स्पष्ट दिसतोय. आपल्या मनातील विचारांचं प्रतिबिंब चेहऱ्यावर स्पष्ट दिसतं. जणू कांही आरसाच तो. विचारा. जरूर विचारा. समर्थच देतील उत्तरे.

मधू म्हणाला, 'मी आधी विचारतो. काल आपण आपल्या शरीरातील पाच भूतांचा अभ्यास केला. ती भूते किती किती अंतराने तयार झाली? ती कार्य कशी करू शकतात?'

'आणी आजी' विलास म्हणाला'माझी शंका अशी की ही भूते आली कोठून व कशी?

'छान' आजी म्हणाल्या, 'आज चर्चेला चांगला विषय मिळाला. समर्थ दासबोधांत म्हणतात बघ.

***पंचभूते त्रिगुणाकार । अवघा वायोचा विकार ।***
***जाणीव नेणीवेचा विचार । वायोचि करिता ।।९।६।११।।***

विलास म्हणाला, 'आता या भूतांना अंगड टोपडं लागलंच. हे गुण म्हणजे त्यांना दोरीने बांधले कां? सुटे सुटे होते. त्यांची मोळी केली कां?

आजी हसल्या,'तू सांगितलास गुण याचा अर्थ दोरी. तो बरोबर आहे पण. दासबोधात हे गुण म्हणजे कार्य करण्याची एक शक्ती. आपण कोणतेही काम केलं तरी त्यांत वर्गवारी असतेच. तुमच्या वर्गात म्हणजे यत्तेत १ ते १० क्रमांकात पास झाला झालांत की उत्तम. त्यांत १ ला क्रमांक म्हणजे विशेष. ११ ते २५ पर्यंत मध्यम. गुण म्हणजे मार्क बेताचे पास होण्यास लागणारे लाल रेघ एखाद दुसरी पण वर पास हा ना कनिष्ट ना मध्यम. व नापास म्हणजे कनिष्टच. असे असते की नाही?

तसेच, त्या महान दिव्य शक्तीमध्ये म्हणजे परब्रह्मामध्ये - मूळ माया उद्‌भवली. तीच तीव्र इच्छा शक्ती. तिच्यात तीन गुण सुप्त अवस्थेत असतातच. १) सत्व गुण २) रजोगुण ३) तमोगुण

सत्वगुण जाणीवयुक्त ज्ञानमय असतो. तो १ला वर्ग. रजोगुण थोडी जाणीव थोडी नेणीव खिचडी. २ रा वर्ग म्हणजे मध्यम. तमोगुण म्हणजे पूर्ण नेणीव. हा तिसरा वर्ग. या गूणामुळेच वैचित्र्य निर्माण झाले. मूळ मायेला स्वस्थ बसवेना. साम्यावस्थेत, सुप्त अवस्थेत असलेल्या गुणांना प्रगट करावेसे वाटले. तेव्हाच तिला गुणमयी माया नांव पडले. थोडक्यात म्हणजे कांही सुचले नाही की विलास गणपती एकमेकांस धक्का देतात किंवा चापटी मारतात मग मधू त्यांना खोडसाळ म्हणतो. तोपर्यंत दोघे सूज्ञच असतात व आहेत. तस्संच हे गुण प्रगट झाल्यावर ती मूळ माया गुणमयी झाली.

सत्वगुणातून अंतःकरण, मन बुद्धी, चित्त अहंकार तयार झाले. याला अंतःकरण पंचक म्हणतात. रजोगुणातून ५ ज्ञानेंद्रिये व ५ कर्मेंद्रिये व त्यांच्या कार्यशक्ती म्हणजे देवता तयार झाल्या. तमोगुणातून पंच महाभूते निर्माण झाली. पाचांची नावे एकदम कशी सांगणार? एकानंतर दुसरे असेच नाव सांगावे लागेल. चकत्यांची चवड एकावर एक ठेवूनच करावी लागते. इच्छा शक्ती म्हणजे वायूच. पण तो रहाणार कुठे म्हणजे पोकळी आधी तयार होऊन त्यात वायू संचरला. पोकळी म्हणजे अवकाश आकाश. ते वायूने भरले. वाऱ्याला हालचालीला खूपच जागा मिळाली. वेग वाढला. घर्षण झाले. तेज निर्माण झाले.

विलास म्हणाला,'थांबा आजी, म्हणजे कसे झाले? आईने पोळया करायचे मनांत आणले. परात घेतली परात म्हणजे पोकळी, आकाश समजू. त्यात कणीक घेतली. कणकेत मीठ, तेल घातले. पाणी घालून कणकेचा गोळा केला. त्यांचे गोळे गोळे



करून पोळया केल्या. एकावर एक ठेवल्या. एकापाठोपाठ काम झाले. त्याच कणकेच्या गोळयातून पुऱ्या केल्या. पापड्या केल्या. म्हणजे जणू नाना प्राणी तयार झाले असेच ना?

' होय ' आजी म्हणाल्या, जवळ जवळ असेच, वायूच्या घर्षणातून अग्नी म्हणजे तेज तयार झाले. उष्ण भागातून सूर्यदेव व थंड भागातून पाणी तयार झाले. पाणी आटले घट्ट घट्ट व्हायला लागले. तीच पृथ्वी, जमीन तयार झाली. डोंगर झाले. पर्वत झाले. आपण तिच्यावर वावरतो. बहुगुणी वसुंधरा! ही पाच भूते व तीन गुण यांना काय म्हणायचं ? कणकेच्या गोळयांवर लाटण्याची भाजण्याची क्रिया झाली. रूप मिळाले नाम आले. पोळया, पापड्या, पुऱ्या. तशी ही झाली अष्टधा प्रकृति.

गणपती म्हणाला, 'आजी, पृथ्वी दिसते. तिच्यावरच आपण रहातो. पाणी दिसते. सूर्यरूपाने अग्नी दिसतो. पण वायू व आकाश दिसत नाही.'

सुधा म्हणाली, 'दिसत नाही. पण वायू हलला की वारा आला आपण म्हणतो तो भासतो, जाणवतो. पोकळी अफाट आहे. ही पृथ्वी त्या पोकळीतच आहे. पोकळी म्हणजे आकाश. व्यापक पण व सूक्ष्म म्हणून हातात धरून दाखवता येत नाही.'

आजी म्हणाल्या, 'या आकाशापेक्षाही परब्रह्मशक्ती व्यापक व सूक्ष्म आहे. विकारी नाही. आकाशाला निरभ्र, ढगाळलेले हे विकार आपण चिकटवतो. ते परब्रह्मांत नाहीत. म्हणून अत्यंत शुद्ध निर्मळ त्याचे श्रेष्ठत्व मानायलाच हवे.'

मधुकर म्हणाला, 'पण हे विकार तरी कसे निर्माण झाले?

आजी म्हणाल्या,'तुला चित्रे काढता येतात. तुझ्याकडे रंगपेटी आहे. काळा रंग व पांढरा रंग एकत्र केला तर?'

विलास म्हणाला, 'पारवा रंग तयार होतो. आजी निळा नी पिवळा एकत्र केला तर हिरवा होतो '.

'शाबास,'आजी म्हणाल्या,'असे एकात एक मिसळून अनेक रंग तयार होतात. वाच ही ओवी'.

***ऐसें रंग नानापरी । मेळविता पालट धरी ।***
***तैसें दृश्य हें विकारी । विकार वंत ।।९/६/४१//***

आजी म्हणाल्या,'मुळातला एकरंग विविधतेने नटतो. तसा एकच विकार एकमेकात मिसळून अनेकानेक विकार तयार होतात. आणि या विकारांना भुलून मनुष्य त्यांत अडकतो.

मधु म्हणाला,'पण हे विकार बाधतात. त्यातून सुटावे, मोकळे व्हावे हे कळते कशाने?

आजी म्हणाल्या,' छान विचारलेस? परब्रह्माने मायेला जशी खेळ खेळण्याची शक्ती दिली. तशी त्याला ओळखण्याची पण शक्ती दिली. तिचे नांव जाणीव. जाणीव म्हणजे ज्ञान.ही जाणीव आहे नाही कसे ओळखतात. वाच तू.

***सावध आहे तो स्मरण । विकल होता विस्मरण ।***
***विस्मरण पडता मरण । पावती प्राणी ।।९/७/२५।।***

आजी म्हणाल्या,'माणसाची बुध्दी शुध्दीत असते तो पर्यंत जाणीव असते. स्मरण रहाते. आठवते. पण माणूस बेशुध्द झाला. की जाणीव लोप पावते. आठवतच नाही. विस्मरण होते. ही जाणीव संपूर्णपणे लोप पावली की तो माणूस गेला. म्हणजे त्याला मृत्यू आला, मरण पावला असे आपण म्हणतो. देहाला मरण आल्यावर त्याला ना सुख ना दुःख. जाणीव गेली तसे अज्ञान पण गेले.

विलास म्हणाला,'आता मनुष्य मरण पावला म्हणजे तो बध्द पणापासून सुटला. मोकळा झाला. मग ज्ञानाचा काय उपयोग?

आजी म्हणाल्या,'सांगते. देह संपला खरे. पण शेवटच्या क्षणाला जी इच्छा आत उद्‌भवली असेल त्या इच्छा पूर्तीकरीता त्याला, म्हणजे अंतःकरणाला जीवाला. नवा देह घ्यावा लागतो. म्हणजे पुन्हा बंधनात पडतो. तो देह माणसाचाच मिळेल असे नाही. कर्माप्रमाणे चांगल्या वा हीन योनीत जन्म मिळेल.

गणपती म्हणाला,'अंस' अडकायची इच्छा नसेल, सुटण्याची म्हणजे मुक्त होण्याची इच्छा असेल तर?

आजी म्हणाल्या,'तू ओवीच वाच. समर्थंनी सांगूनच ठेवलंय.

***तैसें जयास ज्ञान जाले । ते ते तितुकेच तरले ।***
***ज्याचें बंधनची तुटले । तोचि मुक्त ।।९/७/३६।।***



आजी म्हणाल्या,'तैसे म्हणजे, या ओवीच्या आधी समर्थांनी पोहोणराचे उदाहरण दिले. ज्याला पोहता येते तो पूर आलेली नदीसुध्दा पार करून जातो. पण ज्याला पोहता येत नाही तो बुडेल. पुराच्या नदीत तर बुडलेच. पण साध्या खोल पाण्यांत सुध्दा बुडेल. म्हणून माया नदी किंवा भवसागर ज्याला तरून जायची इच्छा आहे त्याने तरण्याचा उपाय शोधलाच पाहिजे. म्हणजेच ज्ञान मिळवलेच पाहिजे ज्ञान म्हणजे ?

सुधा म्हणाली,'त्यालाच म्हणतात स्वरूप ज्ञान, म्हणजे मी कोण ही जाणीवच की!'

'बरोबर.' आजी म्हणाल्या, 'ज्याला हे ज्ञान होते तो मोहांत सापडत नाही. खरं काय खोटं काय त्याला कळते. तो तरतो. फसत नाही. कारण

***ज्ञानात्याची उगवली वृत्ती । बध्दा ऐसी न पडे गुंती ।***
***भुकेल्याची अनुभव प्राप्ती । धाल्यास नाही ।।९/७/५६।।***

ज्याचे जेवून पोट भरले त्याला भुकेल्याला काय होते हे कसे कळणार? जया आता तू वाच ही ओवी.

***मनाच्या वृत्ती नाना । त्यांत जन्म घेते वासना ।***
***वासना पहाता दिसेना । परंतु आहे ।।९/८/१२।।***

आजी म्हणाल्या,'वासना म्हणजे इच्छा अगदी सूक्ष्म असतात. 'मी ब्रह्म आहे' ही जेणीव शुद्ध, निर्मळ, अनंत आहे. ही जाणीव सुध्दा वायूरूपाने असते व विषय वासना इच्छा पण वायूरूपच असतात. कल्पना वायूरूपच.

हा वायू मोठा कारभारीच आहे. वायू हलू लागला, हालचाल करू लागला की त्याला वारा म्हणतात. वारा काय करतो?'

विलास म्हणाला,'सोसाट्याचा वारा घरावरची कौले, पत्रे उडवतो. झाडे पाडतो. ढगांना गोळा करतो पसरवतो पण.

गणपती म्हणाला,'दामू आण्णांच्या अंगावरून वारे गेले म्हणे. ते तर अपंगच होऊन बसले. या वाऱ्यालाच एका विशिष्ट शक्तीने एकत्र आणले की त्याला मंत्र म्हणतात. मंत्र म्हणून सापाचे विंचवाचे विष उतरवतात. मंत्रानेप्रेते उठवतात. भूते घालवतात. मंत्र म्हणूनच बाण सोडत व युध्दे होत असत.

आजी म्हणाल्या,'बरोबर, मंत्र् किती ही प्रभावी असला तरी ब्रह्मांडाला भेदेल. ब्रह्मला भेदूच शकणार नाही.'

जया म्हणाली,'आजी, आकाशांत ब्रह्म आहे. आकाशाचा भेद केला की ब्रह्मचा भेद झाला असे नाही का होत?'

'नाही' आजी म्हणाल्या,'आकाश सर्वव्यापी, निर्मळ, ब्रह्मासारखेच जरी आहे तरी सुध्दा

***पंचमहाभूतामध्दे वास । म्हणौन बोलिजे आकाश ।***
***भूतांतरी जो ब्रह्मांश । तेची गगन ।।९/९/२१।।***

बाळांनो,'पंचमहाभूतांत आकाश वरिष्ट.भूतमात्रातला ब्रह्मांश म्हणजे आकाशच आकाश सोडून उरलेली ४ भूते आली काय मी गेली काय ते तसेच रहाते हा ब्रह्माचा एक गुण आकाशांत आहे. म्हणून ते ब्रह्मसदृश मानतात.

***सागरामध्ये खसखस । तैसें परब्रह्मी दृश्य ।***
***मती सारिखा मतिप्रकाश । अंतरी वाढे ।।९/९/१९।।***

सुधा म्हणाली,'मी सांगते अर्थ. समुद्रात खसखस पडली तर तिचा थांगपत्ताच लागणार नाही. त्या अफाट समुद्रापेक्षाही ब्रह्म अफाट. म्हणून ज्याला ब्रह्मज्ञान हवे त्याने बुध्दीचा विकास करावा. बुध्दीला विशाल करावी. करिता करिता फाटतेच परब्रह्मांत मिसळते.

विलास म्हणाला,'बेडकी फुगली. पण बैला एवढी झाली नाही. तिचे पोट फुटले'

आजी म्हणाल्या,'ती देहाने फुगली. म्हणून पोटफुटले. बुध्दी वायू रूप विशाल होता होता विरळ होते व मूळ ब्रह्मात मिसळते. हे विवेकाने जाणावे. गणपती तू वाच!

***विवेकें तुटे अनुमान । विवेके होये समाधान ।***
***विवेकें आत्म निवेदन । मोक्ष लाभे ।।९/९/३९।।***

विलास म्हणाला,'सोपं आहे. विवेक! विवेकाला हाताशी धरायचे!'

आजी म्हणाल्या,'बरोबर, समर्थ हेच सांगतात.'

***लौकिक बरा संपादिला । परी अंतरी सावध नाही जाला ।***
***मुख्य देवास चुकला । तो आत्मघातकी ।।९/१०/१९।।***



'नुसता लौकीकांत मोठेपणा मिळवून चालत नाही' आजी म्हणाल्या. मुख्य देव म्हणजे परब्रह्म. आत्मज्ञानाने परब्रह्मास जाणले नाही तर तो आत्म घातकीच.'

***ते ब्रह्मरूप आपणचि आंगे । सारासार विचार प्रसंगे ।***
***करणे न करणे वाउगे - । काहीच नाही ।।९/१०/३१।।***

आपण ब्रह्मरूपच आहोत असा विवेकाने अनुभव आला की कर्म अकर्म हा विचारच उद्‌भवत नाही. काय करु? कसं करु? कोडेच सुटते. शांत, शून्यासारखी स्थीर वृत्ती होते.

सुधा म्हणाली, 'म्हणजे ब्रह्मात विलीन होण्याची पात्रता आली असेच म्हणायचे ना?'

'होय' आजी म्हणाल्या. 'पण देह असतानाच हे साधायचे. मग आनंदच आनंद.'

विलास म्हणाला, 'आजी आपण सगळयांनी उत्तम साधना केली की हा आनंद आपण सर्वचजण एकाच वेळी अनुभवू शकू कां?'

'कां नाही?' म्हणूनच या बुद्धीमंताची प्रार्थना करायची की आमची बुद्धी स्थीर ठेव.'

सर्वांनी हात जोडले. 'भीमरूपी' स्तोत्र म्हटले. वंदन केले. आजी आनंदून म्हणाल्या -

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**

## दिवस १९ वा

विलास सारखा कान चोळत होता. आजींनी विचारले, 'कानात कांही गेलं कां? कान दुखतोय कां? चोळतोस का असा?'


गणपतीकडे पहात विलास म्हणाला, 'सांगू कां आता?'

'सांग. सांग. खुश्शाल सांग.' गणपती म्हणाला.

'आजी,' विलास म्हणाला, 'मी इकडे येण्याकरिता तयार झालो. याची वाट पहात उभा होतो पायरीवर. मला गुलाबाचे झाडावर फुलाभोवती तीन चार फुलपाखरे

दिसली. माझे मन मोहून गेले. मी त्यांना कुरवाळावे म्हणून हळूच त्यांचे जवळ गेलो. आणि आता त्यांना धरणार तर हा गण्या मागून आला नी त्याने कान पिरगळला माझा.'

गणपती म्हणाला, 'सुंदर फुलपाखरं. नाजूक प्राणी, लांबूनच सौंदर्य पहायचं की त्यांना धरून दुखवायचं? हे त्याला कळावे म्हणून मी कान धरला. पिरगळला नाही. नुसता कान धरला तर दुखतो ना? मग पाखरांना पण असेच दुखेल हे नको कां कळायला?'



सुधा म्हणाली, ' पण त्याला फुलपाखरू मिळालच नसत. ते भुरकन उडून जातं. आजी, फुलावर बसता बसता त्यांना कसं कळत हो?'

मधू म्हणाला, 'पाखरं तर उडताततच पण आपल्याला डास चावतो ना? म्हणून त्याला मारायला जावं तर डास उडून जातो. फटका आपल्याला बसतो. आजी, एवढ्याशा लहान प्राण्यांना ही धोक्याची सूचना कोण देतो हो!'

आजी म्हणाल्या, 'आपल्याला जसं अंतःकरण दिले आहे तसे प्राणी लहान असो मोठा असो सर्वांना अंतःकरण आहेच. गंमत अशी. अंतःकरण लहान नी मोठे



असेही नाही. सारखेच असते. समर्थ तेच सांगतात बघ.

***जाणीव रूपे अंतःकरण । सकळांचे एक हे प्रमाण ।***
***जीवमात्रास जाणपण । येकचि असे ।।१०/१/१५।।***

बाळांनो, अंतःकरण म्हणजेच जाणीव. सर्व प्राणीमात्रांची जाणण्याची कला एकच. ही कला कोणाच्यात नाही असे होत नाही. विलासला सौंदर्याची जाणीव झाली. मधुला डासांच्या चावायची जाणीव झाली. डासाला प्राण रक्षणाची पण प्रथम भुकेची जाणीव झाली. जाणीव म्हणजे अंतःकरण सगळ्यांचे एकच. पण कृती भिन्न दिसली.

मधुकर म्हणाला, 'आजी, विष्णू जर सगळ्यांचे पालन पोषण करतो तर प्राण्यांनी देहरक्षणाकरिता पळून कशाला जायला पाहिजे?'

'छान विचारलेस' आजी म्हणाल्या, 'डासातल्या जाणीवेने अन्न मिळवण्यासाठी मधुला चावा घे व त्याचे रक्त शोषून घे असे सुचवले.

जाणीव ही ज्ञानमय शक्ती आहे. तिलाच जगत् ज्योती असे म्हणतात. अन्न मिळवून देण्याचे काम विष्णूने केले. डास तृप्त झाला.

आता मधूला देह दुःख सहन होत नाही. म्हणून डास चावल्यावर त्याला मारावे असे कोणाला स्फुरले?'

विलास म्हणाला, 'मधूच्या अंतःकरणाला स्फुरले.'

आजी म्हणाल्या, 'अंतःकरण म्हणजेच विष्णूची शक्ती. त्या शक्तीने मधुला डासाला मार अशी प्रेरणा दिली. डास उडाला म्हणजे डासाला संरक्षण दिले व चावा थांबला. म्हणजे मधुला पण संरक्षण दिले.'

जया म्हणाली, 'पण आजी, कधी कधी डास चावतो त्याच ठिकाणी आपल्या फटक्याने मरतो. ते कसे?'

आजी म्हणाल्या, 'त्या क्षणी त्याची जाणीव मंद झाली. जाणीव नसणे म्हणजे नाश. नाश म्हणजेच नेणीव. नेणीव हे तमोगुणाचे लक्षण तमोगुण रुद्राचा. त्या नेणीवेमुळे बेसावध डास जागीच मेला. मग आपण म्हणतो रुद्राने संहार केला. डासाला मारताना आपण रुद्रासारखे उग्र बनतो. बाळांनो कधी कधी थोडी जाणीवही असते थोडी नेणीवही

असते. बुद्धीला कधी ज्ञान होते तर कधी कळतच नाही. ध्यानी येत नाही. हे मिश्रण म्हणजे कोणता गुण?'

सुधा म्हणाली, 'रजो गुण कां?'

'होय.' आजी म्हणाल्या, 'हा रजोगुण असणारी बुद्धी म्हणजेच आपल्या देहातील ब्रह्मदेव.'

जया म्हणाली, 'पिंपळाचे झाडांत तिन्ही देव असतात. तसे आपल्यास पण आहेत की. मला मावशीने शिकवले,

*मूलतो ब्रह्मरूपाय, मध्य तो विष्णू रुपीणी,*
*अग्रतो शिव रुपाय, अश्वत्थाय नमो नमः ।*

असे म्हणून पिंपळाला पाणी घालावे.

मधूचे लक्ष दासबोधाकडे होते. वाऱ्याने पान उलटले. मधूच्या लक्षात आली ओवी, 'आजी, हे बघा काय म्हणतात.'

ब्रह्मा उत्पत्ती कर्ता चौमुखांचा । पालनकर्ता विष्णू चौ भुजांचा.

'मग आपल्या बुद्धीला चार तोंडे आहेत कां?' मधुने विचारले.

बाळांनो ही शास्त्राची सांकेतिक भाषा आहे. आपण शब्दशः अर्थ घ्यायचा नसतो. वेद हे ज्ञानाचे भांडार. रजोगुणी देवता ब्रह्मदेव याला चारही वेदांचे संपूर्ण ज्ञान आहे. त्याच्यावर ही परब्रह्माची कृपाच आहे. ज्ञान संपन्न बुद्धीच निर्मिती करू शकते. म्हणून चार तोंडे ही चार वेदांचे प्रतीक.'

जया म्हणाली, 'मग विष्णूचे चार हात म्हणजे?'

आजी म्हणाल्या, 'जीवनात उत्कर्ष साधण्यासाठी धर्म अर्थ काम व मोक्ष यांची गरज असतेच. हेच त्या पालन कर्त्या विष्णूचे चार हात. सद्धर्माने वागलो तरच अर्थप्राप्ती. अर्थ प्राप्तीने वासना पूर्ती, प्रयत्न योग्य झाले तर ब्रह्मज्ञान होऊन मोक्षप्राप्ती. हे काम विष्णूचे.'

गणपती म्हणाला, 'आजी, मन बुद्धी चित्त अहंकार अंतःकरण ही सगळी आतली सामग्री वायूरूपच न? मग ब्रह्मा विष्णू महेश म्हणजे रुद्र वायूरूपच होतील.



आजी म्हणाल्या, 'समर्थांनी हेच स्पष्ट केलंय बघ,

*ते मूळ मायेचे लक्षण । वायो स्वरुपचि जाण ।*
*पंचभूते आणि त्रिगुण । वायो अंगी ।।१०/३/२।।*

आणि बाळांनो, नुसते ब्रह्मा विष्णू महेशच काय सर्व देवता वायू रूपच. वायू हलला की त्याला आपण वारा म्हणतो. वायूचाच दुसरा भाग जगत्ज्योती. ही जगज्ज्योतच देवता रुपाने कार्य करते. जया तू ही ओवी वाच.'

*म्हणोनि वायू स्वरुपे देह धरले । ब्रह्मा विष्णू महेश जाले ।*
*पुढे तेचि विस्तारिले । पुत्र पौत्री ।।१०/४/२८।।*

आजी म्हणाल्या, 'ब्रह्मदेवाने चार तऱ्हेचे प्राणी निर्माण केले. १) स्वेदज. २) अंडज. ३) उद्भिज. ४) जारज.

विलास म्हणाला, 'आजी हे चार प्रकार काय मला नाही कळलं.'

'सांगते' आजी म्हणाल्या, 'काही प्राणी घामातून तयार होतात. प्रथम नरमादी जोडी तयार झाली की निसर्ग नियमाने त्यांची वाढ होते. ही प्रथम जोडी तयार होते हीच ब्रह्मदेवाची इच्छा शक्ती उवा पिसवा ढेकूण यांची उत्पत्ती घामापासून. घामाला स्वेद म्हणतात. ज म्हणजे जन्म. स्वेदापासून जन्म म्हणून स्वेदज.'

सुधा म्हणाली, 'अंडज म्हणजे अंड्यापासून जन्म. काही प्राणी अंडी घालतात. ती उबवतात. अंडी फुटून त्यातू पिलू बाहेर येते. पक्षी अंडज, सरपटणारे प्राणी अंडज, वटवाघूळ अंडज नाही. पंख आहेत उडतो. तरी पूर्ण पक्षी नाही. पण उद्भिज म्हणजे?'

'मी सांगते' आजी म्हणाल्या, 'बिया रुजून माती व पाणी यांच्या मदतीने वनस्पती वाढतात. फुले फळे येतात. फळातल्या बियापासून पुन्हा झाडे वाढतात. काही झाडे त्यांच्या फांद्याना मुळे फुडून वाढतात. आंब्याच्या दिवसांत कोयातून अंकूर फुटलेले तुम्ही पाहिले असतीलच. गवतासह सर्व वनस्पती उद्भिज मध्ये येते.'

'पण आजी,' विलासने शंका विचारली, 'प्रथम ब्रह्मदेवाने इतक्या झाडांच्या बिया किंवा फांद्या आणल्या कोठून?'

'हीच त्या ईश्वराची लीला.' आजी म्हणाल्या. ब्रह्मदेवाच्या इच्छेने सृष्टी उत्पन्न झाली म्हणायचे ते यालाच. हे येवढे ज्ञान भांडार त्याचेजवळ आहे म्हणून त्याला

म्हणायचे वेदज्ञ वेदवेत्ता.'

'आणि चौथा प्रकार?' जयाने विचारले.

'चौथा जारज' आजी म्हणाल्या, 'जार म्हणजे वार. सस्तन प्राण्याची मादी तिच्या उदरांत वारेच्या आवरणांत अपत्याचे संरक्षण करुन जन्मदेते. स्तनातील दुधाने त्याचे प्रथम पोषण करते. सगळे चतुष्पाद प्राणी, माणूस, माकड, वटवाघूळ हे जारज या प्रकारांत मोडतात.

मधुकर म्हणाला, 'जीव सृष्टी कशी वाढते हे समजले. पण मग नाश का पावते? नाश कशाने होतो?'

विलास म्हणाला, 'प्राणी मात्रांचा, माणसांचा सुद्धा नाश मरणाने होतो. ईश्वराने काही आयुष्याची मर्यादा घातली. त्याप्रमाणे कांही निमित्त होऊन जीव सृष्टी नाश पाते. असेच ना आजी?'

'होय, ही त्या भगवंताचीच इच्छा.' आजी म्हणाल्या, 'त्याच्या मनांत आता खेळ पुरे असे आले तर प्रलयाचे निमित्त करुन सारेच ब्रह्मांड चंद्रसूर्यासह आटोपते घेतो. सुधा या चारही ओव्या वाच.'

***ऐका प्रलयाचे लक्षण । पिंडी दोन्ही प्रलये जाण ।***
***येक निद्रा येक मरण । देहांत काळ ।।१०/५/१।।***

आजी म्हणाल्या, 'पिंड म्हणजे देह. देहधारी जे आहेत त्यांचे प्रलय दोन - १) निद्रा म्हणजे गाढ झोप २) मरण म्हणजे देहाचा आंत. वाच पुढे.'

***देहधारक तिन्ही मूर्ती । निद्रा जेव्हा संपादिती ।***
***तो निद्रा प्रलय श्रोती । ब्रह्मांडीचा जाणावा ।।१०/५/२।।***

आजी म्हणाल्या, 'तीन देवता म्हणजे?'

विलास म्हणाला, 'मी सांगतो. ब्रह्मा विष्णू महेश. यांना पण झोप येते. त्यांची कामे झोपेत थांबतात.'

आजी म्हणाल्या, 'अर्थातच ब्रह्मांडाचा प्रलय होऊ लागतो. ज्या क्रमाने पंचमहाभूते निर्माण झाली त्याच्या उलट क्रमाने ती एकमेकात मिसळतात.'



***तिन्ही मूर्तीस होईल अंत । ब्रह्मांडास मांडेल कल्पान्त ।***
***तेव्हा जाणावा नेमस्त । ब्रह्म प्रलेय जाला ।।१०/१/३।।***
***दोन्ही पिंडी दोन्ही ब्रह्मांडी । च्यारी प्रलय नवखंडी ।***
***पाचवा प्रलय उदंडी । जाणीजे विवेकाचा ।।१०/१/४।।***

जया म्हणाली, 'आजी मी ब्रह्मांडाचा प्रलय सांगते. सर्व प्रथम पृथ्वीचा नाश.' गणपती म्हणाला, 'थांब जया. पृथ्वीवरील जीव सृष्टीचा नाश आधी. तो कसा मी सांगतो. खूप उन्हाने झाडे करपतील. पाऊस पडणार नाही. पाणी नाही. पिके पिकणार नाहीत. अन्न नाही, पाणी नाही. माणसे जीव सृष्टी मरेल जमीन भाजून निघेल. हलकी होईल. मग धो धो पाऊस पडेल.'

विलास कपाळावर हात मारून म्हणाला, 'आता काय उपयोग पावसाचा?'

मधुकर म्हणाला, 'त्याशिवाय पृथ्वी पाण्यात कशी बुडेल. सगळीकडे पाणीच पाणी. पृथ्वी पाण्यात विरेल. सूर्याच्या उष्णतेने, समुद्रातल्या वडवानलाच्या क्षोभाने पाण्याची वाफ होईल. पाणी आटेल. उष्णता वाढेल. त्या तेजाला वायू गिळेल. म्हणजे वाऱ्याने तेजाचा नाश होईल. उष्णता नष्ट होईल. वारा पोकळीभर फिरेल. आकाशांत लीन होईल. आकाश मूळ मायेत नष्ट होईल. मूळ माया परब्रह्माच्या चरणाशी शांत होईल.'

विलास म्हणाला, 'पण परब्रह्माला पाय कुठे आहेत?'

आजी म्हणाल्या, 'परब्रह्म ही एक सत् चित् आनंद रूप शक्ती आहे. होय ना? त्या दिव्य शक्तीला स्फूर्ती झाली होती. खेळ सुरु झाला होता. आता खेळ संपला ती स्फूर्ती थंडावली. दिव्य शक्तीत मिसळली. त्यालाच म्हणायचे चरणी लीन झाली. विसावली. शांत झाली. काम थांबले.'

या सर्व प्रलयांत महत्वाचा प्रलय कोणता असेल तर पांचवा. काय बरं नांव त्याच?

विलासने सांगितले, 'विवेक प्रलय.'

'शाबास,' आजी म्हणाल्या, 'हा प्रलय निसर्गाने होत नाही आपण अभ्यासाने

देह जीवंत असतानांच साधायचा आहे.'

'आज आपल्याला भोवतालचे विश्व डोळ्यांना दिसते म्हणून कसे वाटते?'

जया म्हणाली, 'खरे आहे असे वाटते. कारण ते चटकन अनुभवास येते.'

आजी म्हणाल्या, 'बरोबर, समर्थ म्हणतात या दृश्याला नाश आहे. म्हणून आत्मानात्म विचार करुन - - - '

विलास म्हणाला, 'थांबा आजी, आत्मानात्म म्हणजे काय?'

आजी म्हणाल्या, 'आत्मानात्म म्हणजे शाश्वत अशाश्वत. टिकणारे काय व न टिकणारे काय? जे टिकणार नाही तेच नाश पावते. त्यातील शाश्वताची म्हणजे जे टिकणार आहे त्याची ओढ वाटावी. नाश पावणाऱ्या दृश्याचा निरास व्हावा. त्यावरील प्रेम कमी व्हावे. आसक्ती कमी व्हावी व दृश्याला बाजूला सारावे, याला म्हणतात विवेक प्रलय.

सत् संगतीत हा विवेक प्रलय कसा साधावा हे सहज शिकता येते.

विलास म्हणाला, 'म्हणजे आजी, फुलपाखराचे सौंदर्य डोळ्यांनी पहायचे. फुलाचे सौंदर्य डोळ्यांनी आस्वादायचे. हृदयांत साठवायचे समाधान मानायचे. फुलपाखरू व फूल दोन्ही विसरायचे. फक्त सौंदर्याचा आनंद आंत घ्यायचा. असे केले की विवेक प्रलय साधला कां?'

मधुकर म्हणाला, 'असं सतत जमू लागलं की साधला म्हणायचं. काय? विवेक प्रलय? आणि हो फूल व फुलपाखरू जसं विसरायचं तसंच गणपतीने - गण्याने नव्हे - कान पकडला हेही विसरायचे. किती चोळून चोळून लाले लाल केला. असं करु नये याची जाणीव अखंड ठेवायची. जे कोणीआपल्या हिताचे सांगत असतील त्यावर चिंतन करायचे म्हणजे विवेक प्रलय साधला म्हणायचे. आधी विवेक जागा होऊदे मग विवेक प्रलय - - - '

आजी म्हणाल्या, 'पुष्कळ छान समजू लागल हं. अशीच शहाणी व्हा. कीर्तीवंत व्हा.'

।। जय जय रघूवीर समर्थ ।।



## दिवस २० वा

आज दुक्कल हसत हसतच आली. सगळे नुकतेच जमले होते.

सुधा म्हणाली, 'येवढे हसायला का येतंय?'

विलास म्हणाला, 'सांगतो ना! काल गणपतीकडे चोर आले होते. किती होतेरे?' विलास हसतच राहिला.

जया घाबरून म्हणाली, 'मग चोरीला काय काय गेलं? नी तू हसतोस काय? चोरी झाल्यावर हसतात?'

'चोरीला नाही काही गेलं.' विलास म्हणाला, 'नाक बघा गणोबाचं कस लाल लाल झालंय.' पुन्हा हसतच सांगू लागला, 'गणपतीच्या बोटातली नसलेलीच अंगठी चोर ओरबाडून घेत होते. गणपती ओरडू लागला. म्हणून त्यांनी म्हणजे चोरांनी छान दोन चार ठोसे नाकाच्या शेंड्यावर मारले. त्याबरोबर स्वारी ओय् ओय् करुन नाचायला लागली. पटापट दिवे लागले. माझे आईबाबा पण काय झाले म्हणून बघायला गेले. तो कसलं काय? गणपती महाराज नाक चोळत रडत होते.

हसून हसून मुरकुंडू वळली आमची!'

आजी म्हणाल्या, 'भ्रम हा माणसाला असाच वेडा करतो.'

सुधा म्हणाली, 'पण हा भ्रम चोर आल्याचा व मारल्याचा होतोच कां? आणि इतका सत्य वाटतोच कां?'

आजी म्हणाल्या, 'देहात्मबुद्धीने भ्रम म्हणजेच भास उत्पन्न होतो. सोन्याच्या अंगठीवर प्रेम असते. ती कोणी नेऊ नये. मलाच असावी असे वाटले. नेमके रात्री स्वप्नात मन कल्पना रचते. चोर नाकावर ठोसा लगावून अंगठी घेऊन जातात. विवेकाने भ्रमाला नाहिसे करता येते. अज्ञानाने वस्तू वा स्थिती जशी नाही तशी वाटते. याला विपरीत ज्ञान म्हणजेच भ्रम असे म्हणतात. भ्रमाचेच दुसरे नाव भास.'

मधू म्हणाला, 'खरंच आजी, मागच्या वर्षी परीक्षा निकालाचे दिवशी मी घवघवीत ३/४ लाल रेघा मिळवून नापास झालो. असे स्वप्न पडले. खिन्न होऊन रडत बसलो.

आईच गेली शाळेत. ती निकाल पत्रक घेऊन आली. माझा झक्कपैकी गुण मिळवून ५वा नंबर आला होता.'

विलास म्हणाला, 'मी एकदा माझ्या सावलीलाच भ्यालो नी पळत सुटलो. अस्सा घामाघून झालो होतो. भ्रमातून बाहेर पडलो तरी घाम येतच होता. सुधा तुला नाही का अशी भिती वाटत?'

सुधा म्हणाली, 'भीती नाही. पण माझी मोत्याची माळ मीच डब्यात ठेवली होती. पण नक्की आठवेना. म्हणून माळ हरवली या कल्पनेने दोन तीन दिवस जेवणही जात नव्हते. अचानक डब्यांत जेव्हा माळ सापडली तेव्हा आनंद झाला. माळ हरवली नसतांना हरवली वाटणे हा भ्रमच नाही कां?'

जया म्हणाली, 'आजी, मी महानंदा सिनेमा पहायला गेले होते. मावशी होती बरोबर. महानंदेने अग्नीत उडी घेतली. मी आई गऽऽ करुन ओरडून उठले. मावशीने व भोवतालच्यांनी मला खाली बसवले. माझी कींव करायच्या ऐवजी ऐकून घ्याव 'सिनेमा आहे हा! पडद्यावरचं चित्र. त्याला काय एवढं भ्यायचं!' मी ओशाळलेच. कोणीच रडत नव्हते. कोणीच भ्यालेनव्हते. मग मलाच का वाईट वाटले? मी का लहान होते? पण मला खरंच महानंदा आता भाजून जळून मेली, असच वाटलं त्यावेळी. हा भ्रमच कां? आजी तुम्हाला नाही कधी असं भासत!'

आजी म्हणाल्या, 'अग आपण सारी या भ्रम सागरांतच पोहोतो आहोत. खूप खेपा पुण्याला गल्ली बोळ रस्ते मी चुकते. मीच वस्तू ठेवते पण मला आठवत नाही. चष्मा व जपाची माळ तर मला नेहमीच चक्रात टाकतात. सुधा आता ही ओवी वाच.'

***परब्रह्म असतचि असे । मध्येचि हा भ्रम भासे ।***
***भासे परंतु अवघा नासे । काळांतरी ।।१०/६/३।।***

'बाळांनो,' आजी म्हणाल्या, 'चित् शक्तीने हा विश्वाचा भ्रम निर्माण केला. त्यातच प्राणी अडकला, डोळस असून आंधळ्यासारखा वागू लागला. विलास आता तू वाच.'

***काच म्हणोन उदकात पडे । का सभा देखोन दर्पणी पवाडे ।***
***द्वार चुकोन भलतीकडे । जाणे या नाव भ्रम ।।१०/१/२३।।***



'म्हणजे आजी, आपला तो, कोण रे, कौरवांचा मुख्य तो - हं दुर्योधन. दुर्योधन असाच मयसभेत पडला होता. किती मोठी मोठी माणसे भ्रमात पडून फजित पावतात.' विलास म्हणाला

आजी म्हणाल्या, 'जो विवेकाने वागतो. तोच भ्रमातून मुक्त होतो. तो सारासार विचार करतो. फजीत पावत नाही कधी!'

***या कारणे पुण्य मार्गे चालावें । भजन देवाचे वाढवावे।***
***न्याये सांडून न जावे । अन्याय मार्गे ।।१०/७/१२।।***

'भ्रमाच्या कोलाहलातून सुटावे अशी ज्याची इच्छा असेल त्याने देवाला अखंड स्मरावे. प्रेमाने भजन करावे. तोच खरा पुण्यमार्ग. जो भगवंताला अनुसरतो त्याचे महात्म्य स्वतः भगवंतच वाढवतो.

भजन कसे करावे? मधू तू वाच आता.'

***कामनेने फळ घडे । निःकाम भजने भगवंत जोडे ।***
***फळ, भगवंता कोणीकडे । महदांतर ।।१०/७/२०।।***

मीच सांगतो अर्थ. कोणतीही अपेक्षा न ठेवता. शुद्ध अंतःकरणाने भगवंताची भक्ती करावी. मग प्रत्यक्ष त्या दिव्य शक्तीचे दर्शन घडतेच. अनुभव येतो. प्रचिती येते. भक्तीच्या फळापेक्षा भगवंताची प्राप्ती अत्यंत श्रेष्ठ नाही कां?'

आजी म्हणाल्या, 'समर्थ अगदी तेच सांगतात बघ.'

***म्हणौन सगुण भजन । वरी विशेष ब्रह्मज्ञान ।***
***प्रत्ययाचे समाधान । दुल्लभ जगी ।।१०/७/३१।।***

जगात सारे कांही पैशाने मिळते. सहज प्राप्त करुन घेता येते. पण उपासनेद्वारा ब्रह्मज्ञान व स्वानुभवाचे समाधान या गोष्टी दुर्लभ आहेत. त्याच मिळवायचा प्रयत्न करायला हवा.

मधुकर म्हणाला, 'असा प्रयत्न करणारालाच आत्मज्ञानी म्हणतात ना? पण त्याला ओळखायचा कसा?' मधुने ओवी वाचली.

***पापाची खंडणा झाली । जन्म यातना चुकली ।***
***एशी स्वयें प्रचित आली । म्हणिजे बरें ।।१०/८/२१।।***

आजी म्हणाल्या, 'विवेकाने वागलो तर सोप आहे हे. पुन्हा पुन्हा जन्म घ्यावा लागतो वासनेमुळे. वासना पापात्मक कर्म अधिक घडवून आणते. पाप प्रवृत्ती नष्ट व्हावी. वासना शुद्ध व्हाव्या असा प्रयत्न असावा. मग जन्म यातना चुकणारच. तोच आत्मज्ञानी. तो कधीच कोणालातुच्छ मानीत नाही. सारे कर्तृत्व कोणाचे हे तो ओळखून असतो. कोणाचे बरं?'

'परब्रह्माचे' विलास म्हणाला.

'अंहं' सुधा म्हणाली, 'हे कर्तृत्व मूळ मायेचे. मूळ मायेनेच ५ भूते व ३ गुण निर्माण केले. हा पसारा मांडला.'

गणपती म्हणाला, 'पण जाणीव कला हे सर्व घडवून आणते ना?'

आजी म्हणाल्या, 'गणपती, तुझी आई ती नातवाची आजी, पुतण्याची काकू, भाच्याची मामी, आणी, आत्या असू शकते की नाही? तशीच ही माया. वायू, जाणीव, जगज्ज्योती चैतन्य शक्ती सर्व तिचीच नांवे.'

वायूला म्हणायचे प्रकृति. जगज्ज्योतीला म्हणायचे पुरुष. प्रकृतिपुरुषच सर्व कांही घडवतात. त्यांनाच अर्धनारी नटेश्वर म्हणतात.

देव देवता भूते ही वायूचीच रुपे. त्यांना खोटे मानू नये. पण भयही वाटू नये. मग त्यांची बाधा कशाला होईल? जया तू वाच ही ओवी.'

***ज्ञात्यास संकल्पचि असेना । म्हणोन त्यांचेन बाधवेना ।***
***या कारणे आत्मज्ञाना । अभ्यासावें ।।१०/९/२२।।***

आजी म्हणाल्या, 'आत्मज्ञानी पुरुषाचा अभ्यास पूर्णत्वाला जातो म्हणून सर्व कर्मांचा नाश होतो. कर्मे बाधत नाहीत. म्हणून त्याला संकल्पच नसतो. मग कोणाची कशाला बाधा होईल?'

मधु म्हणाला, 'भीत्या पाठी ब्रह्मराक्षस. मग तो सावलीला सुद्धा भिऊन पळतो.' सगळेच हसले.

आजी म्हणाल्या, 'मग जीवनात प्रथम काय करावे?'

'मी सांगते.' सुधा म्हणाली, 'आत्मज्ञान मिळवण्याचा प्रयत्न करावा.'



आजी म्हणाल्या, 'शाब्बास. ही ओवी वाच.'

***ज्ञानेविण कर्म बिघडे । हे तो कदापि न घडे ।***
***सद्गुरु वीण ज्ञान जोडे । हेहि अघटित ।।१०/९/२४।।***

आजी म्हणाल्या, 'कर्मे बंधनांत घालणारीच असतात. कर्माची बंधनें तोडायची असतील तर आत्मज्ञान हवेच. आत्मज्ञान सद्गुरु शिवाय लाभत नाही. म्हणून भगवंताची भक्ती दृढतर केली की भगवंतच सद्गुरुंची योजना आखतो. तोपर्यंत सत्संग धरावा. श्रवण करावे. तत्वांच्या, सृष्टीच्या व देहाच्या घटकांचा विचार करावा. आपला आपण शोध घेत साक्षात्कार संपन्न व्हावे. सद्गुरु मार्गदर्शन लाभतेच.'

गणपती म्हणाला, 'पण आजी साक्षात्कार संपन्न म्हणजे जाणायचे कोणाला? परब्रह्माला की मायेला की आत्म्याला? मला घोटाळाच वाटतो.'

आजी म्हणाल्या, 'आपण काढून टाकू घोटाळा. हे बघ, तुझं नांव गणपती. खरं ना? बाबा लाडात म्हणतात गणोबा - विलास थट्टेत म्हणतो गण्या. गडी लोक म्हणतात गणूदादा. म्हणजे बघ किती नावे झाली? तसेच तू कोणाचा मुलगा, कोणाचा भाऊ, कोणाचा काका, कोणाचा मामा, तुझ्या वहिनींचा तू भाऊजी! पण गणपती एकच ना? तसंच हे पिंडाचे देह चार. कोणते?'

सुधा म्हणाली, 'स्थूल, सूक्ष्म, कारण, महाकारण.'

'शाब्बास. आता ब्रह्मांडाचे देह चार कोणते बर?' आजींनी विचारले.

मधू म्हणाला, 'विराट हिरण्यगर्भ, अव्याकृत, मूळ माया.'

आजी म्हणाल्या, 'गणपती येथपर्यंत घोटाळा नाही ना? पिंडात दिव्य शक्ती जाणीव आहे. ब्रह्मांडात पण आहे. जाणीव म्हणजेच परमात्मा, परमेश्वर ज्ञानधन, जगदीश, जगदात्मा कळलं. ही झाली पुरुषवाचक नांवे.

आपल्या भक्तांचा भगवंत तोच. तोच स्त्रीवाचक नावांनी पण ओळखला जातो. मूळमाया, जगदीश्वरी जगन्माता विश्ववंद्या विश्वेश्वरी खूप खूप नावे.

'मूळमाया चंचल की निश्चल?' आजींनी विचारले.

मधू म्हणाला, 'चंचल'

आजी म्हणाल्या, 'म्हणूनच पुरुषवाचक स्त्रीवाचक नावांनी ओळखला जाणारा परमात्मा नपुंसक लिंगी नावाने पण ओळखला जातो. जाणणे, अंतःकरण, श्रवण, चित्त, अनन, चैतन्य इत्यादि खूप खूप नावे आहेत.

आणि गंमत अशी तिन्ही लिंगातल्या नावांनी ओळखला जाणारा जो अलिंगी तो परब्रह्म.

***तो चालवी सकळ देहासी । करुन अकर्ता म्हणती त्यासी ।***
***तो क्षेत्रज्ञ क्षेत्रवासी । देही कूटस्थ बोलीजे ।।१०/१०/४४।।***

कळलं आता? तो बाल नाही. तरुण नाही. वृद्ध नाही. देह तर चालवतो. पण अलिप्त असतो. देहांत गुप्त रुपाने राहतो. तो कोण बरे?'

विलास म्हणाला, 'आत्मा.'

आजी म्हणाल्या, 'मग आता सांगा साक्षात्कार म्हणजे अनुभव कोणाचा यायला हवा?'

गणपती म्हणाला, 'आत्म्याचा, म्हणजेच कूटस्थाचा म्हणजेच स्वस्वरूपाचा.'

विलास म्हणाला, 'म्हणजेच सोहं चा. मीच परब्रह्म हा अनुभव यायला हवा.'

'वा ! वा !' आजी आनंदून म्हणाल्या, 'विलास तूच वाच. ही बघ ओवी.'

***निश्चल परब्रह्म येक । चंचल जाणावे माईक ।***
***ऐसा प्रत्यय निश्चयात्मक । विवेके पहावा ।।१०/१०/४९।।***

'बाळांनो,' आजी म्हणाल्या, 'परब्रह्म कसे?'

सर्वजण म्हणाले, 'निश्चल.'

आजी - 'मायामय सर्व विश्व कसे?'

सर्वजण - 'चंचल.'

आजी म्हणाल्या, 'चंचल ते बदलते. बदलते ते नाश पावते. म्हणून नाश पावते त्याच्याशी संबंध जरुरी पुरता ठेवायचा. व सदैव अंतरंगात त्या निश्चलाचा अनुभव घ्यायचा.



***आत्मज्ञान पाहे सदा । त्याच्या पुण्यास नाही मर्यादा ।***
***दुष्ट पातकाची बाधा निरसोन गेली ।।१०/१०६५।।***

बाळांनो, समर्थ स्वानुभवाचे बोल आपल्याला ऐकवत आहेत. अमृताचा घोट आहे हा. जो आत्मज्ञानात रत असतो. त्या सारखा पुयवान कोणीच नाही. सदैव आत्मज्ञान संपन्न असतो तो पुण्य संपादितो. दुष्ट घातक देहात्म बुद्धीच्या पापाची त्याला बाधा होत नाही!'

मधू म्हणाला, 'म्हणजे तो देहात असून देहात्म बुद्धीत सापडत नाही. असंच ना!'

'अगदी बरोबर.' आजींनी भरल्या डोळ्यांनी मारुतीकडे पाहून नमस्कार केला. 'मारुतीराया बाळांच्या पाठीशी सदैव रहा त्यांची बुद्धी चळू देऊ नकोस.'

नकळतच सगळ्यांनी नमस्कार केला व एका आवाजात म्हणाले -

**महारुद्र हनुमान की जय.**
**समर्थ रामदास स्वामी महाराज की जय**
**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**

## दिवस २१ वा

सगळ्यांनी वंदन केले. विलासचे हात घडी घातलेले छातीशीच होते. आजींच्या हे लक्षात आले.


'विलास तोंडाने स्तोत्र म्हणालास, पण हात जोडले नाहीस. ते का बरं? छातीशीच हातांची घडी. छाती दुखते आहे कां?' आजींनी विचारले.

'नाही.' विलास म्हणाला. 'छाती दुखत नाही. पण सदऱ्याचा खिसा फाटला आहे.

'तो रे कसा?' आजी म्हणाल्या, 'निघता निघता फाटला कां? मग सदरा बदलायचा होतास.'

'तसं नाही. मी निघालो.' विलास म्हणाला, 'झोपडपट्टीतल्या मुलांची जंगी

मारामारी चालली होती. त्यांचे भांडण सोडवण्याचे भरीस पडलो. तो एका मुलाने खिशाला धरून सदरा ओढला. तो खिसा फाटला. फाटला तर फाटू दे. पण भांडण मिटवून आलो हा आनंद. पण आजी, मला शंका अशी की संघर्ष कां होतो?'



आजी म्हणाल्या, 'निमित्त काहीतरी एवढेसेच असते. पण शब्दाने शब्द वाढतो. शब्दातल्या दोन कठीण शब्दांची टक्कर झाली की कठीण कठीण शब्द, दुरुत्तरे म्हणजेच शिव्या, क्रोध वाढवणाऱ्या शिव्या उच्चारल्या जातात. शिव्या पाठोपाठ हातवारे हावभाव वाढतात. स्फुरण येते. व मारामारी धक्काबुक्कीतून सुरु होते. पयवसान दगडफेक हत्यारांचा वापर सुरु होतो.

शब्द म्हणजे वायूच. दोन शब्दातून क्रोधाग्नी वाढतो. तसाच ब्रह्माडांत वायूच्या घर्षणातून अग्नी उत्पन्न होतो.'

'आता पुढे मी सांगतो.' विलास म्हणाला, 'अग्नीतून पाणी, पाण्यातून पृथ्वी तयार होते. पृथ्वीवर जीवसृष्टी वाढते. ती चालवतो कोण?'

मधुकर म्हणाला, ' करुन अकर्ता असा परमात्मा. मग तोच खरा देव कां?'

आजी म्हणाल्या, 'नाही. विवेकाने शोधले तर तो नाश पावतो.'



जया म्हणाली, 'मग आजी ही जी जाणीव किंवा जीवन कला आहे तिला देव म्हणावे कां?'

आजी म्हणाल्या, 'नाही. कारण ही जाणीव म्हणजे निव्वळ निश्चल असलेला परब्रह्म त्याची स्फूर्णा. स्फूर्णा हा विकार उद्भवला. विकार चंचल. चंचल ते नाश पावते. या स्फूर्णेला काय म्हणतात?'

गणपती म्हणाला, 'प्रथमच्या स्फूर्णेला मूळ माया म्हणतात.'

'शाबास,' आजी म्हणाल्या, 'त्या मूळ मायेतला विकार म्हणजे विकारातला विकार. म्हणजेच जगज्ज्योती. सुधा या तीनही ओव्या वाच.'

***श्रोत्रीं नाना शब्द जाणे । त्वचे मध्ये सीतोष्ण जाणे ।***
***चक्षू मध्ये पाहो जाणे । नाना पदार्थ ।।११/१/२७।।***

***रसनेमध्ये रस जाणे । घ्राणामध्ये वास तो जाणे ।***
***कर्म इंद्रियामधे । नाना विषय स्वाद ।।११/१/२८।।***

***सूक्ष्म रूपे स्थूल रक्षी । नाना सुखदुःखे परीक्षी ।***
***त्यास म्हणती अंतरसाक्षी । अंतरात्मा ।।११/१/२९।।***

मधुकर म्हणाला, 'ती जाणीव कला म्हणजेच अंतरसाक्षी, आत्मा कां? मग मघाशी विलास म्हणाला की, झोपडपट्टीतील मुले एकमेकाचा जीव घेत होते. जीव जातो म्हणजे मग कोण जातो?'

'सांगते.' आजी म्हणाल्या.

***जातो जीव तो प्राण । नेणे जीव तो अज्ञान ।***
***जन्मतो जीव तो जाण । वासनात्मक ।।११/१/३४।।***

जीव गेला असे आपण म्हणतो. तेव्हा आपला श्वास बंद होतो. म्हणजे प्राण जातो. प्राणाची गती थांबते. नाकावाटे प्राण (हवा) येतही नाही व जातही नाही. मनुष्य प्राणी गार.

जीवाला बरं नाही किंवा कळत नाही अस जेव्हा आपण म्हणतो त्यावेळी ज्ञान नसलेली अवस्था असते. म्हणजे ते अज्ञान असते. जीव जन्माला आला म्हणतो तेव्हा

वासनाच अवतरुन येते. नव्या देहातून वासना पूर्ती होते. म्हणजे वासना साकार होते. तो जीव.'

'आजी, मग विवेकाने नक्की काय करायचे?' जयाने विचारले.

'छान विचारलेस' आजी म्हणाल्या. 'बघ समर्थच सांगतात -

***श्रवणापरीस मनन सार । मनने कळे सारासार ।***
***निजध्यासे साक्षात्कार । निःसंग वस्तू ।।११/१/४१।।***

आता तुमच्या शंका म्हणजे मननाचाच मार्ग मोकळा होतोय. जीवाची उपाधी देह. देहामुळे देहात्म बुद्धी. ही देहात्मबुद्धी गळून पडली की ज्ञान होते. ज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव म्हणजे विज्ञान. विज्ञानाने मन उन्मन होते. व खरा देव परब्रह्म त्याच्याशी ऐक्य होते.'

सुधा म्हणाली, 'तीच सायुज्य मुक्ती कां?'

'होय.' आजी म्हणाल्या, 'पण काय होते. गणपती आता तू वाच.

***संदेह अनुमान आणी भ्रम । अवघा चंचलामधे श्रम ।***
***निश्चली कदा नाही वर्म । समजलें पाहिजे ।।११/२/८।।***

आजी म्हणाल्या, 'माणूस संशय ग्रस्त असतो. नाना तऱ्हेच्या कल्पना करीत सुटतो. भ्रमांत सापडतो. मुख्य वर्म म्हणजे खरा देव विसरतो.

***मुख्य देव तो कळेना । कशास कांहीच मिळेना ।***
***येकास येक वळेना । अनावर ।।११/२/२१।।***

कोणाचा विचार कोणास पटत नाही. म्हणून ज्ञानी माणसांनी अधिकार परत्वे चार देवांची कल्पना केली. विलास तू वाच.

***येक नाना प्रतिमा । दुसरा अवतार महिमा ।***
***तिसरा तो अंतरात्मा । चौथा तो निर्विकारी ।।११/२/३३।।***

भक्ती मार्गात जसा त्याचा अधिकार वाढेल तसा देवाचा विचार वाढतो. सामान्य भक्त नाना प्रकारच्या प्रतिमांना देव म्हणतात. त्यांची पूजा करतात.

गणपती म्हणाला, 'म्हणजे आपल्या देवघरातले देव ना?'



'होय.' आजी म्हणाल्या, 'थोडे ज्ञान वाढले की भगवंताचे राम कृष्णादिक अवतार हेच देव असे वाटते. सत् संगती वाढली. श्रवण खूप घडले व विवेक वाढीस लागला की अंतरात्मा म्हणजेच जाणीव कला म्हणजेच आत्मा हा खरा देव वाटतो. पण ज्ञानाचे विज्ञान झाले की निर्विकार परब्रह्म हाच खरा देव हे पटते.

विलास, तूच सांग परब्रह्म विकारी की निर्विकारी?'

विलास म्हणाला, 'निर्विकारी.'

'ठीक.' आजी म्हणाल्या, 'आत्मा, अंतरात्मा, साक्षी परमात्मा निर्विकारी की विकारी?'

विलास म्हणाला, 'विकारी.'

'शाब्बास.' आजी म्हणाल्या, 'म्हणूनच समर्थ काय म्हणतात बघ -

***निर्विकारी आणी विकारी । येक म्हणेल तो भिकारी ।***
***विचाराची होतेवारी । देखत देखता ।।११/४/९।।***

ज्याचा विवेक जागा तो विकारी तत्वांना देव म्हणत नाही. निर्विकारी परब्रह्म व विकारी देव यांना एकच समजणे हे भिकारीपण म्हणजे शूद्रत्व. हीनपणाच तो.

मनुष्य देहात बुद्धी लाभली असता हीनपणाने वागावे कां?

विलास म्हणाला, 'नाही. तो मूर्खपणा ठरेल.'

आजी म्हणाल्या, 'मधू तू ही ओवी वाच.'

***म्हणोनि हा विचार करावा । सत्यमार्ग तोचि धरावा ।***
***लाभ जाणोनि घ्यावा । विवेकाचा ।।११/४/२१।।***

गणपती म्हणाला, 'लाभ मिळवायचा म्हणजे आत्मज्ञानच न?'

आजी म्हणाल्या, 'पण त्याचे आधीची तयारी? शेतात पीक काढण्यापूर्वी नांगरणे, ढेकळे फोडणे, जमीनीत खत घालणे, बी पेरणे करावे लागते की नाही? एकदम धान्य पेरले की उत्पन्न मिळते कां? तसंच आहे हे.

समर्थ आवर्जून सांगतात. शुद्ध विवेकवाढीस लागावा म्हणून काय करावे? सुधा

तू दोन्ही ओव्या वाच.'

***मुख्य हरिकथा निरूपण । दुसरें तें राजकारण ।***
***तिसरें तें सावधपण । सर्व विषई ।।११/५/४।।***

***चौथा अत्यंत साक्षप । फेडावे नाना अक्षेप ।***
***अन्याये थोर अथवा अल्प । क्ष्मा करीत जावे ।।११/५/१५।।***

जीवन उत्तम चालावे, हातून ईशसेवा, जनसेवा घडावी असे वाटत असेल तर पहिली गोष्ट भगवंताला विसरू नये.' आजी म्हणाल्या, 'हरीचे गुणगान गावे. व्यवहारांत चातुर्याने वागावे. बेसावध असणाऱ्याचा नाश होतो. ज्याला समाज कार्य करायचे असते. लौकिक मिळवायचा असतो. त्याने सर्व ठिकाणी तत्पर असावे. अंगी उद्योगीपणा असावा. आळसाला थारा देऊ नये. आळस उद्योगाचे आड येतो. उद्योग करीत राहिले कीयश मिळते. टिकावू यश हे खरे यश. कोणी नाना तऱ्हेचे संशय घेतील, शंका काढतील त्यांचे निवारण करता आले पाहिजे. आपल्याशी ज्याचा संबंध येतो त्यांच्या हातून काही चुका झाल्यास क्षमाशील वृत्तीने क्षमा करता आली पाहिजे. अशा वागण्याला काय म्हणायचे?'

जया म्हणाली, 'विवेकाने वागणे. पण आजी, जरा कठीणच आहे. नाही कां? जरा मनाविरुद्ध कोणी वागले तर राग येणारच! नाही कां?'

आजी म्हणाल्या, 'तुझ म्हणणे ठीक आहे. पण खरा लौकीक ज्याला मिळवायचा आहे त्याने प्रथम लक्षात ठेवावे -

***दोष देखोन झाकावे । अवगुण अखंड न बोलावे ।***
***दुर्जन सापडोन सोडावे । परोपकार करुनी ।।११/५/१०।।***

दुसऱ्याच्या दोषावर पांघरुण घातल्याने त्याला दोष काढून टाकायला संधी मिळते. अवगुण बोलत राहिलो तर तो दोष आपल्यातच शिरतील. मनुष्य कोडगाच होईल. सुधारायचे राहोच पण हित साधणार नाही. कोणी दुर्जन भेटला तर त्याचेवर परोपकार करावा. त्याचा दुर्जनपणा न बोलता घालवावा.'

विलास म्हणाला, 'किती बारीक बारीक पण मोलाच्या सूचना दिल्या आहेत. हे सारे मोठ्या माणसाकरिता. आम्ही लहान मुलांनी काय करावे?'



'बाळांनो,' आजी म्हणाल्या, 'आपल्या आवाक्यात येईल तेवढे आरण वागू या. आपण स्वतःला लहान का मानावे? तुम्हाकरता पण सांगितलं आहे बघ.

***अपार असावे पाठांतर । सन्निधचि असावा विचार ।***
***सदा सर्वदा तत्पर । परोपकारासी ।।११/५/१५।।***

छोट्यांनी काय नी मोठ्यांनी काय? पाठांतर नित्य नेमाने करावे. जुन्याची उजळणी. नव्याची भर. त्याने बुद्धी प्रगल्भ होते. विचार संपन्नता वाढते. विवेकाने वागून परोपकार वृत्तीने जगात वावरावे. दुसऱ्याला मदत करणे हे पुण्यकर्मच ना? पुढच वाच मधू.'

***शांती करुन करवावी । तऱ्हे सांडून सांडवावी ।***
***क्रिया करुन करवावी । बहुता करवी ।।११/५/१६।।***

'अर्थ तर सोपाच आहे.' मधू म्हणाला, 'स्वतः शांत रहावे. नाथ महाराजा सारखे. व इतरांना शांत करावे. शोभणार नाही असे आपले वागणे नसावे. स्वतः तर काम करावेच. इतरांनाही कार्य करण्यास वाव द्यावा. काम करण्यास तयार करावे. त्यांच्यात कार्याची गोडी उत्पन्न झाली तरच नकळत आपली महती वाढेल. असेच की नाही आजी?'

'बरोबर आहे.' आजी म्हणाल्या, 'समर्थांनी आणखी एक इशारा दिला आहे बघ.'

***राजकारण बहुत करावे । परंतु कळोच नेदावे ।***
***पर पीडेवरी नसावे । अंतःकरण ।।११/५/१९।।***

आजी म्हणाल्या, 'समर्थांचा राजकारण शब्द फार व्यापक आहे बर! लोकसंग्रह एकजूट या अर्थाने तो शब्द वापरला आहे. लाथाळीचे राजकारण नव्हे. हेव्यादेव्याचे तर नव्हेच नव्हे.

समर्थ म्हणतात, ज्याला लोकसंग्रह करायचा आहे. त्याने आपले कार्य गुप्त रितीने करावे. आपण काय करतो. कोठे जातो, कोणाला काय निरोप देतो हे इतरांना काहीच कळू देऊ नये. सारे कार्य गुप्तच असावे. दुसऱ्याला दुःख होईल असे तर मुळीच वागू नये.'

बाळांनो, व्यवहारांत काय होते? आपण स्वार्थाने एखाद्याची कड घेतो. बाजू उचलून धरतो. पण त्याच वेळी दुसऱ्याचा मत्सर करतो. दुसऱ्याचा उत्कर्ष सहन न होणे हे लक्षण कांही बरे नव्हे.

आपण न्यायाने वागावे. त्यागाची वृत्ती वाढीस लावावी. मग आपसूकच मन अमन होते. निर्मळ होते नी सहज दर्शन घडते. कोणाचे?'

विलास म्हणाला, 'देवाचे.'

गणपती म्हणाला, 'भगवंताचे.'

मधुकर म्हणाला, 'परमेश्वराचे.'

सुधा म्हणाली, 'आजी नुसत्या परमेश्वराला ओळखण्यापेक्षा तोच होऊन रहावे. हेच खरे नाही कां? त्याचसाठी तर हा आटापिटा.'

आजी म्हणाल्या, 'सगळ्यांचेच उत्तर बरोबर. खरा देव कळला. मग प्रतिमा अवतार विभूती यांची भक्ती केली तरी ती परमेश्वरापर्यंत पोहोचते.'

समर्थांनी आयुष्यभर तेच केले.

मारुतीरायांनी तेच केले.

आपण तोच आदर्श डोळयापुढे ठेवू या.

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**

## दिवस २२ वा

आज तिघांच्याही हातात खाऊचे पुडे होते. आनंदाने तिघांनी आजींच्या हाती पुडे दिले. नमस्कार केला.

'हा काय प्रकार आहे?' आजींनी विचारले.

विलास म्हणाला, 'आजी पंधरा वीस दिवस झाले आम्ही येथे दुपारी येतो ना? त्याचे हे फळ. ते तुमच्या हवाली करावे असे तिघांनाही एकदम वाटले.'

'खाऊचे पुडे तुम्ही विकत आणलेत?' आजींनी विचारले.



'नाही.' गणपती म्हणाला. काल क्लबमध्ये कार्यक्रम होता. अर्थात तेथे खादीची चळवळ होतीच. आनंदाची गोष्ट अशी की आम्ही तिघांनी अगदी कोणाला न सांगता स्वयंसेवकाचे काम केले. ते इतके चोख झाले की समारोपाचे वेळी आमचा गौरव करुन आम्हाला पाकीट व खाऊचा पुडा दिला.'

विलास म्हणाला, 'आजी, मधू दादाने इतके मस्त भाषण केले की टाळ्या मिळाल्या. त्याने पाकीट संस्थेलाच देणगी म्हणून दिले. आम्ही दोघांनी पण दिले. 'संस्था आपलीच आहे. आम्ही ही सेवा कर्तव्य म्हणून केली.' असेही तो म्हणाला. मग अध्यक्षांनी पुन्हा एकेक खाऊचा पुडा दिला.आम्ही एक पुडा घरांत आईजवळ दिला व एक पुडा मारुतीरायाचा प्रसाद म्हणून येथे आणला. आम्हाला ही प्रेरणा तुमच्यामुळे मिळाली न!'

आजी आनंदून म्हणाल्या, 'बाळांनो, सर्व कर्ता तो परमेश्वर - निमित्त मात्र मी झाले. तरी तुम्ही वागलात ते फार छान वागलांत हं. समर्थांच्या संदेशाप्रमाणे महंतच झालात. दासबोध अभ्यासता अभ्यासता तुमची विचार शक्ती वाढली. सगळयांना आनंद वाटेल असे वागावे हे पण तुम्हाला पूर्णपणे पटले. म्हणूनच काल प्रसंशेला पात्र झालांत.'

समर्थ म्हणतात, 'ज्याला लोकसंग्रह करायचा आहे त्याने जगांत कसे वागावे हे शिकावे. ज्याला समाजकार्य करायचे आहे. त्याने निःस्वार्थी असावे. पडेल ते कष्ट करण्याची तयारी असावी. स्वतःतर शिकावेच. पण जगाला आपलेसे करण्यासाठी हृदयांत प्रेमाचा साठा असावा. सुधा ही ओवी वाच.'

***आधीच सिकोनी जो सिकवी । तोच पावे श्रेष्ठ पदवी ।***
***गुंतल्या लोकास उगवी । विवेक बळे ।।११/६/१०।।***

आजी म्हणाल्या, 'लोकांची अडचण एकच असते कां? कोणी अभ्यासात अडतो. कोणी प्रपंच्यातल्या अडचणीत सापडतो, कोणी आजाराने बेजार होतो. कोणावर कसाही प्रसंग येवो, त्यांना मदतीचा जो हात देतो त्याला लोक सहजच मानतात. कालच तुम्हाला प्रचिती आली ना?

त्याच्यापुढेही कसे सावध असावे हे समर्थ सांगतात. जया आता तू वाच.

*सांकडीमधे वर्तो जाणे । उपाधीमधे मिळो जाणे ।*
*अलिप्तपणे राखो जाणे । आपणासी ।।११/६/१३।।*

विलास म्हणाला, 'आजी, कोणत्या संकटांत कसे वागून बाहेर पडावे हे कळण्यासाठी बुद्धी चातुर्य पाहिजे ना पण!'

'बरोबर आहे.' आजी म्हणाल्या. 'म्हणून तर अनन्यतेने भगवताचे नाम घ्यायचे. मनाला शुद्ध स्वच्छ पवित्र करणारी साबण म्हणजे नाम. बुद्धीला सतेज करणारी श्रद्धा. चित्ताला एकाग्र करारी निष्ठा जवळ असली की उपाधीत न सापडता अलिप्तपणाने वागता येते. आपोआप बुद्धी निःस्वार्थी होते. समर्थ म्हणतात बघ -

*राखो जाणे नीतिन्याय । न करी न करवी अन्यायें ।*
*कठीण प्रसंगी उपाये । करु जाण ।।११/६/१८।।*

*ऐसा पुरुष धारणेचा । तोचि आधार बहुतांचा ।*
*दास म्हणे रघुनाथाचा । गुण घ्यावा ।।११/६/१९।।*

जो नीतीने वागतो तो अन्याय कधीच करीत नाही. म्हणूनच कठीण प्रसंगात धैर्याने तोंड देऊन तो स्वतः संकटातून बाहेर पडतो. व इतरांना बाहेर काढतो. प्रत्यक्ष रामप्रभू तस्सेच वागले. तो आदर्श समर्थांनी डोळ्यापुढे ठेवला. प्रभू रामाच्याच प्रेरणेने दासबोध रचला. त्यांत कल्पकता पुरेपूर आहेच. मायेच्या कर्तृत्वाची नदीच्या रूपकात त्यांनी रचना केली.

नदीतले भोवरे माणसाला गर्तेत पाडतात. तशीच माया पण 'मी मी' म्हणणाऱ्यांना चक्रातून सोडते. गणपती तू वाच या दोन्ही ओव्या -

*येक ते वाहातचि गेले । येक वळशामध्ये पडले ।*
*येक साकडीत अडकले । अधोमुख ।।११/७/८।।*

*येक बळाचे निवडले । ते पोहतचि उगमास गेले ।*
*उगम दर्शने पवित्र जाले । तीर्थ रुप ।।११/७/१०।।*

आता विलास वरवरचा अर्थ सांगशील?'

विलास म्हणाला, 'सोप आहे. कांही लोक ओढ असलेल्या नदीच्या प्रवाहात वाहून गेले. कोणी भोवऱ्यात सापडले. कडी कपारीत खाली तोंड वर पाय अशा स्थितीत



अडकून मेले. म्हणजे नाशच झाला. पण जे उगमाकडे तोंड करुन धाडसाने पोहत गेले. ते आनंद पावले. त्यांना तेथे उगमाचे दर्शन झाले. तेही तीर्थाप्रमाणे श्रेष्ठ पदवी पावले.'

'ठीक,' आजी म्हणाल्या, 'हे झाले भूतलावरच्या नदीचे वर्णन. समर्थांना माया नदीबद्दल बोलायचे आहे. जे विवेकी आहेत ते पोहोणारे. व ज्यांच्याजवळ विवेक नाही ते दृश्यातील लोभामुळे मायेतच गुरफटणारे. ते मी माझेच्या प्रवाहात सापडून जन्ममृत्यूच्या धारेत वाहून गेले. कोणी मोहाच्या भोवऱ्यात सापडले. एका पापातून बाहेर पडावे तो दुसरे पाप अशा अडचणीत सापडल्याने उन्नती तर राहोच पण अधोगतीला जाऊन मिळाले.

ज्यांना आत्मज्ञान झाले. गुरुबोध लाभला. त्यांचा सारासार विवेक जागा झाला. ते मायेचा उगम ज्या परब्रह्मापासून झाला त्या मुळाकडे गेले. तेथे ब्रह्मरुपत्व पावल्याने पवित्र व शुद्ध झाले. तेथेच आनंदाने राहिले. उलट काय झाले?

*उगमा पैलीकडे गेले । तेथे परतोन पाहिले ।*
*तव ते पाणीच आटले । काही नाही ।।११/७/२१।।*

ज्यांना वृत्ती अंतर्मुख करिता आल्या त्यांना मायेत गुरफटण्याचे भयच नाही. ब्रह्म रुपाला जाणतात. ब्रह्मरूपच होतात. मग द्वैत राहीलच कोठे? मायाच नाही. मग भ्रमही नाही. जो भ्रमरहीत तोच खरा भक्त.

मधू, समर्थांनी भक्ताची व्याख्या कशी छान सांगितली आहे बघ.'

*विभक्तपणे नसावे । तरीच भक्त म्हणवावे ।*
*नाहीतरी वेर्थचिसिणावे । खटाटोपे ।।११/८/१३।।*

आजी म्हणाल्या, 'अखंड चिंतनाने पूर्ण ब्रह्मास जाणता येते. सेवा भावाने वागता वागताच ब्रह्मभाव निर्माण होतो. जया, समर्थांचा हा गोड संदेश बघ. वाच तू.'

*भल्याने विवेक धरावा । दुस्तर संसार तरावा ।*
*अवघा वंशचि उधरावा । हरिभक्ती करुनी ।।११/८/२५।।*

'बाळांनो काल तुम्ही विवेकाने वागलांत. विवेकाचे महत्व कळले ना? विवेकी माणसास हा भवसागर सहज पार करता येतो. इतकेच नव्हे तर आपल्या भक्तीच्या जोरावर तो आपल्या साऱ्या वंशाचा उद्धार करतो.'

विलास म्हणाला, 'आजी, उद्धार करायचा म्हणजे नक्की काय करायचे?'

'सांगते.' आजी म्हणाल्या, 'आपल्या घरातच आधी होऊन गेलेले अतृप्त आत्मे असतील. त्यांना आपल्या भक्तीद्वारे मुक्त करावे. जर शुद्ध विवेक जागा असेल तर आपल्या कुटुंबाचाच विचार कशाला? साऱ्या विश्वातले अतृप्त आत्मे म्हणजे वासनेत अडकलेले जीव आपल्या शुद्ध भक्तीने मुक्त होतील. इतके सामर्थ्य त्या भगवंताचे नामात आहे. त्या नाम सामर्थ्याने खरा परमात्मा तो कोण हे कळते. गणपती ही ओवी बघ.'

***तैसा परमात्मा परमेश्वर । बरा वोळखावा पाहून विचार ।***
***तरीच पाविजे पार । भ्रमसागराचा ।।११/९/८।।***

आजी म्हणाल्या, 'भ्रम म्हणजे भास. भ्रम मायेमुळे होतो. विवेकाने ती माया ओसरली. दृश्यावरचे प्रेम ओसरले, की दिव्य चैतन्ययुक्त असलेले परमेश्वर रूप आकलन होते. तोच त्रैलोक्याचा नायक विवेकाने त्यालाच ओळखावे. ओळखावे म्हणजे अनुभवावे.'

गणपती म्हणाला, 'त्रैलोक्य म्हणजे स्वर्ग मृत्यू पाताळ न?'

'होय' आजी म्हणाल्या.

'पण आजी' जयाने शंका विचारली, 'सर्व भूतमात्रांत असलेला परमात्मा पुन्हा साऱ्या विश्वाला, त्रैलोक्याला व्यापतो. जरा आश्चर्यच आहे नाही कां?'

'खरं आहे तुझे म्हणणे,' आजी म्हणाल्या, 'हेच त्या भगवंताचे अलौकीकत्व. ते सहजी लक्षात येत नाही. म्हणून काय करावे?'

***आधी देखिला देहधारी । मग पाहावे जगदांतरी ।***
***तयाचेनिया उपरी । परब्रह्म पावे ।।११/९/२०।।***

'समजलं.' आजी म्हणाल्या, 'प्रथम भक्ती करता करता आपल्या देहातील चैतन्याचा, स्वस्वरूपाचा अनुभव घ्यावा. मग आपोआपच दुसऱ्याच्या ठिकाणचे चैतन्य अनुभवास येते. तूच सांगितलेस ना विलास? मधुने भाषण करुन पाकीट परत दिले. देणगी म्हणून दिले. तुम्ही दोघांनी त्याचेच अनुकरण केलेत. म्हणजे तिघांच्या चैतन्याचा मिलापच झाला. असा आनंददायी अनुभव जो जो वाढीस लागेल तो तो साऱ्या विश्वातील ईश्वर स्वरुप अनुभवास येईल.'



मधुकर म्हणाला, 'पण आजी हा अभ्यास सतत व्हायला हवा. तरच दिवसानुदिवस सद्गुणांत वाढ होत राहील.'

जया म्हणाली, 'नाहीतर तेरड्याचा रंग तीन दिवस. असंच होईल मग या करिता काय करावे?'

आजी म्हणाल्या, 'समर्थांचीच ओवी तुला उत्तर देईल.

***वेष भूषण ते दूषण । कीर्ति भूषण ते भूषण ।***
***चाळणेविण एक क्षण । जाऊच नेदी ।।११/१०/७।।***

आहे ना सोप? माणसाचा खरा दागिना कोणता? हे पूर्णपणे कळायला हवं. झकपक पोषाख केला. दागदागिने घातले. देह खूप सुंदर दिसेल. पण समर्थांची तळमळ मन सुंदर असायला हवं. जेणे करून आपली कीर्ती वाढेल असे कर्म सदैव व्हावे. आळसांत एकही क्षण न घालवता अखंड मनन व्हावे. विलास पुढची ओवी तूच वाच. ही बघ -

***अखंड येकांत सेवावा । अभ्यासचि करीत जावा ।***
***काळ सार्थकचि करावा । जनासहित ।।११/१०/१७।।***

'शाब्बास,' आजी म्हणाल्या, 'एकान्ताचा फार फायदा होतो. खळखळ करणारं मन स्वस्थ करण्याकरिता एकान्तात ग्रंथवाचन करावे. विचार शुद्ध होण्यासाठी एकान्तात चिंतन करावे. लेखन करावे की चित्त शांत होत. मनुष्य देह सार्थकी लावायचा म्हणजे आपण जे गुण कमावतो ते जनता जनार्दनाचे सेवेस लावावेत. त्यासाठी समाजात मिसळावें लागतेच. निरीच्छ वृत्ती असली की लोकांना आपले बद्दल अधिक आपुलकी वाटते. ह्याचा पण काल तुम्हा अनुभव घेतलांत, पाकीटाचा मोह धरला नाही. लगेच ते पैसे सत्कारणी लावलेत म्हणून तुम्हाला योग्य असा खाऊ मिळालाच ना?'

आयुष्यभर एकच लक्षात ठेवू या.

***उत्तम गुण तितुके घ्यावे । घेऊन जनास सिकवावे ।***
***उदंड समुदाये करावे । परी गुप्तरुपे ।।११/१०/१८।।***

जगांत आयुष्यभर शिकावे इतकेज्ञान पसरलेले आहे. नव्या नव्या कला. नवे

नवेगुण आत्मसात करुन त्यात पारंगत होण्याचा प्रयत्न करावा.

हे सारे शिकायचे कशाकरिता? त्याचा प्रसार करता यावा म्हणूनच ना? ज्यांना जेवढे देता येईल तेवढे ज्ञान द्यावे. दानात दान ज्ञानदान.'

विलास म्हणाला, 'पण आजी अन्नदान श्रेष्ठ नाही कां? भुकेल्या जीवाची भूक भागली की त्याला आनंद होतो.'

'होतो. पण तो आनंद पुन्हा भूक लागेपर्यंतच टिकतो. पुन्हा अन्नाची गरज भासतेच. तसेच वस्त्राचे, पैशाचे. कितीही गरजा भागवल्या तरी पुन्हा वस्त्र फाटते, पैसे संपतात गरज वाढतेच. ज्ञान दानाने आपले ज्ञान वाढते घेणाराचा आनंद कायम टिकतो.

एका विचाराची, सद्विचाराची जितकी माणसे एकत्रित करता येतील तितकी करावीत. त्यालाच संघटना शक्ती वाढवली म्हणतात.'

सुधा म्हणाली, 'आजी, त्यासाठी आपापल्या घरातूनच सुरुवात करावी असं मला वाटतं म्हणून मी काय केलं सांगू? आम्ही तीनही भावंडे रोज सकाळी अथर्वशीर्ष म्हणतो व संध्याकाळी रामरक्षा आणि भीमरूपी स्तोत्र म्हणतो.'

'छान छान.' आजी म्हणाल्या, 'अशीच प्रेरणा भगवंत देत राहो.'

विलास म्हणाला, 'आजी, माझ्या घरांत मी एकटाच. बहीण नेहमी येथेनसते. मग मी कोणाला शिकवू? पण माझे खाऊचे पैसे खूप साठले आहेत. त्यातून बाबांच्याकडून एक हरतालिकेचा साचा आणवणार आहे.

आमच्याकडे स्वयंपाकाला ताई येतात ना? त्या गरीब आहेत. पण त्यांना मूर्ती बनाण्याचा नाद आहे. शाडूची माती नी साचा त्यांना दिला तर त्या हरतालिका मूर्ती तयार करुन रंगवतील. व विकतील तर त्यांना खूप पैसे मिळतील असे दान केले तर चालेल ना? हे योग्य दान होईल ना?'

'होईल. होईल.' आजी म्हणाल्या, 'कोणी कष्टाने, कोणी पैशाने ज्याला जसे जमेल तसे सेवाभावाने वागावे. म्हणजे आपण हृदयस्थ परब्रह्माला जाणले असेच होईल. ब्रह्मदर्शनाचा आनंद रोज लुटता येईल. त्यांत खंड मात्र पडू देऊ नये. म्हणून तर प्रार्थना



करायची. कोणाची?'

गणपती म्हणाला, 'बलभीमाची.'

**महारुद्र हनुमान की जय**
**श्री समर्थ सद्गुरु स्वामी महाराज की जय.**
**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

## दिवस २३ वा

सगळे जमले. पण विलास लंगडत लंगडत येत होता म्हणून जरा थांबले. मधूने पायऱ्या चढतांना त्याला हात दिला.

आजींनी विचारले, 'कुठल्या लढाईवर गेला होतास?'

विलास म्हणाला, 'तेव्हढा पराक्रम गाजवण्याची पात्रता आहेच कोठे? आ ऽऽ आ करीत गुडघा धरून बसला. बघा आजी, नमस्कार सुद्धा विसरलो. आता बसूनच करतो. आजी मी कमनशिबीच! सकाळपासून तीनदा अनुभव आला. काल रात्री टी.व्ही. पहात बसलो. मग आज उठायला उशीर झाला. सगळ्यांचा चहा आटोपला. माझा कप आईने हातात दिला. गरम होता म्हणून बशी आणायला वळलो. तो खुर्चीचा धक्का लागून कपाचे सरळ दोन तुकडे झाले. पुन्हा चहा तर नाहीच. पण आईंची शब्द पुष्पांजली ऐकावी लागली.

मी फुले काढण्याचे निमित्त केले व बागेत पळालो. स्नानानंतर आईने गरम गरम बेसनाचा लाडू खायला दिला. घाम पुसायला टॉवेल घेऊनच बसावे म्हणून लाडवाची वाटी कपाटावर ठेवून न्हाणी घरांत गेलो. टॉवेल घेऊन येईपर्यंत बोक्याने लाडू फस्त केला. आई नी बाबा हसत सुटले. पण पुन्हा लाडू नाही मिळाला. मग सांगा मी कमनशिबीच ना?

झालं! बाबांना कार काढायची म्हणून फाटक उघडायला गेलो. तर ठेच लागली. पडलो. गुडघ्याला खरचटले. रडलो नी काय? त्याच कारमधून दवाखाना गाठला. ड्रेसिंग करुन आलो.'

गणपती म्हणाला, 'वा. वा. तैमूरलंग! आता दोन दिवस धडाधड उड्या नाही

मारता येणार.'

आजी म्हणाल्या, 'विलास, तुला अविवेकाचे फळ तत्काळ मिळाले. हातातला कप टेबलावर ठेवून बशी आणली असतीस तर!'

सुधा म्हणाली, 'पण कपाच आयुष्यच संपल न! म्हणून तसं झालं. शिवाय चहा सांडला ती जागा विलासनेच स्वच्छ केली असती, तरी त्याच्या आईने पुन्हा चहा दिला असता.'

आजी म्हणाल्या, 'अगदी बरोबर. तसंच लाडवाची वाटी - - - '

विलास म्हणाला, 'आजी, तो लाडू बोक्याचाच दैवात होता. एरव्ही त्याला गरम लाडू कोण देतोय?'

गणपती म्हणाला, 'हे सारं आता आपली चूक झाकण्यासाठी हं!'

आजी म्हणाल्या, 'अगदी खरं. मनुष्य योग्य दिशेने प्रयत्न करीत नाही. अपयश आले की दैवाचे माथ्यावर खापर फोडायचे! म्हणून आधीच विवेकाने विचार करुन काम केले की, फसगत होत नाही. समर्थांनी समर्पक उदाहरण दिले आहे बघ.'

***पर्णाळी पाहोन उचले । जीवसृष्टी विवेकें चाले ।***
***आणी पुरुष होऊन भ्रमले । यासी काय म्हणावे ।।१२/१/११।।***

पानावरची आळी, तांदळातली वा भगरीतली आळी आधी पुढचा आधार शोधते. मग मागचे पाय उचलते. तिच्या ठिकाणी इतका विवेक आहे. मग मनुष्य बुद्धीमान असून पुढचा विचार करुन काम का करीत नाही?'

जया म्हणाली, 'पुन्हा काम फसले तर आपलीचूक समजावून न घेता दुसऱ्याला चटदिशी दोष देतो हे पण एक पापच की!'

'विलास,' आजी म्हणाल्या, 'पायाकडे बघून चालावे असे वडील माणसे सांगतात. पाहून चालले तर ठेच लागत नाही. काचेने पाय कापत नाही.'

मधू म्हणाला, 'आजी आम्ही आता स्वयंसेवक होणार न? मग रस्त्यावरील काट्याची फांदी उचलून दूर फेकायला हवी. काचांचे तुकडे कोणी वापर करीत नाहीत अशा जागेवर टाकयला हवेत. म्हणजे दुसऱ्या कोणाला त्रास होणार नाही.'



आजी म्हणाल्या, 'मधू, बरोबर आहे तुझे म्हणणे. ही ओवी वाच.'

***म्हणौन असावी दीर्घ सूचना । अखंड करावी चाळणा ।***
***पूढील होणार अनुमाना । आणून सोडावे ।।१२/१/१२।।***

मी सांगतो अर्थ, कार्य हाती घेतले की पुढचा विचार करुन ठेवावा. विवेकाने वागल्यास पुढच्या परिणामाचा तर्क बरोबर करता येतो. पुढची संकटे टळतात. म्हणजेच आजी बरीचशी संकटे टळतात. म्हणजेच आजी बरीचशी संकटे विवेक न करता कार्य केल्याने येतात. असेच होते नाही कां?'

सुधा म्हणाली, 'आपल्या अपयशाचे मानकरी आपणच असतो. मग दुसऱ्याला दोष देत बसलो की लोकांत घरांत काय नी बाहेर काय आपली नाचक्की होते. सहाजिकच आपल्यातली सहनशीलता कमी होते.'

'छान,' आजी म्हणाल्या, सुधा हाच विचार समर्थांनी सांगितला आहे बघ. वाच तूच'

***लोकी बरें म्हणाया कारणे । भल्यास लागते सोसणे ।***
***न सोसिता भंडवाणे । सहजचि होये ।।१२/२/१३।।***

आजी म्हणाल्या, 'जगांत प्रत्येक माणसाला वाटते. मला चांगले म्हणावे. लोकांनी मला मानावा. मग चांगले म्हणण्यासारखे आपल्या हातून काम नको का व्हायला? टाकीचे घाव सोसल्याशिवाय दगडाला देवपणा येत नाही. लोकांचे नुसते बोलणेच सोसायचे असे नाही. थोडे फार कष्ट करुनही देह झिजवला पाहिजे. परोपकार वृत्ती वाढवली पाहिजे. कर्तव्य कर्माची जाण ठेवली पाहिजे. कौंटुबीक सामाजिक जबाबदारी ओळखली पाहिजे.

आत्ताच पहा न. विलास फाटक उघडतांना अडखळला. पडला. गुडघ्याला खरचटले. फार मोठी जखम नाही. पण सहन करण्याची ताकद नाही. महागाईचा औषध उपचार. २-३ दिवस तरी डॉक्टर ड्रेसिंग करायला ये म्हणणार. त्यासाठी बांबांचा कामाचा खोळंबा. दवाखाना लांबच्या डॉक्टरांचा.

सुधाच्या आईला कळलं असतं तर तुळशीच्या पानांचा रस हळद लावून दोन दिवसांत बरे केले असते. त्या बऱ्याच जणांना फुकट औषध उपचार करतात. त्यांना

गावात लोक किती मानतात. पहात आहात ना तुम्ही. आता आजच आपण ठरवू या कां? लहान सहान कामे विचारपूर्वक करून अपयश पदरांत घ्यायचेच नाही.

सर्वांनी हात उंचावले. मधु म्हणाला, 'स्वावलंबी व्हायचं. मग कांही दिवस लोक हसतीलही.'

'नुसते हसतीलच असे नाही बाबा.' आजी म्हणाल्या, 'लावालावी करणे पाय मागे खेचणे, कार्यात अडथळे आणणे असली कामे करणारी माणसे आपल्या भोवती खूप आहेत व असतातही - - - '

जया म्हणाली, 'मग त्यांना तोंड देत कसं जमायचं?'

आजी म्हणाल्या, 'समर्थांना दासबोध रचतानाच खरं तर कळलं की पुढे मागे जया अशी शंका विचारणार. म्हणून त्यांनी लिहूनच ठेवल बघ.'

***खळ दुर्जन भेटला । क्षमेचा धीर बुडाला ।***
***तरी मोनेचि स्थल त्याग केला । पाहिजे साधके ।।१२/२/२४।।***

'समजलं जया', आजी म्हणाल्या, 'अशी अडवणूक करणारी कोणी व्यक्ती भेटलीच तर त्यांना मनापासून क्षमाच करावी. समजा आपल्या विचार शक्तीच्या बाहेर त्यांचे कार्य असेल, सहनशीलतेच्या पलिकडल असेल, तर समजूत घालणे, समजावून देणे, क्षमा करणे या कुठल्याच भानगडीत न पडता आपण गप्प रहावे. फारच झाले तर तेथून बाजूला सरकावे. त्या जागेचा त्यागच करावा.' गणपती ही पुढची ओवी तू वाच.'

गणपतीने दासबोध हाती घेतला. दासबोधाला नमस्कार केला.

***थोर लहान समान । आपले पारिखे सकळ जन ।***
***चढते वाढते सनेधान । करिता बरे ।।१२/२/२७।।***

'छान,' आजी म्हणाल्या, 'कशी छान युक्ती सांगितली नाही कां?'

जगात कोणी आपल्यापेक्षा मोठे असतील. कोणी लहान असतील कोणी बरोबरीचे असतील. पण कोणीही भेटो. त्यांचेशी प्रेमानेच वागायचे. कोणी अगदी जवळचे नात्याचे असतील, कोणी परकी असतील. तरी सगळयांशी साचेबंद प्रेम नको. चढते वाढते प्रेम असावे. प्रेमतंतूनी सर्वांना आपल्याकडे खेचून घ्यावे. ही पण कलाच आहे हं. असे



वागणे एकदा कां जमले की दोन फायदे होतात.'

'ते कोणते?' विलासने विचारले. आजींनी त्यालाच वाच म्हटले.

***इहलोक साधाया कारणे । जाणत्याची संगत धरणे ।***
***परलोक साधाया कारणे । सद्गुरु पाहिजे ।।१२/३/२।।***

'शाबास,' आजी म्हणाल्या, 'इहलोकात होरपळून जायला नको असेल तर सत् संगती धरावी. म्हणजेच जाणत्याच्या संगतीत जीवन सार्थकी लावावे. परमार्थात ही व्यावहारीक चतुराई कांही उपयोगाची नाही. तेथे स्वस्वरूपाचे ज्ञान देण्याकरिता सद्गुरुच पाहिजेत. ते अनुभवी असल्यांमुळे त्यांचे संगतीत परमार्थ सुलभ होतो. परमार्थात मुख्य अडचण कोणती असेल तर. हे जे भोवताली पसरलेले जग दिसतय, ते अगदी सत्य मानून चालतो. प्रेमाचा ओघ तेथेच संपुष्टात येतो. म्हणून समर्थ म्हणतात सद्गुरुंचे सान्निध्यात खऱ्या ज्ञानाचा उदय करुन घ्यावा-

***दिसेल तितुकें नासेल । उपजेल तितुके मरेल ।***
***रचेल तितुके खचेल । रूप मायेचें ।।१२/३/१२।।***

अर्थ तुमच्या लक्षात आलाच असेल.'

जया म्हणाली, 'सोपे आहेत शब्द. माया कशी ते सांगितले आहे. जे जे दिसते ते नाश पावते. जे निर्माण होते ते नाहीसे होते. जे जे बनवले जाते ते मोडते. अर्थात याच्या विरुद्ध जे नाश पावत नाही हे सत्य. जे नाहीसे होत नाही ते शाश्वत. जे मोडणार नाही, आहे तस्सेच रहाते ते अनंत ब्रह्माचे रुप. असेच ना?'

'होय.' आजी म्हणाल्या, 'पुढच्याच ओवीत समर्थ काय म्हणतात बघ. सुधा आता तू वाच.'

***विवेकें पाहिला विचार । मनास आले सारासार ।***
***येणे करिता विचार । सदृढ जाला ।।१२/३/२१।।***

आजी म्हणाल्या, 'जितका जितका विवेकाने आपण विचार करु तितका तितका त्या शाश्वत ब्रह्माचा शोध लागतो. सार असार कळू लागते. बुद्धी सूक्ष्म होते. मग आत्मा अनात्म ध्यानी येतो. जसजसे विचार सामर्थ्य वाढते तसतसे सूक्ष्मात शिरण्याचे तंत्र साधते. शेवाळ दूर केल्यावर जसे स्वच्छ पाणी दिसते अगदी तसेच असार माईक पसारा

दूर केल्यावर ब्रह्म दर्शन घडते.

विलास म्हणाला, 'आजी एक विचारू कां? एवढ्या सगळ्या खटाटोपाने ब्रह्मदर्शनाचा फायदा काय?'

आजी म्हणाल्या, मानवी देहातच जीवनाचे सार्थक करुन घ्यायचे असते. मायेच्या जंजाळात सापडून पुन्हा जन्म मृत्यूच्या फेऱ्यात अडकण्यापेक्षा अखंड आनंदात रहाणे योग्य नव्हे कां? तो आनंद ब्रह्मदर्शन होण्यातच असतो. ज्यांना हे साधले ते खरेच पावन झाले. समर्थ किती आत्मविश्वासाने ठामपणे सांगतात बघ.

***नाना किंत निवारिले । धोकें अवघेचि तुटले ।***
***ज्ञान विरेके पावन जाले । बहुत लोक ।।१२/३/२।।***

विवेकाने वागणाऱ्या लोकांच्या मातले संशय सर्व दूरच होतात. सर्व संकटे निवारण होतात. ाात्माान होते. म्हणून सारासार विचार जागा रहातो. लोक पावन होतात. म्हणून साधकाने योग्य मार्गाने जावे असे समर्थांना पोटतिडकेने सांगावेसे वाटते.

पुढे इशारा पण देतात. गणपती तो इशारा कोणता बघ.

***वैराग्येविण ज्ञान । तो वेर्थचि साभिमान ।***
***लोभदंभे घोळसून । कासाविस केला ।।१२/४/९।।***

'बाळांनो समजले कां?' आजी म्हणाल्या, 'विवेकाचे महत्व सांगून झाले. पण त्याचेच जोडीला काय हवे? तेहा सांगत आहेत. ज्ञान झाले. पण अंगी वैराग्य नसेल तर? मनुष्य स्वार्थी, लोभी मत्सरी बनतो. मात्सर्य भाव वाढतच रहातो.

'आजी,' विलास म्हणाला, 'वैराग्य म्हणजे काय?'

'सांगते.' आजी म्हणाल्या. 'हवे नकोच्या कचाट्यात न सापडणे म्हणजे वैराग्य? देहाने तर नकोच पण मनाने सुद्धा कोठेही कशासाठीही अडकून न पडणे म्हणजे वैराग्य. हे पडणे म्हणजे तू आज पडलास तसे नव्हे. मी माझेच्या विचारातून कायमचे सुटणे म्हणजे वैराग्य.'

सुधाने आजींचे बोट पाहून ओवी वाचली.



***सन्मार्गे जगास मिळाला । म्हणिजे जगदीश वोळला ।***
***प्रसंग पाहिजे कळला । कोणी येक ।।१२/४/१७।।***

'बाळांनो!' आजी म्हणाल्या, 'सत् संगति सद्ग्रंथ श्रवण याने सन्मार्ग सापडतो. लोकांचा तो आवडता होतो. असा साधक लोकप्रिय झाला की समजावे ही ईश्वराची कृपाच पण ईश्वराची जरी कृपा झाली तरी विवेक वैराग्य हाती असावेतच. प्रसंगमान पाहून वागता आले पाहिजे. तर तो खरा साधक.

अशा साधकाने काय करायचे असते माहीत आहे?

***पदार्थ जड आत्मा चंचळ । विमळ ब्रह्म ते निश्चळ ।***
***विवरोन विरे तत्काळ । तद्रूप होये ।।१२/५/१५।।***

पंचमहाभूतात्मक सर्व वस्तू कशा असतात?

सर्वांनी एकदम सांगितले, 'जड व नाशिवंत असतात.'

आजी म्हणाल्या, 'सर्वांचे. अंतर्यामी रहाणारा आत्मा कसा असतो?'

गणपती म्हणाला, 'साक्षी असतो. चंचल असतो.'

'शाब्बास,' आजी म्हणाल्या, 'त्याही पलीकडे असणारे परब्रह्म विमळ व निश्चळ असते. हा विचार सदैव अंतःकरणांत बाळगला तर कमनशिबी बनू कां?

विलास म्हणाला, 'नक्कीच नाही. सोहं सोहं सोहं!! त्या परब्रह्माशी तद्रूपच होऊ.'

आजी टाळी वाजवून म्हणाल्या, 'शाब्बास,' आनंद वाटला.

मारुतीराया, बलभीमा, हीच बुद्धी वाढीस लागू दे.

आजींनी नमस्कार केला. सर्वांनी मारुतीला नमस्कार केला.

।। जय जय रघूवीर समर्थ ।।

***श्रोत्रीं नाना शब्द जाणे । त्वचे मध्ये सीतोष्ण जाणे ।***

***पंचभूते त्रिगुणाकार । अवघा वायोचा विकार ।***

## दिवस २४ वा

सगळे वेळेवर जमले. मारुतीरायाला वंदन झाले. आजींना नमस्कार करून सगळे आपापल्या जागी बसले. सुधा व जया एकमेकीला काही खुणावत होत्या. विलासच्या हे तेव्हाच लक्षात आले.

'आजी,' विलास म्हणाला, 'त्या दोघींचे काहीतरी कट कारस्थान दिसतंय. 'वाचा कोणी फोडायची?' पहा कशा खुणावत आहेत.'

जया म्हणाली, 'कसला कट नी कसलं कारस्थान! कालपासून पुन्हा पुन्हा प्रयत्न करतेय. पण ओम् फस्!'

मधू म्हणाला, 'कसला प्रयत्न करतेय?'

जया म्हणाली, 'मधूदादा, आजी म्हणाल्या न. आकाशाच्याही पलीकडे निश्चल ब्रह्म असते. म्हणून मी आकाशाच्या पलीकडे पलीकडे म्हणजे नक्की कोठे ? कुठपर्यंत बघायचं ?खूप विचार केला. वर आकाश खाली आकाश, बाजूला आकाश, अलीकडे आकाश पलीकडे आकाश. सगळेच आकाश. मग पलीकडे म्हणजे कोठे जायचे तेथे आकाश आहेच. मग ब्रह्म कसे सापडायचे ? खिडकीत बसून विचार करीत होते. पौर्णिमेचा चंद्र पश्चिमेला जाऊ लागला तरी उत्तर सापडेना. आईने बळेच हाताला धरून उठवले. पलंगावर झोपवले. झोपल्याचं नाटक केलं. पण आतून जागीच होते. ते ब्रह्म खरंच कधी कोणाला दिसलं आहे कां? तेच मला विचारायचं होते. सुधाला म्हणत होते तू विचार, ती म्हणे तूच विचार. अशा खुणा चालल्या होत्या आमच्या.

आजी स्वस्थ पणाने ऐकत होत्या. अगदी मनापासून गुरूदेवांचे स्मरण करून त्यांनी नमस्कार केला. त्यांच्याच प्रेरणेने कार्य करते . वेल लावलाय त्याला फळ येणारच. हा आनंद त्याचे चरणाशी वाहिला. तुम्ही पण डोळे मिटलेत नमस्कार केलात. कोणाकोणाची काय काय भावना झाली ? खरं खरं सांगयच हं?

गणपती म्हणाला, ' आजी डोळे उघडत नाहीत तो पर्यंत असंच आजींच्याकडे पहात रहायचं अस ठरवून नमस्कार केला तर समोर आजी दिसल्याच नाहीत. तुम्ही उठून आंत गेलात असे वाटले. म्हणून डोळे उघडले तर तुम्ही येथे आहातच '.



विलास म्हणाला, 'मी हात जोडले. पण सर्वच जण पुढे काय करतात हे मी हळूच पहात होतो. तो सगळ्यांचेच नमस्कार झालेले. मी ही हात खाली घेतले.

मधू म्हणाला, ' आजींनी बहुतेक गुरूदेवांना नमस्कार केला असावा. आपल्याला अजून गुरू कोण कळलेच नाही. मी मारूती रायाकडे पाहून नमस्कार केला आजी खरं सांगू ? मारूती हसल्यासारखं मला वाटलं. म्हणून मी डोळे उघडले तो आहे तस्साच. मग मघाशी कसा हसला ? म्हणून मनोमन पुन्हा नमस्कार केला'.

जया म्हणाली, 'आजी मी विचारांत पडले की आजींनी डोळ्यापुढे काय पाहिले असेल? म्हणून त्यांचे डोळयात पाणी आले. मला तर कांही म्हणता काहीच दिसले नाही. पण नमस्कार मात्र केला. आजी आनंद वाटला एवढे मात्र खरे !'

सुधा म्हणाली,'आजी, बालध्रुवाला जसा विष्णू समोर दिसला व त्याने गालाला शंख लावला तसे आपल्याला कोणीतरी दिसेल . व आपण आनंदी होऊ. असं वाटून हात जोडले. पण काहीच दिसले नाही. मग नमस्कार कोणाला पोहोचला ? कोणाला केला ? आजींनी केला म्हणून आपण केला का ? सगळ्यांनी हात जोडले. मी जोडले नसते तर हे सगळे काय म्हणतील असे वाटून हात जोडले.

' बाळांनो, आजी म्हणाल्या. 'शुद्ध स्वच्छ मनाने, प्रामाणिकपणे सांगितलेत ना! त्यातच मला आनंद वाटला. आपला अभ्यास अनाठायी जाणार नाही. कोणाला लवकर अनुभव येईल कोणाला उशिरा पण अनुभव येणार. त्यासाठी काय करायचे कळले ? सुधा, तू वाच ही ओवी'.

***आद्य मध्य अवसान । जें शाश्वत निरंजन ।***
***तेथें लावावें अनुसंधान । जाणते पुरूषीं ।।१२/६/२०।।***

'ठीक', आजी म्हणाल्या, 'आद्य म्हणजे विश्वरचनेच्या आधी, मध्य म्हणजे आत्ता चालू काळात व प्रलय, महाप्रलय झाला तरी जे शाश्वत ब्रह्म कसे. अगदी स्वच्छ मलरहित कलंक रहित राहत ते ब्रह्म ज्ञानी साधकाने एकाग्र चित्ताने अखंड अनुभवावे. असे चिंतन करीत असता त्या दिव्य शक्तीचा म्हणजे ब्रह्माचा गोड अनुभव येईल.

विलास म्हणाला, 'तेथे लावावे अनुसंधान हे नाही मला कळले'.

गणपती म्हणाला,'लागला मध्येच विचारायला'.

'विचारू दे', आजी म्हणाल्या मनातली शंका निरसन झाली की पुढचे ऐकायला गोडी वाटते.

'पण आजी, गणपती म्हणाला, 'आत्तां नाही कळलं तर गप्प बसाव घरी शब्द कोषांत 'अनुसधांन' शब्द पहावा. अर्थ कळेल आपला आपल्याला कळेल. विचारायचे कशाला?' याला एवढही येत नाही 'अस नाहीका दुसऱ्याला वाटत?'

आजी म्हणाल्या, 'गणपती, जगाच्या वाटण्याशी आपला संबंध ठेवावाच कशाला ? पुस्तकांत अर्थ सापडेल. अनु = पाठोपाठ जाणे. सं - म्हणजे सम्यक् धान -ध्येय. प्राप्तव्य. जे प्राप्त करून घ्यायचे ते प्राप्त होई पर्यंत सारखे त्याच विचारांत राहणे म्हणजे अनुसंधान. असा अर्थ पाहून समाधान होत नाही. संत तुकारामांनी दृष्टांन्त दिला आहे. 'तुका म्हणे आळी । जेवी नुरेचि वेगळी', कुंभारीण नावाच्या कीटकाने मातीचे बाटली सारखे घर बांधले. त्यांत एक खाद्य म्हणून आळी आणून ठेवली. घराचे तोंड बंद केले. आतल्या आळीला त्या कुंभारीण कीटकाचा ध्यास लागला. कुंभारणीने घराचे तोंड मोकळे केल्याबरोबर पाखरांत रूपांतर झालेली आळी भुरकन उडून गेली.

संतांनी दिलेल अनुसंधानाचे उदाहरण पुस्तकातल्या अथपिक्षा लवकर पटेल असे आहे. जर ब्रह्मदर्शनाकरीता तोच विचार अखंड राहिल तर ते ब्रह्म अंतरंगांत चटकन स्फुलिंगा प्रमाणे प्रगटेल ही शक्ती सद्‌गुरूकडून मिळते, गणपती तूच वाच ही ओवी'.

***पुस्तक ज्ञानें निश्चय धरणें । तरी गुरू कासया करणें ।***
***या कारणें विवरणें । आपुल्या प्रत्यये ।।१२/६/३०।।***

'आता मला सांग' आजी म्हणाल्या, 'आंबा गोड आहे असे म्हणत मीच चाखत राहिले तर तुला गोडी कळेल कां ? त्यासाठी तुला लहानशी का होईना पण फोड घ्यायला हवी.

सुधा म्हणाली, 'यालाच स्वतःचा अनुभव म्हणायचं ना ?

'बरोबर', आजी म्हणाल्या, 'आणि हे अनुभवास येण्यापूर्वी ह्या भोवतालचा प्रत्यक्ष दिसणारा पसारा आपणास मागे खेचतो न ? म्हणून शांतपणे कसे निर्माण झाले?कसे मोडते ? कोण करते ? रहाते काय ? याचा विवेकाने विचार करायचा'.



विलास म्हणाला, 'आता आलं ध्यानांत, आधी एकच ब्रह्म होते. त्याची हालचाल म्हणजे स्फूरण, विचार, वायूरूप तो बाहेर पडला. पसरला. सगळीकडे पसरला.

गणपती म्हणाला, 'त्या वायूरूप चैतन्य शक्तीने आकाश व्यापले. त्या वायातून तेज म्हणजे अग्नी उत्पन्न झाला'.

मधू म्हणाला, 'त्या तेजातून आप म्हणजे जल व जलातून पृथ्वी तयार झाली. जलचर भूचर खेचर प्राणीच प्राणी पृथ्वी ठेलंठेल भरली'.

जया म्हणाली, 'थांब मधूदादा. पुढे त्या मायेला, शक्तीला आवराआवरी करावी वाटली तशी नाशाला सुरूवात झाली. जशी उत्पन्न झाली तशी भूते एकमेकांत मिसळता मिसळता वायू आकाशांत स्थीर झाला. आकाश आहे तसेच राहिले. चैतन्य जेथून आले तेथे विसावले. तेच-----

विलास ओरडला, ' तेच ब्रह्म '.

'हं' आजी म्हणाल्या, ' हे छान लक्षात राहिले. पण चुचकारून त्यागाची वृत्ती तयार करायची, मोह कमी करायचा, लोभाला आवरायचे '.

'बरोबर' आजी म्हणाल्या, 'म्हणजेच समर्थ म्हणतात विरक्त व्हायचे. विलास तू वाच, ही ओवी.

***वैराग्या परते नाही भाग्य । वैराग्य नाहीं तों अभाग्य ।***
***वैराग्य नस्तां योग्य । परमार्थ नव्हे ।। १२/७/१७ ।।***

'ठीक' त्यागाशिवाय विरक्तता येत नाही. वैराग्य वृत्ती ही मनाची अवस्था अत्यंत आवश्यक. वैराग्य असणे हेच भाग्य. त्या वैराग्याला विवेकाची जोड असली की माफक प्रमाणांत योग्य ते विषय सेवंन करून परमार्थ घडतो विलास म्हणाला, 'म्हणजे सध्या आमचा साधतो तसा, उन्हाचे वेळी बुध्दीला खुराख. ज्ञानांत भर. संध्याकाळी खेळ ९पर्यंत रात्री टी.व्ही. पुढे झोप. सकाळी घरकाम, बागकाम, जेवण थोडी विश्रांती की यायचं पडवीवर. हे सर्व साधले म्हणजे विवेकाने साधले म्हणायचे कां?'

आजी म्हणाल्या, 'होय, विवेक नसला तर? तू वाच आता

***जे विचारापासून चेवले । जै आचारापासून भ्रष्टले ।***
***विवेक करूं विसरले । विषयलोभी ।।१२/७/२२।।***

आजी म्हणाल्या, 'जर का मनुष्य उच्च ध्येयापासून घसरला. तर तो भ्रष्ट झालाच म्हणून समजा. मग तो करू नये ते करतो. त्यालाच भ्रष्टाचार म्हणतात. विवेकाची, सारासार विचाराची संगत सोडली की तो लोभात गुंतलाच

कमळाची फुले काढायला जर माणूस तळ्यात उतरला तर तो देठाच्या जाळयात अडकलाच म्हणून समजा. तस्सा आसक्तीत मनुष्य फसतो व इतरांना फसवतो.

*असतें येक वाटतें येक । त्याचें नांव हीन विवेक ।*
*नाना प्रवृतीचें लोक । प्रवृत्ति - जाणती ।।१२/८/१६।।*

'हीन विवेकी माणसे खरं ते विसरतात, खोट्याच्यां मागे लागतात. त्यांना विषय सुख मिळते असे वाटते. ते क्षणीक असते. खाण्यापिण्यात पूर्ण आयुष्य जाते. जया तू वाच.

*कीर्ती करून नाहीं मेले । ते उगीच आले आणि गेले ।*
*शाहाणे होऊन भुलले । काये सांगावे ? ।।१२/८/२७ ।।*

आजी म्हणाल्या,'व्यर्थ जीवन न घालवता नाव राहील असं काही केलं पाहिजे बुद्धी मिळाली. धनदौलत कमावली. पैसा वाढला. धुंदी माजली. कष्टाची प्रवृतीच नष्ट झाली. जीवन वाया गेले. असे नको व्हायला.

*म्हणोन आळस सोडावा । येत्न साक्षेपे जोडावा ।*
*दुश्चित पणाचा मोडावा । थारा बळें ।।१२/९/८।।*

विलास म्हणाला,'मी सांगतो अर्थ, माणसाने आळसाला थारा देऊ नये. नेहमी प्रयत्नशील असावे. चांगले विचार स्थीर रहात नाहीत. संशय येतो. अर्धवट काम सोडावेसे वाटते. चित्त एकाग्र होत नाही. आळसाला हुसकून लावून निर्धार पक्का करावा.

*जैसें बोलणें बोलावें । तैसेचि चालणे चालावें ।*
*मग महंत लीळा स्वभावें । आंगी बाणे ।।१२/९/२३।।*

सुधाने ओवी वाचून पण दाखवली, 'आजी, तुकाराम महाराज म्हणतात, 'बोले तैसा चाले -------



विलासने घाईघाईने सांगितले - ' त्यांची वंदावी पाउलें'.


आजी म्हणाल्या, 'खरचं आहे, 'तरच लोकांत प्रतिष्ठा वाढेल. समाजांत खालच्या थरापासून वरच्या थरापार्यंत सर्वांच्यात मिसळून काम केले पाहिजे. तरच वाहवा होईल. त्यासाठी काय करायचे' ?

*घालून अकलोचा पवाड । व्हावें ब्रह्मांडाहून जाड ।*
*तेथे कैचें आणिले व्हाड । करंटपण ।।१२/९/२९।।*

'विलास, अकलेचा पवाड घालायचा म्हणजे काय कळलं का ?'

विलास म्हणाला,'अक्कल म्हणजे बुद्धी, बुद्धीचे चातुर्य दाखवून काम करायचे. जगातले सर्व ज्ञान प्राप्त करून घेऊन बुद्धीचे सामर्थ्य वाढवायचे. म्हणजे बुद्धी विशाल झाली म्हणतात. येथे नतद्रष्टपणा राहीलच कसा ? आपल्याला करंटा म्हणणार कोण ?

आजी म्हणाल्या, ' छान, अशी बुध्दी व्यापक झाली की ज्ञानाने तृप्त होते.



नदीच्या प्रवाहात एक मुलगा बुडताना पाहून पुलावरील एक मुलगा म्हणतो, 'मरे ना मेला तर आपल्याला काय त्याचे?' त्याच पुलावर दुसऱ्या बाजूला मुलगा बुडत आहे असे पाहून पुलावरून एकाने सूर मारून त्याला बाहेर काढले.

*तैसें ज्ञानें तृप्त व्हावें । तेंचि ज्ञान जनास सांगावें*
*तरतेन बुडों नेदावें । बुडतयासी ।।१२/१०/२।।*

आजी म्हणाल्या,'बघा कसा छान बोध आहे. ज्याला पोहता येतय त्याने बुडणाऱ्यास तारावे की बुडून द्यावे ? स्वतः ज्ञान मिळवावे. आटोक्यात असेल ते दुसऱ्यास सांगावे. त्याने आपले ज्ञान वांढते. त्यासाठी पथ्य कोणते माहीत आहे?

विलास म्हणाला 'त्यासाठी आळस सोडायला हवा आता मी वाचतो ओवी '.

***आलस्य अवघाच दवडावा । येत्न उदंडचि करावा ।***
***शब्द मत्सर न करावा । कोणीयेकाचा ।।१२/१०/११।।***

आजी म्हणाल्या, 'व्देषाने व मत्सराने माणसाचा नाश होतो. उणे दुणे आधिकच वाढते. सहनशीलता वाढली की या दुर्गुणाला रहायला जागाच मिळणार नाही. आळस गेला. प्रयत्न वाढला. उद्योगी वृत्ती वाढली. सहनशीलता आली. दुसऱ्याचे बरे वाईट सहन करून आपले ध्येय सोडले नाही की जगात मोठेपणा आपोआप वाढेल. मग भक्तीला आधिकच रंग चढेल.

***मनापासून भक्ती करणें । उत्तम गुण अगत्य धरणे।***
***तया माहापुरूषाकारणें । धुंडीत येती ।।१२/१०/३१।।***

विलास म्हणाला, 'आजी अगदी खरं आहे. परवाचीच क्लबची गोष्ट. अध्यक्ष महाशय बाबांचेच ऑफिस मधले होते. त्यांनी सहज बोलता बोलता आमची नावे सांगितली. बाबांना पण आनंद झाला. हा गणपती, आमच्या शेजारीच राहतो आणि मधुकर पलीकडच्यां चौकांत रहातो.

'तेच अध्यक्ष आमचे घरी आले होते. चहा देण्याचे काम माझ्याकडेच आले. मला पाहिल्यावर त्यांना आनंदच झाला . आम्हा तिघांची त्यांनी जवळून ओळख करून घेतली'.

गणपती म्हणला,'आणि आजी, याचे बाबा म्हणाले,'जवळच इनामदारांचा वाडा आहे. तेथे दुपारी दासबोध अभ्यास चालतो. तेथे मुले जातात. तेथल्या आजी मुलांच्यावर फार चांगले संस्कार बसवत आहेत'. मग तर आम्हांला फारच आनंद झाला. आजी त्या आंनदाच्या भरांत आम्ही डोळे मिटून नमस्कार पण केला'.

बाळांनो असेच आनंदाचे क्षण टिपत राहू या. आलिप्त राहून काम करू या. शक्ती देणारा कोण? बुध्दी देणार कोण?



आपला मारूती.

महारूद्र हनुमान की जय

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**

## दिवस २५ वा

अगदी तावातावानेच तिघे बोलत आले. आश्चर्य, चीड, संताप यांनी भरलेले बोलणे होते. चपला काढून पाय धुवून पडवीवर आले. तरी बोलणे चालूच होते.

सुधा म्हणाली,'कसली येवढी चर्चा रंगलीय ?

विलास म्हणाला,'आज आखाड्यात कुस्तीची स्पर्धा होती. आम्ही तिघे गेलो होतो पहायला. मोठी प्रतिष्ठीत माणसेही खूप होती'.

'पण त्याची तावातावाने चर्चा आता कशाला ?' सुधाने विचारले.

गणपती म्हणाला,'सुधा, अग, खेळ नी खेळातला आनंद बाजूलाच राहिल व तेथे महाभारत घडलं ! ते कसं? याला जबाबदार कोण ? हे आजींना विचारायचं', इतक्यात आजी बाहेर आल्या.

विलास म्हणाला,'आजी आज आम्ही महाभारत पाहिलं'.

आजी म्हणाल्या, 'आज रविवार नव्हे! मग महाभारत कोठे नी कसे घडलं ?

'मी सांगतो गणपती म्हणाला,'समर्थ व्यायाम शाळेच्या पटांगणावर कुस्तीची स्पर्धा होती. खूप गर्दी जमली होती. खेळ छान रंगला होता दोन कुस्त्या पार पडल्या आणि तिसऱ्या वेळेला निर्णयात काही चूक झाली. बोलणे अटीतटीवर गेले. साराच रंग बदलला. आनंदावर विरजण पडले. मारामारी सुरू झाली. आम्ही तिघांनी काढता पाय घेतला.

आजी सगळयांच्या ह्रदयांत भगवंत असतो ना? मग चांगला खेळ चालला होता. तो भांडण कशाला जुंपावे? 'कोणी भांडताहेत तर कोणी तटस्थ, कोणी टाळया वाजवत होते. तऱ्हाच तऱ्हा, पण मी म्हणतो सर्वांचा आत्मा जर एक आहे तर असे का व्हावे?'

आजी म्हणाल्या,'आत्मा एकच हे खरे. तो सर्व ठिकाणी व्यापून आहे खरा. पण गंमत अशी सर्वच प्राण्यांत, माणसांत सारख्याच सामर्थ्याने प्रगट होत नाही. हा भेद गुणामुळे होतो. सात्विक वृत्तीचा मनुष्य आत्म्याच्याच शक्तीने पण न्यायाकडे झुकतो. तडजोड करतो. भांडण मिटवतो. पण रजोगुणाचा प्रभाव पडला तर तोच आत्मा आपल तेच खंर म्हणतो, म्हणून संघर्ष वाढतो. तमोगुणी मनुष्याचा आत्मा उगाचच गोंधळ माजवतो. दुसऱ्याला दुःख देतो. स्वतः आसुरी आनंद मिळवतो.

एकच आत्मा आपल्या देहांत किती भिन्न भिन्न कामे करतो, ऐकतो, बोलतो चालतो, सारे देह व्यापार त्याच्याच सत्तेने चालतात. आनंदाचा अनुभव तोच देतो. सुखदुःख त्याचेच मुळे भोगावे लागते. स्पर्धेत वा युद्धात त्याचेचमुळे जिंकतो. हरणारा त्याचेच मुळे हरतो.

हे सारे लक्षात घेऊन समर्थ सांगतात.

***आत्मा नस्तां देहांतरीं । मग तें प्रेत सचराचरीं ।***
***देह संगें आत्मा करी । सर्व कांहीं ।।१३।१।२१।।***

देह व आत्मा एकमेकाशिवाय काम करू शकत नाहीत. देह नाशिवंत आहे. आत्मा शाश्वत आहे. जीवदशेमुळे आत्म्याला क्लेश भोगावे लागतात. म्हणून ज्ञानी माणसाने काय करावे ?

मधुकर म्हणाला, 'आत्मानात्म विचार करावा. त्यालाच नित्यानित्य विवेक म्हणतात कां ?

आजी म्हणाल्या, 'तुझ्या प्रश्नाचे उत्तर या ओवीत आहे बघ.'

***देह अनित्य आत्मा नित्य । हाचि विवेक नित्यानित्य ।***
***अवघें सूक्ष्माचें कृत्य । जाणती ज्ञानी ।।१३।१।२३***

गणपती म्हणाला, 'आजी, नित्य कशाला म्हणायचे व अनित्य कशाला म्हणायचे ते एकदा सांगता कां?

'सांगते, 'आजी म्हणाल्या,' जे जे आकाराला आले ते अनित्य. जे जे जड पंचमहाभूतापासून बनले ते ते अनित्य. जे जे अति सूक्ष्म, त्याला आकार नाही पंचमहाभूतापलिकडे ते नित्य. लक्षात ठेवायला अगदी सोपे आहे बघ.



***दिसेल ते नासेल । आणि येईल ते जाईल ।***
***जें असतचि असेल । तेंचि सार ।।१३।२।२।।***

विलास म्हणाला,'म्हणजे आजी, आत्मानात्म, सारासार, नित्यानित्य, शाश्वत-अशाश्वत, हे सगळे एकाच अर्थाचे शब्द'

'होय' आजी म्हणाल्या, 'क्रम लावायचाच झाला तर आत्मानात्म विवेकानंतर नित्यानित्य विवेक ही निवड होईल. मग सारासार विचाराने शाश्वत अशाश्वत विचार पक्का होतो, बाळांनो कापूस पिंजून सरकी काढतात तसा हा शब्दांचा पसारा मांडता आला किंवा आवरता आला तरी ब्रह्म स्वरूप होणे जड जाते. कां बरे? समर्थच सांगतात, मधू तूच वाच.'

***संग त्यागें विण काही। परब्रह्म होणार नाहीं ।***
***संग त्याग करून पाहीं । मौन्य गर्भा ।।१३।२।१७।।***

आजी म्हणाल्या,'जो पर्यंत देहात्म बुद्धीमुळे मीपणा शिल्लक आहे, तोपर्यंत परब्रह्म स्वरूप आकलन व्हायचे कठीण. त्या मीपणाचा निःशेष त्याग घडला की परब्रह्माचा अनुभव दूर नाही.'

विलास म्हणाला, 'हे मौन्य गर्भ ही काय भानगड आहे?

'भानगड नाही' आजी म्हणाल्या 'जे वाणीने वर्णन करता येत नाही ते. जे शब्दाच्या पलीकडे आहे ते शब्दातीत असे कोण आहे? फक्त परब्रह्म, मौन्य गर्भ म्हणजे परब्रह्म. त्याला अनुभवायचे म्हणजे काय करायचे?

***खोटें सांडून खरें घ्यावें । तरीच परीक्षवंत म्हणावें ।***
***असार सांडून सार घ्यावें । परब्रह्म तें ।।१३।२।२७।।***

जयाने ओवी वाचली व अर्थ पण सांगते म्हणाली,'जो खरा परीक्षावंत आहे तो खोटे काय ते ओळखून त्याचा त्याग करतो व खरे ते घेतो. तसेच असार ते टाकून परब्रह्म स्वरूप सार ते घ्यावे.

मधु म्हणाला, 'आजी हे सगळं जगत असार. आपला देह सुद्धा असार. मग अनुभव कोणी घ्यायचा ?'

'छान विचारलेस,' आजी म्हणाल्या, 'हे सर्व सोडायचे म्हणजे टाकून कोठे पळून

जायचे नाही. वा देहाचा नाश पण करायचा नाही. या सर्वांवरची आसक्ती सोडून देह असतानाच त्या परब्रह्माची मन बुद्धीने ऐक्यता साधायची. नेहमी स्वानंदात रहायचे. हे मानव देहातच शक्य आहे. ब्रह्मदेवाने चार तऱ्हेची सृष्टी उत्पन्न केली.

***अंडज जारज स्वेदज उध्दीज। पृथ्वी पाणी सगळांचे बीज ।***
***ऐसे हे नवल चोज । सृष्टी रचनेचे ।।१३।३।१४।।***

विलास म्हणाला, 'हे चांगले लक्षात आहे. अंडयातून जन्म ते अंडज, वारेने वेष्टीलेले व पूर्ण वाढ झाल्यावर जन्म जारज, घामातून जन्म ते स्वेदज व जमीनीत अंकूर फुटून वर वाढ होते ते उद्धीज. या सगळयांना जमीन व पाणी यांची फार गरज असते. ईश्वराचे सगळयात मोठे कौतुक ते हेच.'

आजी म्हणाल्या,'बाळांनो, या परब्रह्माच्या प्रेरणेनेच हा खेळ चालतो. विश्वाचा हा गुंतागुंतीचा खेळ अवलोकन करता करताच वृत्ती शून्य, सूक्ष्म करून त्या दिव्य चैतन्याचा अनुभव घ्यायचा. ही कुशलता. ही फक्त मानवातच आहे.

***वेवसाये प्रवृत्ती निवृत्ती । दोहींकडे पाहिजे प्रचिती ।***
***प्रचितीविण अनुमाने असती । ते विवेकहीन ।।१३।३।१९।।***

जे अनुमानाने म्हणजे तर्कानेच अनुभव आला म्हणतात ते विवेकहीन. ते प्रचिती येईपर्यंत अभ्यास म्हणजे उपासना करीतच नाहीत. ते पण विवेकहीनच.

मधु म्हणाला, ' आजी तुम्ही हे सांगत आहात न? तेव्हा मला गणितातल्या पदावलीची आठवण झाली. मयूर कंस , चौकोनी कंस, गोल कंस असे एकात एक कंस शिवाय अंश व छेद. मोठी पदावली सोडवतांना कुशलताच असते. बुद्धी एकाग्र करावी लागते. उणे अधिक चिन्हे लक्षात ठेवावी लागतात आधी आतले आतले गोल कंस काढून सगळयांत शेवटी मोठा कंस काढायचा. आणि एवढा सगळा खटाटोप करून उत्तर शून्य तरी किंवा एक. तसंच हे आहे. फक्त बाहेरून आत जायचे आहे. बाहेरचे दृश्य हे नको ते नको करीत शाश्वत एकाकडेच याचये आहे.

आजी म्हणाल्या,'शाब्बास, यालाच म्हणतात स्थूलातून सूक्ष्माकडे जायचे म्हणजेच बहिर्मुख वृत्ती अंतर्मुख करायची, मग काय होते? सुधा वाचेल आण.

***दृष्य हलकालोळे नेले। जड चंचळ वितुळलें ।***
***या उपरी शाश्वत उरलें। परब्रह्म ते ।।१३।४।२४।।***



विलास म्हणाला,'आजी माझी शंका अशी की ज्या क्रमाने सृष्टी उत्पन्न होते त्याच क्रमाने -----'

त्याला अडवीत गणपती म्हणाला,'चुकतो आहेस, ज्या क्रमाने उत्पन्न होते त्याच्या विरूद्ध क्रमाने नाहीशी होते.

'बरोबर, विलास म्हणाला, 'बोलता बोलता चुकत होतो पण मला म्हणायच की शेवटी महाप्रलयांत कांहीच रहात नाही रहातं फक्त परब्रह्म, बस्स, समजला परब्रह्माचा विचार, मग हे सोडा, ते जोडा, उपासना करा, नाम घ्या, हे सारं करायचं कारणच नाही. आत्ताच आपल्याला कळलं 'या उपरी शाश्वत उरले। परब्रह्म ते।

आजी हसल्या,'विलास, आत्ता कळले ते शब्दाने की अनुभवाने?

'शब्दाने कळले, संतांच्या ग्रंथाधारे कळले.' विलास म्हणाला.

सुधा म्हणाली, 'मग शब्दाचं ज्ञान खरं की अनुभवाचं ज्ञान खरं?'

'थांब सुधा,'तिला थांबवून आजी म्हणाल्या, 'विलास, शालेय अभ्यासक्रमांत प्रत्येक विषयावर पुस्तके असतात. ६ विषयांची ६ पुस्तके. काही पुरवणी पुस्तके. कांही मार्गदर्शक पुस्तके. सारांश ६ विषयांकरिता अगदी दुप्पट १२ पुस्तके जमली. वाचली, टाचणे काढली आपल्याला पूर्ण अंदाज आला की उत्तरे अचूक असली तर १००पैकी ९० च पुढचे गुण मिळतीलच. मागील २।४ वर्षांच्या प्रश्न पत्रिका सोडवल्या. तरी १० वी पास म्हणतील का? तसा दाखला मिळेल कां? उत्तीर्ण होण्याचा आनंद मिळेल कां ?

'तो कसा मिळेल? विलास म्हणाला, 'परीक्षा देणे भाग आहे. उत्तरे तपासून निर्णय लागेपर्यंत वाट पहाणे भाग आहे. निकाल जाहीर झाला त्यात आपला क्रमांक सापडला की त्या भोवती आपण शाईने गोल काढतो. सर्वांना सांगत सुटतो. तो उत्तीर्ण होण्याचा आनंद वेगळा.

सुधा म्हणाली,' त्यात सुद्धा फरक आहे, बघ. नुसता निकाल कळला उत्तीर्ण, पण गुण? गुणांची यादी मिळाली की पक्केच झाले किती गुणांनी उत्तीर्ण ?वर्ग कोणता? तो आनंद खरा.

'बस्स ! आजी म्हणाल्या,'अगदी तस्संच आहे हे. तेथे लेखी पेपर असतो. येथे

आचाराला महत्व असते. नरदेहात जन्म मिळाला मग प्रपंच करता करताच मन सर्व विषयातून काढून सतत परब्रह्माचे अनुसंधान ठेवता ठेवता अचानक अनुभवाचा क्षण येऊन ठेपतो. मग तो आनंद काही वेगळाच.

मधुकर म्हणाला, 'नाथांना पैची चूक सापडली. ते टाळी वाजवून नाचू लागले. 'सापडली रे सापडली' तसा हा परब्रह्माचा अनुभव म्हणजे सत् चित् आनंद याच्या अनुभूतीचा आनंद. याची देही याची डोळा अनुभवायचा, तो आनंद वेगळाच नाही कां?

'अगदी बरोबर, 'आजी म्हणाल्या,'अवघड नाही. छंद लागला पाहिजे, समर्थ सागतात बघ,

***त्या जगोध्दाराचे लक्षण । केले पाहिजे विवरण ।***
***सार निवडावे निरूपण । यास बोलीजे ।।१३।५।२१***

''मानव देह जगदोध्दाराकरिताच मिळाला आहे''

जया म्हणाली,'पण आधी स्वतःचा उद्धार नाही साधला तर जगाचा कसा साधणार?

विलास म्हणाला,'बघा आजी, पुन्हा माझा घोटाळा होतोय. स्वतःचा उद्धार करायचा म्हणजे?

मधू म्हणाला, 'चुकला पीर आला पुन्हा मशिदीत,

आजी म्हणाल्या, येऊ दे. आपण देऊ या आश्रय. विलास हे विश्व कोणी उत्पन्न केले?

विलास म्हणाला,'परब्रह्माच्या प्रेरणेने ब्रह्मदेवाने उत्पन्न केले.'

आजी -'शक्ती कोणती वापरली?'

''माया, चैतन्य ही शक्ती वापरली'' विलास.

आजी- किती जिन्नस वापरावे लागले?

विलास- पंचमहाभूते व तीन गुण. नावे सांगू?

आजी- नको, लक्षात आहेत तुझ्या. आता सांग हा अफाट विश्वपसारा शाश्वत की अशाश्वत ?



विलास - अशाश्वत, आज आहे उद्या नाही. सारखा बदल. कालांतराने नाहीसे होणार. म्हणून अनित्य, असार, अशाश्वत.

आजी- मग यांत शाश्वत कोण? तू का मी ?

विलास - दोघेही नाही. फक्त परब्रह्म शाश्वत.

आजी- हे तुला कशाने कळले?

विलास - समर्थांच्या दासबोधातून कळले, बुद्धीत जाऊन घट्ट बसले. चित्तापर्यंत पोहोचले.

आजी - या कळण्यालाच ज्ञान म्हणतात. या ज्ञानानेच 'मी कोण' हे अखंड लक्षात ठेवणार न ?

विलास - होय सोहं सोहं सोहं.

आजी - मग हे लक्षात ठेवून गप्पच बसणार का? विसरून जाणार, का झोपून दिवस घालवणार ?

विलास- विसरायचे कशाला ,'लक्षात ठेवणार. नुसतं लक्षात नाही ठेवणार? माझ्यातले दोष काढून टाकून लक्षात आलंय त्याप्रमाणे वागणार.'

आजी म्हणाल्या, 'दे टाळी! तू तसे वागणार याला म्हणायचे स्वतःचा उद्धार जगाला सांगणार याला म्हणायचे जगदोध्दारः दुसऱ्याला सांगण्याने आपले ज्ञान वाढते. असार काढावे सार घ्यावे. आटोक्यांत असेल तेवढेच सांगावे. याचे नाव निरूपण हेच व्रत आपण सर्वजण घेऊ या. आज पाच आहोत पंचवीस व्हायला वेळ नाही लागणार.

'आजी,' विलास म्हणाला,' आता अगदी पक्क कळलं. रोज आपण करतो तो व्यवहार सगळा चोख करायचा. अंतरात 'सोहं' लक्षात ठेऊन करायचा. आसक्ती व हेतू रहित करायचा. फक्त आनंद मिळवायचा जगाला वाटायचा. आनंद आनंद आनंदात डुंबायचे!!

'शाब्बास' आजी म्हणाल्या

**।। जय जयरघूवीर समर्थ ।।**

## दिवस २६ वा

सगळी मुले जमली. पण जयाचा चेहरा रडवेला होता. तिला काय होतय? सगळ्यांनाच जाणायची उत्सुकता होती. पण नुसत्या खाणाखुणा चालल्या होत्या.

इतक्यात आजी आल्या. नित्याप्रमाणे वंदन प्रकार झाला. विलासने खुणेनेच 'जयाकडे बघा' सुचवले.

आजींनी प्रेमाने तिच्या पाठीवरून हात फिरवला.'जया, चेहरा का उतरलाय? कांही होतय कां?' तिला विचारले.

जयाने डोळे पुसले. नाक पुसले. जया म्हणाली,'आजी, आज सकाळीच माझे मामा आले. त्यांनी माझ्याकरिता कृष्णाची किती छान मुर्ती आणंली होती. फारच सुंदर होती. मी सगळ्यांना दाखवायला येथे आणणार होते. म्हणून मूर्ती बाजूला ठेवून खोका शोधायला आत गेले. एवढ्यात शेजारचा बंडू आला. त्याने ती मूर्ती उचलली व घरी जाऊ लागला. इतक्यात मी आले. त्याला हाक मारून थांबवले, तो उंबरठयावरच अडखळला----

विलास म्हणाला, 'आणि पडला असेल. मूर्ती फुटली असणार! मातीची मूर्ती फुटली तर फुटली.'

आजी म्हणाल्या,'विलास तिला वाईट वाटणं स्वाभाविक आहे. तुम्हाला सर्वांना दाखवून तिला आनंद मिळणार होता. नुकतीच मूर्ती मिळाली नी लगेच फुटली. याचेच तिला वाईट वाटत आहे. शहाणी आहे ती. तिची समजूत पटेल लवकर. जया पूस डोळे.

हे बघ प्रत्येक निर्मित वस्तूला काल मर्यादा असते. ती वस्तू कोठे तयार होते? कोठे जाते? किती दिवसांनी नाहिशी होते? हरवते, का फुटते का चोरीला जाते हे त्या वस्तूचे दैवच. कोण ठरवतो हे? हे सारे आपल्या हाती नाही. पृथ्वी रचते आणि खचते! हे तो प्रत्ययास येते. तू वर्तमान पत्र वाचतेस ना? धडाधड इमारती पडतात. झाडे मोडतात. कडे कोसळतात, पूल उध्वस्त होतात. मग लहानशी मातीची मूर्ती धक्का लागला जोरात. पडली हातातून फुटली. आता दुःख करू नकोस. मूर्ती पाहिल्यावर ज्या क्षणाला तुला आनंद झाला तो क्षण फक्त आठव. मूर्ती ह्रदयांतच कायम राहील. आता



ही ओवी वाच.

***ऐसा पाचा भूतांचा विस्तार। नाशिवंत हा निर्धार ।***
***शाश्वत आत्मा निराकार । सत्य जाणावा ।१३।६।११***

'पाच भुतांची नावे मी सांगतो. गणपती म्हणाला, पृथ्वी आप तेज वायू आकाश' ही प्रलयाच्या वेळी नाश पावतात.

'आकाश नाश पावत नाही ना आजी.' विलासने विचारले.

आजी म्हणाल्या,'चैतन्य परब्रह्मांत मिसळले की आकाश हे नांव लोप पावते. शुद्ध चैतन्य व्यापकतेने सर्वत्र असतेच असते. फक्त जे जे आकारास येते ते ते लवकर वा उशिरा पण केव्हातरी नाश पावते. सुधा म्हणाली, 'आजी, आकारिले तितुके नासे हे जरी खरे असले तरी ते नाहीसे होऊ नये असेच आपल्याला वाटते. ती वस्तू अपलीच आपल्याच जवळ असावी असे वाटते. त्या असण्यातच खरा आनंद वाटतो. हा तर आपला नित्याचा अनुभव म्हणून चित्र फोटो मूर्ती जवळचा माणूस, नाहीसा झाला की वाईट वाटते.'

आजी म्हणाल्या, 'बरोबर आहे तुझे म्हणणे. पण बुद्धीला जर उजाळा मिळाला तर सूक्ष्म बुद्धीने लक्षांत काय ठेवायचे ? वाच तू.

***निराकार जाणावा नित्य । आकार जाणावा अनित्य ।***
***यास बोलिजे नित्यानित्य । विचारणा ।।१३।६।१५।।***

नित्य अनित्य हा विवेक जागा असला की वस्तूचा नाश पावणे हा धर्म लक्षात येतो व दुःख होत नाही. होऊ नये. आज पर्यंत कपडे किती फाटले? कपबशा किती फुटल्या ? तुमच्या हातातल्या बांगडया किती वाढवल्या ? याबद्दल शोक करीत बसलो कां? अस व्हायचंच असं म्हणून नित्य असणाऱ्याला जाणू या. विलास तू वाच आता.

***जेथें नाहीं विवंचना । तेथें कांहींचं चाले ना ।***
***खरें तेंचि अनुमाना । कदा नये।।१३।६।२९***

मधुकर म्हणाला, 'मी सांगतो तो अर्थ. जो सूक्ष्म विचार करीत नाही सारासार विचार करीत नाही तो खरा देव कसा जाणू शकेल? अनुमानाने परब्रह्म कसे जाणता येईल ? नुसत्या तर्काने परब्रह्म कळू शकणार नाही. आजी मी शालेय जीवनातील गंमत

सांगतो.

परीक्षा देण्याकरिता शाळेत गेलो करायचे काय पुष्कळ कागद? असं म्हणून चालेल कां? लिहायला बसलो? कशाला हवा कागदाला समास? दोन शब्दात योग्य अंतर सोडा. कशाला ते? पुष्कळ कशाला लिहा? होईना का खाडाखोड अस सगळ म्हणत कसाबसा पेपर लिहिला अभ्यासाचा योग्य मजकुराचा विचारच नाही केला तर पास होण्याचा आनंद कसा मिळेल. उत्तीर्ण होणे हेच ध्येय डोळयापुढे ठेवून अभ्यास करायला हवा. गबाळेपणा अस्ताव्यस्तपणा टाकून नेटके स्वच्छ सुंदर हवे तेच लिहिले तर उत्तीर्ण होण्याचा आनंद मिळेल. शालेय जीवनांत उत्तीर्ण होण्यातला आनंद हीच ब्रह्मप्राप्ती. असं म्हणायला काय हरकत आहे?

‘शाब्बास मधू’ आजी म्हणाल्या,‘ हरकत तर नाहीच नाही उलट ध्येय डोळयासमोर अखंड असावे व प्रयत्न करावा. गणपती समर्थांचा अगदी हाच विचार तू वाच.’

***या कारणे सर्व सांडावें । येक देवास धुंडावें ।***
***तरीच वर्म पडे ठावें । कांही येक।।१३।७।२१।।***

आजी म्हणाल्या,‘सर्व कांही सांडावे म्हणजे काय कळलं ना? विलास म्हणाला उन्हातून हुंदडणे, उगाच मारामारी होईल असे वेडेवाकडे बोलणे, अभ्यासाव्यतिरिक्त वेळ वाया घालवणे सोडावे. व ध्येय हाच देव तो हाती लागेपर्यंत प्रयत्न सोडू नयेत. मग यश हमखास मिळतेच. यश हेच वर्म.’

‘ठीक’ आजी म्हणाल्या,‘समर्थच नव्हे तर भगवंताचं सुद्धा तेच म्हणणं आहे. काय म्हणतात-

***सर्व सांडून शोधा मजला । ऐसें देवचि बोलिला ।***
***लोकीं शब्द अमान्यकेला । भगवंताचा ।।१३।७।२३।।***

गीतेत भगवंत अर्जुनाला सांगतात. पण विषय सुखाच्या नादात लक्षात कुणाच्या रहातंय! असं कां होतं?’

गणपती म्हणाला, ‘मी सांगू? विवेक बुद्धी झोपी जाते?

मधुकर म्हणाला, ‘ विवेकाचा पाया पक्का हवा असा समर्थांचा आग्रह आहे.



***विवेकाचें फळ तें सुख । अविवेकाचें फळ तें दुःख।***
***यात मानेल तें आवश्यक । केले पाहिजे ।।३।७।२८।।***

विलास म्हणाला,‘सुख सोडून दुःखाच्या मागे कोण लागेल? विवेकानेच वागावे हे उत्तम.’

आजी म्हणाल्या,‘हे कळून सुद्धा सामान्य माणसाची फसगत होते ती कशी? दृश्य म्हणजे डोळयाला दिसते, प्रत्यक्ष हाताने स्पर्श करता येतो, देवाण घेवाण करता येते. त्यावरून मन काढावे याला माणूस तयार होत नाही . दिसते ते खोटे व दिसत नाही ते परब्रह्म खरे हेच मानायला सामान्य मनुष्य तयार नसतो. विश्वाचा कर्ता परमेश्वरच हेही तो मानीत नाही. झाड मी लावलं पाणी मी घातलं फुले आली. फळे आली. हे कर्तृत्व माझे. असे प्रत्येक कामात माणसाला वाटते. हेच अज्ञान मोठ्या देवाच्या आड येते. निमित्त मात्र आपण होतो. फांदी रूजावी खाली मुळया फुटाव्यात व फांदीला डोळा असतो तेथून नवा अंकूर बाहेर यावा. गुलाबी कोवळी पाने हिरवी व्हावीत ही किमया कोणाची? त्याला कळया लागल्या. फुले उमलली. फुलात वास कोणी घातला? हेच माणूस विसरतो. सुधा तू वाच.

***येथें कर्ताचि दिसेना । प्रत्यये आणावा अनुमाना।***
***दृश्य सत्यत्वें असेना । म्हणोनियां ।।१३।८।३४।।***

हे सारे विश्व निर्माण करणारा विश्वाच्या आधी होताच व आताही आहेच. अत्यंत सूक्ष्म शक्ती व तितकीच व्यापक असल्याने ब्रह्मदेव निर्माण करून मायेकरवी सृष्टी उत्पन्न करून आपण अलिप्त राहिला. मायेच्या निर्मितीमुळे सत्यत्वाचा भास होतो.

बाळांनो थोराथोरांना चक्रावून सोडणारी ही माया! तुम्ही तर अजून लहान आहात’. आजी म्हणाल्या ‘पण एकच लक्षात ठेवायचे. त्या चैतन्याचा एक कण आपल्यात वावरतो आहे.’

विलास म्हणाला, ‘त्यालाच आत्मा म्हणतात न!’

‘होय,’ आजी म्हणाल्या,‘तो काय काय करतो?

सुधा म्हणाली, ‘इंद्रिया करवी सर्व कामे, देणे घेणे, उठणे, बसणे, रडणे, हसणे,सर्व

सर्व कामे तोच करवून घेतो. तो सर्व कर्मांचा साक्षी'.

आजी म्हणाल्या, 'म्हणूनच या देहाच्या संगतीने आत्म्यास सुखदुःखे भोगावी लागतात. वाच ओवी,

***वाढणें मोडणें जाणें येणें । सुख दुःख देहाचेनि गुणें ।***
***नाना प्रकारें भोगणें । आत्म्यास घडे ।।१३।९।९।***

छान, या देहाशी संबंध आल्यामुळे चैतन्यरूप आनंदरूप असलेल्या आत्म्याचे नांव जीवात्मा. त्यालाच सारे वाढणे नाश पावणे सुख दुःखाचा अनुभव घेणे भोगावे लागते. त्याला एकच का काम असते? नाम ही एक नाही व कामही एक नाही.

***जगामध्ये जगदात्मा। विश्वामधें विश्वात्मा।***
***सर्व चालवी सर्वात्मा। नाना रूपे।।१३/९/२८।।***

तोच परब्रह्म जगांला चालवतो. विश्वाच्या अंतर्यामी राहून विश्वात्मा बनतो. सर्व प्राणी मात्रांचे ठिकाणी तोच अंतरात्मा किंवा सर्वात्मा म्हणून तोच चालवतो'.

मधुकर म्हणाला,'आजी,म्हणजे हे कसं झालं सांगू? नाटकांत बालगंधर्व सौभद्र मध्ये सुभद्रा. तेच शाकुंतल मध्ये शकुंतला ते एकच प्यालात सिंधूचे काम करतात तर मानापमान मध्ये भामिनी होतात. बालगंधर्व एकच पण रूपे वेगवेगळी अर्थात कामे पण वेगवेगळी.

'शाब्बास' बरोबर सांगितलेस,'आजी म्हणाल्या, म्हणून त्याच्या अनेक रूपाचे मूळ कोण म्हणून तू बाल गधंर्व सांगितलेस ना? तसेच त्या परब्रह्माचे, परमात्म्याचे लक्षण सदैव जाणावे. तोच थोरला देव त्याची लीला ती हीच.

***देही आत्मा देह अनात्मा। त्यातून पर तो परमात्मा।***
***निरंजनास उपमा। असे चिना।।१३/१०/७।।***

विलास, देह कसा?'

विलास म्हणाला,'अनात्म म्हणजे अशाश्वत, असार.'

आजींनी विचारले, 'आत्मा कसा?'

गणपती म्हणाला, 'शाश्वत, सार.'



आजी म्हणाल्या, 'देहापेक्षा त्यात रहाणारा आत्मा श्रेष्ठ. आत्म्यापेक्षा परमात्मा श्रेष्ठ. पण त्याची गंमत अशी तो भिन्न गुणाच्या देहात स्वस्थपणाने वावरतो, सुधा ही पुढची ओवी वाच.'

***पुण्यात्मा आणी पापात्मा । दोहीकडे अंतरात्मा ।***
***साधु भोंदु सीमा । सांडूच नये ।।१३/१०/१२।।***

आजी म्हणाल्या, 'आत्मा एकच असला तरी एक देह तमोगुणाचे आधिक्याने पाप करतो. दुसऱ्या देहात सत्वगुणाच्या आधिक्याने पुण्यकर्म करतो. म्हणून दोघांनाही साधू म्हणजे चांगला माणूस म्हणून चालेल कां? किंवा दोघांना भोंदू म्हणून तरी चालेल कां? त्या त्या गुणामुळे साधू तो साधूच व भोंदू तो भोंदूच.

म्हणून समर्थ म्हणतात ज्याचा विवेक जागा आहे त्याने काय करावे? -'

***तैसे निंद्या सोडून द्यावे । वंद्य ते हृदईं धरावे ।***
***सत् कीर्तीनें भरावें । भूमंडळ ।।१३/१०/२०।।***

आजी म्हणाल्या, 'आता आपल्याला सार असार कळतंय. नित्य अनित्य कळतंय व मोठा देव कोण हे पण कळतंय.

म्हणून निंद्य गोष्ट सोडायची. संताना, सज्जनांना मान्य असेल तीच गोष्ट करायची आणि सत्कर्म करीत आयुष्य सार्थकी लावायचे. म्हणजे कीर्ती सहजच वाढेल.

मधुकर समर्थ काय म्हणतात तू वाच.

***मनोगत राखोन जाता । परस्परे होय अवस्ता ।***
***मनोगत तोडीता वेवस्ता । बरी नाही ।।१३/१०/२५।।***

आजी म्हणाल्या,'बाळांनो, एवढे पथ्य सांभाळले की भगवंत आपल्यावर कृपा करणारच. दुसऱ्याचे मनोगत जाणावे. दुसऱ्याचे मन कधी दुखवू नये. आपण थोडी झीज सोसावी. म्हणजे परोपकार वाढतो. परस्पर एकोपा वाढतो. संघर्ष माजत नाही. आणि जर का दुसऱ्याचे मन दुखवले गेले तर एकरूपता साधायची कठीणच. उलट कलह माजेल. बेबनाव होईल. अर्थातच असल्या जगण्याला कांहीच अर्थ रहाणार नाही.

म्हणून एकोप्याने वागून सदा आनंदच भोगावा. आनंदच वाटावा. आनंदातच रहावे. आनंद घ्यावा आनंद द्यावा.

आजींनी डोळे मिटून नमस्कार केला

मुलांनी जय घोष केला.

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**

## दिवस २७ वा

कालचीच रडवेली जया आज आनंदीत चेहऱ्याने आली. उशीर नव्हता झाला. पण सगळयात शेवटी आली इतकेच.

'ये सावकाश ये अजून सुरूवात झाली नाही'. आजी म्हणाल्या.

सर्वांना नमस्कार करून बसता बसताच जया सांगू लागली,

'तशी मी रोजच्या सारखीच निघाले. पण वाटेत केशवच्या आईने ५/१० मिनीटे थांबवून घेतले. केशवच्या विद्यालयात सध्या उन्हाळी शिबीर आहे. काल त्याची आई तेथे गेली होती. केशवचा गोष्टी सांगण्याचा काल कार्यक्रम होता. त्याने साने गुरुजींच्या गोड गोष्टी यातली एक गोष्ट सांगितली. हावभावासह सांगितली. त्याचा १ला नंबर आला. त्याला बक्षीस मिळाले. मिठाईपण मिळाली. त्याच्या आईने तर मला मिठीच मारली. मला पेढे दिले. म्हणून यायला थोडा वेळ झाला. आज आपण हा प्रसाद वाटू या.'

'सगळयांनीच टाळया वाजवल्या. आजींचा आनंद डोळयातून वाहू लागला. बाळांनो,' आजी म्हणाल्या, 'आली ना प्रचिती! ईश सेवा समजून कार्य केले की देव अशा आनंद स्वरूपांत प्रगट होतो. कीर्ती रुपाने प्रसाद देतो. जयाचा सुटीचा काळ सार्थकी लागला हा तिचा आनंद. आपल्या संस्थेतल्या विद्यार्थ्याला मोठ्या समाजात छान गोष्ट सांगता आली. संस्थेचे नांव राखले हा मुख्याध्यापकांचा आनंद. बक्षीस मिळाल्याचा केशवला आनंद. मुलाने समाजात अंध असून नांव गाजवले हा आईचा आनंद. पहा हा आनंद कसा पसरला.'



जया म्हणाली, 'आजी, या सगळयांच्या मुळाशी तुम्ही आहांत. तुम्ही मला पुस्तके दिलीत व त्याचा उपयोग कसा करायचा हे सांगितलेत म्हणून सगळे हे जमले.'

आजी म्हणाल्या, 'हे झाले तुझ्या दृष्टीकोनातून. मला तरी तुला सांगावेस वाटले हे समर्थ प्रेरणेनेच ना? दासबोध समर्थांचा. म्हणजे या सर्व कार्याचे मूळ समर्थच. सद्‌गुरुंची किमया ही अशीच असते. अमृत वेलच ही. अवगुणांचा त्याग घडला की प्रचितीला वेळ नाही लागत. समर्थ सांगतात ती पथ्ये मात्र पाळली पाहिजेत. जया पथ्य १ले तूच वाच.'

***आचार भ्रष्ट होऊं नये । दिल्यां द्रव्य घेऊं नये ।***
***उणा शब्द येऊं नये । आपणावरी ।।१४/१/७।।***

'छान.' आजी म्हणाल्या, 'समर्थांचा शुद्ध आचारावर फार भर आहे अशुद्ध वागणुकीने मनुष्य पशुवत ठरतो. काम केल तर दाम हे ठीक पण कोणी तसेच द्रव्य दिले तर मिंधेपणा येतो. तसे कष्टाशिवाय कोणाचे द्रव्य घेऊ नये. निस्पृहपणे वागायचे म्हणजे कसे? तुम्हाला पटलंय. परवा तुम्ही खाऊचे पुडे स्विकारलेत पण पैशाची पाकीटे परत केलीत हे उत्तम. आपले बोलणे सदा गोड असावे. कोणाचाही हीन शब्द आपल्याबाबतीत येऊ नये. मग नाव लौकीक वाढायला वेळ लागत नाही.'

कोणतेही काम काळजी करुन यशस्वी होत नाही. काळजी घ्यावी की यश आपलेच. तेवढ्यासाठी काय करावे? गणपती आता तू वाच.

***पोटीं चिंता धरूं नये । कष्टे खेद मानूं नये ।***
***समई धीर सांडूं नये । कांही केल्या ।।१४/१/१३।।***

सुधा म्हणाली, 'आजी, चिता आणि चिंता. फक्त अनुस्वाराचा फरक पण चिता माणसाल जाळून राख करते व चिंता सारखी पोखरतच रहाते. तसेच खायला आधी आधी. कामाला कधीबधी असेही नसावे. कष्टाळू वृत्तीचा मनुष्य कधीही उपाशी रहात नाही. प्रसंग कसाही असो धैर्य गळू देऊ नये. धैर्यवान मनुष्य सर्वही संकटांना तोंड देऊ शकतो.'

विलास म्हणाला,'शिवाजी महाराजांचे धैर्य वाखाणण्यासारखे नाही कां? फळांच्या पेटाऱ्यातून सही सलामत सुटले. आग्रयाहून मजल दर मजल करीत पुण्यात येऊन

पोहोचले.

सुधा म्हणाली,'धैर्य तर खरेच. पण तयारी ८/८ दिवस आधी योजना आखणे व भोयांचे सहाय्य, त्यापेक्षा हिरकणी गवळण ! तिचे धैर्य मोलाचे. बाळासाठी जीवाची पर्वा न करता कड्यावरून उडी घेतली. आड वळणाने काट्याकुट्यातून अंधारात वाट काढीत घर गाठले. हिरकणी बुरूज अजून या गोष्टीची साक्ष देतोय.

आजी म्हणाल्या,'खऱ्या आहेत या गोष्टी. पण माणसाला हे केव्हा साधते? गणपती वाचेल. ऐका.

***नित्य नेम सांडू नये । आभ्यास बुडों देऊं नये ।***
***परतंत्र होऊं नये । कांही केल्यां ।।१४/१/२२।।***

आजी म्हणाल्या,'आदर्श जीवन जगायचे म्हणजे काही नियम म्हणजेच नेम आपणच घालून त्याप्रमाणे वागायला हवे. देहाला सवय पडली की शिस्तबध्द कामे होतात.

विलास म्हणाला,'आजी आम्ही येथे हातपाय धुवून बसतो. ही सवय कशी छान लागली. मी खंर ते सांगतो. शाळेतून आल्यावर मला अशी भूक लागे तहान लागे की जेमतेम बूट काढून मी पाणी पीत असे. आई ओरडायची पण माझी संवय काही जात नव्हतीच. आता आई बाबा माझे कौतुक करतात. घरांत मी थोडे आईचे काम पण करतो'.

गणपतीने त्याच्या पाठीवर छानच शाबासकी दिली.

मधुकर म्हणाला, आजी अभ्यास बुडो देवू नये. हा अभ्यास शालेय नसणारच आजी म्हणाल्या,'समर्थांना सांगायचंच साधने बद्दलच. अभ्यास म्हणजे सराव सोडला की नुकसानच. सततच्या अभ्यासाने कला जीवंत रहाते. ज्ञानाला उजळा मिळत रहातो. मात्र मी ज्ञानी हा फुंजही वाढू देऊ नये'.

गणपती म्हणाला,' गर्वाचा फुगा फटदिशी फुटला की पितळ उघड पडायंच नाहीतर !

'बरोबर आहे'. आजी म्हणाल्या,'समर्थानी स्पष्टच केलंय'



***ज्ञानगर्व धरू नये । सहसा छळणा करू नये।***
***कोठे [illegible] घालू नये। कोणी येकासी ।।१४/१/४८।।***

बाळांनो, येथे छळणे म्हणजे छळणे नव्हे. त्रास देणे नव्हे. दुसऱ्याचा बुद्धी भेद करून आपले म्हणणे दुसऱ्यावर लादू नये. जबरदस्तीने कामे होत नाहीत. मानीत मानीत शिकवावे. पण आपण नम्र असावे. जर ही समर्थांची शिकवण लक्षात ठेऊन आपण वागलो तर जगातील सगळीच सुखे आपल्या पायाशी लोळण घेत येतील. कशालाच कमतरता असणार नाही.

पुन्हा गंमत अशी की ज्ञानाची जोपासना केली व ज्ञानाची वाढ व्हावी ही पोटी आस असली की त्याने प्रचाराकरिता थोडे फिरावे. लोक संग्रह करावा संघटना शक्ती वाढवावी.

विलास म्हणाला,'पण असली कामे दुसऱ्या गावात जाऊन करायची म्हणजे जेवायचे खायचे कोठे?'

***पृथ्वी मध्ये देश नाना । फिरता उपवासी मरेना ।***
***कोणी येक ठायी जना । जड नव्हे ।।१४/२/१७।।***

आजी म्हणाल्या,' विलास आपल्यातील लोकसेवेच्या गुणामुळे ईश्वर आपली सर्व चिंता वहातो. त्या त्या गावात सहजच आपली रहाण्या खाण्याची सोय होते. थोडे मोठे व्हा. आणि २ वर्षे जाऊ देत.

आपणच ५/६ जण एक दोन गांवे फिरून प्रचिती घेऊ या. विलास - पण त्याचे आधी तयारी?

'पण त्याच्या आधी तयारी?' विलास म्हणाला.

'समर्थच तयारीचा मार्ग दाखवतात बघ. तूच वाच.' आजींनी ओवी दाखवली.

***जेणें घडें भगवद्भक्ती । जेणें घडे विरक्ती ।***
***ऐसिया कावित्वाची युक्ती । आधी वाढवावी ।।१४/३/४।।***

म्हणजे आपण सगळयांनी कवी व्हायचं की काय ? विलासने विचारले.

आजी म्हणाल्या,' व्हावं अस लागतच नाही. शुद्ध भक्तीने मूलाधार चक्र शुद्ध

होते. आपोआप काव्य स्फुरते. ते सुद्धा प्रासादिक काव्य स्फुरते. त्यात उत्कट भाव आपोआप येतो. आपण फक्त आपली जबाबदारी त्याच्यावर टाकायची, 'मी नाही तूच' असे आतून विश्वासाने वाटून तसे वागायचे.'

माकडीणीचे पिलू आईच्या पोटाला घट्ट बिलगून असते म्हणून स्थलांतर करतांना ते पडत नाही. योग्य ठिकाणी गेल्यावर आई त्याला दूर सारते तेव्हा ते उड्याच मारण्यास दूर जाते.

याच्या उलट मांजरी आपल्या पिलाला मानेवर तोंडात धरते व पिलांचे डोळे उघडत नाहीत तोपर्यंत ७ ठिकाणी फिरवते. पिलांची काही तक्रार नाही. तुला वाटेल तिकडे ने. माझा सांभाळ करणारी तूच आहेस. हा विश्वास पक्का असतो.

आता सांगा. आपण माकडाच्या पिलासारखे रहायचे का मांजराचे पिलू?

मधुकर म्हणाला, 'मांजराच्या पिलासारखे वागायचे. पूर्णपणे ईश्वरावर अवलंबून. तो ठेवील त्यांत आनंद. तोंडाने वल्गना पण करायची नाही.'

आजी म्हणाल्या, 'शाबास, समर्थांचे वचन असेच आहे, बघ.'

***क्रियेवीण शब्द ज्ञान । तया न मानिती सज्जन ।***
***म्हणोनि देव प्रसन्न । अनुतापे करावा ॥१४/३/५॥***

एकदा कां दिव्य शक्ती पाठीशी आहे असे पक्के झाले. की जीवन निर्धास्त जगावे. मात्र भगवंताबद्दलचे प्रेम, उत्कट प्रेम जीवंत झऱ्याप्रमाणे सतत झुळझुळ वहाणारे असावे. अशा भक्ताचे जीवन कसे असते?'

***जो भगवद्भजनें वीण । जाऊ नेदी एक क्षण ।***
***सर्वकाळ अंतःकरण । भक्ती रंगे रंगलें ॥१४/३/२४॥***

भगवंताचे विस्मरण म्हणजे मरणच वाटावे.

विलास म्हणाला, 'आजी मी खरं खरं सांगतो. चहाबरोबर आईने बिस्कीटे दिली नाहीत तर मी मागून घेतो. अशी कशी विसरलीस? तिला विचारतो. नसली तरी चालतील. असे होत नाही. पण मारुती स्तोत्र एखाद दिवशी विसरतो. दोन दिवसांनी आठवण आली की म्हणतो असं का बरं होतं?'



'छान विचारलेस,' आजी म्हणाल्या, 'चहा बरोबर बिस्कीटे लहानपणापासून खात आहेस. त्याच्याशी पक्की मैत्री जमली आहे. तशी नामाशी अजून मैत्री जमली नाही. मारुती स्तोत्र आत्ता आत्ता म्हणायला सुरुवात केली आहेस. रोज म्हणायचा सराव झाला. की आपोआप त्या त्या वेळी मुखात येईल.

***नाना नामें भगवंताची । नाना ध्यानें सगुणाची ।***
***नाना कीर्तनें कीर्तीची । अद्भुत करावी ॥१४/४/५॥***

आजी म्हणाल्या, 'सगळं एकदम एकाएकी होत नाही. सकाळी स्नान केल्यावर सूर्यदर्शन घ्यावे. जमलं तर नमस्कार घालावेत.'

गणपती म्हणाला, 'आजी, मधूने आम्हाला नमस्कार शिकवले. आम्ही दोघे रोज १२ सूर्यनमस्कार घालतो.'

'वा! वा!' आजी म्हणाल्या, 'सूर्याची १२ नांवे सागशील?'

विलास म्हणाला, 'आजी, व्यायाम म्हणून नमस्कार घालतो. नांवे घेत नाही.'

आजी म्हणाल्या, 'ॐ मित्राय नमः। म्हणावे व नमस्कार घालावा. ॐ रवये नमः। शांतपणे म्हणून दुसरा घालावा. दोन्ही साधते. नाम व व्यायाम. प्रातः स्मरणीय १२ नांवे. तोंड पूर्वेला करुन नमस्कार घालावेत. शक्यतो सकाळी ७ चे आत. कठीण नाही. जेवणापूर्वी देवाचे स्मरण करावे. झोपतांना श्लोक म्हणावेत. नमस्कार करुन झोपावे. एकदा इंद्रियांना संवय लागली की कामे आपोआप होतात. आठवण ठेवावी लागत नाही.

गणपती म्हणाला, 'आजी, माझे बाबा म्हणाले, की ते लहानपणी संध्या पण करीत होते. नमस्कार घालत होते. पण कांही कारणाने संध्या बंद पडली. तरी नमस्कार घालत होते. शाळा संपली. कॉलेज सुरु झाले. अभ्यास वाढला हे निमित्त पण नमस्कारही बंद पडले. पुढे नोकरी प्रपंच आता ब्लड प्रेशर - - - पण मला शाबासकी देत म्हणाले कायम घाल. चांगलीच गोष्ट. तुझे नमस्कार पाहून मला आनंद होतो.'

आजी म्हणाल्या, 'असं होत बऱ्याच जणांचं. निमित्त अनेकानेक. मुख्य गोष्ट आळस व लाज वाटते. मग आवड कमी होते. गरज नाही अशी वृत्ती वाढते. तेथेच सावध रहायला हवे. ते वय असतं गद्धे पंचविशीचं!'

'गद्धे पंचविशी' सगळे एकदमच म्हणाले. व हसले.

आजी म्हणाल्या, 'समर्थांनी एक धोक्याचा कंदील दाखवला आहे पहा!'

***निर्गुण नेलें संदेहानें । सगुण नेलें ब्रह्मज्ञानें ।***
***दोहीकडे अभिमानें । वोस केलें ।।१४/५/९।।***

काय गंमत होते पहा. परब्रह्म कसे हे शब्दांनी आपल्याला कळले आहे. सगुण की निर्गुण?'

'निर्गुण' सगळयांनी एकदम उत्तर दिले.

'परब्रह्म अव्यक्त. निर्गुण, चर्मचक्षूंना दिसत नाही. मग ते आहे की नाही? शंकाच येत रहातात. सत्संगाने श्रवण घडले. आत्मज्ञान, ब्रह्मज्ञान बुद्धीत शिरले म्हणून सगुणाची, मूर्तीची देवतांची पूजा अर्चा करिता करिता सगुण नाशिवंत कळले. म्हणून पूजा बंद पडली. नाशिवंताची पूजा कशाला करा? हातचे गेले. पळत्याचे पाठीस लागलो तेही हुकले. शेवटी दोन्हीकडून देहाभिमानामुळे मनुष्य फसतो. मग फक्त देह सुखाच्या मागे लागतो. पैसा प्रपंच व्यवहार यातच स्वतःला रमवतो व आनंद मानतो.

संतांचे याच्या विरुद्ध वागणे असते. ते देहाने सर्व व्यवहार सांभाळतात. इतर लोकांप्रमाणेच वागतात पण -

***नम्र होऊन राजांगणीं । निःशंक जावें लोटांगणीं ।***
***करताळिका नृत्य वाणी । नाम घोषे गजर्वि ।।१४/५/१७।।***

भगवंताचे मंदिरापुढे नम्रपणाने नमस्कार घालण्यात त्यांना सकोच वाटत नाही. लोटांगण घालतांना देहभाव नसतो. हाताने टाळया वाजवतात. प्रसंगी नृत्य करतात. भगवंताचे नाम मनापासून घेतात. देहभाव कुठल्या कुठे जातो. आनंदाने भारावतात. समर्थ म्हणतात तेच खरे धन्य -

***मन ठेवुनी ईश्वरी । जो कोणी हरिकथा करी ।***
***तोचि ये संसारी । धन्य झाला ।।१४/५/३७।।***

बाळांनो, मग ते काम कोणतेहि असो. मनांत ईश्वरसेवा भाव असावा. भगवंताच्या कथा प्रेमाने गाव्यात. इतरांना प्रेरणा द्यावी. जीवनाचे सार्थक साधावे. लाजू नये. विसरू



नये. संकोचू नये. म्हणजेच भगवंताशी एकरूप'

'कसे ते मी सांगू?' विलास म्हणाला.

'मारुतीच्या ह्रदयांत राम - रामाच्या अंतःकरणांत मारुती. बरोबर ना?'

आजी म्हणाल्या, 'आपल्या ह्रदयांत?'

'आत्माराम.' गणपती चटकन म्हणाला.

'शाब्बास.'

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**

## दिवस २८ वा

आपापल्या घरातच पण रोजच्यापेक्षा नवीन काहीतरी काम करुन ते आजींना सांगायचं असे मुलांनी ठरवले होते. जो तो कसा मी आधी, मी आधी सांगेन या भावात होता.

आजी आल्या. स्थानापन्न झाल्या. वंदनादिक आटोपले. मुलांच्या चेहऱ्यावरचा भाव आजींनी जाणला. 'आज कळया फुलल्या आहेत सगळयांच्या', आजी म्हणाल्या.

विलास म्हणाला, 'आजी तुम्ही 'अरिंग मिरींग' करा म्हणजे भांडणच होणार नाहीत. सगळयांनाच वाटतय आपण आधी सांगावे.'

'हे बघा,' आजी म्हणाल्या, 'आपण नावाच्या आद्याक्षराप्रमाणे संधी देऊ चालेल कां?' सर्वजण हो म्हणाले. सहाजिकच 'ग' गणपती.

१ ला क्रमांक गणपतीचा. न रागावता विलास म्हणाला, '१ ला डाव या भूताचा.' गणपती पण म्हणाला, 'मारुतीराय महत् भूत. आपण सारी सामान्य भूते. आजी, आज रोजच्या पेक्षा नवीन काही चांगलं काम करायचं आम्ही ठरवलं होतं. मी काय काम केलं ते सांगतो. बाबांची खोली, छत, भिंती, मांडणी, टेबल, खुर्ची सर्व झाडून अगदी झकपक केली. आई तर म्हणाली, 'अगोबाई आज कोणतं भूत संचारलं?

मारुती आला वाटतं मदतीला! बाबांनी शाबासकी दिली. आईने गरम गरम छानसा शिरा केला. खाऊ मिळाला मनासारखा.

आता 'ज' म्हणजे जया.

जया म्हणाली, 'आजी, आमच्याकडे सगळीच कामे मोलाने होतात. आई रोजच घाईत असते. सकाळी माझी वेणी घालून तिला सारे आवरून शाळेत जायचे असते. म्हणून मी आजपासून माझी वेणी मीच घालायची ठरवली. केस लांब आहेत. जरा वेळ लागला मग आईने शिकवले. पण आज मीच घातली वेणी रोजही घालणार. आई म्हणाली, 'शहाणी बाळी माझा वेळ वाचला.'

शाबास, स्वतःची कामे स्वतः करण्यास काहीच हरकत नाही. आता कोण? 'म' मधुकर.

मधुकरने मांडी सारखी केली व गंभीरपणे म्हणाला, 'आजी मला सगळ्यात कंटाळा कशाचा असेल तर चक्कीत जाऊन दळण आणण्याचा. त्यातून दोनदा जावे लागते. एकदा दळण टाकायला. दुसऱ्यांदा आणायला. कंटाळा म्हणण्यापेक्षा लाज वाटते. पण मी आता ठरवले. आईने खस्ता तरी किती खायच्या? घरातली सगळी कामे तीच करते. मीहून आईला सांगितले व दळण आणून पण दिले. 'मधू, आज कुठला देव पावला मला?' ती म्हणाली. 'आई मी आजपर्यंत विचारच केला नाही की आईला किती त्रास होतो?'

'आई, तुझी सेवा हीच देवपूजा. मी अंगात ताकद आहे तोपर्यंत आयुष्यभर न कंटाळता दळण आणणार.' अस म्हटल्यावर आईने चक्क मला जवळ घेतले व कपाळ हुंगले. तो स्पर्श शिऱ्यापेक्षा गोड वाटला मला.'

'आता आता माझा नंबर 'व' विलास.' विलास म्हणाला, 'आजी, मुळांत मी आळशी. उशिरा उठणे हा माझा हातखंडा. आंघोळ शाळेत जायच्या आधी करायची. हेच मला आवडत आलं. पण कालपासून विचार कर करुन पक्क ठरवलं. आई उठल्याबरोबर उठायचं. प्रातर्विधी आटोपून स्नान सूर्यनमस्कार मगच चहा प्यायचा. १२ पैकी ५ नांवे पाठ झाली. अगदी मोठ्याने ॐ मित्राय नमः। म्हणून नमस्कार घातले. आई म्हणाली, 'सोनाराने कान टोचलेले दिसतात.' मला खरा आनंद कोणता झाला सांगू?



बाबा म्हणाले, 'आजींच्या दासबोधाने विलास खूप सुधारला नाही कां? आपण एकदा आजींना घरी बोलावू या. मी म्हटले, नुसते आजींना नको. आम्ही सहा जण आहोत आजींच्या सह, सगळ्यांनाच बोलवूया. आई बाबा हो म्हणाले. हा खरा आनंद. मी मरेपर्यंत नियम पाळणार. स्नान सूर्यनमस्कार मग चहा.'

'छान, छान.' प्रातः स्नानाने बुद्धीवर चांगला परिणाम होतो.' आजी म्हणाल्या. आता राहिली सुधा.

सुधा म्हणाली, 'आजी, आजोबांना डोळ्याचं ऑपरेशन झाल्यापासून नीट दिसत नाही. त्यांनी 'सुधा गीता वाचतेस कां?' म्हटले की 'मला संस्कृत येत नाही. मला वेळ नाही. मला अभ्यास आहे.' एक का दोन हज्जार, सबबी सांगून टाळत होते. पण मी आज त्यांना १२ वा व १५ वा अध्याय वाचून दाखवला खरं तर आजी, मी गीता उघडली १२ वा अध्याय असे पान काढले व मला पाठ आहे म्हणून घडाघड म्हणत सुटले. आजोबांनी शाबासकी दिली. पण म्हणाले सुधे, पाठ असल्यागत घडाघड वाचलेस मग संस्कृत येत नाही का म्हणत होतीस? मला कबूल करणे भाग पडले. मी रोज १२ व १५ वा म्हणेनच पण राज १ अध्याय वाचायला शिकेन. चुकले तर तुम्ही सांगा. खरं बोलण्याचा व रोज वाचेन म्हटल्याचा आजोबांना आनंद झाला. वाड्यातल्या लहान मुलांना १२ वा अध्याय व रामरक्षा शिकवीन.

आजींनी अश्रूपूर्ण नेत्रांनी गुरुदेवांना वंदन केले. 'बाळांनो वाचलेल्या शिकलेल्या दासबोधाचा चांगला परिणाम झाला हं. पुन्हा आज एकच दिवस नव्हे ठरवलेला नियम आयुष्यभर पाळणार आहांत याचा फार आनंद झाला. समर्थ तेच म्हणतात पहा -

***रूप लावण्य अभ्यासितां नये । सहज गुणास न चले उपाये ।***
***कांहींतरी धरावी सोये । अगांतुक गुणाची ।।१४/६/१।।***

आजी म्हणाल्या, 'रूप, सौंदर्य, शरीराचा रंग, ठेवण, हे सारे निसर्गाने दिले आहे. अभ्यास करुनही ते बदलता येणार नाही. पण जे चांगले गुण आपल्यात नाहीत ते जरूर शिकावेत. अंगी बाणवावेत. त्यांचा साठा करावा. समाजाच्या उन्नती करता त्यांचा उपयोग करावा.'

विलास म्हणाला, 'पण आजी, उन्नती पैशाशिवाय होते कां?'

आजी म्हणाल्या, 'याचे उत्तर समर्थांनीच दिलयं बघ. तूच वाच.'

***अंतर्कळा शृंधारावी । नाना परी उमजवावी ।***
***संपदा मेळऊन भोगावी । सावकाश ।।१४/६/१०।।***

आजी म्हणाल्या, 'जाणीव शक्ती सगळयांच्यातच आहे. नाना तऱ्हेच्या ज्ञानांनी ती प्रिपूर्ण भरावी. त्या ज्ञानाचा स्वतःसाठी जनतेसाठी, उपयोग करावा. स्वकष्ट करुनच द्रव्य मिळवावे. त्या द्रव्याचा स्वतः करिता माफक प्रमाणांत उपयोग करावा. बाकीचे समाज सेवेला लावावे.'

जया म्हणाली, 'आजी, नुसत्या द्रव्याने सेवा न करता, अंग मेहनतीने समाजसेवा करता येत नाही कां?'

'कां नाही?' हे बघ न? २१ व्या ओवीतच समर्थ सांगताहेत. वाच तू.

***तनें मनें झिजावें । तेणें भलें म्हणोन घ्यावे ।।***
***उगेंचि कल्पिता सिणावें - । लागेल पुढें ।।१४/६/२१।।***

आजी म्हणाल्या, 'सगळयांचेच जवळ द्रव्य असते असे नाही. शरीर कष्ट, लोककल्याणाची मनापासून इच्छा बाळगून जो वागतो. तो लोकप्रिय होतो. उगाच कल्पना चित्र रंगवत बसण्याने दुःख करायची पाळी येईल. मी यँव करीन टँव करीन या बढाया मारण्याने पण नाश होतो. त्याचे नुकसान तोच करुन घेतो. म्हणून मनुष्याने काय करावे?'

***समजलें आणि वर्तलें । तेचि भाग्य पुरुष जाले ।***
***या वेगळे उरले । ते करंटे पुरुष ।।१४/६/२५।।***

असा आपल्या सहात कोणी करंटा राहील कां सांगा बरं! जे जे अवगुण लक्षात आले. ते तुमचे तुम्ही समजावून घेऊन काढलेत ना? चांगले वागावे हे आपणहूनच ठरवलेत ना? गुण गौरव झाला ना? योग्य बक्षीस मिळाले? आनंद द्विगुणीत झाला न? हेच खरे भाग्य. मोठेपणी मोठे कार्य साधले की मोठे भाग्य मिळेल. तुम्हाला माहीत आहे? महात्मा गांधींना 'बापूजी' म्हणत. परदेशस्थांनी श्री. बापूजी भारत इतका जरी पत्ता लिहिला तरी ते असतील तेथे त्यांना पत्र मिळत असे. हे कशाचे प्रतीक? त्यांचे नाव सर्वतो मुखी झाले हेच खरे भाग्य.'



मधुकर म्हणाला, 'त्यासाठी आत्तापासून काय करावे बरे?'

आजी म्हणाल्या, 'समर्थांच्याच मार्गाने जाऊ या. वाच ते काय म्हणतात.

***सर्व प्रकारें नेमक । शास्त्रोक्त करणें कांहीं येक ।***
***त्याहि मध्यें अलोलिक । तो हा भक्तीमार्ग ।।१४/७/६ ।।***

आजी म्हणाल्या, 'आपल्याला जे कार्य करायचे असेल ते नियमित व शास्त्रोक्त पद्धतीने करावे. उत्कट भक्ती मार्ग अवलंबिला तर आणखीच वाहवा!'

विलास म्हणाला, 'ही उत्कट भक्ती म्हणालांत ती कोणती? कशी?'

आजी म्हणाल्या, 'भक्ती कशी करावी?'

***काया वाचा जीवें प्राणें । कष्टे भगवंताकारणे ।***
***मनें घेतलें धरणें । भजन मार्गी ।।१४/७/८।।***

शरीराने भगवंताकरिता जेवढे कार्य करता येईल. तेवढे करावे. प्रत्येक काम भगवंताचेच करीत आहोत या भावनेने करावे. मधुने आईचे कष्ट कमी केले. जयाने आईचा वेळ वाचवला अशी कामे ही देवपूजाच. वाणी मधूर गोड असावी दुसऱ्याचे मन न दुखवणारी असावी. ज्याच्याशी बोलतो त्याला प्रसन्नता वाटावी. ही भगवंताचीच पूजा. प्राण पणाला लावून कर्म केले की मन भजन मार्गाकडे वळत रहाते. भगवंताचा विसर पडतच नाही.

जया म्हणाली, 'आजी सहजच विचारते हं. असं का वागायचे?'

आजी हसल्या, 'जया समर्थांना नक्कीच कळले होते जया असला प्रश्न विचारेल. मग आजी गांगरतील तेव्हा उत्तर देऊनच ठेवावे -

***जो दुसऱ्यांचे अंतर जाणे । देश काल प्रसंग जाणें ।***
***तया पुरुषा काय उणे । भूमंडळीं ।।१४/७/२८।।***

आपल्या कामात दुसऱ्याने मदत करावी असे स्वाभाविकपणे वाटते ना? त्याची मेख अशी, आपल्या अंतरंगावरून दुसऱ्याचे अंतरंग ओळखावे. न सांगता जाणूनच पडेल ते काम करावे मग दुसरे आपल्या कामात मदत करतातच. ही चतुराई प्राप्त होणे हीच भगवंताची कृपा. यालाच म्हणायचे की भगवंत पाठीशी उभा आहे.

मधुकर म्हणाला, 'पण श्रेष्ठ कोण भक्त की भगवंत? भक्ताने भगवंताची सेवा करायची की भगवंताने भक्ताची सेवा करायची?'

आजी म्हणाल्या, 'छान शंका आहे तुझी. भगवंताने मानवाला बुद्धी दिली. त्या बुद्धीचा योग्य वापर करुन भगवंताला भक्ताने हृदय सिंहासनावर बसवावे. प्रेमाचा झरा जवळच असल्यावर निराधारपणा राहीलच कसा?'

***आधी देवास वोळखावे । मग अनन्य भावें भजावें ।***
***अखंड ध्यानचि धरावें । सर्वोत्तमाचे ।।१४/८/३।।***

विलास म्हणाला, 'हं आलं लक्षात. हा देव म्हणजे मातीचा कृष्ण व धातूचा मारुती नव्हे! हा सर्वोत्तम म्हणजे आपल्याच हृदयांतला आत्मा.'

गणपती म्हणाला, 'आत्मारामाचे भजन म्हणजे नुसते राम राम राम राम सीताराम सीताराम म्हणणे नव्हे. न सांगताच दुसऱ्याचे काम केले की तो आत्माराम प्रसन्न होतो. खाऊ न मागता मिळतो. बाबांचा प्रसन्न चेहरा अजून डोळ्यापुढे येतो. आजी तुम्हाला मी गंमत सांगितलीच नाही. सगळी खोली आवरून झाली. कचरा टाकायला बाहेर गेलो. परत आलो तो काय पाहिले? बाबांनी आईला हाताला धरुनच आणले व अगदी लहान मुलासारखे आनंदून आईला स्वच्छ खोली दाखवू लागले. आईचापण चेहरा उजळला. माझे अंग मळकट घामाजलेले झाले होते तरी तिने मला आपल्या मिठीतच घेतले. पाठीवरून हात फिरवला. अजून जाणवतोय तो स्पर्श.'

आजी म्हणाल्या, 'तो जो आनंद अजून अनुभवतो आहेस न तेच, तेच बरं सर्वोत्तमाचे ध्यान.'

सुधा म्हणाली, 'पण आजी असे जाणून कौतुक करणारी सगळीच माणसे नसतात. चांगलं करुनही कशाला केलंस हे? असं कोणी झिडकारले तर आनंद कसा वाटेल?'

विलास म्हणाला, 'मी म्हणतो की झिडकारणारा माणूसच ना? त्याला ते काम चांगलं का दिसू नये? मग त्याने झिडकारले तर आपण काय करावे?'

'वा! वा! हे बघ समर्थ वचनच वाच.' आजी म्हणाल्या.

***गरळ आणि अमृत जालें । परी आपपण नाहीं गेलें ।***
***साक्षत्वें आत्मयास पाहिलें । पाहिजे तैसें ।।१४/८/१९।।***



आजी म्हणाल्या, ' गरळ म्हणजे विष व अमृत यांची चव एकच असेल कां? आणि कार्य तरी? विषाने प्राण जातो. अमृताने तरतरी येते. दोन्ही स्वभाव धर्माने भिन्न असले तरी द्रवरूपता म्हणजे आपतत्व एकच असते. तसे वागणे भिन्न वाटले तरी त्या देहातल्या आत्म्याला साक्षीत्वाने, तटस्थतेने पाहिले पाहिजे. याला म्हणतात देवास ओळखणे. गुणामुळे त्यांच्या वागण्यात फरक पडला. एकाने कौतुक केले. तो सत्वगुणी, दुसऱ्याने झिडकारले तो तमोगुणी. पण आत्मा एकच. हे जाणले की -

***देह देऊळ आत्मा देव । कोठे धरूं पाहता भाव ।***
***देव वोळखोन जीव । तेथेचि लावावा ।।१४/८/२९।।***

देहरूपी देवळातला देव आत्मा. मग देवळावर प्रेम करायचे की देवावर?

जया म्हणाली, 'देह जन्मतो. देह मरतो. मग देहावरचे प्रेम फुकटच जाणार. आत्मा जन्म घेत नाही म्हणून मरत नाही. त्याच्यावरचे प्रेम खरे.'

आजी म्हणाल्या, 'शाब्बास, अगदी समर्थांच्याच वचनाचा अर्थ सांगितलास,

***जें होतें आणी सवेंचि जातें । तें तें प्रत्ययास येतें ।***
***जेथें होणें जाणें नाही तें । विवेकें वोळखावें ।।१४/९/१५।।***

एकदा का विवेकाने कळले की दृश्य सर्व, त्यांत देह पण आलाच, नाहीसे होणार तरी परब्रह्म शाश्वत रहाते. तोच आत्मा. त्याला अखंड स्मरावे. व काम करावे.'

***खोटें अवघेंचि सांडावें । खरें प्रत्ययें वोळखावें ।***
***मायात्यागें वोळखावे । परब्रह्म ।।१४/९/३०।।***

सुधा म्हणाली, 'आजी आल लक्षात. मी खोटे बोलत होते. चुकारपणा करीत होते. तो खोटेपणा सोडला. खेळाबद्दलची आसक्ती सोडली व आजोबांना गीता वाचून दाखवली. त्यांचा चेहऱ्यावरचा आनंद तोच परब्रह्म. मी समजावे कां?'

'होय', आजी म्हणाल्या, 'आनंद शुद्ध आनंद हे त्या परब्रह्माचे एक लक्षण आहेच. मायेचा त्याग घडल्याशिवाय मात्र तो दिसत नाही.'

***माया दिसे परी नासे । वस्तु न दिसे परी न नासे ।***
***माया सत्य वाटे परी मिथ्या असे । निरंतर ।।१४/१०/१।।***

'आता आलं लक्षात,' मधू म्हणाला, 'खोटे ते खोटेच. जे कधीच नाहीसे होत नाही ते परब्रह्म सत्य. त्याचीच प्राप्ती व्हायला हवी.'

सुधा म्हणाली, 'मधुदादा तो भगवंत हृदयांत आहेच. त्याचा अनुभव यायला हवा. असंच ना आजी?'

'असंच. अगदी अस्संच. येईल हो अनुभव. सगळयांना येईल.'

'मारुतीराया लेकरांना नीट सांभाळ.'

।। जय जय रघूवीर समर्थ ।।

## दिवस २९ वा

आज सगळेजण १० मिनीटे आधीच जमली. अंतरात्मा फक्त माणसांच्याच देहाला सांभाळतो कां? पशू पक्षी प्राणी त्या अंतरात्म्यामुळे संकटातून सुटतात की बुद्धी चातुर्याने?

मधू म्हणाला, 'सुसरीच्या पाठीला मऊ म्हणून स्तुती केली. वानर सही सलामत सुटले बुद्धी चातुर्यानेच.'

जया म्हणाली, 'जाळयात अडकलेली कबुतरे एक शक्तीने उडाली. अगदी जाळयासह उडाली. हे पण बुद्धी चातुर्यानेच.'

विलास म्हणाला, 'ससा केवढा पिटुकला. पण सिंहाला विहीरीत दुसरा सिंह दाखवून चकवलं व आपला प्राण वाचवला. इतरही प्राण्यांना आनंद झाला. हे पण बुद्धी चातुर्यच.'

गणपती म्हणाला, 'कोल्ह्याने माणसाची तर सुटका केलीच. पण वाघाला पुन्हा पिंजऱ्यात अडकवले. वा रे बुद्धी चातुर्य! माणसाला सुचलं नाही ते त्याला सुचले.

सुधा म्हणाली, 'आपले प्राण वाचवलेल्यां कबुतराचे प्राण एक मुंगीने वाचवले. कशी कडकडून चावली पारध्याच्या पायाला. त्यामुळे पारध्याचा नेम चुकला. कबुतर उडून गेले. किती सांगाव्यात चतूरपणाच्या गोष्टी! माणसाची बुद्धी तर याहीपेक्षा श्रेष्ठ. मग या चातुर्याचा उपयोग करुन आपापली उन्नती का करुन घेत नाही? आपण



आजींनाच विचारु या.'

असे म्हणे पर्यंत आजी आल्याच. मुलांची चर्चा माजघरांतून त्यांनी ऐकलीच होती. आता मुले स्वतःचं विचार करु लागली याचा त्यांना आनंद झाला होता. स्थानापन्न होऊन त्या म्हणाल्या, 'विचारा. काय विचारायचं आहे? त्याचे उत्तर दासबोधात सापडणारच.'

विलास म्हणाला, 'चतुराईचा उपयोग करून कोण कसे सुटले या गोष्टींची आम्ही चर्चा करीत होतो. हे चातुर्य माणसांत का नसावे? बुद्धी तर अधिक प्रमाणांत लाभली आहे. बुद्धी चातुर्याचा स्वतःच्या उन्नतीकरिता कां उपयोग करुन घेत नाही?'

आजी म्हणाल्या, 'चांगला आहे प्रश्न,' साधन आहे पण त्याचा उपयोग करता आला पाहिजे ना? समर्थ सांगतात.

***जीव जीवांत घालावा । आत्मा आत्म्यांत मिसळावा ।***
***राह राहों शोध घ्यावा । परांतराचा ।।१५/१/४।।***

ही एक फार मोठी कला आहे! ती आत्मसात करता आली पाहिजे. सर्व जीवंत प्राण्यात जीव, प्राण, आत्मा आहेच. पण जीव जीवांत घालावा हे वागणे. सगळयांचे होते कां? आपल्यावरून जग ओळखून सर्वांशी जर प्रेमाने वागता येईल तर आत्मस्वरूपाने आपण एकच आहोत याचा प्रत्यय येईल. बुद्धी अधिक शुद्ध व सतेज होईल. देहात्म बुद्धीने स्वतःचाच फायदा व दुसऱ्याचे नुकसान असले कर्म होणार नाही. आपल्याशी संबंध असलेले लहान बालक रस्त्यांत पडले तर आपली प्रक्रीया काय होते?'

जया म्हणाली, 'आपण धावत जाऊन त्याचे दुःख निवारण्याचा कसोशीने प्रयत्न करतो.'

आजी म्हणाल्या, 'तेच मूल आपल्याशी संबंध नाही त्यातून झोपडपट्टीतील मूल असेल स्वाभाविकपणे काय होते?'

सुधा म्हणाली, 'फार फार तर हळहळतो. 'अरेरे' १०/१० वेळा म्हणतो. पाडणाऱ्याला दोष देतो. दुःख निवारण्याचा प्रयत्न जातीनिशी होत नाही.'

आजी म्हणाल्या, 'यालाच म्हणतात, आत्म्यात आत्मा घालता आला नाही. माझे तुझे द्वैत गेले नाही. तर परांतराचा शोध कसा घेता येईल? म्हणून शुद्ध भक्तीने

आधी स्वतः मधला देव शोधून तोच सर्वत्र पहायचा अभ्यास आवश्यक. समर्थ पुढे काय म्हणतात बघ. गणपती आता तू वाच.'

***आचार विचारें विण । जें जें करणें तो तो सीण ।***
***धूर्त आणि विचक्षण । तेचि शोधावें ।।१५/१/२४।।***

शुध्द आचरणावर समर्थांचा फार भर. आचरण म्हणजे वागणूक अगदी कसं धुतलेल्या तांदळासारखं. तारतम्य ठेऊन वागायला हवे. विवेक विचाराची साँगड घालून जर आपण चांगले वागलो नाही तर जे कर्म करू ते वाया जाईल. श्रम फुकट जातील. म्हणून धूर्त, दूरवर विचार करणारांनी चातुर्याने वागणारांची संगत धरावी.

जया ज्ञान ग्रहण करीत असता वृत्ती कशी असावी ? तूच वाच.

***वेष धरावा बावळा । अंतरी असाव्या नानाकला ।***
***सगट लोकांचा जिव्हाळा । मोंडू नये ।।१५/१/३१।।***

बाह्य वेष अगदी साधा असावा आतून मात्र नाना कला जोपासांव्यात.

कलाहीन मनुष्य म्हणजे पशूच. या कलेमुळे आपला नावलौकीक तर वाढतोच अनेक लोकांशी आपला जिव्हाळ्याचा संबंध येतो. सर्वांची अंतःकरणे जिंकण्याची कला आत्मसात करता येते. जगांत सर्वांशी मैत्री असावी. त्यामुळे काय होते. तूच वाच विलास.

***याकारणें ज्ञान दुल्लभ । पुण्यें घडे अलाभ्य लाभ ।***
***विचारवंतां सुल्लभ । सकल कांही ।।१५/२/१२।।***

'बाळांनो,'आजी म्हणाल्या, ' समर्थ याकरणे असे कां म्हणतात बरे ? पोटापाण्याचे मागे लागला धर्म बुडला. पैसा मिळतो म्हणून लोकांनी इस्लाम धर्म स्विकारला. युध्दाकरता लष्करांत माणसांची भरती होऊ लागली. हरि कीर्तने पोटासाठी होऊ लागली. बेबंदशाही माजली. ज्ञानाचा लोप झाला. संमर्थांचा जीव तीळ तीळ तुटत होता.खरे ज्ञान दुर्लभ झाले याचे त्यांना वाईट वाटत होते. जे पुण्यवान असतील त्यांनाच खऱ्या ज्ञानाचा लाभ होईल हे वचन आजही खरेच आहे. पैशाची सुबत्ता असली तर ज्ञानाची आवश्यकताच काय असे समाजांत म्हणणारी माणसे फार. विचारी विवेक संपन्न माणसांना सर्व कांही सुलभच. मग ब्रह्मज्ञान मिळवणे सुध्दा सुलभच असे समर्थ ठासून सांगतात.



बाळांनो समर्थ नुसते सांगून गप्प बसले नाहीत. समाज सुधारावा म्हणून या गोड व अत्यावश्यक प्रचाराकरिता शिष्य तयार केले. त्यांनी काम कसे करावे हेही पण सांगायला कमी केले नाही.

***उदंड करी गुप्तरूपे । भिकाऱ्या सारिखे स्वरूपें ।***
***तेथें येश कीर्ती प्रतापें । सीमा सांडिली ।। १५/२/२१।।***

लोक जागृतीचे कार्य करायचे पण वल्गना नको. भिकाऱ्यासारखे म्हणजे मलीन फाटके कपडे घातलेले नव्हे. छान छोकी नको. साधे स्वच्छ कपडे असावेत पण बडेजाव नको. मग कार्यात यश येतेच. कीर्ती वाढत, कामाचा आवाका वाढतो कारण काय माहीत आहे ? मधू तू वाच.

***शाहाण्यास कोणीतरी बाहती । मूर्खास लोक दवडून देती ।***
***जीवास आवडे संपत्ती । तरी शाहणे व्हावें ।।१५/३/२४।।***

मधूनेच अर्थ सांगितला, 'शहाणे हुशार चतूर अशी माणंसे सगळ्यांनाच हवी वाटतात. त्यांना कोणीही बोलावतात. सन्मान राखतात. मूर्खाला कोण विचारतो? आळशी निरूद्योगी त्याला हाकलून लावतात. ज्याला खरीच संपत्ती हवी असेल त्याने शहाणे व्हावे. ही संपत्ती दासबोधातली. पैसे नव्हेत. विवेकाने शहाणा होता त्यालाच समाधान संपत्ती मिळते.

' शाब्बास छान सांगितलास अर्थ. ' आजी म्हणाल्या

विलास म्हणाला,' आजी जो असा शहाणा होण्याचा प्रयत्नच करीत नाही.त्यांच्या बद्दलही समर्थ काही म्हणाले असतीलच की! 'हो तर!' आजी म्हणाल्या ही बघ ओवी.

***आपले हित न करी लौकिकीं । तो जाणावा आत्मघातकी ।***
***या मूर्खा येवढा पातकी । आणिक नाही ।।१५/३/२७।।***

आजी म्हणाल्या,' मनुष्य देह मिळून सुध्दा जो स्वतः उत्कर्ष साधू शकत नाही तो लोकांचा तरी उत्कर्ष कसा साधेल ? त्याला स्वतःचेच स्वतः अकल्याण करणारा म्हणावे. आपल्याच पायावर आपण धोंडा पाडून घेतो. अशा पापी माणसारखा दुसरा पापी नाही कोणी. त्याचे संगतीत सुध्दा कोणी राहू नये.

विलास म्हणाला,' आजी हित साधायचे म्हणजे नुसते परीक्षा पास होऊन

वरच्या वर्गात जायचे असे समर्थांना नक्कीच म्हणायचे नसेल. मग हित म्हणजे ज्ञान मिळवणे कां? ज्ञान म्हणजे खऱ्या देवला ओळखणे ना?

आजी म्हणाल्या,'होय शालेय परीक्षा उत्तीर्ण होणे हे एक अंग आहेच तेथे चुकारपणा नकोच. पण अध्यात्म ज्ञानाची गोडी याच वयांत लागावी, समर्थ अगदी तेच सांगातात. सुधा तू वाच.

***तै परब्रह्म जों कळेना । तो जन्ममृत्यू चुकेना ।***
***चत्वार खाणी जीव नाना । होणें घडे ।।१५/४/२४।।***

मोट्ठा देव, थोरला देव कोण हे जोपर्यंत कळतं नाही तो पर्यंत जन्म मृत्यू रहाट गाडगे सुरूच.

विलास म्हणाला,'पण आजी चत्वार म्हणजे चार कळतं पण खाणी म्हणजे दगडी कोळसा, लोखंड, सोने आणी चौथी?'

गणपती म्हणाला,'वेडबंबू ! या खाणी नव्हेत. या भूगोलातल्या आपण मागे नावे शिकलो स्वेदज, अंडज, उद्‌भिज जारज. विसरलास कां?'

आजी म्हणाल्या,' विसरू दे पुन्हा सांगते - घामापासून तयार होतात ते स्वेदज, अंड्यातून उत्पत्ती ते अंडंज, जमीन पाणी यांच्या संयोगाने अंकूर फुटतात ते वृक्षवेली उद्‌भिज, वारेने वेष्टिलेले ते जारज. अशी चार प्रकारची जीव सृष्टी भगवंताच्या आज्ञेने ब्रह्मदेवाने उत्पन्न केली.

'आजी,' विलास म्हणाला, 'परब्रह्म म्हणजे नक्की कोण कसे? हे ज्ञान मिळवले नाही तर पुन्हा सर्व योनी फिराव्या लागतात त्या कशा?'

'सांगते.' आजी म्हणाल्या, 'ज्ञान झाले की मनुष्य साधना करण्याची सोडतच नाही. त्यामुळे हळूहळू वासना शुद्ध होतात. पण जर आत्मज्ञान झाले नाही तर निश्चितपणे देह सोडतांना कोणत्या ना कोणत्यातरी वासनेत जीव अडकतो. त्या वासनेपूर्तीसाठी पुन्हा उच्च किंवा नीच योनीत जावे लागते. जरा गंमत म्हणून सांगते. समजा मला देह सोडता सोडता दूध प्यावेसे वाटले. तुझ्याजवळ मागितले. तू ते देत नाही म्हणालास. दुधाची इच्छा असतानाच प्राण गेला तर दुधाच्या वासनेकरिता मला चोरून दूध पिणाऱ्या मांजराचा जन्म येईल. कर्म धर्म संयोगाने मरता मरता तुझ्या बद्दलचा द्वेषाचा भाग



तसाच माझे ठिकाणी राहील.

आता अशाच काही कारणाने तू उंदीर झालास, चिमणी झालास तर हे मागचे उट्टे काढण्यासाठी मी संधी शोधत राहीन व तुला मारून तुझा नाश करीन. पुन्हा तेथेही वासना सोबत असणारच. सूक्ष्मरुपांत असलेली ही वासना शुद्ध करायची म्हणून अखंड नाम घेऊन समाधानी रहायचे.'

गणपती म्हणाला, 'जन्म मृत्यू वासना पुन्हा जन्म हे चक्र कधी संपते? आणि मनुष्य देह मिळतो केव्हा? मनुष्य देहांत मागचे पुढचे वैर साधणारे कोणी असतात की नसतात?'

आजी म्हणाल्या, 'छान विचारलेस. सतत नामस्मरणाने वासना क्षीण होतात. शुद्ध होतात. मनुष्य देहातच नाम घेणे, ज्ञान मिळवणे शक्य आहे. इतर योनीत बुद्धी असते. पण ती देह सांभाळण्यासाठी वापरली जाते. पापात्मक व पुण्यात्मक दोन्ही कर्मे घडत रहातात. पाप पुण्य समान झाले तर मनुष्य योनी मिळते.

मागच्या जन्मातली कर्मफले भोगावीच लागतात. मग तू विचारलेस तसे जन्मापासून वैर साधणारे वा प्रेम करणारे जीव एकमेकांच्या सन्निध येतात. ईश्वरी योजना या सदरांत कर्मे होतच रहातात. म्हणून शहाण्या माणसाने काय करावे?'

***लोकांचे बोलीं जो लागला । तो अनुमानेंच बुडाला ।***
***या कारणें प्रत्ययाला । पाहिलेच पाहावें ।।१५/४/३१।।***

विषयी लोकांच्या बोलण्याप्रमाणे वागून जगणारा पार बुडतो. अनुमान म्हणजे तर्क. तर्काने उद्धार होत नाही. खऱ्या देवाच्या कृपेचा स्वतःला प्रत्यय यायला हवा. खरा प्रत्यय ज्ञानी तो चतूर. स्वतः अनुभव पडताळून पहातो तो शहाणा. त्यालाच म्हणतात अंतर्निष्ठ. हे बघा समर्थांचे म्हणणे. जया तू वाच आता -

***अंतर्निष्ठांची उंच कोटी । बाहेर मुद्रयाची संमती खोटी ।***
***मूर्ख काये समजेल गोष्टी । शाहाणें जाणती ।।१५/५/१९।।***

आजी म्हणाल्या, 'आल लक्षांत? जे आत्मज्ञान करुन घेऊन वागतात. ते उच्च प्रतीचे भक्त समजावेत. ते खरे साधक. जे दृश्यावरच प्रेम करतात, विषय माझ्याचसाठी आहेत म्हणून विषय सेवन करतात स्वत;च्या देहसुखासाठी दुसऱ्याची पर्वाही करीत

नाहीत त्यांच्या वाऱ्यालाही उभे राहू नये.

वानराला कळले 'मगरीला फळे मिळवून दिली. तरी तिची बुद्धी खोटी ती मलाच खायला निघाली.' म्हणून चतुराईने चक्क खोटे बोलून झाडावरचे काळीज आणून देतो म्हणाला. मगराच्या पाठीवरूनच पाण्याबाहेर आला. अशा दुष्टांची संगत नकोच त्याला कळले.

केवळ मी मोठा हा अहंकार पोसला म्हणून सिंहाचे काय झाले? सशाच्या बोलण्याचा पडताळा पहाण्यासाठी विहिरीपाशी आला विहिरीत डोकावून गुरगुरला. आवाज चांगलाच घुमला म्हणून द्वेषाने सिंहाला मारण्यासाठी उडी घेतली पण काय झाले? तोच नाश पावला.

छान छान गोष्टी वाचून त्यावर मनन करावे. चातुर्याने कसे वागतात? कोणाच्या वागण्याने काय झाले? कोणाचे वागणे कसे स्वार्थाचे? कोणाचे परोपकाराचे? असे चिंतन करावे. सार लक्षात ठेवावे. तसे चांगले आयुष्यभर वागावे.

'आजी, यालाच समर्थ म्हणतात कां आगांतुक गुणाची करी सोये बरोबर ना?' विलास म्हणाला.

'अगदी बरोबर' आजींनी शाबासकी दिली. सर्वांनीच तसे वागू या म्हणून टाळी वाजवली. मारूतीरायाला नमस्कार केला.

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**

## दिवस ३० वा

मुले जमली. आजी पण आल्या. मधू तावातावाने म्हणाला, 'सुधा, माझं नांव सांगणार होतीस ना? सांग ना आत्ता आजींना.'

सुधा म्हणाली, 'मग काय भीते कां तुला? सांगीनच.' आजी, असा छान दासबोध अभ्यासता अभ्यासता खोटं वागण्याचा मोह टाळावा की नाही! तर मधुदादा पहा काय म्हणतो -

आम्ही सकाळी म्हणी पूर्ण करायच्या असा खेळ खेळत होतो. मी अर्धी म्हण



सांगितली की त्याने पूर्ण करायची. त्याने सांगितली की मी पूर्ण करायची. उदा. 'एक हात लाकूड' मी सांगितलं की त्याने 'सात हात ढलपी' असं पूर्ण करायची. खेळ खूप रंगला

मी म्हटलं 'ऐकावे जनाचे' तो म्हणाला, 'करावे मनाचे'. म्हण बरोबर पूर्ण केली. त्याबद्दल वाद नाही. आमचा वाद असा जर दुसऱ्याचे ऐकून मनासारखे केले तर फसवल्यासारखे होत नाही कां? तो म्हणतो, 'नाही होत.' दुसऱ्याला जरूर विचारावे पण तसेच वागावे असे कोठे आहे? आपल्याला आवडेल ते करावे. मी त्याला खोटारडा म्हटले. मग चुकले का माझे?'

आजी म्हणाल्या, 'सुधा, थोडा विचार करावा. दुसऱ्याला काय विचारले? सांगणारा कोणत्या पात्रतेचा? सांगितले ते योग्य की अयोग्य? तसे वागलो तर हित की अनहित? हा विचार करायलाच हवा. विचार केला नाही तर अर्धवटाचे काम फसते. जर अनुभवी माणसाने सांगितले असेल तर जरुर त्यांचे ऐकावे. 'उन्हात न खेळता आपण दासबोध वाचू या' हे ऐकलंत आजचा ३० वा दिवस. कसे आनंदात दिवस जात आहेत. या ठिकाणी तुझे मत बरोबर. ऐकावे जनाचे आणि तसेच वागावे. पण जर हितकारक गोष्ट नसेल तर करावे मनाचे हेच बरोबर. म्हणजे परवा गणपतीने भावाला पुस्तके वाचायला दिली व आपण इकडे आला. हे त्याने मनाचे केले. भावाचे ऐकून क्रीकेट खेळायला गेला नाही.

विवेकी माणसाने कसे वागावे? हे मधूचे म्हणणे बरोबर. म्हणून ते खोटे ठरत नाही. समर्थ तेच सांगतात बघ.

***उदंडाचें उदंड ऐकावें । परी तें प्रत्ययें पहावें ।***
***खरें खोटें निवडावें । अंतर्यामी ।।१५/६/११।।***

बुद्धी कुशल करायची ती खरे खोटे ठरवण्यासाठीच. दुसऱ्याच्या म्हणण्याचा प्रत्यय काय येईल? याचा विचार करावा व अनुभवाअंती विश्वास ठेवावा. व वागावे. नाहीतर मार्ग सोडून द्यावा. पुष्कळ वेळा प्रसंग पाहून दुसऱ्याचे ऐकून मन सांभाळावे लागते. आणि ही कसरत बायकांनाच फार करावी लागते. दुसऱ्याचे ऐकून कामाचा विचका होता उपयोग नाही. मने दुखावली तर वाकडेपणा वाढीस लागतो. मत्सरी वृत्ती फोफावते. समर्थांनी तो पण इशारा दिला आहे बघ.'

***अंतरी पीळ पेंच वळसा । तोचि वाढवी बहुवसा ।***
***तरी मग शाहाणा कैसा । निवऊ नेणे ।।१५/६/१४।।***

खरा शहाणपणा हाच. एकमेकाबद्दल मन स्वच्छ राहील असे करावे. मन पारदर्शक ठेवावे. वाकडेपणाने वाकडेपणाच वाढतो. मग समाज कल्याणाचे काम शांतपणे कसे करता येईल?

विलास म्हणाला, 'हा शहापणा कायम टिकावा म्हणून काय करावे?' आजींनी त्यालाच ओवी वाचायला दिली.

***प्रसंग जाणोनी बोलावें । जाणपण कांहींच न घ्यावें ।***
***लीनता धरून जावें । जेथें तेथें ।।१५/६/२५।।***

आजी म्हणाल्या, 'कार्य करायचे म्हणजे दुसऱ्याशी संबंध येणारच. मान अपमान झाला, अपशब्द ऐकला तरी शांत राहून सहन करुन प्रसंग पाहून मानावे. किंवा हसण्यावर घालवावे. पण काम साधावे. यश मिळाले तरी मोठेपण आपलेकडे घेऊ नये. आपण कोठेही गेलो तरी लीन पणानेच वागावे. असे केल्याने लोकांची पारख करता येते कोणाच्याही गुणावगुणांचा स्पष्ट उल्लेख करु नये. पण मनांत जाणून असावे. गणपती आता तू वाच -'

***बहुतीं कांहीं तरी सापडें । विचक्षण लोकी मित्री घडे ।***
***उगेच बैसतां कांहींच न घडे । फिर्णे विवरणें ।।१५/६/२५।।***

आजी म्हणाल्या, 'पुष्कळ माणसांशी संबंध आला की कोणाजवळ तरी घेण्यासारखा एखादा तरी गुण असतोच की नाही? तो जरूर घ्यावा. सद्‌गुणांची खाणच आपल्याला व्हायचंय. पुष्कळांशी मैत्री आयुष्यांत फार उपयोगी पडते. माणसे जोडायची कठीण असतात. तोडायला वेळ लागत नाही. यासाठी एके ठिकाणी बसून कसे चालेल? वेगवेगळया भागात फिरावे. जया आता ३० वी ओवी बघ -'

***जो बहुतांचे पाळण करी । तो बहुतांचे अंतर विवरी ।***
***धूर्तपणे ठाऊके करी । सकळ कांहीं ।।१५/७/३०।।***

आजी म्हणाल्या, 'ही फार मोठी चांगली कला आहे. हं! सगळ्यांना सामावून घेणे. अंतःकरणाचा ठाव घेऊन कोणाचे मन न दुखवता त्यांना एकाच कार्याला लावायचे



किंवा आपले कार्य साधून घ्यायचे. सगळी बित्तं बातमी करुन घ्यायची. आपले सर्वांगीण ज्ञान वाढीस लागले पाहिजे.

बाळांनो, काहींना ज्ञान खूप असते. पण आयत्यावेळी सुचत नाही किंवा आठवत नाही?'

विलास म्हणाला, 'या आठव नाठव यावरून समर्थांनी तीन वर्ग केले. तूच पहा विलास.'

***स्मरण म्हणजे देव । विस्मरण म्हणजे दानव ।***
***स्मरण विस्मरणें मानव । वर्तती आता ।।१५/१०/२५।।***

विलास म्हणाला, 'म्हणजे माझ्या सारखे. ठीक आहे देव नाहीतर नाही. पण दानव नाही हे बरे. आता सतत स्मरण रहावे म्हणून प्रयत्न व्हायला हवा. अगदी पूर्ण ज्ञानी असं जगात कोणी आहे कां? म्हणजे असेल कां असं मला म्हणायचं आहे?

'छान शंका आहे तुझी.' आजी म्हणाल्या.

***ज्ञानी येक अंतरात्मा । सर्वांमध्ये सर्वात्मा ।***
***त्याचा कळावया महिमा । बुद्धी कैचीं ।।१५/८/२५।।***

परमेश्वर ही सर्वात अधिक ज्ञानी शक्ती. सर्वांचे ठिकाणी आत्मरुपाने तोच वावरतो. परमेश्वराचा महिमा कर्तृत्व समजण्याकरिता बुद्धी सूक्ष्म असावी लागते. ती फारच थोड्यांना लाभते.

मधुकर म्हणाला, 'तशी बुद्धी लवकर तयार व्हावी म्हणून काय करावे?'

आजी म्हणाल्या, 'समर्थच सांगतात बघ त्याचे उत्तर? वाच तू.

***उगेचि कासया तंडावें । मोडा अहंतेचे पुंडावे ।***
***विवेके देवास धुंडावें । हें उत्तमोत्तम ।।१५/८/४०।।***

कळलं उत्तर? आजी म्हणाल्या, 'उगीच शब्दच्छल करीत बसण्यांत बुध्दीची शक्ती वाया घालवू नये. अहंकाराचा बंडखोर पणा मोडून काढावा. म्हणजेच अहंकाराच्या वर्चस्वाने नाशच होतो. म्हणून विवेक जागा ठेवून खऱ्या देवाचा शोध घ्यावा. हे उत्तम. याचसाठी हा मानव देह आहे. बाळांनो, पण काय होते माहीत आहे कां? जो सर्व श्रेष्ठ

म्हणजे वडिल आहे त्याला ओळखता येत नाही. म्हणून समर्थांनी एक युक्ती केली. एक फळ शिष्यासमोर ठेवले. फळाहून वडिल म्हणजे श्रेष्ठ कोण? फूल. फुलाहून वरिष्ठ पाने. पानाहून वरिष्ट फांद्या फांद्यांचा खरा विस्तार कोणामुळे? झाडांच्या मुळयामुळे. म्हणून मुळया श्रेष्ठ. मुळया वाढल्या कोणामुळे? पाण्यामुळे. म्हणून पाणी श्रेष्ठ. जमीनीमुळेही मुळया वाढल्या. पण जमीन पाण्यातूनच तयार झाली. म्हणून पाणी श्रेष्ठ.

गणपती म्हणाला, 'पुढचं मी सांगतो. आप तेजातून निर्माण झाले. म्हणून तेज श्रेष्ठ. तेज वायूतून आले. म्हणून वायू श्रेष्ठ. वायू आकशामुळे हालचाल करु लागला - - - '

आजी म्हणाल्या, 'कोणाच्या सत्तेने?'

'अंतरात्म्याच्या सत्तेने.' विलास म्हणाला, 'म्हणून अंतरात्मा श्रेष्ठ म्हणजे सुधाचे लक्ष दासबोधांतच होतं. ती म्हणाली, 'आजी ही बघा ओवी.'

***सकळां वडिल अंतरात्मा । त्यासि नेणे तो दुरात्मा ।***
***दुरात्मा म्हणजे दुरी आत्मा । अंतरला तया ।।१५/९/१८।।***

बाळांनो, आपल्याला आज शब्दाने कळलंय. वर्षभरांत साधना करता करता अनुभवाने कळले तर आपण दुरात्मा होऊ कां?' आजींनी विचारले.

'नाही, मुळीच नाही. दुरात्मा होणे नाही.' विलासने अर्धवट उठूनच उत्तर दिले. 'पण त्यासाठी रोज काय करायचे माहीत आहे?' आजी म्हणाल्या. त्यांनी मधुला वाचायला सांगितले.

***नारायेण असे विश्वीं । त्याची पूजा करीत जावी ।***
***याकारणे तोषवावी । कोणीतरी काया ।।१५/९/२५।।***

'आजी,' मधू म्हणाला, 'नारायण म्हणजेच अंतरात्मा कां? तो सगळ्या विश्वाला व्यापून आहे. तसा आपल्या शरीरांत पण आहे. मग पूजा म्हणजे गंध फूल वाहून नव्हे ना? ज्या ज्या देहाला आपण अन्न पाणी वा गरज असेल ती वस्तू देतो तो आनंद आत्म्यापर्यांत जाऊन पोहोचतो. म्हणून आपला देह वगळून दुसऱ्या कोणत्याही देहाची सेवा केली तरी ती आत्म्यापर्यंत जाऊन पोहोचते. हीच खरी नारायणाची पूजा. म्हणजे जो भेटेल त्याच्यावर देव म्हणूनच प्रेम करायचे. असेच ना?'



आजी म्हणाल्या, 'अगदी बरोबर. जे जे भेटे भूत - - - '

गणपती म्हणाला, 'ते ते मानिजे भगवंत.'

आजी हसल्या. 'ठीक. यालाच खरी उपासना म्हणतात. नुसते देवघरांत देवाच्या समोर आसन टाकून बसणे म्हणजे उपासना नव्हे. किंवा ठराविक प्रार्थना ठराविक वेळी म्हणणे सुद्धा उपासना नव्हे. कोणाचेहि अंतःकरण न दुखवणे म्हणजे उपासना. सर्वांना आपलाच मानणे व तसे वागणे म्हणजे उपासना. आपल्या बाळाचा घाम आई आपल्या पदराने पुसते. पण दुसऱ्या मुलाचा घाम पुसायला त्याच्याच सदऱ्याचे टोक घेते. इतकाही दुरावा नको. ती खरी उपासना. एकपणाने सर्वत्र पहाणे. हा अंतरात्म्याचा खेळ जो कोणी रोज पहायला जाईल तो अंतरात्म्याशी तदाकारच होऊन जाईल. जया ... च्या १० वा समास काढ वाच ही ओवी.'

***विवरतां विवरतां शेवटीं । निवृत्तीपदी अखंड भेटी ।***
***जालीयाने तुटी । होणार नाही ।।१५/१०/८।।***

आजी म्हणाल्या, 'त्या थोरल्या देवाची जो जो सेवा करावी, चिंतन करावे तो तो साधक निवृत्तीपदाला पोहोचतो. लोभातून, मोहातून, मायापाशातून दूर होतो. तदाकार होतो. अखंड तीच अवस्था अनुभवता येते. म्हणजेच भगवंताची व आपली कधीच ताटातूट होत नाही.'

विलास म्हणाला, 'आजी सगळे हसतील. पण खरं तेच सांगतो. इथून घरी गेलो तरी आजी बोलतच आहेत. आपण सहाही जण असेच अभ्यास करीत आहोत असे ... झोपतांना पण दिसते. पाहता पाहता कधी झोप लागते ते कळतच नाही. परवा तर ... सांगतो. मी सांगतो.' म्हणतच उठलो. आई जवळच होती. 'काय सांगतोस? तुला स्वप्न पडतंय काय? कोणाला सांगतोस? मी खरा जागा झालो. आजी मी झोपेतून जागा झालो. पण खरा जागा होईन का हो?'

विलास आजींच्या पाणावलेल्या डोळयाकडे पहातच राहिला. त्याचे ही डोळे पाणावले होते. बाकीचे सारे स्तब्ध होते

आजी म्हणाल्या,

***'जगदीश बोलल्यावरी । तेथे कोण अनुमान करी ।***
***आता असो हे, विचारी । विचार जाणती ।।१५/१०/१७।।***

एकदा कां भगवंताने प्रसन्न होऊन कृपा केली, की नुसते तर्क करीत कोण बसेल? कल्पनेच्या भराऱ्या कोण कशाला मारील? विचारवंताला हा विचार सहज समजतो.'

मधुकर म्हणाला, 'आजी, हा अनुभव सगळ्यांनाच लवकर यावा म्हणून काय करावे? दोन क्षणापूर्वी विलास नेहमीचा वाटला नाही. तुम्ही पण त्याच्या कडे पहात होतात ते पहाणे पण मला नेहमीचे वाटले नाही. काहीतरी वेगळे वाटले. दोघांच्याही डोळ्यांत पाणी का आले? वेगळे म्हणजे काय वाटले ते मलाही सांगता येणार नाही.'

आजी गोडसं हसल्या, 'मधू -

***शाश्वतास शोधीत गेला । तेणे ज्ञानी साच जाला ।***
***विकार सांडून मिळाला । निर्विकारीं ।।१५/१०/२५।।***

शाश्वत कोण ते कळले ना? सगळ्यांनी मूकपणेच माना डोलावल्या.

असा शाश्वताचा शोध घेता घेता विकार रहित अवस्था होते. सारे चंचल विश्व मागे रहाते. व निर्विकारी ब्रह्माशी तदाकार होता येते. रोज अभ्यास हवा. नुसता अभ्यास असून उपयोग नाही. आपण स्वतः पूर्णत्वाला जाऊन पोहोचावे व उर्वरित आयुष्यांत काय करावे? सुधा तू वाच.'

***उपासनेचे उत्तीर्ण व्हावे । भक्तजन वाढवावे ।***
***अंतरीं विवेकें उमजावें । सकळ कांहीं ।।१५/१०/३३।।***

आजी म्हणाल्या, 'जी उपासना करुन आपण ब्रह्मज्ञान प्राप्त करुन घेतले. त्या उपासनेचे ऋण फेडणे आवश्यकच. पैशाचे ऋण पैशाने फेडतात. ज्ञानाचे ऋण ज्ञानाने फेडायचे? आपल्या परिसरांत भक्तीमार्ग वाढीस लागेल. असे करावे. सदाचाराने वागून संघटना शक्ती वाढवावी. आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी करायलाच हवा. जो स्वस्थ बसला तो फसाला. 'जनकल्याण' हे एकच ध्येय असावे. सर्वांचे सेवेचे मार्ग भिन्न भिन्न असतील. पण जीवनांत ध्येय ठरवून वागावे. सध्या आपण थोडेसे तसे करतोच आहोत नाही कां?'

सर्वांनी 'हो' म्हटले.

मधुकर म्हणाला, 'आजी, दर ६/६ महिन्यांनी नवीन नवीन कांही भर घालून आम्ही आणखी कांही चांगल्या सुधारणा करु. शिक्षण घेता घेता जेवढे जमेल तेवढे



तुमच्या देखरेखीखाली करुच.'

'शाब्बास' आजी म्हणाल्या. मारुतीराय आहेतच आपल्या पाठीशी.

महारुद्र हनुमान की जय

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**

## दिवस ३१ वा

मुले जमली. सुधा जया जोडी पण आली. गल्लीत नुकताच नंदीबैल येऊन गेला होता. नी बैलाचा मालक त्याला प्रश्न विचारी. बैल कधी कधी होकारार्थी मान हलवी तर कधी नकारार्थी मान हलवी. कांही उत्तरे बरोबर असत तर कधी भलत्याच उत्तराकरिता मान हलवली तर त्याला लहानसा फटका मिळे. बैलाला खरंच कांही कळत होत कां? की दोरीच्या इशाऱ्यावरून मान हलवी. त्यावरून सांगतो ते ज्योतिष तरी बरोबर असतं कां? अशी भविष्यवाणी खरी ठरली तर जीवन सुखकर होईल कां दुःखदायक होईल? चर्चा तर अगदी रंगात आली होती. की आजी केव्हा आल्या ते लक्षातच आले नाही.

आजी आपल्या जागेवर बसल्या. 'बाळांनो सगळीच भविष्ये खरी ठरत नाहीत. अचूक भविष्ये सांगणारी माणसे थोडीच असतात. पण एक विश्वास बसणारच नाही अशी घटना ऐकलीत कधी. रामावतार व्हायच्या आधीच संपूर्ण रामकथा रचणारा कवी. नांव ऐकलंत त्यांचं? त्यांनी रचलेल्या कथेप्रमाणेच रामावतारांत घटना घडल्या. त्यांची भविष्यवाणी. तंतोतंत खरी ठरली. कोण बरं ते ऋषी?'

मधुकर म्हणाला, 'सामान्य कवी नव्हे तो! वाल्मीकि ऋषी त्यांचे नांव. आजी त्यांचे चरित्राचे पुस्तक मी नुकतेच वाचले. मुळांत ते ऋषी कुळातले नव्हतेच.

विलास म्हणाला, 'मग रामायणासारखे मोठे महाकाव्य कसे रचता आले त्यांना?'

मधुकर म्हणाला, 'लुटमार करणारा हा वाल्या. पण उद्धाराचा काळ जवळ आला. भाग्य त्याचे की नारद मुनींशी गाठ पडली.'

सुधा म्हणाली, 'सत्संगाचा महिमाच असा. त्यांनी वाल्याला रामनाम घ्यायला सांगितले. म्हणून एवढे परिवर्तन घडले.'

जया म्हणाली, 'राम नामाचा महिमा हे खरे. पण मुख्य गोष्ट वाल्याला पापाचं फळ भोगावे लागेल ही भीती. म्हणून तो तयार झाला.'

गणपती म्हणाला, 'भीतीपेक्षा त्याला उपरती झाली म्हटले तर? या पापाचे वाटेकरी सर्वच कुटुंबीय होणार या भ्रमांत तो होता. बिनादिक्कत तो माणसे मारत होता. खरं तर घरच्या लोकांचीच कृपा म्हणायची. सगळयांनीच जेव्हा 'आम्ही पाप कशाला भोगू? तुझं कर्तव्यच होतं आम्हाला पोसायचं.' असं ऐकवलं म्हणूनच त्याचे डोळे खाडदिशी उघडले.

विलास म्हणाला, 'पण आजी इतका दुष्ट वृत्तीचा वागणारा माणूस एकाएकी निश्चल कसा बसू शकला? त्याच्या वृत्तीची धरसोड झाली नाही हे नवलच नव्हे कां?'

आजी म्हणाल्या, 'यालाच अंतरात्म्याची कृपा म्हणतात. नारदांचे बोलणे धीराचे स्पष्ट पण मृदू. ह्रदयाचा ठाव घेणारे म्हणून. 'राम म्हणता येत नसेल तर मरा मरा म्हणता येते ना? चालेल. तसेच म्हण. पण निर्धाराने म्हण. निष्ठेने म्हण. विश्वास ठेव माझ्यावर.'

नारदांचा आशिर्वाद हा भगवंताचाच आशिर्वाद होता. निष्ठेने नाम घेतल्याने दृश्यावरचे प्रेम एकाएकी उडाले व नामाशी एकरूप झाले अंगावर मुंग्यांनी वारूळ रचले तरी देहात्मबुद्धी सुटलेला वाल्या निवांत होता. ठराविक मर्यादेपर्यंत नाम गेल्यावर ईश्वरी कृपा म्हणजेच शरीरातील अमृत तत्व शरीरभर पसरले. रक्तातील दोषात्मक भाग पूर्ण जळला. खाक झाला. वाल्या आतून बाहेरून शुद्ध झाला. त्याला लोक वाल्मीकि म्हणू लागले. रामायण रचले गेले. एक महाकाव्य -

***उफराटें नाम म्हणतां वाचें । पर्वत फुटले पापाचे ।***
***ध्वज उभारले पुण्याचे । ब्रह्मांडा वरूते।।१६/१/९।।***

महाप्रलय होईपर्यंत घरोघर रामायण वाचले जाणार. अनेक कवींनी आपापल्या परी रामकथा गाइली तरी वाल्मीकि रामायण अजरामरच राहणार. वाल्मीकीचा देह गेला तरी तो अजून ग्रंथ रूपाने आहेच ना?'

विलास म्हणाला, 'माणूस मारला की खडा रांजणांत टाकावा असे सात रांजण भरले होते म्हणे. ते फक्त 'मरा मरा' चे 'राम राम' आपोआप झाले व एवढे परिवर्तन



घडून आले. आता मला असं म्हणायचं आहे की इतकं ज्वलंत उदाहरण डोळयापुढें असतांना, वाल्मीकीची कीर्ती गातांना मनुष्य मात्रांच्या मुखातून ते नाम का येत नाही? शंका पोरकट असेल पण शंका आहे की सरकारी नियमच जर केला की इतके नाम घेतलेच पाहिजे तर होणार नाही कां? सगळया राष्ट्राचा उद्धार होईल की! दुष्ट वृत्ती औषधाला सुद्धा रहाणार नाही.'

'विलास,' आजी म्हणाल्या, 'नाम जबरदस्ती करुन घेतले तर त्याचे फळ मिळणार नाही. कारण त्यात जिव्हाळा प्रेम असत नाही. असणार नाही. आता तुला चटकन पटावं म्हणून सांगते. आजपर्यंत तुझ्या आई बाबांनी लवकर उठावे असे कधी सांगितलेच नव्हते कां? पण तू ऐकलं नाहीस. ऐकणार नाहीस म्हणून त्यानी सांगण्याचा नाद सोडून दिला. पण परवा परवा पासून तुझे तुलाच पटल्यावर अगदी कोणी न हलवता, न उठवता उठतोस ना? म्हणजेच तुला तुझ्या आतल्या जाणीवेने धक्का दिला की 'असे करणे योग्य आहे.' ते मनाला पटले. स्नानही लवकर होऊ लागले. उत्साह वाढला.'

विलास म्हणाला, 'आजी हा दासबोध श्रवणाचा परिणाम. आम्ही पाचही जण कसे आकर्षले गेलो. तसे सर्वही आकर्षले जातील की.'

'नाही.' आजी म्हणाल्या, 'मूर्ती तितक्या प्रकृति. तमोगुणाचे प्राबल्य असल्यावर इतके कठोर तप करण्याचे सामर्थ्य सगळयांच्यात येणार नाही. हे केव्हा जमते व त्याने काय होते. तूच वाच.'

***उपरति आणि अनुताप । तेथें कैचें उरेल पाप ।***
***देहांत तपे पुण्यरूप । दुसरा जन्म जाला ।।१६/१/१२।।***

'ही उपरति व्हायलाच सद्‌गुरु भेट हवी.' आजींनी अगदी स्वाभाविकपणे नमस्कार केला. न सांगता मुलांनी पण डोळे मिटले व नमस्कार केला.

'बाळांनो,' आजी म्हणाल्या, 'असा सुंदर संस्कार बसण्यासाठीच सद्ग्रंथ श्रवण सतत हवे. म्हणजे बुद्धी सतेज होते. असे श्रवण एकान्ती व्हावे. मोजक्याच लोकांच्यात व दिवसाच व्हावे. दिवसा सूर्यप्रकाश असतो. सूर्य हा आपला पिताच. त्याच्या प्रकाशाने सगळं जग उजळून निघते. दिवसाची कामे धड होतात. ती रात्री होत नाहीत. समर्थ काय सांगतात बघ.'

***प्रापंचिक अथवा परमार्थिक । कार्य करणें कोणी येक ।***
***दिवसेंविण निरर्थक । सार्थक नव्हे ।।१६/२/७।।***

आजी म्हणाल्या, 'मग हे कार्य संसारातले असो वा परमार्थातले असो. दिवसा करावे. हुरुप वाढतो. रात्री मलूलपणा येतो. उठाव येत नाही. सूर्याचा महिमा किती? माहीत आहे?

***विश्वचक्षू हा भास्कर । ऐसें जाणती लहान थोर ।***
***या कारणें दिवाकर । श्रेष्ठाहून श्रेष्ठ ।।१६/२/१५।।***

विलास म्हणाला, 'मी सांगतो अर्थ. विश्वाचा डोळा म्हणजे साऱ्या प्राणी मात्रांचा डोळा. म्हणजेच त्याच्या उजेडात सर्व प्राणीमात्रांना काम करता येते. याला थोडा अपवाद पण आहेच न? कांही दिवाभीत असतातच ते दिवसा झोप घेतात व रात्री खाद्य मिळवण्यासाठी बाहेर पडतात. पण तेवढ्याने सूर्य महिमा कमी होतो असे नाही. सूर्य जर चार आठ दिवस रजेवर गेला तर? पावसाळ्यात तो रजेवर जात नाही. पण सतत पावसामुळे २/४ दिवस त्याचे दर्शन घडले नाही तरी मरगळल्यासारखे वाटते. चार दिवसांनी सूर्यदर्शन झाले की तरतरी येते. हा अनुभव सगळ्यांनाच आहे.

गणपती म्हणाला, 'आजी, बरोबर आहे विलासचे म्हणणे. समर्थांनी सूर्य महिमा गाइला. आपण पण त्याची पूजा करीतो १२ सूर्यनमस्कार घालतो. तो आपला पिता खरा. पण त्याच्यापेक्षा पृथ्वी श्रेष्ठ नाही कां? तिला आपली माता म्हणायला काय हरकत आहे?'

आजी म्हणाल्या, 'आहेच ती माता. हरकत कसली? समर्थ तरी कसे विसरतील? पृथ्वी तर बहुगुणी बहुरत्ना अत्यंत सोशिक. सर्वांचे पोषण करते आहे. सगळ्यांना आपल्या अंगावर वाढवते. गणपती तू वाच समर्थ वचन.

***बहुरत्न हे वसुंधरा । ऐसा पदार्थ कैंचा दुसरा ।***
***अफाट पडलें सैरावैरा । जिकडें तिकडे ।।१६/३/२०।।***

मधू म्हणाला, 'पाणी आटून पृथ्वी झाली. पटकन म्हणतो आपण. पण त्याला किती काळ लागला असेल. उंच उंच पर्वत, खोल खोल दऱ्या, कुठे जमीन पिवळट, तर कुठे काळी भोर, कुठे लाल तर कुठे मुरुम किती तऱ्हा'



त्याला थांबवीत जया म्हणाली, 'आणि तिच्या पाठीवरच्या नद्या. त्या तरी किती प्रकारच्या? कोणाला दोनदा पूर तर कोणी उन्हाळ्यात आटतात. काही नद्या लहान तर काही महान. सगळ्या नद्यांची नावे लिहू म्हटले तरी जमणार नाही. किती अफाट पसारा - - - '

सुधा म्हणाली, 'आणि पिके तरी किती? सगळंच नाविन्य. कोठे भात पिकतो तर कोठे ज्वारी, कोठे गहू तर कोठे बाजरी. फुले विपूल फळे विपूल. या सगळ्या गोष्टी मानवाला ज्याने पुरवल्या त्याचे ऋण फिटणार कधी?'

विलास म्हणाला, 'ते ऋण फेडण्यासाठीच तर नाम घ्यायचे. ज्ञान मिळवायचे. आपण आनंदात रहायचे. जगाला आनंद वाटायचा. आजी, मी अगदी शपथ घेऊन सांगतो. पहाटे उठून स्नान व सूर्यनमस्कार घातल्याने मला फार आनंद होतो. माझ्यातला चिडचिडेपणा गेला. मलाच जाणवतो.'

आजी म्हणाल्या, 'शाबास, हेच १० मुलांना पटेल असे सांग. हळू हळू एकेक मुलगा तयार कर. अशी १० मुले तयार केलीस की हा आनंद १० जणांत वाटला जाईल. हे त्या परब्रह्माचे ऋण फेडणे होय. आणि मी म्हणते कोणाकोणाचे ऋण फेडणार? आपलं जीवनच ज्याच्यावर अवलंबून त्याला आपण जीवन म्हणतो म्हणजे पाणी, त्याला विसरणार कां? त्या आपो नारायणाची तर अत्यंत गरज असते आपल्याला. २ दिवस नळाला पाणी येणार नाही म्हटले की तोंडचे पाणी आटते. आपोनारायणाचे अलौकिकत्व समर्थ सांगतात बघ -

***उदक तारक उदक मारक । उदक नाना सौख्यदायेक ।***
***पाहतां उदकाचा विवेक । अलौकिक आहे ।।१६/४/२३।।***

त्या पाण्याशी सुद्धा मर्यादेनेच वागायला हवे. त्याचा योग्य वापर करायला हवा. पाण्याच्या शुद्ध अशुद्धतेचा विचार करायला हवा. अशुद्ध पाणी सुद्धा योग्य विल्हेवाट करुन उपयोगात आणायला हवे असे झाले नाही तर तेच पाणी मारकही होते. दोन्ही शक्ती पाण्याजवळ आहेत.'

विलास म्हणाला, 'आजी सूर्य पिता. पृथ्वी माता मग उदक बंधू म्हणायचा कां? आपला भाऊ सुद्धा कधी सहाय्य करतो कधी भांडतो. तसच पाणी.'

सुधा म्हणाली, 'पाण्यासारखाच दुसरा एक भाऊ आहे. त्याला विसरू नकोस. त्याचे नांव अग्नी. आजी, अग्नीची पण ओवी असेलच की,' आजींनी ओवी दाखवली.

***अग्नी करतां नाना उपाये । अग्नी करतां नाना अपाये ।***
***विवेकें विण सकळ होये । निरार्थक ।।१६/५/२१।।***

मधुकर म्हणाला, 'मानवाने अग्नीचा शोध लावला. दाहक अग्नी पण खिशांत ठेवता येईल असे त्याला रूप दिले. त्या अग्नीचे अनंत उपकार आहेत आपल्यावर. अग्नीमुळेच भूक लागते. तहान लागते. अग्नीमुळेच अन्न पचते. अग्नीमुळेच अन्न शिजते. थंडीचे निवारणही अग्नीच करतो. रात्री अग्नीचा प्रकाशासाठी उपयोग होतो.'

सुधा म्हणाली, 'पण जर का अग्नीदेव रागावला तर भडका उडवून देतो. घरे जळतात. माणसे मरतात. अग्नी या देहाचे भस्म करतो. यज्ञातला अग्नी पवित्र पूजनीय देवांना हविर्भाव देतो. अग्नीच्या साक्षीने विवाह होतात.

माणसाला सुख नी दुःख देणारा अग्नी. त्याचे सुद्धा पूजन शास्त्रांत सांगितले आहे.

आजी म्हणाल्या, 'अगदी हाच विचार समर्थ सांगतात बघ.'

***जीत असतां सुखी करी । मेल्यां प्रेत भस्म करी ।***
***सर्व भक्षक त्याची थोरी । काये म्हणूनी सांगावी? ।।१६/४/२४।।***

अग्नी सर्व भक्षक असला तरी उपयुक्तता लक्षात घेऊन त्याचे पूजन अवश्य करावे. घरोघर वैश्वदेव होत असत. चुलीतल्या अग्नीची पूजा होत असे. आता विज्ञान युगात दोन्ही गोष्टी बंद झाल्या. यज्ञाचे विपरित प्रकार पाहून यज्ञ ही नको ही मत प्रणाली वाढली. तरी वैश्वनराची पूजा करणे आवश्यकच.'

विलास म्हणाला, 'वैश्वानर म्हणजे अग्नी. आपल्या पोटांत पण असतो अग्नी. त्याला आहुती द्यायची म्हणजे खायचे. अन्नाच्या आहुतींनी जठराग्नी शांत होतो.'

आजी म्हणाल्या, 'बरोबर पण तेथेही योग्य, अयोग्य विचार करायलाच हवा. भूक लागलेली नसता जर अन्न खाल्ले तर अग्नी मंद होतो. अन्न पचत नाही. अग्नीची कार्यक्षमता बघूनच अन्न खावे. वाजवी पेक्षा जास्त खाल्ले तरी अग्नी विझतो. अन्न पचत



नाही. दुखणी होतात.'

सुधा म्हणाली, 'मग धावा डॉक्टरांचे कडे. ते गोळी देतात ही कशावर? भूक लागावी म्हणून. ही? अन्न पचावे म्हणून.'

मधू म्हणाला, 'अशी पाळी आपल्यावर येऊ नये. म्हणून आत्ता पासूनच व्यायाम करायचा. शरीर ताब्यात ठेवावे. पंच महाभूतापैकी दृश्य स्वरूपांत असलेल्या पृथ्वी, आप व तेज यांची यथायोग्य बडदास्त ठेवावी.'

गणपती म्हणाला, 'वर्षातून एकदा स्वच्छता सप्ताह पाळून कसे भागेल? रोजच स्वच्छ व नेटके पणाने वागलो की जीवन सुखकर होणार.

मन प्रसन्न रहाण्याची गुरुकिल्लीच आज आपल्याला मिळाली. देवघरातल्या देवापेक्षा या देवांची पूजा आवश्यक हे आज आपल्याला कळले. मग आता उद्यापासून. उद्यापासून कशाला? आत्ता पासूनच तसे वागायचे ठरवू या. आजी आशिर्वाद देतीलच.

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**

## दिवस ३२ वा

जया व सुधा आधी आल्या. कालच्या विषयाची उजळणी चालली होती. इतक्यात तिघेही आले. पंचमहाभूतात जे दृश्य स्वरूपांत दिसतात त्यांची पूजा जमेल. आता अदृश्य पण अत्यंत महत्वाचे असे दोन राहिले. विलास म्हणाला, 'तोच विचार मी करीत होतो. पृथ्वीची पूजा करता येईल स्वच्छता सडासंमार्जन रांगोळ्यांनी सुशोभित. पाण्याची तेजाची पूजा करता येईल पण वायूची पूजा कशी करायची?'

मधू म्हणाला, 'तू कोणतीही शंका विचार आजी दासबोधाचा आधार घेऊन उत्तर देणारच बघ.'

इतक्यात आजी बाहेर आल्या. वंदन आटोपले. प्रार्थना झाली. विचारा. काय विचारणार आहात.

विलास म्हणाला, 'पृथ्वी आप तेज यापेक्षा वायू श्रेष्ठ. वायू तर दिसत नाही. वायूत हालचाल झाली की आपण वारा म्हणतो. त्या वायूत घटक तरी किती? ऑक्सीजन,

हायड्रोजन, नैट्रोजन, ओझोन, वाफ, धूळ, कचरा, धूर असतोच. भूमीपासून आकाशापर्यंत सर्व पोकळी त्याने व्यापली आहे. तोच जास्त श्रेष्ठ नाही कां?'

आजी म्हणाल्या, 'हो तर. तो आहे म्हणून श्वास आहे. म्हणून आपण आहोत.

***वायोकरिता श्वासोच्छवास । नाना विद्यांचा अभ्यास ।***
***वायोकरिता शरीरास । चळण घडे ।।१९/६/२।।***

येथे करिता या शब्दाचा अर्थ 'म्हणून' किंवा 'मुळे' असा आहे. वायूमुळेच आपण श्वास घेऊ शकतो.

गणपती म्हणाला, 'अन्नाशिवाय माणूस २ दिवस राहू शकतो. पाण्याशिवाय फार तर सात आठ तास राहू शकतो. म्हणजे शरीराला अन्नापेक्षा पाण्याची गरज जास्त असते. पण पाण्यापेक्षा वायू आवश्यक. कारण श्वासाशिवाय माणूस जगूच शकणार नाही. जरा गर्दीच्या ठिकाणी हवा कोंडली तर जीव गुदमरतो. तो वायूदेव मोठा.'

आजी म्हणाल्या, 'त्या वायूमुळे नाना मंत्र, प्रार्थना, भजने म्हणता येतात शब्दांचे उच्चार होतात. विद्याभ्यासाला वायूच कारणीभूत. जीभेवरून वारे गेले. तर मनुष्य बोलू शकत नाही. या वायूमुळेच शरीर हालचाल करू शकते.'

मधुकर म्हणाला, 'वायू मोठा उपकारक. रक्ताची शुद्धी वायुनेच होते. मलमुत्र विसर्जन वायूमुळेच होते. उचकी, ढेकर, शिंक, जांभई सर्व वायूमुळेच.'

आजी म्हणाल्या, 'त्यांची नावे लक्षात रहतात कां पहा! हा वायू आपल्या शरीरांत प्राण, अपान, व्यान, उदान व समान या पाच रुपाने वावरतो. या पाचांचे कार्य सुरळीत चालावे म्हणून त्यांना सहाय्य करणारे पाच वायू आहेत. त्यांना उपप्राण म्हणतात. नाग, कूर्म, कृकल, देवदत्त, धनंजय असे हे पांच मुख्य प्राण व पाच उपप्राण वायूचे प्रकार आहेत.

ब्रह्माडांत हा वायू मोठा कारभारीच आहे. जसा उपयुक्त आहे तसा तडाखा लगावणारा पण आहे. त्याने उग्र रूप धारण केले की वादळ आले असे आपण म्हणतो. झाडे मुळासकट कोलमंडून पडतात. घरे कोसळतात.'

'आजी,' जया म्हणाली, 'या वायूचाच मुलगा हनुमत कां? तोही पित्याप्रमाणेच अचाट पराक्रमी.'



आजी म्हणाल्या, 'त्याने मोठे काम कोणते केले माहीत आहे. तूच वाच.'

***देव कारागृही होते । हनुमंते देखिले अवचितें ।***
***सेंव्हार करूनी लंकेभोंवते । विटंबूनी पाडिलें ।।१६/६/३०।।***

सीतेचा शोध या हनुमंतामुळेच लागला. रामाची आज्ञा असती तर सीतेला खांद्यावरून आणून रामापुढे हजर केली असती. पण पक्का आज्ञाधारक ब्रह्मचारी, जन्मजात सोन्याचा लंगोट होता त्याला. 'तो जो कोण ओळखेल तोच तुझा सद्गुरु' त्याची आई त्याला एकदा म्हणाली होती.

रामाने ते ओळखले. तेव्हापासून रामाला शरण जाऊन त्याचा दास बनलेला हा हनुमंत म्हणजेच मारुती.

विलास म्हणाला, 'आजी, त्याला एवढी शक्ती कोठून आली? कोणी दिली?'

आजी म्हणाल्या, 'वायू म्हणजे पवन. या पवनाचे मूळ अंतरात्मा त्या अंतरात्म्यामुळेच सर्वांना शक्ती बुध्दी युक्ती मिळते. तोच मारूतीच्या शरीरांत होता. तुमच्या आमच्या शरीरांत पण आहे. वाच ही ओवी.'

***आत्म्यावेगळें काम चालेना । आत्मा दिसेना ना आडळेना ।***
***गुप्तरुपें विचार नाना । पाहोन सोडी ।।१६/७/१०।।***

आजी म्हणाल्या, 'कसा जादुगारासारखे काम करतो.'

गणपती म्हणाला, 'आजी, जादुगार म्हणालांत न म्हणून मला आठवण आली. सांगू गंमत. माझ्या मामाचे मित्र जादूगार होते. विंचवाच्या पाठीवरचे बिऱ्हाड असा त्यांचा संसार. मी त्यांना काका म्हणत असे. काका काकू व मीही होतो त्यांचे बरोबर. गाडीने मनमाडला जायचे होते. स्टेशनवर आलो तो गाडीने शिटी दिली होती. सिग्नल मिळाला होता. गाडी चालू झाली. आता हो कसे? हे इतके सामान २/४ पेट्या. भले मोटे पोते भांड्याचे आणि आम्ही तिघे. डोळ्यासमोरून गाडी चालली. मी खट्टू होऊन पहात होतो. काय आश्चर्य. अगदी शेवटचा डबा आमच्यासमोर आला. गाडी थांबली. काका पेट्या उचलून गाडीकडे धावले. पोते फरफटत आम्ही त्यांचे मागे चाललो. गाडीत चढलो. सामान नीटनेटके लावले. घाम पुसत आम्ही बसलो. तोपर्यंत स्टेशनांत पोर्टरची स्टेशन मास्तर गार्ड यांची धावाधाव. सर्व कांही ठीक असताना गाडी कां

थांबली? ड्रायव्हर आपल्या जागी गेला. गार्ड परतला. काकांनी दारात उभे राहून रुमाल हलवला. गाडी चालू झाली. ऑऽऽ असं कसं झालं. अशी होती काकांची जादू. गुप्तपणे विचार नाना . मला मजाच वाटली.'

आजी म्हणाल्या, 'गंमतच झाली ना? कोणाला काही कळलेच नाही. तस्साच हा आत्मा शरीरांतच राहून सर्व कांही करतो पण तो दिसतच नाही. गणपती, तूच वाच ही ओवी.'

***आत्मा शरीरीं वर्तती । इंद्रिय ग्रामे चेष्टविती ।***
***नाना सुखदुःखे भोगिती । देहात्म योगें ॥१६/७/१४॥***

विलास म्हणाला, 'आजी मी सांगू कां अर्थ? हा आत्मा सर्व प्राणीमात्रांच्या शरीरांत राहतो. इंद्रिय ग्रामे म्हणजे सगळी १० इंद्रिये भराभर कामे करु लागतात. कामे सांगू? डोळा पहाण्याचे काम करतो. कान ऐकण्याचे. नाक वास घेण्याचे, श्वास घेण्याचे काम करतो. जीभ चव घेण्याचे व बोलण्याचे पण काम करते. पाय चालण्याचे काम करतात.'

'आणि हात मारण्याचे काम करतात.' असे म्हणून गणपतीने एक लहानशी चापटी विलासला मारली.

विलास म्हणाला, 'तेच हात शाबसकी देण्याचे काम का करत नाहीत?' असे म्हणून त्याने शाबासकीच्या तीन चापट्या गणपतीच्या पाठीवर मारल्या.

सगळे हसले.

मधुकर म्हणाला, 'विलास ही सगळी कामे दिसणाऱ्या इंद्रियांची झाली. आपल्या शरीरांत काम करतांना तर दिसत नाही पण काम तर चालू आहे. फुफ्फुसांत रक्त शुद्ध होते. ह्रदयांत शुद्ध अशुद्ध दोन्ही तऱ्हेचे रक्त साठवले जाते. शुद्ध रक्त शरीरभर रक्त वाहिन्या नेतात. अशुद्ध रक्त पुन्हा ह्रदयांत साठवले जाते व शुद्धी करणाकरिता फुफ्फुसाकडे जाते. पोटांत अन्न पचते. हे सारे कोणामुळे घडते?'

विलास म्हणाला, 'आत्म्यामुळे.'

आजी म्हणाल्या, 'बरोबर एका देह संगतीमुळे त्याला सुख दुःखे पण भोगावी लागतात तसा हा अनेकानेक कामे करवून आत्मा अनेकानेक नावांनी ओळखला जातो.



भली मोठी यादीच आहे. कोण वाचतो?'

'मी वाचतो' गणपती म्हणाला.

***जीवात्मा शिवात्मा परमात्मा । जगदात्मा विश्वात्मा गुप्तात्मा ।***
***आत्मा अंतरात्मा सूक्ष्मात्मा । देव दानव मानवीं ॥१६/८/६॥***

***नादरूप ज्योतीरूप । साक्षरूप सत्तारूप ।***
***चैतन्यरूप स्वस्वरूप । द्रष्टारूप जाणिजे ॥१६/८/८॥***

***नरोत्तमु विरोत्तमु । पुरुषोत्तमु रघोत्तमु ।***
***सर्वोत्तमु उत्तमोत्तमु । त्रयलोक्यवासी ॥१६/८/९॥***

आजी म्हणाल्या, 'हा आत्मा अत्यंत सूक्ष्म आहे. ज्याची दृष्टी सूक्ष्म बनते त्यालाच हा आत्म्याचा खेळ पाहता येतो.'

सुधा म्हणाली, 'आत्मा तर सूक्ष्म मग पाहता कसा येईल? त्याला समजून घ्यायचं म्हणजे अनुभव घ्यायचा. पण हे सामान्यांचं काम नव्हे असेही समर्थ मुद्दाम सांगतात. मी वाचू आजी?'

***सूक्ष्म दृष्टी आणितां मना । शरीराचा अंत लागेना ।***
***मा तो अंतरात्मा अनुमाना । कैसा येतो ॥१६/८/२९॥***

आजी म्हणाल्या, 'अनुमान म्हणजे तर्क, तर्काने कल्पनेने त्याला जाणता येणार नाही. आपल्याच शरीरातल्या घडामोडी आपल्याला जाणता येतात कां? क्ष किरणांनी फोटो काढला की हाड कोठे मोडले? शीर कोठे तुटली हे कळते ना? तसेच सूक्ष्म ज्ञानाच्या डोळ्याने कळते.'

***सकळास मूळ सांपडे । ऐसें पुण्य कैचें घडे ।***
***साधुजनाचे पवाडे । विवेकीं मन ॥१६/९/१०॥***

आजी म्हणाल्या, 'हे मूळ म्हणजे परब्रह्म. सरसकट सगळयांना त्याचे ज्ञान होत नाही. पूर्व पुण्याई लागते. ही पुण्याई म्हणजे साधना. उपासना, प्रयत्न अंतरीची ओढ असेल तरच त्याचा अनुभव येईल. कांही थोडी संत मंडळी असतात. त्यांना ब्रह्मदर्शन घडते आणखी एक गंमत सांगू? सामान्य माणसाचे ठिकाणी विवेक जागाच झालेला

नसतो. त्यामुळे काय गंमत होते?

***विवेकेंचि तो मुख्य राजा । आणी सेवकाचें नांव राजा ।***
***याचा विचार समजा । वेवाद खोटा ।।१६/९/१५।।***

सिंहासनावर बसतो तो खरा राजा प्रजेचे पालन करणारा राजा. आणि राजा नावाचा सेवक पण असतो. म्हणून दोघांची पात्रता एकच कां? हे विवेकाने ओळखावे उगाच वाद न घालता खरे खोटे ओळखावे. यालाच ज्ञान म्हणतात. ज्ञानाने समजणे हिताचे. वितंडवादाने नुकसानच की! म्हणून वादविवाद टाळावा. बाळांनो,

***समजणें हे विवेकाचे । तेहि आत्म्याविण कैचें ।***
***कोणीयेकें जगदीशाचें । भजन करावे ।।१६/१०/२७।।***

व्यवहार काय किंवा परमार्थ काय? नीट ध्यानात येण्यासाठी विवेक हवाच. आणि हा विवेक याच देहांत जागा व्हायला हवा. म्हणजे सहाय्य कोणाचे हवे?'

विलास म्हणाला, 'प्रयत्नाचे!'

आजी म्हणाल्या, 'ते तर खरेच. प्रयत्न हवाच. प्रयत्न तरी कोणाच्या अस्तित्वामुळे होतील?'

गणपती म्हणाला, 'आत्म्याच्या.'

आजी म्हणाल्या, 'शाब्बास.'

विलास म्हणाला, 'मी देऊ का शाबासकी?'

आजी म्हणाल्या, 'एकट्याने पाठीवर नको. टाळ्या वाजवून देऊ या. सर्वांनी टाळ्या वाजवल्या.

'असाच एकोपा भजनात पण असावा.' 'म्हणू या का भजन?'

'मारुतीराया बलभीमा, भजनालागो द्या प्रेमा' आजींनी नीट सांगितले पाठोपाठ सर्वांनी छान म्हटले. असे भजन एकदिलाने करुन त्या जगदीशाला आळवायचे.

विलास म्हणाला, 'म्हणजे काय होते?'

'भगवंत भक्ताचे पाठीशी उभा रहातो?' आजी म्हणाल्या, 'भक्ताला एकाकीपणा



जाणवतच नाही. संकटाचे भय नष्ट होते. समर्थ म्हणतात.

***समर्थांची नाही पाठी । तयास भलताच कुटी ।***
***याकारणे उठाउठी । भजन करावे ।।१६/१०/३०।।***

बाळांनो, ओवीतला 'समर्थ' शब्द ते स्वतः करिता वापरीत नाहीत. समर्थ म्हणजे बलवान व्यक्ती. रामरायाला ते समर्थ म्हणत. अशी शक्ती जर आपल्या पाठीशी असेल तर कोणाची हिंमत आहे की यावे नी ठोसा मारावा. अपाय करावा. पुन्हा शब्दाचा खोल अर्थ लक्षात घेऊ या. सामर्थ्य संपन्न गुरखा किंवा पोलीस आपल्या संरक्षणाकरिता हवा असाही त्याचा अर्थ नव्हे. सर्वात सामर्थ्यवान कोण असेल तर आत्मारामच. अंतरात्माच. तो चोख काम करीतच आहे. त्याच्या बद्दलचा विश्वास आपल्या मनांत पक्का हवा. असा विश्वास ज्याचा पक्का असतो, त्याचे रक्षण अंतरात्मा करतोच. म्हणून कंटाळा न करता आळस न करता भजन करावे.'

विलास म्हणाला, 'आजी, भजन करायचे म्हणजे अभंग गायचे की स्तोत्र म्हणत बसायचे?'

आजी म्हणाल्या, 'छान विचारलेस, मनात भाव नाही नी नुसतं 'रामा रामा रामा, रामा आत्मारामा आत्मारामा' असं चढ उतर आवाजात म्हटले म्हणजे भजन नव्हे. आत्माराम सर्वश्रेष्ठ असून तोच माझे रक्षण करीत आहे. म्हणूनच मी आहे हे अनुसंधान अखंड ठेवणे याला भजन म्हणतात. अशी वागणूक ज्याची असते त्याला कोणी शत्रू असतच नाही. त्याची सर्वत्र वाहवाच होते. मग कोणी मारण्याचा प्रसंगच कसा येईल? असा भक्त सदैव काय करतो?'

***भजन साधन अभ्यास । तेणे पाविजे परलोकास ।***
***दास म्हणे हा विश्वास । धरिला पाहिजे ।।१६/१०/३१।।***

भगवंताचे अखंड स्मरण, नित्य नियमाने वागणे, आणि सतत प्रयत्नशील असणे म्हणजेच अभ्यास. असा अभ्यास जो करतो तो या लोकांत तर नावाजला जातोच पण परलोकातही, अन्य राष्ट्रात, अन्य क्षेत्रांत चमकतोच. लोक आपणहून त्याला बोलावतात. आपला विश्वास पक्का असायला हवा.

जगातली बरीचशी कामे विश्वासावरच चालतात. आमचा सोनारावर विश्वास

आहे. न्हाव्यावर विश्वास आहे. फक्त देवावर पक्का विश्वास नाही. तसे नको.

ईश्वर भक्ती हेच ध्येय असावे. नाम हे तारुच समजून जीवन जगावे. कठीण आहे कां? मनात आले तर कठीण कांहीच नसते. होय ना?'

'अगदी खरं' मुले म्हणाली, उत्स्फूर्तपणे जयघोष केला.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

## दिवस ३ ३ वा

सगळी अगदी वेळेवर जमली. त्रिकूट एका बाजूने. दुक्कल दुसऱ्या बाजूने. आजीपण दासबोध घेऊन आतून आल्या. सर्व आपापल्या जागी बसले. विलास उल्हसितपणे म्हणाला, 'आजी मला गंमत वाटते ती हीच की, १ली पासून आठवीपर्यंत मी शाळेत जातोय. पण घंटेला माझी हजेरी कधीच लागली नाही. कधी रस्त्यावरच घंटा कधी ऐकायची. तर कधी प्रार्थना संपून मुले वर्गात गेली की मी हजरः पण येथे ना घंटा ना तंटा. सगळी कसे बरोबर येतात. कधीच कोणाला उशीर होत नाही. हे कशाचे प्रतीक? हे कशाचे प्रतीक ? हे कसे काय जमते ?

गणपती म्हणाला, 'मला तर २।। पासूनच वेध लागतो. 'चला निघू'. असं सारखं मन म्हणतं'.

सुधा म्हणाली,'हा सगळा सत्संगाचा परिणाम आजी आम्ही दोघींनी विचार केला की आता लवकरच शाळा सुरू होईल. तरी आपण आजींना विचारू या. संध्याकाळी जमू या'.

विलास म्हणाला.'दोघीच काय म्हणून? आम्ही का नको? बघा आजी एवढा दासबोधाचा छान अभ्यास करते नी भेद मानते. आम्ही येऊ. तुम्ही नको. सुधा म्हणाली,'आम्ही दोघीच येऊ. असं मी म्हटलं नाही.'आम्ही संध्याकाळी जमू कां? आम्ही म्हणजे त्यात आपण पाचही जण आलो. नाही कां ? भेदाने तूच बघतोस. मी नाही'.

मधुकर म्हणाला, 'या सगळया मी तू चा, भ्रमाचा, मायेचा, विश्व पसाऱ्याचा सर्व श्रेष्ठ स्वामी तोच. तोच सारे निर्माण करतो व तोच सारे मिटवतो!



जया म्हणाली,' तो स्वामी कोण? समर्थांनी सांगितले असेलच ना!

'तर, दासबोध अभ्यासायचा या साठीच. समर्थ काहीच सांगायचं शिल्लक ठेवीत नाहीत.' आजी म्हणाल्या.'ही बघ सापडली ओवी. सुधा तू वाच.'

***अशाश्वतांचा मस्तक मणी । जयाची एवढी करणी ।***
***दिसेना तरी काय जालें, धनी-। तयासीच म्हणावें ।१७/१/१७।।***

आजी म्हणाल्या,'कळलं का जया? तो दिसत नाही. पण सगळे काही करतो तो अंतरात्मा. हाच सगळया दृश्य अदृश्य विश्वाचा धनी. मालक, कर्ता, शास्ता सर्वकाही तोच. या सर्व अशाश्वत गोष्टीचा तो मुगुटमणी. मुगुटमणी म्हणजे राजा. नुसता पुढारी नव्हे. शास्ता तो दिसला नाही. तरी काय झालं ? तोच सर्व श्रेष्ट. आणि मधू तू म्हणालास ना भेदाबद्दल ? तो अंतरात्म्यामुळे नव्हे. हा मायेचा खेळ. मग अंतरात्म्याकडे वळले की सगळेच आत्मरूप. म्हणजे मी तू गेलेच. अभेद . व्दैत नाहीच. वेगळेपण नाही. आणि त्याच मनाने जर अंतरात्म्याकडे पाठ केली की उद्भवला भेद. लगेच मी तू व्दैत आलेंच. म्हणजे ऐक्य मोडलेच. विभक्त झालोच. वेगळेपण आले. म्हणजे हा परिणाम देहात्म बुध्दीचा.

जया म्हणाली,'असं जर आहे तर त्या मनाने कायमच अंतरात्म्याकडे तोंड वळवावे. व त्याच्याच आज्ञेत कायम रहावे. यासाठी काय करावे ?

'छान, छान. ही बघ ओवी'. आजी म्हणाल्या, 'मी सांगणारच होते. तू विचारलेस तेही छान झाले. तुमची जिज्ञासू वृत्ती वाढीस लागत आहे हा आनंद. वाच तू.'

***सत्संग आणी सत्शास्त्र श्रवण । अखंड होतसे विवर्ण ।***
***नाना सत्संग आणी उत्तम गुण । परोपकाराचे ।।१७/१/२८।।***

'आजी मी सांगू अर्थ' जया म्हणाली 'साधकाने संतांची संगत धरावी. कारण संत सान्निध्यात अध्यात्म ग्रंथाचेच वाचन व निरूपण चालते. त्याचे श्रवण घडते. परमार्थात श्रवण हेच प्रमुख साधन आहे. असे सतत सत्कडे नेणाऱ्या ग्रंथाचे विवरण, निरूपण कानी पडले की आपल्यातील दुर्गुण नाहीसे होतात. व सद्गुण जमा होतात. त्या सद्गुणतला मोठा सद्गुण परोपकार. आपण परोपकार वृत्तीने वागता वागता पर म्हणजे दुसरा ही भावनाच नष्ट होते व त्या वागण्याला कर्तव्याचे रूप येते. डाव्या हाताने

उजल्या हाताला किंवा उजव्या हाताने डाव्या हाताला खाजवले किंवा चोळले दाबले तर परोपकाराची वा शाबासकीची भावना असत नाही. अगदी तस्सेच होते'.

विलासने उत्स्फूर्तपणे टाळ्या वाजवल्या. 'आजी, जयाने फार छान अर्थ सांगितला नाही कां? नुसता अर्थ न सांगता थोडा विस्तारही केला. पण माझी शंका अशी आहे की असे जरी असले तरी त्याला मोडता कोण घालतो ?'

विलास तू पण आता चांगला विचार करू लागला आहेस! आजी म्हणाल्या, 'रास्त आहे तुझी शंका.हा पण खेळ खेळणारी आतच आहे. आपल्या जवळच आहे. बघ दासबोधातली ओवी.

***स्थूळाचे मूळ ते वासना । ते वासना आधी दिसेना ।***
***स्थूळावेगळे अनुमानेना । सकळ कांही ।।१७/२/१७।।***

आजी म्हणाल्या,'या सगळ्या विश्व पसाऱ्या मागे परब्रह्माची इच्छा हेच कारण आहे. तसेच आपल्या प्रत्येक कृती, इच्छा, कल्पना, वासना असतेचः मगच कार्य होते. ही वासना किंवा इच्छा दिसत तर नाहीच. पण कार्य मात्र तिच्यामुळेच होते. सत्संगाला जा. श्रवणाला बस. असे वासनाच सांगते. व काही जाऊ नकोस. कशाला हवे श्रवण? त्यापेक्षा मस्त पैकी झोप असे वासनाच सांगते. अशा सूक्ष्म वासनेंचे रूप व कार्य ध्यानी येण्यासाठी मनाने सूक्ष्म व्हायला हवे. त्यासाठी हवा विवेक. मग लक्षात येईल सगळयाच वासना वाईट नसतात. विवेकाने वाईट वासना उडवून लावायच्या. त्यांचे मूळ रूजू द्यायचे नाही. मग त्या फोफावणार नाहीत. भक्तीच्या प्रेमाच्या वासना वाढीस लावायच्या, मग जगांत वाहवाच होईल. आदर्श कोणाचा ठेवायचा? मातेचा. किती प्रेमाने बालकाचे रक्षण करते. किती कष्ट सोसते.

विलास म्हणाला,'त्या मातेची महती समर्थांनी गाइली नाही कां?

'हो तर! त्या आधारावरच बोलले मी', आजी म्हणाल्या, 'गणपती तू वाच.

***वीट नाही. कंटाळा नाही । आलस्य नाहीं त्रास नाहीं***
***इतुकी माया कोठेंचि नाही । माते वेगळी ।।१७/२/२७।।***

आजी म्हणाल्या,'आपले सर्वस्व ती बालाकरता अर्पण करते. ही प्रेमाची वासना. तिचे मोल तरी करता येईल कां?'



सुधा म्हणाली, 'असे विशुध्द प्रेम करता आलं पाहिजे. यासाठीच सतत श्रवण, तेही दासबोधासारख्या अध्यात्मग्रंथाचे, प्रचितीच्या अनुभवाच्या बोलाचे श्रवण घडावे. आजी ही बघा ओवी याच पानावर आहे.'

***श्रवणामध्यें सार श्रवण । तें हें अध्यात्म निरूपण***
***सुचित करून अंतःकर्ण । ग्रंथामध्यें विवरावें ।।१७/३/२।।***

आजी म्हणाल्या,'श्रवण अनेक प्रकारचे असते टी.व्ही तला संवाद ऐकणे हेही श्रवणच. व कीर्तन प्रवचन ऐकणे हेही श्रवणच. विवेकाने काय ऐकणे हिताचे हे ठरवावे. संतांच्या मते ज्ञान वाढवायचे असेल तर आत्म स्वरूपाबद्दल ज्यांत उहापोह आहे ते ऐकावे. त्यालाच अध्यात्म निरूपण म्हणतात. पुन्हा कसे ऐकावे हेही पण सांगितले आहे. 'सुचित' म्हणजे एकाग्र. अंतःकरण एकाग्र करून ऐकावे. ऐकलेला शब्दन शब्द हृदयांत ठसावा. एकही अक्षर गळून जाऊ नये. असे ऐकावे. पुन्हा अभ्यास व्हावा यासाठी तो ग्रंथ स्वतः एकदा वाचून ऐकलेल्या भागाची उजळणी करावी. हे सारे कशासाठी? ज्ञानाचा भाग पक्का व्हावा यासाठी. नाहीतर कालचं काल आजचं आज. असं व्हायचं. पुढचं पाठ मागचं सपाट. पुन्हा पाटी कोरीच. असं होऊ नये.

असं झालं तर आयुष्य वाया जाईल. अध्यात्म शास्त्रातलेच पण काय ऐकावे? मधू ही पुढची ओवी वाच.

***अष्टांग योग पिंडज्ञान । त्याहून थोर तत्वज्ञान ।***
***त्याहून थोर आत्मज्ञान । तें पाहिलें पाहिजे ।।१७/३/२४।।***

बाळांनो, तुम्हाला ऐकायला नवीनच. पण सोपं आहे ; आजी म्हणाल्या, 'अहिंसा म्हणजे काय कळलं? सत्य म्हणजे? कळलं कां? सर्वांनी माना डोलावल्या.'अस्तेय म्हणजे चोरी न करणे, ब्रह्मचर्य म्हणजे कामावर, विकारावर ताबा मिळवणे. विषय पण ताब्यांत ठेवणे. अपरिग्रह म्हणजे कष्ट केल्याशिवाय कोणी द्रव्यादिक दिल्यास ते न घेणे हे किती झाले बरं शब्द? १) आहिंसा २) सत्य ३) अस्तेय ४)ब्रह्मचर्य ५) अपरिग्रह या पाचांना योगमार्गात 'यम' म्हणतात.

आता 'नियम' सांगते हं, शौच म्हणजे शुध्दता. देहाची शुध्दता सर्वच ठेवतात. मनाची सुध्दा शुध्दता राखायला हवी. संतोष म्हणजे समाधान. तप म्हणजे सतत करायचा प्रयत्न. स्वाध्याय म्हणजे आत्मज्ञान प्राप्तीचा अभ्यास. आणि ईश्वर प्रणीधान

म्हणजे ईश्वराला अनन्य भावे शरण जाणे, बंदन करणे त्याची भक्ती करणे. किती झाली नांवे? पाच '१) शौच २) संतोष ३) तप ४) स्वाध्याय ५) ईश्वर प्रणिधान ' जयाने सर्व नांवे सांगितली.

आजी म्हणाल्या अष्टांग योग साधनेतले २ प्रकार सांगितले. १ला यम २रा नियम आता ३) आसन ४) प्राणायम ५) प्रत्याहार ६) धारणा ७) ध्यान ८) समाधी. अशा ८ प्रकारांना मिळून काय म्हणायचे ?

सुधा म्हणाली,'अष्टांग योगसाधन. जरा अवघड आहे. पण सावकाशीने पुन्हा सांगितलेत की लक्षात ठेवू आम्ही'.

विलास म्हणाला,'अहाहा. ८च तर नावें! मी सांगतो'. यम नियम अहिंसा सत्य तप............'

गणपती म्हणाला,'पुरे पुरे. आठ नावात अहिंसा सत्य नाही. विलासराव आपण उद्या पर्यंत पाठ करू हं!' सगळेच हसले.

'बाळांनो, आजी म्हणाल्या,'४/५ वेळा श्रवण घडले की राहील लक्षात तर काय! समर्थ म्हणतात अष्टांग योग व त्याबद्दलची माहिती ऐकावी. पिंड म्हणजे शरीर. त्या शरीराची रचना, महती म्हणजेच पिंडज्ञान ऐकावे.

मग हळूहळू ज्ञानाची पातळी वाढते. पिंड ज्ञानापेक्षा महत्वाचे तत्व ज्ञान. त्याहून श्रेष्ठ आत्मज्ञान म्हणजेच ब्रह्मज्ञान. ते ऐकावे. गणपती म्हणाला,'म्हणजेच सर्व ज्ञानात आत्मज्ञान हा राजाच. तो सर्वश्रेष्ठ असणारच.'

विलास म्हणाला,'हे कसं आहे सांगू? शिपायापेक्षा हजारी. हजारी म्हणजे हजार योध्यांचा प्रमुख हजारी श्रेष्ठ. पण दहा हजारी पेक्षा सेनापती श्रेष्ठ. सेनापतीपेक्षा प्रधान श्रेष्ठ. प्रधानापेक्षा राजा श्रेष्ठ. बरोबर ना आजी?'

आजी म्हणाल्या, 'बरोबर अष्टांग योग सुध्दा बरोबर सांगशील हं. आजच प्रथम ऐंकत आहेस जरा खिचडी झाली इतकेच. आत्ता आपण घेत आहोत ते शब्द ज्ञान. शब्द पक्के लक्षात आले की अर्थासह शब्द. तेही ध्यानांत आले की ग्रंथात शास्त्रात सांगितलेले सिध्दान्त ऐकून कळतील. तरी नुसते कळून उपयोग नाही. अनुभव ज्ञान जमा झाले की अधिकारी झाला. अशा एखाद्या अनुभव ज्ञानी व्यक्तीचे अनुभव ऐकता



ऐकता ओढ वाढते. ही ओढ विषय ज्ञानाची नाही हं! आत्माज्ञानाची. तेथेही थाबूंन उपयोग नाही. याला म्हणतात गुरू प्रचिती. मग तळ मळ लागते. व पडताळा यावा असे मनापासून वाटते. तसे प्रयत्न सुरू होतात.स्वतःला प्रचिती म्हणजे अनुभव आला की म्हणतात आत्मप्रचिती.

'शास्त्र प्रचिती, गुरूप्रचिती व आत्म प्रचिती असेच ना?' विलास म्हणाला.

'शाब्बास हं बाळा.' गणपतीने पाठीवर शाबासकी दिली.

'आजी बघा न! मला हा बाळा म्हणतो', विलासची तक्रार.

'अरे तो माझी नक्कल करतोय! रागवायचं कशाला? आजी म्हणाल्या. 'आत्ता तीन नावे बरोबर सांगितलीस समर्थ म्हणतात.

***प्रत्यय ज्ञाता सावधान । त्याचें ऐकावें निरूपण ।***
***आत्म साक्षात्काराची खूण । तत्काळ बाणे ।।१७/४/३०।।***

आता आलं लक्षात! स्वतःला प्रचिती म्हणजे अनुभव. कशाचा? आत्मज्ञानाचा. आत्मज्ञानाचा अनुभव आल्यामुळे तो सावधान पणे विषय समजावून देतो. त्याचे निरूपण ऐकावे. म्हणजे आत्म साक्षात्कार लवकर होतो.

'तो पाल्हाळ न लावता मुद्याचे तेच पण सोपे करून बोलतो आपला विश्वास बसतो. आनंदही होतो. असे बोलणे समर्थांचे ते बघ ५व्या समासात किती सुंदर विचार सांगताहेत. देव कोठे शोधाल? वाच तूच वाच' विलास वाचू लागला.

***सहज देव असतचि असे । सायासें देव फुटे नासे ।***
***नासिवंत देवास विश्वासे । ऐसा कवणु ।।१७/५/१४।।***

आजी म्हणाल्या,'नाशिवंत देव कोणते कळले आता? सगळयांच्या नजरा जयाकडे वळल्या.

जया चटकन म्हणाली,'मातीच्या बनवलेल्या मुर्ती फुटणारच त्यावर प्रेम करीत बसू नये. चांदी सोन्याचे देव चोरीला जातील.

आजी म्हणाल्या.'मग खरा देव अंतरात मंदिरात वैकुंठविहारी म्हणजे कोण बरं?

गणपती म्हणाला,'आत्माराम'

'शाबास हं बाळा' विलासने तीनदा शाबासकी दिली.

आजी म्हणाल्या,'झाली फिट्टंफाठ' सगळेच हसले. समर्थांनी युक्ती सांगितली,

***अंतरी वसतां नारायेणें। लक्ष्मीस काये उणें ?।***
***ज्याची लक्ष्मी तो आपणें। बळकट धरावा ।।१७/५/२४।।***

फारसा खटाटोप न करता. अंतरंगातल्या नारायणाची भक्ती करावी. निरंतर नाम घ्यावे. नुसते शांत बसून श्वासाकडे लक्ष द्यावे.श्वासातूनच सोहंचा जप चाललेला आपला आपल्याला ऐकू येईल असे अखंड नाम घेतल्यावर लक्ष्मीला काय तोटा? ज्याची लक्ष्मी तो नारायण घट्ट धरून ठेवल्यावर पाठोपाठ लक्ष्मी येणारच.

'शिवाच्या पाठोपाठ पार्वती म्हणजे शक्ती येणारच'- गणपती

'रामाच्या पाठोपाठ सीता येणारच'- विलास

'कृष्णाच्या पाठोपाठ राधा येणारच'- जया

'विठोबाच्या पाठोपाठ रूख्मिणी येणारच'- सुधा

'आजींच्या पाठोपाठ आम्ही असणारच' मधुकर म्हणाला, सगळेच मोकळेपणी हसले.

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**

## दिवस ३४ वा

हातपाय धुवून मारूतीला वंदन करून मुले उभीच राहिली. नित्याप्रमाणे आजींना वंदन करायचे म्हणून थांबली. आजी आल्या. पण जरा दूर बसल्या. 'बाळांनो, आज जरा लांबूनच नमस्कार करा' आजी म्हणाल्या.

'आज बैठ्कीवर कां बसत नाही?' विलासने शंका विचारली.

'आपल्या शेजारच्या मावशींना देवाज्ञा झाली. तिकडे जाऊन आले. म्हणून बैठ्कीवर बसत नाही. स्नान करून येई पर्यंत उशीर होईल. वेळ जाईल. मी स्नान मग करीन.' आजींनी उलगडा केला. 'सुधा आतून चटई व दासबोध घेऊन येशील?

सुधा आत गेली.



मधुने विचारले,'आजी आम्ही कितीतरी लहान आहोत. पण तुम्ही नेहमी 'कर असे न म्हणता 'करशील?'असे विनंती सारखे कां म्हणता? आम्ही 'कर' म्हटले तर ऐकणार नाही कां ?'

'तसे नव्हे' आजी म्हणाल्या, ' आपल्या वाणीत आर्जव असावे. मृदू भाषणाने माणूस सुखावतो. त्यात प्रेमाची भावना वाढते.'

सुधा दासबोध घेऊन आली. चौरंगावर दासबोध ठेवला. आजींना चटई दिली.सुधाने विचारले., 'आजी, मावशी गेल्या. तुम्ही त्यांचे घरी जाऊन आलात. मग स्नान कशाला करायचे ?'

आजी म्हणाल्या,'आपल्या देहांत चैतन्य आहे. आत्मा आहे. तो पर्यंत देह पवित्र असतो. आत्मा देहाला सोडून गेला की दूषितता येते. तो मलीनपणा दुःखाची छटा घालवण्यासाठी स्नान करायची वहीवाट पडली.

विलास म्हणाला,' मनुष्य मरतो म्हणजे श्वास बंद पडतो. हे आत्म्याच्या सत्तेनेच. पण तो देहाला सोडून का जातो?'

आजी म्हणाल्या, ' वापरून पुस्तक विस्कळत होते. पाने सुटी होतात. वस्त्र जीर्ण होते. फाटते. तसा देह वापरून वापरून झिजतो. कार्य करण्यास इंद्रिये कुरकुरतात. देह निकामी होतो. तेव्हा देहातील आत्मा दुसरे घर शोधतो, व हे टाकून देतो. सुधा दशक१७ समास ६ वा काढ. पहिलीच ओवी वाच.'

***आत्मा देहामध्यें वसतो। नाना सुखदुःखे भोगतो।***
***शेवटी शरीर सांडून जातो। येकायेकी ।।१७।६।१।।***

आजी म्हणाल्या,'काल जे आपण म्हणालो की निरंतर नाम घ्यावे. त्याचे कारण हेच की आत्मा या देहाला सोडून केव्हा जाईल याचा नेम नाही. शेवटचा क्षण केव्हा येतो. हे कोणाला कळत नाही. त्यावेळी भगवंताचे नाम आठवेलच असे सांगता येत नाही.'

गणपती म्हणाला,'ज्या देहाकरवी आत्मा सुख दुःख भोगतो. तो देह तर पडला. मग आत्मा दुसऱ्या देहात जाऊन काय करतो? पुन्हा सुख भोगत बसतो. मग भजनाचा भक्तीचा काय उपयोग?'

'बरे विचारलेस' आजी म्हणाल्या. भक्ती करून वासना शुध्द करता येतात. वासनेच्या पायात दुसरा जन्म घ्यावा लागतो, तो वरच्या वरच्या पातळीतला मिळाला तर आत्मा परब्रह्मांत विलीन होणे सोपे जाते. व अशुध्द वासना, पापात्मक कर्मे यांनी पुन्हा पुन्हा खालच्या पातळीत म्हणजे पशू पक्षी होत बसावे लागते. पुन्हा मानव देह मिळायला वेळ लागतो.

मधुकर म्हणाला,'पाप पुण्य समान होण्याचं गणित सोडवत बसावं लागेल?'

'बरोबर', आजी म्हणाल्या,'म्हणून समर्थांचा आग्रह भगवंताने दिलेल्या बुध्दीचा वापर करून परब्रह्मपदाशी ऐक्य साधण्याचे ध्येय गाठावे. पण विषय सुखाच्या नादात शुध्द ज्ञानाचा लोप होतो. देहातील जीवात्मा म्हणजेच जीव सारखा जींवत रहाण्याकरितांच धडपड करतो. गणपतीला दे आता दासबोध बघ १७वी ओवी.'

***अखंड रडती चर्फडिती । विवळ विवळों प्राण देती ।***
***मूर्ख प्राणी त्यास म्हणती । परब्रह्म ।।१७/६/१७।।***

आजी म्हणाल्या,'जीवात्मा व परब्रह्म यातला फरक कळला नं? अज्ञाना मुळे विषय मिळाला नाही, मनासारखे झाले नाही की जीव दुःख करीत बसतो. कधी रडतो. कधी तडफडतो. शेवटी वैतागतो. कधी अविचाराने आत्मघात करतो. आपणच आपला प्राण घेतो. नाश पावतो. आणि अज्ञानामुळे अशा दुःखमय जीवाला म्हणजेच जीवात्म्याला लोक परब्रह्म म्हणतात. त्यांना मूर्खच म्हणावे नाहीतर काय? ज्ञान मिळवायचे ते याच करिता जीव व परब्रह्म यातला फरक लक्षात यावा. जीवाला उपाधी आहे. परब्रह्माला उपाधी नाही. मधू पुढचीच ओवी वाच.'

***परब्रह्म जाणार नाहीं । कोणास दुःख देणार नाही ।***
***स्तुति निंदा दोन्ही नाही । परब्रह्मी।।१७/६/१८।।***

परब्रह्म ही शक्ती शाश्वत असणारी. ती कधी कोठे जात नाही. येत नाही. देहाची उपाधी परब्रह्माला नाही. परब्रह्म आनंद मय असल्याने कोणालाही दुःख देत नाही. परब्रह्माची कोणी स्तुती केली वा निंदा केली तरी त्याची बाधा परब्रह्मास नाही. परब्रह्म ही चीज आकारी नाही. तर त्याला विकार कोठून असणार? अत्यंत सूक्ष्म असून आतिशय अवाढव्य ब्रह्मांडाला व्यापून असणारे परब्रह्म अनुभवाने जाणायचे असते.

आजी म्हणाल्या,'बाळांनो हे जाणणे सुध्दा त्यानेच दिलेल्या जाणीव शक्तीने



जाणायचे असते. त्याच शक्तीने अनुभवायचे असते. पण केव्हा? देहाचा अंत व्हायच्या आतच अंतकाळी कशी स्थिती होते? समर्थ वर्णन करतातच. विलास तू वाच शेवटची ओवी.'

***अंतकाळ आहे कठिण । शरीर सोडिना प्राण ।***
***बराडया सारिखे लक्षण । अंतकाळी।।१७/६/३२ ।।***

आजी म्हणाल्या,'या जीवाचा देहावर इतका लोभ असतो की शरीर सोडतांना वासनेत गुंतल्यामुळे सुटता सुटत नाही. त्यामुळे सामान्यांत सामान्य मनुष्य एखाद्या भणंग भिकाऱ्यासारखा दीनवाणा होतो.

अशी स्थिती येऊं नये म्हणून खरा मित्र शोधावा. कोण बरं आपला खरा मित्र?

'गणपती विलास मित्र मित्र असे उत्तर नक्कीच नसणार', जया म्हणाली.

'पैसा हा आपला मित्र कां?' विलासने शंका विचारली

आजींनी नकारार्थी मान हलवली. मग सदगुरू आपले मित्र कां? तरी आजींनी मान हलवली.

'मग आपला मित्र कोण? आजी आम्ही हरलो. तुम्हीच सांगा' गणपती म्हणाला.

आजी म्हणाल्या,'समर्थच सांगतील. मधू तू वाच ८वी ओवी.'

***आपला आपण करी कुडावा । तो आपला मित्र जाणावा ।***
***आपला नाश करी तो समजावा । वैरी ऐसा ।।१७/७/८।।***

आपणच आपला मित्र. आपणच आपला शत्रू! अय्या! हे कसे? जया आश्चर्याने म्हणाली.

मधुकर म्हणाला,'आपण म्हणजे कोण? देह नव्हे हे नक्कीच. व आपला म्हणजे कोणाचा? चांगलंच कोडं आहे हे!'

आजी म्हणाल्या,' ते सुटण्याचा मार्गपण सांगतात समर्थ.'

विलास म्हणाला,'कांही अंकातून शब्दकोडी असतात. व शेवटच्या पानावर नाहीतर कोडयाच्या खालीच उलटया अक्षरांत उत्तरे असतात. मधुदादा सारखी हुशार मुले कोडी सोडवून पहातात. माझ्या सारखे बुद्दू थोडा प्रयत्न करून सरळ उत्तर पहातात.

त्यांत आनंद असत नाही. आजी कोड सुटेल अशी जवळची ओवी सांगा. आजींनी ओवी सांगितली,

*जो आपला आपण घातकी । तो आत्मा हत्यारा पातकी ।*
*याकारणें विवेकी । धन्य साधु ।।१७/७/१०।।*

मधु म्हणाला,'मी प्रयत्न करू? आपण म्हणजे जीव. देह सुखाला घट्ट धरून बसतो. पूर्ण आनंदाचा मार्ग चोखाळत नाही. शिव स्वरूप होत नाही. आपला म्हणजे आत्म्याचा उन्नतीचा मार्ग शोधणे सोडून देतो म्हणजे नाशच.

सुधा म्हणाली, 'पण आत्मा आविनाशी न? मग त्याचा नाश कसा?'

जया म्हणाली,'वासनेची फळे भोगण्यासाठी पुन्हा नवा देह धारण करून उपाधीत अडकणे म्हणजे नाशच नव्हे कां?

गणपती म्हणाला,'मग काय करायचं?' आजींनी ११ बोटे दाखवली. सुधाने बरोबर ताडले व ११वी ओवी काढली.

*पुण्यवंता सत्संगती । पापिष्टां असत् संगती ।*
*गती आणि अवगती । संगती योगे ।।१७/७/११।।*

आजी म्हणाल्या,'पुण्यवान कोण हे आपल्याला कळले. तसेच अत्यंत पापी कोणाला म्हणायचे? ते पण कळते. सगळ्यांना सारखी गती कशी मिळणार? जशी संगत तशी गती. सत्संगती लाभण्यासाठी सुध्दा पूर्व पुण्याई लागते. अर्थातच चांगल्या संगतीचे फळ चांगले. वाईटाचे वाईटच असणार. याबद्दल दोष देता येणार नाही.

विलास म्हणाला,'म्हणजे करावे तसे भरावे.'

'होय' आजी म्हणाल्या,'पण करतो जीव अणि भरावे म्हणजे भोगावे लागते आत्म्याला. हीच ती गुंतागुंत. विलास तू वाच शेवटची ओवी.'

*देह जैसें केलें तैसें होतें । येत्न केल्या कार्ये साधतें ।*
*तरी मग कष्टावें तें । काये निमित्य ।।१७/७/३०।।*

आजी म्हणाल्या,'देहाला जसं वळण लावावं तसं करण्यास तत्पर असतो. मग निष्कारण कष्ट करून भलत्याच मार्गास कशाला जा? मधू आता उलगडलं कोडं ?



म्हटलं तर अवघड कांहीच नाही. हा सगळा खेळ वागेश्वरीचा. वागेश्वरी म्हणजे वाग् देवता. किती सूक्ष्मपणाने पण कसे सुंदर कार्य चालले आहे पहा! त्या शारदेचे कौतुक करावे तेवढे थोडेच!

भगवंताने मानवाला दिलेली मोठी देणगी कोणती असेल तर वाणी. बोलण्याची शक्ती. जो जो विचार करावा तो तो मति गुंग होते.

सुधा पुढचाच समास काढ. वाच तूच.'

*नाभीपासून उन्मेष वृत्ती । तेचि परा जाणिजे श्रोतीं ।*
*ध्वनी रूप पश्यंती । हृदंई वसे ।।१७/८/१।।*
*कंठापासून नाद जाला । मध्यमा वाचा बोलिजे त्याला ।*
*उच्चार होता अक्षराला । वैखरी बोलिजे ।।१७/८/२।।*

आजी म्हणाल्या,'नाभी पाशी म्हणजे बेंबीपाशी जे स्फुरण होते त्यास परावाणी म्हणतात. ॐकार रूपाने ही शारदाशक्ती नाभीपाशी वास करते. म्हणजे राहते. ही सच्चिदानंदाची ज्ञानमयी शक्ती. तीच स्फुरणरूप. वृत्ती हृदयात शिरली की ध्वनीचे रूप तिला प्राप्त होते. किती तऱ्हेचे आवाज! तेथे तिला कसे प्राप्त होतात हे तर मोठेच कोडे नाही कां ? तिला पश्यन्ति वाणी म्हणतात. तो ध्वनी कंठात येतो व नादाचे रूप प्राप्त होते. तिला मध्यमा वाणी म्हणतात. शब्द स्वरूपात तिचा उच्चार होतो तेव्हा वैखरी वाणी म्हणतात. दिवसाकाठी किती कोट्यावधी शब्दांचा वापर मनुष्य करतो. सर्व शब्दांचे स्थान एकच नाही. कांही अक्षरे कंठातून वर काही टाळूच्या स्पर्शाने. कांही दांत जीभ यांचे सहाय्याने तर काही नाकातून, कांही जीभ उलटी करून तर कांही ओठांच्या सहाय्याने.मनुष्य उच्चार करतो. काय शारदेचे कौशल्य हे ! अक्षरापासून शब्द. शब्दांना अर्थ तो तरी एक कां? एकेका शब्दाला २/४ अर्थ. ही सारी मनोगत स्पष्ट करण्याची किमया ज्याचे सत्तेने निर्माण झाली तो मोठा देव. त्याच्या अनुभवासाठी त्यानेच दिलेली वाणी कशी वापरावी आलं ना ध्यानात ?

*आणखी एक करामत आहे त्या वाणीची! धन्य ती जगज्ज्योती!*
*अंतकर्ण प्राणपंचक । ज्ञानेंद्रियें कर्मेंद्रिये पंचक ।*
*पांचवें विषय पंचक । ऐंसी हे पांच पंचके ।।१७/८/१५।।*

हा खरा अध्यात्माचा अभ्यास.

अंतःकरण पंचकाची नावे कोण सांगेल?

'मी सांगते,' सुधाने नांवे सांगितली. 'अंतःकरण, मन, बुद्धी, चित्त, अहंकार. आजी म्हणाल्या, 'आता बाहेरील ज्ञान आंत घेणारी इंद्रिये?'

गणपती म्हणाला,'डोळा'. थांब गणपती,' डोळा हा अवयव आहे इंद्रिय म्हटल्यावर नेत्रेंद्रिय असे म्हणावे' आजींनी दुरूस्ती सुचवली.

गणपती, म्हणाला 'चुकलो. १) नेत्रेंद्रिय २) कर्णेंद्रिय ३) घ्राणेंद्रिय ४) रसनेंद्रिय ५) त्वगींद्रीय ही पाच ज्ञानेंद्रिये झाली. '

विलास म्हणाला मी विषय पंचक सांगतो१) शब्द २) स्पर्श ३) रूप ४) रस ५) गंध.

'ठीक. आता कर्मेंद्रिये मधू सांगेल.

मधु म्हणाला, 'हस्त, पाद, वाणी, गुद आणि शिश्न. ही पांच कर्मेंद्रिये'.

जया म्हणाली, ' मी प्राण पंचक सांगते. प्राण अपान व्यान उदान व समान, म्हणजे सर्व मिळून पाचा पाचा पंचवीस तत्त्वे झाली. या २५ सांना सूक्ष्म देह म्हणतात.

आजी म्हणाल्या, 'ही ओवी बघ. समर्थ काय म्हणतात?'

***आत्मानात्म विवेक करितां । सारासार विचार पाहतां ।***
***पंचभूतांची माइक वार्ता । प्रचित आली ।।१७।९।११।।***

विलासने पंचभूतांची नांवे सांगितली,' पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश' ही मायेने निर्माण केली. ती एकात एक मिसळणार. म्हणजेच नाश पावणार. आणि त्या पाचांचा हा देह.'

आजी म्हणाल्या, 'बरोबर. तो देह नाश पावणार. आज मावशींचा देह सुटला. उद्या आजींचा.'

'नको नको' विलास ओरडला. आम्हाला दासबोध शिकायचा आहे. शहाण व्हायचंय.'

आजी हसल्या.' अरे, मी नसले तरी दासबोध रहाणारच न? मग काय करायचे समर्थ सांगतात बघ.



***जें आपणांस नव्हे ठावें। ते जाणतयास पुसावें ।***
***मनोवेगें तनें फिरावें । हें तों घडेना ।।१७।१०।५***

मनाच्या वेगाने शरीर कधीच फिरू शकणार नाही. नेहमी जिज्ञासू वृत्ती धरावी. जे येत नाही ते जाणकारास विचारावे. ज्ञानचक्षूने जगाकडे पहावे.

***खरें खोटें येकचि जालें। विवेकानें काये केलें ।***
***असार सांडून सार घेतलें। साधु जनीं ।।१७।१०।२२।।***

बस्स एवढंच केले की कोडे सुटले. संत ज्या मार्गाने गेले. त्याच मळलेल्या वाटेने जायचे. सोपा मार्ग

***म्हणौन संतसंगेचि जावें । सत् शास्त्रचि श्रवण करावें।***
***उत्तम गुणास अभ्यासावे । नाना प्रयेत्नें ।।१७।१०।३०।।***

आजी म्हणाल्या, 'प्रथम गुणवान व्हायचं. सद्गुणामुळे श्रवणाची गोडी वाढेल. श्रवण करता करता ज्ञान वाढेल. ज्ञानी बुद्धीमान सर्वत्र वंद्य ठरतो. कोणासारखा?

विलास म्हणाला,'मारूती राया सारखा '

महारूद्र हनुमान की जय.

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**

## दिवस ३५ वा

सगळी जमली. जयाच्या हातातल्या डब्याकडे सगळ्यांचे लक्ष होते. 'आज खूपच मोठा डबा आहे. काय आहे एवढा खाऊ?' विलासने विचारले.

'खाऊ नाही. प्रसाद आहे प्रसाद' जया म्हणाली.

'प्रसाद सत्यनारायणाचा कां?' गणपतीने विचारले.

जया म्हणाली,'नाही. प्रसाद फक्त सत्यनारायणाचाच असतो कां? आज खूप प्रसाद आहे. आजी आज आधी आम्ही प्रसाद कोणता ते पाहू कां?

आजी म्हणाल्या, 'पहा. पहा. थांबा मी ताट आणते. त्यात ठेव वेगवेगळा.' आजींच्या ऐवजी सुधाच आत गेली ती ताट घेऊन आली. डबा आजींच्या हातात दिला.

आजींनी उघडला. एक पुडा काढला. त्यात एक लहान पुडी होती. ती उघडली काळा बुक्का होता. वास छान आला. चुरमुऱ्याला पण बुक्क्याचा वास लागला होता. 'हा प्रसाद पंढरपूरचा', विलास म्हणाला. 'विठोबा काळा बुक्का काळा.'

दुसरा पुडा काढला. त्यांत कवठाची बर्फी होती. मधु म्हणाला, ' ही बर्फी केशरी आंबट गोड, कवठाची, नरसोबा वाडीची. होय नां?' जयाने मान हलवली.

'अय्या ! हे पेढे. वास कसा खमंग आला. पुडयावरच नांव आहे कंदी पेढे. म्हणजे हे सातारचे. हा प्रसाद गडावरचा दिसतोय. सुधा म्हणाली.

'आणि हे काय आहे?' विलासने विचारले.

आजी म्हणाल्या, 'याला पेठा म्हणतात. वरून कोरडी दिसते वडी. पण आत मऊ ओलसर आहे. हा मथुरेचा प्रसाद. तिकडचा पेठा प्रसिद्ध.'

'आणि हे खोबरं. याला हळद किती लागलीय. पिवळ झालयं सगळं.' विलासने नाक उडवलं.

जया म्हणाली,'हा जेजुरीचा खंडोबाचा प्रसाद याला भंडारा म्हणतात. जेजुरीला गेलं की कपडयांना पिवळा डाग पडलाच म्हणून समजा. कपाळाला हळद फासतात. नी खोबऱ्याचा प्रसाद देतात.

'आणि हे मोठे फुटाणे.' हे कोल्हापुरचे अंबाबाईचा प्रसाद हा.' विलास म्हणाला.

'इतका प्रसाद एकदम कसा आला?' गणपतीने विचारले.

जया म्हणाली,' माझे काका भारत दर्शनाला गेले होते. खूप खूप यात्रा केली त्यांनी, प्रत्येक गावाचा देव वेगवेगळा. प्रसाद वेगळा. हिमालयातील बद्रीनारायणापासून थेट दक्षिणेला रामेश्वरापर्यंत व पूर्वेच्या जगन्नाथपुरी पासून पश्चिमेला व्दारकेपर्यंत चारधाम यात्रा केली. आजी, इतके देव असल्यावर भक्ती कोणत्या देवाची करायची?

आजी म्हणाल्या,'हे सगळे देव म्हणजे मोठया अवतारी देवांच्या काल्पनिक प्रतिमा.

जोपर्यंत पूर्ण ब्रह्मज्ञान होत नाही तो पर्यंत सगुण मूर्तींची पूजा वंदन आवश्यकच. मात्र विचार करून आपले आवडते दैवत आपण पक्के ठरवावे. व मनोभावे एकाचीच



उपासना करावी . कोणत्याही प्रतिमेची मनोभवे भक्ती केली तरी ती पूजा अंतरात्म्यालाच जाऊन पोहोचते. फळ देणारा शेवटी अंतरात्माच असतो.

कारण समर्थ दासबोधात सांगतात सुधा १८/१ काढ.

विलास म्हणाला,'आजी, अठरा एक म्हणजे काय?'

सुधा म्हणाली, दशक १८ समास १ आता ओवी ऐक.

***सकळ देवांचे मूळ । तो हा अंतरात्माचि केवळ ।***
***भूमंडळी भोग सकळ । त्यासीच घडे ।।१८/१/१६।।***

आजी म्हणाल्या,'देव कोणत्याही क्षेत्रातला असो. त्याचे नाव काहीही असो. जगन्नाथ पुरीचा जगन्नाथ नाहीतर व्दारकेचा व्दारकानाथ. आपण जी पूजा करू ती अंतरात्म्यालाच पोहोचते. सामान्य मनुष्य अंतरात्म्याला पाहू शकत नाही तो पर्यंत एकनिष्ठेने सगुणाची म्हणजे मूर्तीची पूजा करायलाच हवी.

पूजा करता करताच भगवंताचे प्रेम वाढीस लागले की मूर्ती आपोआप सुटते व प्रेमाचा ओघ अनुसंधानांत शिरतो. अनुसंधान म्हणजे त्याच्या शिवाय दुसरा कोणी नाहीच. सर्वत्र तोच तो अनुभवास येणे. या अनुसंधानाने काय साधते ? गणपती तू वाच आता.

***त्या अनुसंधाना सरिसें । जळोनी जाईजे किल्मिषें***
***अंतर्निष्ठ ज्ञानी ऐसे । विवरोन पाहाती ।।१८।१।२३।।***

आजी म्हणाल्या, 'एकदा का भक्ताला अनुभव आला की हा अंतरात्माच सर्व काही आहे. की बस्स ! मार्ग मोकळाच झाला. पुण्याई शिवाय अनुसंधान राखता येत नाही. अनुसंधान राखता येऊ लागले की पापाचे नाव सुद्धा शिल्लक रहात नाही.

मधू म्हणाला, 'पाप जळून जाते. म्हणजेच सदैव देवाचेच स्मरण असल्याने पापकृती हातून होणारच नाही. जळायला पापच कुठे आहे ?

आजी म्हणाल्या, 'बरोबर. पण भक्ती करायला लागण्यापूर्वी आपण जे कांही पापात्मक कर्म केले असेल तेही फळ देण्यासाठी शिल्लक नको रहायला. ते पाप जळून जाते व नवीन होतच नाही. असे जे अंतरात्म्यावर प्रेम करणारे अंतर्निष्ठ असतात त्यांचे

काय होते? त्यांना कोणता लाभ मिळतो? जयाने विचारले.

आजींनी लगेच दासबोधातली ओवी तिला वाचायला दिली.

***अंतर्निष्ठ तितुके तरले। अंतर्भ्रष्ट तितुके बुडाले ।***
***बाह्यात्कारें भरंगळले । लोकाचारे ।।१८।१।२४।।***

आजी म्हणाल्या, 'त्या थोरल्या देवावर ज्याचे खरेखुरे प्रेम असते ते नाना तऱ्हेच्या संकटातून सुटतात. माया नदी तरून जातात. दृश्य माईक पसाऱ्यात अडकत नाहीत. त्यांचे जीवन सार्थकी लागते.

ज्यांना देवावर प्रेम करताच येत नाही ते देवाण घेवाण या व्यवहारात गुंतून पडतात. ते अंतरभ्रष्ट ते पार बुडतात. त्यांचे जीवन फुकट जाते.

विलास म्हणाला, ' आजी खरे खुरे प्रेम करायचे म्हणजे ते कसे? ते कोठे शिकायचे ?

'छान विचारलेस.' आजी म्हणाल्या. 'हे बघ समर्थ सांगतात-

***जाणत्यांची संगती धरावी । जाणत्यांची सेवा करावी***
***जाणत्याची सद्बुद्धी घ्यावी । हळुहळु ।।१८।२।२।***

विलास म्हणाला, ' सोपी आहे ओवी. मला कळला अर्थ. जाणता म्हणजे अंतरात्मा हाच खरा देव.तोच सारे करतो. सांभाळतो मोडतो तरी तो असतोच असतो हे ज्यांनी ओळखले तो जाणता. म्हणजे संत. त्यांची संगती धरावी. त्यांचे पडेल ते काम करावे त्यांची आज्ञा पाळावी. त्यांच्या वागणुकीचे निरीक्षण करावे. घेता येतील तितके गुण घ्यावेत. गुणांचा साठा आपल्याजवळ झाला की त्यांचे सारखे अनुसंधान आपल्याला राखता येईल.

सुधा म्हणाली,'वा! वा! आता विलास पण वाढीव अर्थ सांगू शकतो हं ! शाब्बास विलास.

'थँक यू मॅडम ! विलास म्हणाला, सारेच हसले.

'जाणत्यापाशी, म्हणजे ज्ञानी माणसापाशी शिकण्यासारखे असे काय असते?' गणपतीने शंका विचारली.



आजी म्हणाल्या, 'खूप कांही असते. ती बघण्याची दृष्टी हवी. हे बघ

***जाणत्याची तीक्ष्णता । जाणत्याची सहिष्णता ।***
***जाणत्याची उदारता । समजोन घ्यावी ।।१८।२।१७।।***

आजी म्हणाल्या, जाणता सूक्ष्म , तीक्ष्ण बुद्धीचा असतो. सूक्ष्म विचार करतो. विलास म्हणाला, 'थांबा आजी.सूक्ष्म आणि तीक्ष्ण एकच कां? मी आजपर्यंत समजत होतो सूक्ष्म म्हणजे लहान म्हणजे थोडी मंद बुद्धी. आता मला समजायला लागलं.'

गणपतीने टोला हाणला, 'बाळ आता मोठा झाला न ! मोठा म्हणजे शहाणा.' आजी म्हणाल्या, 'आपण सगळेच हनुमान भक्त न? सगळेच शहाणे होऊ या. जाणत्या माणसाचे ठिकाणी सहिष्णुता असते.सारे काही सहन करण्याची ताकद असते. जाणता समभावाने वागतो म्हणून मनाविरूद्ध काही घडले तरी खोल विचार करून तथ्य नाही तो भाग काढून फेकून देतो. दुष्ट माणसाच्या सुद्धा चांगल्या विचाराचे स्वागत करतो.त्याला सहिष्णु म्हणतात. असा ज्ञानी उदार असतो. अशा उदारपणाची दातृत्वाची कितीतरी उदाहरणे आपल्या वाङमयातून आढळतात. शिबी राजा, चांगुणा, कवच कुंडले काढून देणारा कर्ण, शीर कापून भगवंताला वहाणारा बाणासूर. सगळ्याच कथा वाचाव्यात. संतांच्या संगतीत हे सारे जमते. मग १० चांगल्या गुणातील एक तरी आपल्यात उतरतोच.

विलास म्हणाला, 'हे बाकी थोडे तरी आम्ही अनुभवतो आहोत. आम्ही ठरवलेले नियम आजतागायत पाळत आहोत. अधूनमधून मुद्दाम एकमेकाला विचारतो. पण आजी जाणत्याची संगत धरली तरी स्वतः काही प्रयत्न करायला हवेतच नां? तो नक्की कोणता करावा ?

'सांगते,' आजी म्हणाल्या,' ध्यान. हा एकमेव उपाय. समर्थ म्हणतात.

***ध्यान धरीना तो अभक्त । ध्यान धरील तो भक्त ।***
***संसारापासूनी मुक्त । भक्तांस करी ।।१८।२।२९।।***

बाळांनो, जो आपला योगक्षेम चालवतो, त्याचे सतत चिंतन असावे. एकान्तात त्याच्या अव्यक्त स्वरूपाचे चिंतन करावे.जो असे ध्यान धरत नाही तो अभक्त. जो भगवंताचा भक्त असतो त्यास भगवंत जन्म मृत्यूच्या संसारापासून मुक्त करतो. म्हणजेच

वासना शुद्ध करण्यास मदत करतो. शुद्ध विचाराची संचिताची ठेव शुद्ध आचाराकरिता उपयोगी पडते. मनुष्य कर्मबंधातून सुटतो.

मधुकर म्हणाला, 'समर्थ आणि इतर संतही इतके मार्गदर्शन करतात तरी पुण्यमार्ग लोकांना कां बरे आवडत नाही?

जया म्हणाली.'मला वाटते या ध्यान, अनुसंधान, भक्ती यांत पैसा मिळण्याची बाब कोठेच नाही. इतरांना पैसा हेच सर्वस्व वाटते.'

गणपती म्हणाला, 'ते तर खरंच, पण ज्यांच्याजवळ विपुल पैसा आहे त्यांना द्रव्याकरिता नको भक्ती करायला. पण अध्यात्माचा कांही भाग जाचक व अवघड वाटतो.

आजी म्हणाल्या, 'गणपती, तेवढीच अडचण असेल तर समर्थ युक्ती सांगतात बघ. खरी गंमत त्यांना आवश्यकताच वाटत नाही.

***आपणास कांहीचं येना । आणि शिकविलेंही मानेना ।***
***आपण वेडा आणि सज्जना । बोल ठेवी ।।१८।३।९।***

स्वतःला कळत नाही. दुसऱ्याने सांगितलेले पटत नाही. दोष मात्र देतो. तसे न करता काय करावे? जया तू वाच'.

***येकाग्र करूनियां मन । बळेचि धरावें साधन ।***
***येत्नीं आळसाचें दर्शन । होऊंच नये।।१८।३।२०।।***

एकाग्र चित्ताने साधना केली तर अशक्य काय आहे ? मन एकाएकी रमत नाही. म्हणून त्याला बळेच जबरदस्तीने खेचून साधनेस बसवावे. आळस केला की जीव वाया गेला. असाच होईल नाही का याचा अर्थ?'

आजी म्हणाल्या, 'बरोबर सांगितलेस. चित्त एकाग्र होण्यासाठी एकान्ताची अत्यंत गरज असते. समर्थ तर म्हणतात ----'.

***अखंड येकांत सेवावा । ग्रंथ मात्र धांडोळावा ।***
***प्रचित येईल तो घ्यावा । अर्थ मनी ।।१८।३।१।।***

सूक्ष्म अभ्यासासाठी साधनेत खंड नको. अखंडीत साधना लवकर फलद्रूप होते.



बऱ्याच ग्रंथांचे वाचन मन लावून करावे. ग्रंथांतील विचाराबरोबर वाहून न जाता आपल्या कुवतीप्रमाणे योग्य ते विचार संग्रही ठेवावेत.

विलास म्हणाला, 'ग्रंथांची कात्रणे कोण काढून देईल ? जेवढे पटले आहे तेवढे लिहीत बसायला वेळ किती लागेल? मग संग्रही कसे ठेवायचे?'

गणपती म्हणाला, 'मेंदूच्या कपाटांत ठेवायचे. कात्रणे नाही काढून घ्यायची. स्मरणांत ठेवायचे.' विलासच्या डोक्यावर थाप मारूनच सांगितले.

आजी म्हणाल्या, 'भगवंतांची आपल्यावर केवढी कृपा आहे? त्याची भेटी लवकर व्हावी म्हणूनच हा सुबक देह त्याने मला दिला आहे.'

'आणि सुपीक बुद्धी पण दिली आहे. ' गणपतीच्या डोक्यावर थाप मारून विलास म्हणाला.

आजीसह सर्व जण हसले. 'विलास ही ओवी तू वाच' आजी म्हणाल्या.

***देह्याकरितां श्रवण घडे । देह्याकरितां मननी पवाडे ।***
***देह्यांकरिता देही आतुडे । मुख्य परमात्मा ।।१८।४।५।।***

आजी म्हणाल्या, 'येथे 'करिता' या शब्दाचा अर्थ 'मुळे' असा होतो. देहामुळे श्रवण घडते. ऐकण्याचे काम कान करीत असले तरी मनासह सर्व देह अनकूल असावा लागतो. तरच श्रवण घडते. श्रवणाचे मनन झाले की या देहातच तो परमात्मा कोठे व कसा आहे हे स्पष्ट कळू लागते. आणखी काय कार्य करता येते ? मधू तू वाच आता.'

***नाना सन्मार्ग साधनें । देह्याकरितां तुटती बंधनें ।***
***देह्याकरितां निवेदनें । मोक्ष लाभे ।।१८।४।१७।।***

पण आजी, हा देहच बंधनांत ढकलतो. आणि सोडवतो पण ! कशी गंमत आहे? '

सुधा म्हणाली, 'मधुदादा, जे परमार्थ मार्गाला लागत नाहीत त्यांचेच देह त्यांना देहात्मबुद्धीत जखडतात. पण साधना करू लागल्यावर हा देहच मुक्त होण्यासाठी मदत करतो. म्हणजेच साधना देहानेच करायची असते.

आजी म्हणाल्या, 'फक्त विवेक जागा ठेवावा. सर्वांचे ठिकाणी भगवत् भाव

ठेवावा. पूज्य वंदनीय असतील त्यांची अधिकार पाहून पूजा करावी. तिरस्कार कोणाचाच करू नये. समर्थ बघ काय म्हणतात.

***पूज्य पुजेसी अधिकार । उगेजि तोषवावे इतर ।***
***दुखऊं नये कोणाचे अंतर । म्हणिजे बरे ।।१८।४।३८।।***

कोणाच्याही अंतःकरणास वेदना होतील असे बोलणे वागणे नसावे.जे ज्ञान आत्मसात केले आहे ते विचारपूर्वक वापरता आले पाहिजे. नाहीतर नुसता शब्दपंडित आतून कोरा करकरीत. कसा छान दृष्टान्त दिला आहे समर्थांनी!

सुधा म्हणाली,' मी वाचते ही ओवी.'

***धान्य उदंड मोजलें । परीं त्या मापें नाहीं भक्षिलें ।***
***विवरल्याविण तैसें जालें । प्राणीमात्रासी।।१८।५।१।।***

लोका सांगे ब्रह्मज्ञान आपण कोरडे पाषाण. असे होऊ नये म्हणून मननाला फार महत्व आहे.

***स्वये आपणचि गुंते। समजावीस कैसी होते।***
***नेणतां कोणीयेक ते । आपदों लागती ।।१८।५।१९।।***

मधु म्हणाला, 'किती योग्य विचार. समर्थांनी जणू कांही धोक्याची सूचनाच दिली आहे. जो स्वतःच दुबळा तो दुसऱ्याला काय मदत करणार? आणि अशांच्या तडाख्यात सापडणारा अज्ञानी पार संकटातच बुडणार !' उद्धार तर बाजूलाच राहिला पण अवनती मात्र होणार!'

'म्हणून तर आपला आदर्श आपण भक्कम ठेवला आहे' विलास म्हणाला.

'सारासार विचार जागा ठेवणारा मारूती !' मधुकर म्हणाला.

'रामाचा अनन्य भक्त लेचापेचा नाही!' जया म्हणाली.

'समर्थांचा आदर्श तोच आपला आदर्श!' आजी म्हणाल्या. आता प्रसाद घ्या तोंड गोड करा.

।। जय जय रघूवीर समर्थ ।।



## दिवस ३६ वा

सगळे अगदी वेळेवर जमले. विलास नको नको म्हणत होता तरी सुद्धा गणपतीने त्याची करामत सर्वांना सांगितली. त्याच्या घराजवळच्या झोपडपट्टीत मुलामुलांच्यात हाणामारी चालली होती. विलासने २ तास त्यांच्यात मिसळून त्यांची समजूत काढली. भांडण मिटवले. व तडक इकडे आला.

सर्वांनी त्याचे कौतुक केले. सगळा घडलेला इत्थंभूत प्रकार ऐकून झाल्यावर आजी म्हणाल्या, 'विलास, गोष्ट कौतुकाची खरी. तुझी प्रामाणिक इच्छा मुले सुधारावीत हीच आहे. तेही उत्तम. पण पैसे लावून खेळणाऱ्या मुलांच्यावर एकाएकी संस्कार होणार नाहीत. भांडणाचे स्वरूप पाहून ते सोडवायला जात जा. दारूच्या नशेत भांडणे चालू असतील तर त्या फंदांत पडू नकोस. मुले नशेतून शुद्धीवर आली की घालतील गळ्यात गळे. आपण आपली फळी भक्कम करू या. मग त्याही मुलांच्याकरिता मार्ग शोधू या मीच असे म्हणते असे नाही. समर्थांचे सुद्धा काय म्हणणे आहे पहा. वाच तू'.

***अति सर्वत्र वर्जावें। प्रसंग पाहोन चालावें ।***
***हटनिग्रहीं न पडावें । विवेकी पुरुषें ।।१८।६।७।।***

आजी म्हणाल्या, 'अति तेथे माती'असे ऐकले आहेस ना? सगळ्याच गोष्टींना प्रमाण पाहिजेच. शिवाय अशा प्रसंगी २/४ जणांची बलिष्ट शक्ती पाठीशी हवी. कोणत्या प्रसंगी कसे वागावे याचा खूप विचार करावा लागतो. प्रत्येक ठिकाणी आपलाच हट्ट चालवू नये. समर्थांनी असा गोड इशारा शिवाजी राजेंना पण दिला होता.हे लक्षांत घे. म्हणून प्रसंग पाहून शिवाजीला वडिलांच्या सुटकेसाठी काही किल्ले सोडून द्यावे लागले. पुन्हा त्यांनी ते प्रयत्नाने मिळवले, काबीज केले ही गोष्ट वेगळी. पण कधी कधी पडही घ्यावी लागते. याला चतुराई म्हणतात. गणपती तू पुढचा विचार पहा.

***सकळ गुणांमध्ये सार । तजविजा विवेक विचार ।***
***जेणें पाविजे पैलपार । अस्त्रपरत्रींचा ।।१८।६।२२।।***

आजी म्हणाल्या, 'विवेक हा जीवनाचा आधारस्तंभ, सगळ्या सद्गुणांचा मेरूमणीच. ज्याचा विवेक जागा त्याचे विचार पुरोगामी. कोणतेही काम करायचे म्हणजे योजना आखल्याशिवाय करू नये.'

गणपती म्हणाला,' घर बांधायच्या आधी नकाशा काढतात. त्यालाच योजना म्हणतात ना? '

'होय,' आजी म्हणाल्या, 'नुसता नकाशाच नव्हे. सामान, मनुष्यबळ, पैसा या सर्व गोष्टींची योजना हवी. लाखो रूपये सारून आपण घर बांधतो. ज्याच्या कृपेने घर बांधतो त्याच्याकरिता देवघर म्हणून काही जागेची योजना असत नाही. हा विवेक खरा नव्हे.

विलास म्हणाला, 'आजी, योजनाबद्ध काम करणारा अरत्र परत्र पार करतो हे मला नाही कळलं.'

आजी म्हणाल्या, ' अरत्र म्हणजे या लोकी, प्रपंचात व परत्र म्हणजे परमार्थ. प्रपंच व परमार्थ दोन्ही नीट पार पडायला हवेत.

विलास म्हणाला, 'पण आजी आम्ही प्रपंचाचा आत्ताच केशाला विचार करायला हवा?'

'विलास' आजी म्हणाल्या तूर्तास तुमचे शालेय जीवन हाच प्रपंच. आता पुढच्या आठवड्यात शाळा सुरू होतील. मग विवेकाने न्यायाने वागायचे म्हणजे १ल्या दिवसापासून गणवेशांत जायला हवे. ते कपडे लगेचच नवे हवेत कां? जुने नीटनेटके धुतलेले आहेत की नाहीत पहायला हवेत.पावसाळ्याचे तोंडी शाळा सुरू होते. मग रेनकोट छत्री बघून ठेवायला नको कां? हीच तुमच्या प्रपंचातील योजना. पहिलेच दिवशी पुस्तके नसतील पण १ वही पेन न्यायला हवी की नको? त्यासाठी पिशवी दप्तर ? हीच योग्य काळजी.'

'आलं. आता लक्षात आलं. ' विलास म्हणाला.

'हुषार आहे बाळ. पण लक्षांत यायला जरा वेळ लागतो.' बाजूला सरकतच गणपती म्हणाला.

'लवकर लक्षांत आलं नाही तर दोष नाही.' आजी म्हणाल्या, 'पण सांगूनही लक्षात ठेवलं नाही, किंवा न समजलेलं तसंच मनात ठेवलं, शंका निरसन करून घेतली नाही तर मात्र दोष ठरतो. शरीर संपदा वाढवण्यासाठी जसा व्यायाम तसा बुद्धी तरतरीत होण्यासाठी सुद्धा व्यायाम असतोच. ध्यानात रहावेच असा जो भाग असतो तो दर ४० दिवसाचे आंत पुन्हा पुन्हा उजळणी करिता डोळ्यापुढे आणावा. स्मरणशक्ती



वाढवावी. वाढेल तेव्हा वाढेल असे म्हणू नये. '

मधुकर म्हणाला, 'म्हणजेच प्रत्येक क्षेत्रांत कष्ट करण्याची अभ्यास करण्याची जरूरी आहेच.

'हो तर समर्थांनी सगळयांनाच इशारा दिला आहे, वाच'

***कष्टेंवीण फळ नाही । कष्टेंविण राज्य नाही ।***
***केल्याविण होत नाही। साध्य जनीं ।।१८।७।३।।***

'रोप लावल्याशिवाय फुले कशी मिळणार ? सुधा म्हणाली. ' दूध तापवून विरजल्याशिवाय दही कसे मिळणार ? जया म्हणाली.

'सैन्यात भरती होऊन पराक्रम गाजवल्याशिवाय सेनापतीपद कसे मिळणार? विलास म्हणाला.

आजी म्हणाल्या,'विचार केला की कशा कल्पना सुचतात. मग आनंदही होतो. ही ओवी तेच सांगते पहा.

***जेहिं उदंड कष्ट केले। ते भाग्य भोगून गेले ।***
***येर ते बोलतचि राहिले । करंटे जन ।।१८।७।१६।।***

'बोलाचाच भात . . .

बोलाचीच कढी' जयाने वाक्य पूर्ण केले.

'शाब्बास,' आजी म्हणाल्या,' असे फक्त विचार करून आला दिवस साजरा करीत राहतात त्यांना पदरांत कांहीच पाडून घेता येत नाही. पैसा अमाप असतो. तो खर्च कोठे करणार ? मग जीवाची मुंबई! यात्रा कंपनी गाठून तीर्थक्षेत्रे. स्वस्थपणाने दर्शन तरी होत कां ?

'मुळीच नाही,' जया म्हणाली. 'काका तेच सांगत होते. सारी धावाधाव. कधी कधी खाणं सुद्धा मोटारीतल्या मोटारीतच. कधी सोय कधी गैरसोय. फक्त खूप गांवे पाहिली. पण निर्भेळ आनंद २/३ ठिकाणीच झाला. तेथे मुक्कामच घडला नाही.' जया तूच वाच आता ही ओवी.आजी म्हणाल्या.

***तो अंतर्देव चुकती । धावा घेऊन तीर्था जाती।***
***प्राणी बापुडे कष्टती। देवास नेणतां ।।१८।८।११।।***

आजी म्हणाल्या, 'हौस म्हणून, विरंगुळा म्हणून, कुटुंबियासमवेत एखादे ठिकाण जरूर पहावे. पण निसर्ग सान्निध्य देवदर्शन तीर्थस्नान इतके कांही मनासारखे घडावे की आनंद अगदी ओसंडून वहावा.'

पण होते काय ? आतच असलेल्या रामाला विसरून काळा राम गोरा राम करीत बसतो. काळ्या रामाची बडदास्त. नी गोरा राम पडित ! असं कां बरं व्हावं ? केवळ शुद्ध भाव नाही. खऱ्या ज्ञानाचा लोप. वरवरच्या कर्मात गुंतून पडण्याची शर्यतच लागते जणू! तुमचा हार २ रू. चा. माझा पाच रूपयांचा. दोन्ही हार देवाच्या पायाला लावले की निर्माल्य म्हणून फेकून दिले जातात. निदान एकदा प्रचिती आल्यावर तरी सुधारणा करावी? तर मन माघारी फिरायला तयार होत नाही. समर्थांचे म्हणणे.

***प्रचीतीविण जे केलें । तें तें अवघें व्यर्थ गेलें ।***
***प्राणी कष्ट कष्टोंचि मेले। कर्म कचाटे ।।१८।८।२०।।***

विलास म्हणाला, 'पण आजी, कर्म केल्याशिवाय माणूस राहू शकतो कां? '

'मरे पर्यंत कर्म करावेच लागते नां? जया म्हणाली.

'बरोबर आहे तुझे म्हणणे.' आजी म्हणाल्या, 'कर्माकरिता कर्म, कर्तव्यापोटी कर्म, आवश्यक कर्म, ईश्वरार्पण बुद्धीतून केलेले कर्म, सगळी एकच कां ? कर्माच्या ओझ्याखाली दबून जाणे वेगळे. अनावश्यक कर्मे करून जीव बेजार होतो. शेवटी देह सोडून जातो.

मधुकर म्हणाला, 'म्हणजे मनुष्यदेह मिळूनही त्याचे आयुष्य वायाच गेले म्हणायचे!' सुधा म्हणाली, 'पण आजी, सगुणाची पूजाअर्चा करण्याकरिता कर्माची गरज आहेच ना? आजी म्हणाल्या, 'सुधा सगुण म्हणजे नुसत्या देवघरातल्या मुर्ती नव्हेत. आणि तसे जरी समजलो तरी त्यांच्या पूजेअर्चे चि कर्मे तरी शुद्ध होतात कां? कर्माचं अवडंबर माजवून पदरांत काय पडतं ?

वटपौर्णिमेस वडाची पूजा की डालडाच्या डब्यात वाळू किंवा मातीत पांच पानांची फांदीची पूजा. देहाचा साज शृंगार मात्र पाहून घ्यावा. नाकात नथ घालायला १० मिनीटे लागतात. ठेवणीतली कडक इस्त्रीची साडी नेसतात पण पळी पंचपात्री विसरतात. सुवासिनींची ओटी कशी भरतात ? व घेतात तरी कशी? साराच गोंधळ नागोबाचं



पूजन नागपंचमीला कसे होते? ऋषीपंचमीला एका तरी ऋषींची माहिती ५/१० वाक्यांत तरी कोणाला सांगता येते कां? सगळीकडेच नन्नाचा पाढा. त्यापेक्षा समर्थ म्हणतात हे खटाटोप थांबवून काय करा -

***परमेश्वरीं अनुसंधान - । लाविंता होईजें पावन ।***
***मुख्य ज्ञानेंचि विज्ञान । पाविजेतें ।।१८।८।२४।।***

गणपती म्हणाला, 'हे पावन होणं सोप खरं! अनुसंधानांत रहायचं कठीण!

विलास म्हणाला, ' अनुसंधान म्हणजे काय ? हे ध्यानात येणे कठीण ! '

जया म्हणाली,' अजून कठीण वाटते तुला?'

'मला नाही म्हणत मी' - विलास म्हणाला, 'धर्माच्या नावाखाली अधर्माने वागतात नं ! त्यांच्या लक्षात यायचे कठीण म्हणतो मी !'

मधुकर म्हणाला, ' तुला समजलं आहे न पण पक्कं !'

'हो तर! आजी, मला सगळेच बुद्दू समजतात.'विलासची तक्रार. अनुसंधान म्हणजे एका भगवंताशिवाय दुसरे कांही नको वाटणे. सतत भगवंताचाच विचार मनांत राहाणे. म्हणजे अनुसंधान. थोडक्यांत म्हणजे दुपारच्या दासबोधाचे अनुसंधान सतत असल्यामुळे कोणालाच कधी उशीर झाला नाही. कधी कोणी गैरहजर राहिला नाही. ज्ञानात भर पडली. पण खंड कधीच पडला नाही. हेच पावन होणे. उलट कांही किरकोळ दोष असतील तर ते जाऊ लागले. ही प्रचितीच नव्हे कां ?'

आजी म्हणाल्या, 'खरंच छान सांगितलंस याच ज्ञानाच रूपांतर विज्ञानात होतं. विज्ञान म्हणजे शुद्ध ज्ञान. निर्गुण ब्रह्माशी ऐक्य आणि बाळांनो, हा विषय पटवून देण्याकरिता समर्थांनी शिष्यांना निद्रा निरूपण ऐकवले. झोपेचे नाना प्रकार नी गमती जमती सांगितल्या. थोडा विचार करून समास वाचला तर ते एक रूपकच आहे.निद्रा हे अज्ञानाचे प्रतीक. निद्रेत अजाणतेपणी मनुष्य जे जे करतो ते ते अज्ञानामुळे माणसाचे हातून घडत असते.

रात्रीच्या झोपेतून मनुष्य जागा होतो व ठरलेल्या चाकोरीतले जीवन सुरू होते. पण शेवटच्या दोन ओव्या पहा कशा विचार करायला लावतात.

***मागे निद्रा संपली। पुढे जागृती प्राप्त जाली।***
***वेवसाई बुद्धि आपुली। प्रेरिते जाले ।।१८।९।२३।।***

मधू म्हणाला, ' निद्रा संपली म्हणजे अज्ञान गेले. आणि खऱ्या अर्थाने जाग आली. म्हणजे आत्मज्ञान झाले. 'मी कोण?' हे कळले. अंतरात्मा कोठे कसा आहे हे समजले. मग बुद्धीने निर्णय घेतला. 'आता या ज्ञान विचाराला सोडायचेच नाही.' त्याप्रमाणे तिने प्रेरणा दिली व मनाला तिचे ऐकावे लागले. १० इंद्रियांसह मन भक्तीमार्गाकडे वळले. ही खरी जागृती.'

'शाब्बास,' आजी म्हणाल्या, 'पुढेच बघ समर्थ काय म्हणतात,

***ज्ञाता निवेदनें जाला । तुर्ये पलिकडे गेला ।।***
***आत्मनिवेदनें जाला। ब्रह्मरूप ।।१८।९।२४।।***

सुधा म्हणाली, 'आजी, एकदा का मन या आत्मज्ञानांत रमलं की तो २५ तत्त्वांच्या स्थूल देहाला बाजूला सारतो. कारण ती तत्त्वे नाशिवंत आहेत. म्हणून स्थूल देह नाशिवंत. सूक्ष्म देहाच्या २५ तत्त्वांना बाजूला सारतो. नी मनाच्या ओढीने जागृती स्वप्न सुषुप्तीच्या पलीकडे उन्मनी अवस्था व त्याही पलीकडे तुर्यावस्था तो ओलांडतो. तेथेच आत्मनिवेदन घडते व ब्रह्मरूपाचा त्याला अनुभव येतो.

'वा वा सुधा, आजी बोलतात तस्स फक्कड बोललीस. पण या खोक्यात फारच थोडं शिरलं बघ !' विलास म्हणाला.

आजी म्हणाल्या,'विलास, तुला सुध्दा हे सगळं सांगता येईल. फक्त लहान लहान प्रश्न विचारून तुला समजले याची खात्री करून दिली की तूच म्हणशील हे सोप आहे. तिने एकदम २५ तत्वे म्हटले म्हणून तू गडबडलास.

५ज्ञानेंद्रिये ५ कर्मेंद्रिये ५ अंतःकरण पंचक ५विषय व ५ प्राण मिळून २५ झाली की नाही. त्यांची नावे तू जाणतोस.

असे सुटे घेतले की येते तुला सांगयला. समर्थ काय म्हणातात ते लक्षात ठेव.

***जे जे काही श्रवणी पडले । तितुकेंन समजोन विवरले ।***
***तरीच कांही सार्थक झाले । निरूपणी।।१८/१०/१६।।***



'आलं लक्षात' विलास म्हणाला,'मनन हवं. म्हणजे अर्थाच अनुसंधान हवं म्हणजे निरूपण येत, आजी मला एक कल्पना सुचली. तुम्ही १० छोटे छोटे प्रश्न विचारा आम्ही उत्तरे लिहू. बघू कोणाच्या किती लक्षात आहे.

आजी म्हणाल्या आपण तोंडी उजळणी घेऊ या. स्पर्धेने कोणाचे तरी मन दुखवले जाईल. सध्या आपण अभ्यास करीत आहोत. आपल्याला थोरल्या देवाचे पाईक व्हायचं आहे. मग थोरांचे लक्षण आपल्यांत उतरायला हवं, कोणतं ते?

***अखंड आपण सांभाळिती । क्षुल्लकपणा येऊ नेदिती ।***
***थोर लोकास क्ष्मा शांती । अगत्य करणे ।।१८/१०/३७।।***

आपण थोरपणा म्हणजे आपले मिळाले आहे ते ज्ञान सांभाळून आपल्याकडे कमीपणा येऊ देऊ नये. कोणाला उत्तर आले न आले तरी उणे दुणे काढू नये. हिणवू नये. आपल्याला सगळ्यांनी मिळून एकच कार्य करायचे आहे.

***बहुत जनास चाळवी । नाना मंडळे हालवी***
***ऐसी ही समर्थ पदवी । विवेके होते ।।१८/१०/४६।।***

करणार न एकजुटीने काम?

वा वा! विचारायला हवं काय? करणारच. सगळे मिळून जगन्नाथाचा रथ ओढू. शाब्बास!

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**

## दिवस ३७ वा

सगळी जमली. वंदनादिक आटोपले. विलासने खिशातून एक कार्ड काढले. 'कोणाचे पत्र आले आहे?' सुधाने विचारले.

विलास म्हणाला,'मुद्दामच आणले आहे दाखवायला. पत्र पाहिल्यावर तर मला वाटले छापलेलेच आहे. निळ्या शाईमुळे लिहिलेले पत्र हे कळले. माझ्या मावशीने पाठविलेले पत्र आहे हे. सुट्टीत का आला नाहीस? तिने विचारले आहे. मला चार मावश्या. सगळी छोटी मोठी मिळून १०/१२ भावंडे तेथे जमली होती. फक्त मीच नव्हतो. अक्षर दाखवण्यासाठी कार्ड आणले आहे.'

सर्वांनी कार्ड हातात घेऊन पाहिले. अगदी पहिल्या अक्षरापासून तो शेवटच्या अक्षरापर्यंत एक टाकी लेखन. कोठे कुठे खाडाखोड नाही. व्यवस्थित लेखन नेटकेपणे. लेखनावर व्यवस्थितपणे शुभ नाम. कोठे डाग नाही.




आजींनी पण कार्ड पाहिले. आजी म्हणाल्या, 'मी शिकत होते तेव्हा आम्हाला कित्ता असायचा. अक्षर लेखनाची वही वेगळी. पुस्तीची वही वेगळी. रोज अक्षरलेखन १० मिनीटे असायचेच व आठवड्यातून पुस्तीचा १ तास असे. पुस्तीला गुण देत व ते भाषेच्या गुणांत मिळवत. प्रत्येक पेपरवर सुद्धा पाच गुण अक्षर व नेटकेपणासाठी राखून ठेवलेले असत.

आता अक्षरलेखनाकडे दुर्लक्ष व्हायला लागलं आहे. अक्षर घोटल्याशिवाय सुंदर कसे येईल? अक्षरावरुन माणसाचा स्वभाव कळतो. आजींनी तीन तऱ्हेचे ३ क बोटांनी काढून दाखवले. व्यवस्थित चौकोनात बसेल असा क हे संयम शीलतेचे लक्षण दाखविते. एक गोल नीट व दुसरा फाटा खाली लोंबता 'क' की अस्ताव्यस्त वागणूक ओळखली जायची. लेखनांत वाचनांत व्यवहारांत, कोणत्याही क्षेत्रात कष्ट आहेतच. जया १३ वी ओवी काढ. १९/१ मध्ये बघ.



***काया बहुत कष्टवावी । उत्कट कीर्ती उरवावी ।***
***चटक लाउनी सोडावी । कांहीं येक ।।१९/१/१३।।***

आजी म्हणाल्या, 'काया म्हणजे शरीर. शारिरीक कष्टाशिवाय कोणतेच काम होत नाही. स्वतः कष्ट करुन जो काम करतो, त्याची वाहवा होते. लोकांना त्याची आवड उत्पन्न होते. मरावे परी कीर्ती रुपे उरावे, असे म्हणतातच.

जीवनांत सगळंच सुंदर असावे. असा संतांचा कटाक्ष असतो. अक्षर सुंदर असावे. तसे बोलणे पण सुंदर असावे. नुसतेच वरपांगी गोड असे नको. हसत हसत बोलणे असे ही नको. त्याला हसत चाड दात पाड म्हणतात. बोलतांना हसत बोलायचे पण अंतरंगात भाव कुटील असेही नको. गणपती 'समर्थ काय म्हणतात बघ.' गणपतीने ओवी वाचली.

***हेत समजोन उत्तर देणें । दुसऱ्याचें जीवीचें समजणें ।***
***मुख्य च्यातुर्याचीं लक्षणें । तें हें ऐसी ।।१९/२/६।।***

आजी म्हणाल्या, 'आपल्याशी जो बालतो त्याचा बोलण्याचा हेतू लक्षात घेऊन उत्तर देता आले पाहिजे. दुसऱ्याच्या मनातला आशय ओळखणे ही एक चतुरताच आहे. चेहऱ्यावरचा भाव ओळखण्याची कला अवगत करुन घ्यायला हवी. चेहरा वाचणे असे त्याला म्हणतात. चेहरा हा आरसाच आहे. अंतःकरणातल्या विचारांचे प्रतिबिंब तेथे छान उमटते. ज्याला अंतःकरण वाचता येते तो चतूर.

गणपती म्हणाला, 'जगांत वावरायचे म्हणजे किती किती गोष्टी शिकायच्या? हे कांही सारे शाळेत शिकवत नाहीत. व्यायाम शाळेत व्यायाम शिकवतात. शिवण क्लासांत फक्त शिवण. नृत्याच्या वर्गात फक्त नृत्य. आजी ते तरी सोपे असते कां? माझी आते बहीण नृत्य विद्यालयांत जाते. फक्त डोळयांची वेगवेगळी हालचाल व त्यानुसार भिवया मान हलवणे याला ३/४ महिने लागले. त्यापेक्षा थोडयाच दिवसात दासबोधाने आम्हाला खूप खूप शिकवले.'

आजी म्हणाल्या, 'माणसाने आयुष्यभर विद्यार्थीच रहावे. आयुष्य संपेल. पण शिकणे संपणारच नाही. तेथे आळस डोकावता उपयोगी नाही. विलास ही ओवी बघ'

***शोध घेतां आळसों नयें । भ्रष्ट लोकीं बैसों नये ।***
***बैसलें तरी टाकूं नये । मिथ्या दोष ।।१९/२/१२।।***

आजी म्हणाल्या, 'मग तो शोध कशाचाही असो. हाती घेतलेल्या कामाची तड लागेपर्यंत आळस येता कामा नये. समजा भ्रष्ट लोकाशी तसा संबंध आला तर गुणदोषाची चर्चा करू नये. खोटे आरोप करीत बसण्यात वेळ घालवू नये. खरी परीक्षा नाही तर मौनच धरावे. आपली वाणी विटाळू नये.

'समाजात आपल्याला मानावे असे वाटत असेल तर काय करावे?' मधूने शंका विचारली.

आजी म्हणाल्या, 'आधी उत्तमोत्तम म्हणवून घेण्यासाठी आपल्या जवळ उत्तम गुणांचा साठा हवा. चातुर्याने त्या गुणांचा उपयोग समाज कार्याकरीता करता यावा. समर्थांनी तोच विचार मांडला आहे.'

***उत्तम गुण प्रगटवावें । मग भलत्यासीं बोलतां फावें ।***
***भले पाहोन करावे । शोधून मित्र ।।१९/२/१५।।***

आजी म्हणाल्या, 'समाज हिताचे काम एकट्याच्याने होणारे नसते. त्याची पायाभरणीच भक्कम सांगितली बघ. आपल्यातले उत्तम गुण समाजाला दिसले की लोक आपणहून चौकशी करतील. सहाय्य देतील. सर्वांच्या स्वभावाची पारख करून मित्र जोडावा. मित्र म्हणून कोणाला निवडावे? यासाठी विवेक हवाच. सज्जन, कार्य तत्पर लोक पाहूनच मैत्री करावी. ती कायम टिकणारी असते.'

गणपती म्हणाला, 'आजी या दासबोधाच्या अभ्यासाने आम्ही पाचही जण समाविचारी झालो आहोत. आयुष्यभर कायम एकमेकाला मदत करीत राहू. तुम्ही बघालच आमची संघटना.'

आजी म्हणाल्या, 'बाळांनो, यशस्वी होण्याचे आणखी एक तंत्र आहे. मधू तू ते तंत्र बघ.'

***जगामध्ये जगमित्र । जिव्हेपाशीं आहें सूत्र ।***
***कोठेंतरी सत्पात्र। शोधून काढावें ।।१९/२/१९।।***

मधू म्हणांला, 'आजी, शारदेची कृपा असली की वाणी मधूर रहाणारच. सत्य पण स्पष्ट, स्पष्ट पण मधूर अशा वाणीने लोकांना प्रसन्न ठेवता येते. या प्रसन्नतेतूनच



चांगले चांगले मित्र शोधता येतात.'

आजी म्हणाल्या, 'त्यावर एक पथ्य आहे. आपापसातील मतभेद बाजूला ठेवता आले पाहिजेत. एकमेकाला समजून घेणे हे फार महत्वाचे. सर्वगुण संपन्न उपजताच कोणीही नसतो. पण प्रयत्न केला तर तसे होता येते.'

विलास म्हणाला, 'तो नेमका प्रयत्नाचा मार्ग सांगा. आम्ही तो अंगीकारू. त्याच मार्गाने जाऊ.'

'हाच तो मार्ग. तुम्ही महिनाभर हाताळता आहातच. आजींनी ओवी दाखवली. विलासने वाचली.

***सकळामध्यें विशेष श्रवण । श्रवणाहुनी थोर मनन ।***
***मननें होयें समाधान । बहुत जनाचें ।।१९/२/२२।।***

विलासनेच अर्थ सांगितला, 'सर्व उपायात श्रेष्ठ उपाय श्रवण. संत वचनाच्या श्रवणाने उत्तम गुण अधिकच वाढीला लागतात. दुसरा फायदा असा की ज्याच्यात मिसळून काम करायचे त्यांचे समाधान व्हायला हवे. आपल्यातील चांगल्या गुणांनी ते समाधान त्यांना प्राप्त करून देता येते. त्यातून आपल्यालाही आनंद मिळतो. तसं वागतील तर सारेच भाग्यवान होतील.'

आजी म्हणाल्या, 'भाग्यवान व्हावे असे साऱ्यांनाच वाटत असते. पण मार्ग सापडत नाही. कळत वा नकळत पाप कर्मे केली जातात.'

मधू म्हणाला, 'कुकर्माने पैसा मिळवला चांगला विनियोग करून चांगला उद्योग सुरू करून पापकर्म सोडून देता येणार नाही का?'

'नाही' आजी म्हणाल्या, 'एक खोटे पचवण्यासाठी १० वेळा खोटे बोलावे लागते. म्हणजे पापापासून पुन्हा पापच घडते. करंटयाचे वर्णन समर्थ असंच करतात.

***पापाकरिता दरिद्र प्राप्त । दरिद्रें होयें पापसंचित ।***
***ऐसेंचि होत जात । क्षणक्षणा ।।१९/३/२।।***

आजी म्हणाल्या, 'वाईट मार्गातल्या पैशाने सत्कर्म करावेसे वाटणारच नाही. पापाचा पैसा व्यसनातच जातो. वित्तहानी होते. शेवटी अन्नान्न दशा येते. दारिद्रय

घालविण्यासाठी पुन्हा पापच. अशी साखळीच सुरू होते. त्याची घसरण पण समर्थांनी छान वर्णन केली आहे. जया आता तू वाच' आजींनी ओवी दाखवली.

***हारवी, सांडी पाडी फोडी । विसरे चुके नाना खोडी ।***
***भल्याचे संगतीची आवडी । कदापि नाही ।।१९/३/७।।***

जया म्हणाली, 'हे हरवे विसरे सांडी फोडी हे तर माझ्या हातून नेहमीच घडतं. आई तर मला धांदरट म्हणते. असं करू नये हे सांगण्यासाठीच मला ओवी वाचायला दिलीत कां? अर्थ मुळीच कठीण नाही. काम करतांना चित्त स्वस्थ नसते. घाई गडबड म्हणून असे होते. हे आता मला कळलं. त्याने नुकसान होते. नुकसान हेच दारिद्र. मी तर म्हणते पैशाचं दारिद्र परवडले भीक तरी मागता येईल. विचाराचे दारिद्र नको. आचाराचे दारिद्र मुळीच नको.'

आजी म्हणाल्या, 'घाबरू नकोस ते येणार नाही. कारण सत्‌ग्रंथ वाचनाची गोडी लागलीय. चूक कळण्या इतकी जाण आलीय. चांगली वाईट संगत कळू लागलीय. म्हणजे पाया पक्का होऊ लागला आहे. पाया पक्का तर इमारत पक्की.'

***राखावी बहुतांचीं अंतरे । भाग्य येते तदनंतरें ।***
***ऐसी ही विवेकाची उत्तरें । ऐकणार नाही ।।१९/३/१८।।***

दारिद्री माणसाला भाग्य हवे असते. पण विवेक नसतो.

'आजी अशांना शहाणे करण्याचा कारखाना आमचे विलासराव काढणार आहेत.' गणपती म्हणाला.

विलास म्हणाला, 'आजी तुमचे आशिर्वाद पाठीशी असतील तर गाढवाचे घोडे करायचा कारखाना उघडीन' परवाच्या मारामारी पासून मी पक्का प्लॅन आखतोय. गणपतीने आत्ता उगाच स्फोट केला. मी एकदमच उद्‌घाटनाला तुम्हाला बोलवणार होतो.' गणपतीच्या पाठीत धपका बसलाच.

आजी म्हणल्या, 'मारूतीराय पाठीशी आहे. कराल, सुंदर काम कराल. पण घाई नको. घरांतील वडील माणसांची संमती घ्या. चोरून लपून गुपचूप नको. म्हणजे भलताच प्रसंग उद्‌भवणार नाही. सुधा हे वाच.'



***झिजल्यावांचुनी कीर्ति कैंची । मान्यता नव्हे की फुकाची ।***
***जिकडे तिकडे होते ची ची । अवलक्षणें ।।१९/३/२४।।***

'कुलक्षणे जात नाहीत तो पर्यंत छी.थू' आजी म्हणाल्या, 'शरीराने मनाने धनाने समाजाकरिता झिजावे. मगच कीर्ती वाढते. लोक वाखाणतात. पडेल तो शब्द झेलतात.कामाचा म्हणजे कार्याचा वाढावा होतो. त्यासाठी पथ्य.'

***याकारणें अवगुण त्यागावें । उत्तम गुण समजोन घ्यावे ।***
***तेणें मनासारिखें फावे । सकळ कांहीं ।।१९/३/३०।।***

'जितक्या प्रमाणांत सद्‌गुण वाढीस लागतील तेव्हा शुध्द मनांत शुध्द कर्माचा संकल्प. भगवंताला मनांत घट्ट धरून ठेवा. अहंकार वाढणार नाही. कर्तेपण चिकटून घेतले नाही की आपोआपच काम होईल.'

***नाना उत्तम गुण सत्पात्र । तेची मनुष्य जगमित्र ।***
***प्रगट कीर्ती स्वतंत्र । पराधेन नाहीं ।।१९/४/६।।***

बाळांनो, असा गुणवंत जो होतो. जगमित्र होण्यसाठी एकदम अमेरिकेत नको जायला! गल्लीत, गावांत, भागात मित्र परिवार वाढवावा. रात्‌कर्म करून माहीत व्हायला हवं. गुन्हेगाराचे नाव पण सर्वतोमुखी असते पण अपकीर्ती म्हणून. कार्य कर्त्यांने काय करावे?

***राखे सकळांचे अंतर। उदंड करी पाठांतर ।***

***नेमस्त पणाचा विसर । पडणार नाही ।।१९।४।७।।***

'बाळांनो, पाठांतर म्हणजे नुसत्या शालेय कविता नव्हेत, किंवा गणितातले आडाखे नव्हेत.संत वचने, ग्रंथ निरुपणांतला उत्तम भाग पाठ असेल तर बोलण्यात त्याचा उपयोग करता येतो, भोवतालच्या लोकांवर त्याचा चांगला परिणाम होतो.

***उत्तमगुणें शृंघारला । तो बहुतांमधे शोभला ।***
***प्रगट प्रतापें उगवला। मार्तंड जैसा ।।१९।४।१५।।***

सूर्यप्रकाशाप्रमाणे तो उठून दिसतो. परमार्थातले खरे वर्म ध्यानांत आले कां ?

***दुसऱ्याच्या दुःखें दुःखवे । दुसऱ्याच्या सुखे सुखावे ।***
***अवघेचि सुखी असावे । ऐसी वासना ।।१९।४।२३।***

जगदीश्वराच्या उत्कृष्ठ सेवेची वासना वाढीस लागो. ही मारूतीरायाला प्रार्थना करते. मात्र एक करायच !"

'काय ते सांगा. आम्ही करू.' गणपती म्हणाला.

दुसरं तिसरं कांहीच नाही. कठीण नाही. समर्थांची शिकवण लक्षात ठेवायची.

तस्संच वागायचं' आजी म्हणाल्या.

***देहे मुळींच केला वाव । तरी भजनासी कैंचा ठाव।***
***म्हणौनी भजनाचा उपाव । देहात्म योगें ।।१९/५/८।।***

'देहाची हेळसांड करून चालणार नाही. देहाला वाजवीपेक्षा जास्त महत्व नको. केसाची निगा जरूर राखायची. तेल लावायलाच हवे. पण कामिनी ऑईलच हवं हा हट्ट नको.'

विलासचा हात डोक्यावरून फिरला. हळूच वास घेतला. 'आजी, मी हेच तेल लावले हे तुम्ही कसे ओळखले? आता मी साधे तेल वापरीत जाईन. महागडया बाटलीचे पैसे-------'

'गाढवाचे घोडे ' कारखान्याला' गणपतीने वाक्य पूर्ण केले. सारेच हसले. 'आपण सगळेच जण लक्षात ठेवू या' आजी म्हणाल्या, 'साधी रहाणी उच्च विचार सरणी.

***कर्तृत्व वेगळें करावें । मग त्या देवासी पाहावें ।***
***तरीच कांही येक पडे ठावे । गोपगुह्य ।। १९।५।२४।।***

मी कर्ता हा भाव बाजूला ठेवून कर्म केले की भगवंताचा खरा पत्ता आपल्याला लागतो. त्याचा महिमा लक्षात येतो. देवाची व आपली सदैव भेटी. त्याच्या हृदयांत आपण व आपल्या हृदयांत तो. सर्वांनी टाळ्या वाजवल्या.

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**



## दिवस ३८ वा

विलास आणि गणपती हातवारे करीत हळूहळू बोलत चालत होते. पाठोपाठ मधू आहे. त्यांचे लक्षही नव्हते.

'जागा नक्की झाली. नगरपालिकेची आडकाठी येणार नाही. बाबांनी चौकशी केली आहे. आता सुरुवात . . . ' तोच मधू म्हणाला, '१ ला पाऊस पडलाच आहे. आता वृक्षारोपणाचा कार्यक्रम ठरवू. चार झाडे लावू या.'

विलास म्हणाला, 'आमच्या मागच्या पडक्या भिंतीत दोन पिंपळाची झाडे वाढत आहेत. ती काढू नी येथे लावू. मधूची कल्पना चांगली आहे. एक उंबराचे व एक वडाचे झाड लावू या. पुढे सूरपारंब्या खेळता येतील. ' इतक्यात वाडा आलाच.

सुधा व जया पायरीवरून वाटच पहात होत्या. पाय धुवून वंदन केले. सर्व आपापल्या जागी बसले.

'काहीतरी मोठ्या कार्याची आखणी चाललेली दिसते.' आजींनी विचारले.

विलास म्हणाला, 'तुम्ही कसे ओळखलेत?'

सुधा म्हणाली, 'आपला चेहरा हा आरसाच न? त्यांत मनातल्या विचारांचं पडलेलं प्रतिबिंब आजींनी पाहिलं.' मुले हसली.

'आजी प्लॅन पूर्ण झाली की सांगणारच तुम्हाला.' विलास म्हणाला.

'आनंद आहे बाळांनो,' आजी म्हणाल्या, 'एक लक्षात ठेवू या.'

***कोण्हास कांहींचव न मागावें । भगवद्भजन वाढवावें ।***
***विवेक बळें जन लावावें । भजनाकडे ।।१९/६/११।।***

अगदी सोप आहे ना? विवेकाचा उपयोग पुरेपूर करायचा. पैशाशी संबंध येऊच द्यायचा नाही. फक्त भजनाचा आनंद लुटायचा. आणि तो सुद्धा कार्य करीत असतानाच.

***उत्कट भव्य तेंचि घ्यावें । मळमळीत अवघेंचि टाकावें ।***
***निस्पृहपणें विख्यात व्हावें । भू मंडळीं ।।१९/६/१५।।***

बाळांनो, जगातल्या बऱ्याच उत्कट, दिव्य, भव्य, वाखाणण्यासारख्या गोष्टी

आदर्श डोळयापुढे ठेवू या.'

आजी - उत्कट भजन कोणाचे?

सुधा - संत मीराबाईचे कान्होपात्राचे, नामदेवांचे.

आजी - उत्कट गायन कोणाचे?

विलास - गान सम्राज्ञी लता मंगेशकरचे.

आजी - उत्कट समाजसेवा कोणाची?

मधुकर - कै. दाजी पटवर्धन. शिवाजीराव नांव त्यांच. कुष्ट रोग्यांच्याकरिता तपोवनाची स्थापना केली त्यांनी.

जया - आजी समाजसेवक म्हणून विनोबांजीचं पण नांव घेता येईल.

विलास म्हणाला, 'आजी अशी उत्कट कार्य करणारांची खूप मोठी यादी होईल. आम्ही उद्या गृहपाठ आणू कां? सगळयांची यादी एकत्र केली की खूपच नांवे मिळतील.'

आजी म्हणाल्या, 'हे सारे आदर्श डोळयापुढे ठेवून - - -'

त्यांना थांबवत गणपती म्हणाला, 'नुसते डोळयापुढे नांवे ठेवून नाही भागायचं. आम्ही त्यांची माहिती गोळा करु व प्रत्येकाबद्दल १५ मिनीटे तरी बोलता येईल असा अभ्यास करु. आजी आमचं बाल वाचनालय आता १०० पुस्तकांचे झाले आहे. काल विलासने आणि मी सर्व पुस्तकांचे दोन भाग केले भुताखेताच्या जादुटोण्याच्या गोष्टी वेगळया केल्या व चरित्रात्मक पुस्तकांचा गठ्ठा वेगळा केला.'

'शाब्बास,' आजी म्हणाल्या, 'चांगलेच समर्थ महंत व्हाल हं! हे पहा समर्थ वचन.

***याकारणे सावधान असावें । जितकें होईल तितुकें करावें ।***
***भगवत्कीर्तीनें भरावें । भूमंडळ ।।१९/६/२६।।***

विवेकाने काम केल्यावर घोटाळाच नाही. खोटेपणाच्या कार्यात घोटाळे फार. आपण देवाच्या शोधाचे पवित्र कार्य करणार आहोत न? मग या तयार होणाऱ्या संघशक्तीत पवित्रता, मंगलता असणारच. जे झेपणार नाही ते करायला घ्यायचेच नाही. कारण समर्थांनी छान दृष्टान्त दिला आहे बघ. मधू तू वाच.



***आपणासी बरे पोहतां न ये । लोक बुडवावयाचें कोण कार्य ।***
***गोडी आवडी वायां जाये । विकल्पचि अवघा ।।१९/७/१६।।***

पोहता न येणारा स्वतः गचकेल व दुसऱ्याला पण बुडवेल. दुसऱ्याची परमार्थाची गोडी वाढीस लागली पाहिजे. असे कार्य करायचे. दुसऱ्याचे ठिकाणी असलेली गोडी नष्ट होईल असे करायचे नाही. कार्यापूर्वीच दूरवरचा विचार करायचा.

***अभ्यासें प्रगट व्हावें । नाही तरी झांकोन असावें ।***
***प्रगट होऊन नासावें । हे बरं नव्हे ।।१९/७/१७।।***

सुधा म्हणाली, 'आजी, प्रगट होऊन नासावे असे होणार नाही. आम्ही पाचच नाही. माझी एक मैत्रीण गावाला गेली आहे. ती आमच्यात मिसळणारच. आम्ही सहाजण वार वाटून घेऊ. सातव्या वारी सर्वजण जमू. तुम्ही निश्चित असा. विलास म्हणाला, 'पण मंगलाला दासबोधातल्या ओव्या कशा सांपडतील? तिचा अभ्यास कसा होईल?'

'आता मी करु गौप्य स्फोट!' जया म्हणाली. सुधाने एका वहीत रोजच्या होणाऱ्या ओव्या अर्थासह लिहून ठेवल्या आहेत. २ दिवसांनी दासबोध पूर्ण होईल. मग आपला नित्यपाठ दासबोध पण सुंदर अक्षरांत मधूदादा तयार करील.'

भान न राहून विलास उठला 'मी १० प्रती झेरॉक्सच्या काढीन. वा. वा. वा. नित्यपाठ दासबोध.' नाचायलाच लागला. आजींचे डोळे भरून आले जयाने भजन सुरु केले. मधुकरने विलासला खाली बसवले. सर्वांनी टाळया वाजवून भजन केले.

आजींनी डोळे पुसले. समर्थांना मनस्वी खेद कशाचा असेल तर मानवाचे ठिकाणी असलेल्या अवगुणांचा.

***सकळ अवगुणामधे अवगुण । आपले अवगुण वाटती गुण ।***
***मोठे पाप करंटपण । चुकेना की ।।१९/८/८।।***

मधू म्हणाला, 'आजी गुळाच्या भेलीत (ढेपेत) लहानसा दगड असला तरी तो दगडच राहणार. वर्षानुवर्ष गुळाच्या संगतीत राहूनही त्यांत काऽऽही बदल होणार नाही. गोडी अंतरंगापर्यंत जाणारच नाही.

गणपती म्हणाला,'नर्मदितले धोंडे पाण्यात आहेत तो पर्यंत ओले. बाहेर काढले

की कोरडे ठणठणीत.'

सुधा म्हणाली,'आजी आम्ही परवाच मारूतीसमोर शपथ घेतली की सोडलेले अवगुण चिकटू देणार नाही. उलट स्वतःलाच स्वतः तपासायचे. चाळायचे. गाळायचे. आजींना चतुर्दश भुजा देवी बनवायचे.' पुन्हा टाळया वाजल्या.

'बाळांनो,' आजी म्हणाल्या, 'ही सारी सद्गुरु कृपा हं. 'आत्माराम वोळला ग वोळला.' खरंच सांगते हृदय प्रेमाने भरून आलंय समर्थ म्हणतात –

***आपणास उपाधी मुळींच नाही । रुणानबंधें मिळाले सर्वहि ।***
***आल्या गेल्याची क्षिती नाही । ऐसे जाले पाहिजे ।।१९/८/२७।।***

आपण म्हणजे कोण कळले ना?'

'हो तर! सच्चिदानंद रुप आत्माराम.' विलास म्हणाला.

'उपाधी रहित असलेले आपण देहात वस्तीला आलो,' आजी म्हणाल्या, 'धर्मशाळेत प्रवासी जमतात न, तसे आपण सारे शेजारी शेजारी, नातेवाईक, सगे सोयरे, मित्र मित्र जमलो. कर्माची देवघेव आनंदाने व्हावी. कोणाचे उणेदुणे पाहू नये. उच्चनीच मानू नये. यालच समभाव म्हणतात. असे जर वागता आले तर दुःखाची झळ कमी लागते. या एका मोहातून सुटलो की दुसरा टप्पा.

'तो कोणता?' विलासने विचारले.

***आळसें आळस केला । तरी मग कारबारचि बुडाला ।***
***अंतरहेत चुकत गेला । समुदायाचा ।।१९/९/७।।***

'आळस हा शत्रूच. आळसाने जर काम थांबवले तर सगळ्या कार्याचाच नाश होतो. पुढाऱ्यानेच जर अंग काढले. तर मागचा व्याप सांभाळणार कोण? आळसाचं साम्राज्य पसरायला वेळ लागत नाही. काम तर थांबतेच पण जगांत नाचक्की होते. 'जमणार नव्हतं तर करावच कशाला?' हेही जगाचे बोल ऐकून घ्यावे लागतात. लोकांना भजन मार्गाला लावायचे. कार्यरत व्हायचे व जगाला कार्यात मग्न ठेवायचे. हा हेतू राहूनंच जातो. देह आहे तेथे दुखणे पाणी असणारच. देहाला विश्रांती हवीच. पण आपल्या ऐवजी आधीच दुसरी योजना आखून ठेवावी. उणे पडून देऊ नये. साधा व्यवहार पण काय सांगतो?



***कोणीयेक काम करितां होतें । न करितां तें मागें पडतें ।***
***या कारणे ढिलेपण ते । असोचि नये ।।१९/९/१५।।***

अशी कामे अर्धी राहिली की दुःखच.

'हा मला खूप खेपा अनुभव आला आहे.' विलास म्हणाला, 'बाबांनी पण तेच बजावलं. अगदी सरळच विचारलं. म्हातारा होऊन डोळ्यांनी दिसत नाही, कानांनी ऐकू येत नाही. पाय चालत नाहीत असे होईपर्यंत काम करणार कां? इतर मदतनीस नसतील तरी चालू ठेवणार कां? समजा तरुणपणी बदलीची नोकरी असली तरी व्यवस्था न चुकता पाहणांर कां? इतका पुढचा ७०, ८० वर्षाचा विचार कर. मग हात घाल. नाहीतर एकटाच आजींच्याकडे जातोस. वाचतोस. तेवढे पुरे. फार मोठें आव्हान मी स्विकारले आहे.'

'तुझ्या बाबांचे म्हणणे आणि समर्थांचे म्हणणे एकच आहे बघ.' आजी म्हणाल्या.

***जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ।***
***जो आपणचि कष्टत गेला । तोचि भला ।।१९/९/१६।।***

कार्याला सुरुवात करताना स्वतःच्या हिमतीनेच सर्व निभावून न्यायचे आहे ही तयारी हवी. मदतीचे हात पुढे येतील. जरुर. मदत घ्यावी. पैशाची नको. कष्टाची. पण विश्वासघाताने फसण्याची पाळी येऊ नये. म्हणून कोणतेही काम दुसऱ्यावर सोपवून आपण बाजूस राहू नये. दुसऱ्याकडून ते न झाले तर आपल्यावर दोष येतो.

विश्वासघाताने फसवूनच आपला प्रपंच चालवणारी माणसे जगांत पुष्कळ आहेत. म्हणून कोणावर विश्वास ठेवावा कोणावर नाही हे ही विवेकाने ठरवायला हवे. स्वतः कष्ट सोसावे लागले तरी हरकत नाही. पण त्यात जो आनंद आहे तो दुसऱ्याने काम करण्यात नाही.

बाळांनो, आणखी एक लक्षात ठेवायला हवे. जगांत बुद्धीमत्ता सगळयांना सारखी नसते. स्वभाव सगळयांचे सारखे नसतात. कांही सज्जन काही दुर्जन भेटतातच. म्हणून समर्थ सांगतात.'

***दुर्जन प्राणी समजावे । परी ते प्रगट न करावे ।***
***सज्जनापरीस आळवावें । महत्व देऊन ।।१९/९/२३।।***

या करिता मन फार मोठे असावे लागते. दुर्जनातला दुर्जनपणा ओळखायचा. पण प्रगट बोलून दाखवू नये. इतकेच नव्हे तर नाठाळपणा कोणता हे आपण ओळखले आहे असे भासून सुद्धा द्यायचे नाही. उलट सज्जनांना वागवतो तसे त्यांना मानमरातबीने वागवावे. क्वचित प्रसंगी त्याची त्याला लाज वाटून तो सुधारण्याची शक्यता असते.

आपल्या कार्याचा व्याप कितीही वाढला तरी आपला नित्य नियम चुकवू नये. प्रथम अंगिकारलेल्या कार्यात खंड पडू देऊ नये. प्रगती खुंटू देऊ नये. आपले भक्तीचे ध्येय पक्के जोपासावे.

***भक्तीमार्ग विशद कळे । उपासना मार्ग आकळे ।***
***ज्ञान विचार निवळे । अंतर्यामी ।।१९/१०/४।।***

कळलां कां अर्थ?' आजींनी विचारले.

विलास म्हणाला, 'मी सांगतो. भक्तीमार्ग म्हणजे काय? भक्तीच्या द्वारे भगवंताला जाणणे. म्हणजे भक्ती. पण भक्ती म्हणजे काय? कोणी विचारलेच तर? आपण म्हणजे साधकाने भगवंताहून वेगळा न रहाणे म्हणजे भक्ती. भक्ताची व भगवंताची एकरूपता म्हणजे भक्ती. भगवंताचे अखंड अनुसंधान राखणे म्हणजेच उपासना. भक्तीने उच्चतम ब्रह्मज्ञान झाले तरी डंका न पिटता शांत रहाणे म्हणजे भक्ती.'

'बरोबर सांगितलेस.' आजी म्हणाल्या, 'मीपणा पूर्ण विलीन झाल्याशिवाय ही एकरूपता येणार नाही. आता उपासना म्हणजे काय? कोण सांगतो?'

सुधा म्हणाली, 'मी सांगू कां? मीपणा सहजासहजी भगवंताच्या चरणी विलीन करता येणार नाही. त्यासाठी जो अभ्यास करायचा, जी साधना करायची त्याचे नाव उपासना. जितक्या प्रमाणांत अहंभाव, मीपणा कर्तेपणाचा अभिमान कमी कमी होईल तितक्या प्रमाणांत साधकाची विचारशक्ती प्रगल्भ होते. प्रतिभा शक्ती वाढते. ती प्रतिभा कोठे कशी वाढते हे कळणे म्हणजेच ज्ञान. अंतरंगात प्रकाश पडतो. आतून आनंदाची उर्मी येते. म्हणजे कसे होते सांगू? आजी, ऐन मोक्याचे वेळी रात्री वीजेचे दिवे मालवतात. वीज खंडीत होते. मग धावपळ. मेणबत्ती लाव. समई लाव. कंदील शोध. कुठून तरी मिणमिण प्रकाश निर्माण करतो. पंखे बंद उकाडा खूप. पुरुषांना बायकांचा हेवा वाटतो कारण त्या पदराने वारा घेतात. बायकांना पुरुषांचा हेवा वाटतो कारण ते सदरा न



घालता बसू शकतात. हिंडू फिरू शकतात. चरफड चालूच असते. असा अर्धा पाऊणतास जातो नी चटकन वीज येते. दिवे लागतात. पंखे फिरतात. लहानापासून मोठ्यापर्यंत सर्वांचे चेहरे खुलतात. 'आले आले दिवे आले' मुले तर नाचतातच. म्हाताऱ्यांना पण आनंद होतोच. ते टाळ्या वाजवतात. त्याहीपेक्षा ज्ञानाचा आनंद मोठाच जीवनात हाच आनंद मिळवायचा असतो.'

'शाब्बास!' विलासने जोरांत टाळ्या वाजवल्या.

'विलास,' आजी म्हणाल्या, 'समर्थ भक्ताकडून कोणती अपेक्षा करतात माहीत आहे? वाच तू.'

***जितुकें कांही आपणासी ठावे । तितुकें हळुहळु सिकवावें ।***
***शाहाणें करुनि सोडावे । बहुत जन ।।१९/१०/१४।।***

***आपण करावें करवावें । आपण विवरावें विवरवावें ।***
***आपण धरावें धरवावें । भजन मार्गासी ।।१९/१०/१७।।***

'आजी, या दोन ओव्या म्हणजे आमचा शपथ विधीच.' विलास म्हणाला.

आजी म्हणाल्या, 'स्वतः करुन मग दुसऱ्याला सांगण्यात एक आनंद वेगळा असतो. आपण प्रचिती घेऊन दुसऱ्यास सांगितले की जरा जोर येतो सांगण्याला. साऱ्या जीवनभर हे पथ्य पाळू या. भगवंत डोक्यावर घेईल आपल्याला नी नाचेल.'

विलास म्हणाला, 'पण आजी, भक्त नी भगवंत एकच झाले की भगवंत डोक्यावर कोणाला घेणार? त्याला आनंद देण्याकरिता आपण थोडे विभक्त होऊ, बाजूस राहू. त्याचे नाचून झाले की त्याच्या हृदयांत पुन्हा दडी मारुन बसू! हां असंच करु. वा. वा. वा.

आजींना पण गंमत वाटली. त्यांनी हात जोडले.

**।। जय जय रघूवीर समर्थ ।।**

## दिवस ३९ वा

तिघे आले. जया व सुधा अजून आल्या नाहीत. कां बरे? तिघे विचार करीत आहेत तोच माजघरांतून आवाज आला. 'चला, बाहेरच बसू या.' मुलं येतीलच आत्तां.' आजींचाच आवाज.

विलास म्हणाला, 'त्या दोघी लवकर येऊन गप्पा मारीत होत्या कां?'

'गप्पा नव्हतो मारत.' सुधा म्हणाली. आईने आजींच्या करतां औषध दिले होते ते द्यायला आले. आजी माजघरांतच निजल्या होत्या म्हणून आत गेलो दोघी. औषध मग घेते म्हणाल्या. म्हणून आम्ही हट्ट धरून बसलो. 'आत्ताच थोडे चाटण घ्या. नाहीतर आम्ही परत जातो.'

मधू म्हणाला, 'आजी आज बरं वाटत नसेल तर राहू दे. आम्ही आपापसांत थोडी चर्चा करतो. मागची उजळणी घेतो. प्रार्थना म्हणतो. तुम्ही आत विश्रांती घ्या.'

आजी बसत बसत म्हणाल्या, 'बाळांनो, दासबोध हीच माझी विश्रांती. तसा फार मोठा आजार नाही. ऋतु मानांत बदल झाला की वृद्धावस्थेकडे झुकणाऱ्या देहात पण कांहीतरी बदल होतो. थोडे पित्त झाले आहे. डोके गरगरते म्हणून पडले होते. पोरींनी हट्टच धरला म्हणून चाटण घ्यावेच लागले. आता गरगरणे थांबेल. बस सुधा. जय दासबोध आणलास कां? बसा.

मधू म्हणाला, 'आजी, आता दोन दिवसांनी शाळा सुरू होणार. महिना कसा मजेत गेला. आम्हाला खूप खुराक मिळाला. 'विवरावे, विवरवावे.', यावरच मी सकाळपासून विचार करीत होतो. विवरणे म्हणजे विवेकाने विचार करणे. म्हणजे आता नक्की कसे व काय करायचे? विचारपूर्वक निर्णय म्हणजे तो कसा घ्यायचा? त्रास होत नसेल तर सांगा हं.

'त्रास ? बाळांनो, हे तर माझे औषध आहे. शक्तीवर्धक औषध आहे' आजी म्हणाल्या. 'हे बघ विवरणाकरिता ओवी किती छान आहे. वाच'

***परब्रह्महि अचळ । आणि पर्वतासहि म्हणती अचळ ।***<br>
***दोनीही येक केवळ । हे कैसें म्हणावें ।।२०।१।२१।।***



आजी म्हणाल्या, 'या ओवीवर मनन करू लागलो की आधी वरवरचा अर्थ बघावा. मग खोलात शिरावे. परब्रह्म अचल आहे. अचल म्हणजे हालचाल करीत नाही. स्थीर आहे. गेल आलं नाहीसं झालं असे काही होत नाही. आहे तस्से रहाते. हा सगळा त्या अचलाचा विचार विस्तार झाला. आता २ रा चरण पहा.

पर्वताला पण अचल म्हणतात. पर्वत पण स्थीर असतो. हालत नाही. जागा सोडत नाही. म्हणजे अचल असतो. आता विचार करायचा. अचलपणा म्हणजे हलचाल रहितता हा गुण परब्रह्मांत व पर्वतात सारखाच आहे. म्हणून पर्वताला परब्रह्म म्हणून चालेल कां? परब्रह्म सूक्ष्म आहे. पर्वत स्थूल आहे. परब्रह्म भूत म्हणजे मायेकरवी तयार झालेले नाही. आकार नाही. पर्वत हा पृथ्वीचाच भाग म्हणजे पंचमहाभूतातील शेवटचे भूत. त्याला आकार नाही. म्हणूनच पर्वताला कालांतराने नाश आहे. परब्रह्माला नाश नाही एवढ्याकरिताच परब्रह्म व पर्वत एकच म्हणता येणार नाही. त्यांत जमीन अस्मानचा फरक आहे.

मधू ओवी वाचून झाली की त्यावर खोल विचार करून निर्णय घेणे म्हणजे विवरणे.

सुधा म्हणाली, 'छान लक्षात आले. पण आता माझी शंका अशी की आकाश व्यापक. तसे पाणी पृथ्वी अग्नी वारा हेही व्यापक. मग आता ही सगळी परब्रह्मापेक्षा अपूर्णच हे कसे पहायचे?'

आजी म्हणाल्या, 'वरील सर्वांना मर्यादा आहेत. त्यांची शक्ती स्वयं नाही. पंचभूतात ती मोडतात. म्हणून परब्रह्म पूर्ण. ही सारी भूते अपूर्ण.'

'म्हणजे सर्वश्रेष्ठ परब्रह्मच !' विलास म्हणाला.

'होय' आजी म्हणाल्या. आता ही २ री ओवी बघ.

***आत्मत्वी जन्ममरण लागे । आत्मत्वीं जन्म मरण न भंगें ।***<br>
***संभ्रवामि युगे युगे । ऐसें हें वचन ।।२०।१।२६।।***

'पुन्हा पुन्हा जन्म का घ्यावा लागतो ?' आजींनी विचारले.

सुधाने उत्तर दिले, 'जीव वासनेत अडकतो. वासनेप्रमाणे जीव नवा देह धारण करतो. जीव हा आत्म्याचाच भाग म्हणून त्याला जीवात्मा म्हटले तर?

'बरोबर आहे'. आजी म्हणाल्या. जीवात्मा देहात्म बुद्धीने देहच आत्मा आहे असे मानून वासनेच्या जाळ्यात अडकतो. आता श्रवणाने देहाचे नश्वरत्व लक्षात आले की 'मी देह आहे' म्हणायचे ऐवजी जाणीव शक्तीने जीव काय म्हणतो ? 'मी आत्मस्वरूप आहे.'

मधू म्हणाला, 'आत्मस्वरूप म्हणजे शिवस्वरूप म्हणून तोच जीवात्मा शिवात्मा होतो. आजी शिवात्मा झाल्यावर जन्ममरण नसते कां?

'असते.' आजी म्हणाल्या,'जिवात्म्याला किंवा शिवात्म्याला जन्म मरण चुकत नाही. फक्त शिवात्मा म्हणजे ईश्वर कर्माच्या अधीन न होता कर्माला आपल्या ताब्यात ठेवतो. ईश्वर म्हणजे शिवात्मा जरूर पडेल तेव्हाच जन्म घेऊन भूतलावर अवतरतो. त्यांना - - - - - - - - - - - -.

'अवतार म्हणतात' गणपतीने आजींचे वाक्य पूर्ण केले. 'अवतार स्वतंत्र असतात. जीवाने जन्म घेतलेला देह व जीवात्मा परतंत्र असतात. '

विलास म्हणाला, ' सर्व श्रेष्ठ असलेले परब्रह्म कोठे गेले ?'

आजी म्हणाल्या, 'कोठे गेलेही नाही आणि आलेही नाही. ही ओवी तूच वाच.'

***परब्रह्माएवढें थोर नाहीं। श्रवणापरतें साधन नाही.'।***
***कळल्यविण कांहीच नाही । समाधान ।।२०।२।९।।***

'बाळांनो, जीवाची उपाधी कोणती?' आजींनी विचारले.

विलास म्हणाला,' शिवाची म्हणजे शिवात्म्याची उपाधी कोणती ?

मधू चाचपडतच म्हणाला, 'मला वाटते हे विश्व.'

'बरोबर आहे,' आजी म्हणाल्या. 'ठामपणे सांगा हे सारे दृश्य.ही मायिक करणी आहे, हा ब्रह्मांडाचा पसारा ही शिवात्म्याची म्हणजेच विश्वात्म्याची उपाधी. या उपाधी बाहेर तो गेला की शुद्ध ज्ञान झाले म्हणायचे. तरी पूर्ण मी सुटला नाही. महत्तत्त्वापर्यंत शिरल्यावर तेथे मनाची गतीच खुंटते. निःशब्दता येते. ते निश्चल ठिकाण म्हणजे परब्रह्म. ही शून्यावस्था म्हणजे परब्रह्माशी एकरूपता. ही एकरूपता साधण्यासाठीच मूळ मायेच्या पसाऱ्यातून सुटायचे म्हणजे विवेकाने वागून फक्त भगवंताचा पाईक म्हणून काम करायचे.



विलास म्हणाला, 'असे वागता येण्यासाठी समोर अगदी जवळचा आदर्श कोणता?

'आपल्या आईचा,' आँ ऽ ऽ गणपती बघतच राहिला. विलास बावचळला.

आजी म्हणाल्या, 'आई म्हणजे जन्म देणारी नव्हे. आत्ता जिच्या मांडीवर आपण बसलो आहोत ती.

मधू म्हणाला, 'पृथ्वी ही माता सूर्य हा पिता. प्रत्यक्ष आपण पाहिले. पण गेलं डोक्यातून. जवळची म्हटल्यावर मी पण हीच आई समजलो.

'याला आधार ओवी बघ' आजी म्हणाल्या.

***खाणी वाणी होती जाती। परंतु तैसीच आहे जगती।।***
***ऐसे होती आणी जाती । उदंड प्राणी ।।२।२।३०।।***

या पृथ्वीच्या पाठीवर चारही खाणीतले अनेकानेक प्राणी जन्माला येतात नी जातात. पण पृथ्वी मात्र तशीच्या तशीच रहाते. आजी म्हणाल्या. 'मी सगळयांना वागवते' हा फुंज नाही. ' पोषण करते' हा अभिमान नाही. आल्याचा आनंद नाही. गेल्याचे दुःख नाही सृष्टी उत्पन्न होते नी जाते तरी जी शक्ती जशीच्या तशीच रहाते ती शक्ती म्हणजेच परब्रह्म. खोल विचार केला की महाप्रलयांत पृथ्वी नाश पावते. पंचमहाभूते अगदी मूळ स्फूर्णा म्हणजे चैतन्य सुद्धा ज्या दिव्य शक्तीतून बाहेर पडते, त्यांत जाऊन मिसळते. तरी सुद्धा ज्यांत वाढ होत नाही वा घटही नाही त्या दिव्य शक्तीचे नाव ---

'परब्रह्म ' विलास टाळी देऊन म्हणाला, 'पण हे सारे ऐकतांना सोपे वाटत. नंतर ते घोटाळयांच कां होतं ? सगळयांच्याच सगळं एकदम लक्षांत कां येत नाही?'

'हा सगळा खेळ गुणांचा ! ' आजी म्हणाल्या, 'जया, समर्थांनी गुणांचे वर्गीकरण केले आहे. बघ वाच तू'

***शुद्ध नेणीव तमोगुण । शुद्ध जाणीव सत्त्वगुण ।***
***जाणीवनेणीव रजोगुण । मिश्रित चालिला ।।२०।३।७।।***

अर्थ सोपाच होता. जयाने सांगितला.

आजी म्हणाल्या.' छान देहात वावरणारा जीव गर्तेत का पडतो? परब्रह्माला कां विसरतो? ते पण पहा-

***अधोमुखें भेद वाढतो । ऊर्ध्वमुखें भेद तुटतो ।***
***निःसंगपणें निर्गुणी तो । माहांयोगी ।२०।३।२२।।***

आजी म्हणाल्या. 'जीव या विश्वपसाऱ्यात फसतच जातो. त्याला मायेच्या जाळ्यांत सापडणारा, विषय सेवनांत आनंद मानणारा, अधोमुख म्हणतात. त्यामुळे भेदाची भावना वाढते. मी तू पणा जास्तच फोफावतो. अनेकपणाचाच अनुभव जास्त येतो. पण तोच जीव जर ब्रह्मज्ञान युक्त होईल तर त्याला उर्ध्वमुख म्हणतात. जो भक्त ब्रह्मरूप होतो. तो द्वैताने वागत नाही. भेद कमी होतो. सर्वसंग परित्याग करता येतो. तो अखंड निर्गुण परब्रह्माशीच समरस होतो. समर्थ त्याला महायोगी म्हणतात.ही स्थिती बाणण्यासाठी काय करावे?

***रात्रंदिवस पाहावा अर्थ। अर्थ पाहेल तो समर्थ ।***
***परलोकींचा निजस्वार्थ । तेथेंचि घडे ।२०।३।२९।।***

ओवी ऐकल्याबरोबर विलास गडबडला, 'आँ रात्रंदिवस पैशाचा हव्यास धरलांतर सगळंच मुसळ केरात गेलं.'

आजी हसल्या, 'नाही. मुसळ केरात जाणार नाही.' आजी म्हणाल्या, 'अर्थ या शब्दाला अनेक अर्थ आहेत. अर्थ म्हणजे पैसा. असा येथे शब्द प्रयोग नाही. संताच्या वचनाचा भावार्थ लक्षात यावा. असा तत्वबोधाचे चिंतन करणाराच आत्मज्ञानाचा स्वार्थ साधू शकेल.

गणपतीने शंका विचारली, 'पूर्ण आत्माज्ञानी कसा वागतो?'

आजी म्हणाल्या, 'त्याची भावना काय असते हे ओवीच सांगते बघ.'

***पृथ्वीमधें जितुकीं शरीरें । तितुकी भगवंताची घरें ।***
***नाना सुखें येणें व्दारें । प्राप्त होती ।२०/४/४।।***

प्रत्येक शरीर हे देऊळच. त्यातला भगवंत म्हणजे आत्मा. हे आत्माज्ञानी पक्के जाणून असतो. मग ते शरीर कीडा मुंगीचे असो वा शेणकिड्याचे वा अवतारी पुरूषाचे असो. प्रत्येक शरीरांत भगवंत आहेच व त्या घरांतला जीव सुख दुःखे भोगतोच. त्याच्या पुढचा विचार असा -

***जगदांतरीं अनुसंधान । बरें पाहाणें हेंचि ध्यान ।***
***ध्यान आणी तें ज्ञान । येकरूप ।।२०/४/१२।।***



आजी म्हणाल्या, 'आत्मज्ञानी मनुष्य जगाकडे वेगळ्या दृष्टीने पहातो. ईश्वराच्या इच्छेनेच प्रत्येक घटना घडते असे त्याचे अनुसंधान सतत असते. या एकच विचाराने त्याला स्वतःचा विसार पडतो. स्वतःचा विसर पडणे याला ध्यान म्हणतात. पूर्णत्वाला नेऊन पोहोचवणाऱ्या ध्यानाला शुध्द ज्ञान म्हणतात.'

विलास म्हणाला, 'ही ज्ञानाची पायरी आम्ही चढू शकू कां?'

'कां बरं शंका आली?' आजींनी विचारले. 'समर्थ म्हणाताात ते खोट कां?'

***उपसना म्हणिजे ज्ञान । ज्ञानें पाविजे निरंजन ।***
***योगियांचें समाधान । येणें रितीं ।।२०/४/२२।।***

आपण श्रवण व्दारे उपासना करीतच आहोत. दिवसानुदिवस आपली उपासना वाढेलही. उपासना ही ज्ञानाची पूर्णावस्था या शुध्द ज्ञानानेच ब्रह्माची प्राप्ती होते. ब्रह्मपद प्राप्ती हेच खरे समाधान. असे योगी लोक मानतात. त्यांच्या दृष्टीकोनाप्रमाणेच आपला दृष्टीकोन ठेवून आपण वागू या. त्याच मार्गाने जाऊया. कोणता मार्ग?

***सकळ कर्ता परमेश्वरू । आपला माइक विचारू ।***
***जैसे कळेल तैसें करू । जगदांतरे ।।२०/४/२९।।***

आजी म्हणाल्या, 'ब्रह्मांडाचा कारभार ज्याच्या सत्तेने चालतो तोच खरा परमेश्वर. त्याच्या आज्ञेतच रहावे. मायेच्या कक्षेत असलेले आपण. आपले कर्तेपण खोटेच. हे सदैव लक्षात ठेवून वागावे. भगवंत प्रेरणा देईल तेवढे काम त्याच्याच समजून त्याच्याच करिता करायचे. कर्तेपण आपलेकडे घ्यायचेच नाही. मग सोपेच आहे.

'बाळांनो' शेतकरी शेतात बी किती पेरतो? समर्थांचा दृष्टान्त पहा -

***बीज थोडें पेरिजेतें । पुढे त्यांचे उदंड होतें ।***
***तैसें जालें आत्मायांते । खाणी वाणी प्रगटतां ।।२०/५/१४।।***

बी थोडे पेरले तरी--

'थांबा आजी' सुधा म्हणाली, 'एका बीजापोटी । तरू कोटी, कोटी सुमने फळे, आधी बीज एकले ।' बी थोडे धान्य पुष्कळ मिळते.

आजी म्हणाल्या, 'तसेच एक आत्म रूप चार खाणी चार वाणी केवढा विस्तार

झाला हा? एकच परब्रह्म अनेक रूपात सहज लीला म्हणून प्रगटले.

त्याचाच खेळ त्यानेच दिलेल्या दृष्टीने पहायचा. पण तेथेही आळस आड येतो. याला काय म्हणावे ?'

***येथें जेणें आळस केला । तो सर्वस्वें बुडला ।***
***देव नाहीं वोळखिला । विवेकबळें ।।२०/५/२७।।***

मनुष्य देह मिळून सुध्दा जो आळसात दिवस घालवतो. तो खऱ्या देवाला कसा ओळखू शकेल ? आपल्याच हाताने आपल्या पायावर धोंडा मारून घेतल्यागतच होणार. मग काय करायच?

'मी सांगतो' विलास म्हणाला, 'चले जाव चळवळ करायची घोषणा देऊन नाही थांबायचं. त्याला पार घालवूनच घ्यायच. त्याला म्हणजे कोणाला?'

गणपती म्हणाला, 'आळसाला.'

'शाब्बास' विलासने गणपतीच्या पाठीवर थाप मारली.

मधूने विलासला तश्शीच दोनदा शाबासकी दिली.

जया सुधाने टाळया पिटल्या 'आळसा आळसा चले जाव!'

आजी हसल्या.

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

## दिवस ४० वा

सगळी जमली. पण चेहरे कसे उदास होते सर्वांचे. आज सांगता दिवस. उद्या पासून शाळा सुरू होणार. सकाळची शाळा असली तरी दुपारी इतका वेळ मिळणे कठीण. दुपारची असली तरी सकाळी कसे जमणार? वेळेचें कसे जमावायचे?

सुधा म्हणाली, 'करणाऱ्याला हजार वाटा. आपण मारूतीच्या दर्शनाला आरतीला एकत्र यायचं व तासभर थांबून ज्ञानाची उजळणी करूनच जायचं. पण खंड नाही पाडायचा.

'संध्याकाळची वेळ असेल तर केशव पण श्रवणाला येईन म्हणाला आहे' जया



म्हणाली.

सुधा म्हणाली, 'मंगला आज रात्री गांवाहून येईल. ती पण नक्की येत जाईल. आपण आजींना विचारू या.'

'त्या हो म्हण्णारच' विलासने ठामपणे सांगितले. इतक्यात आजी बाहेर आल्या. 'बाळांनो, चांगलीच गोष्ट आहे. मी नको कशी म्हणेन? पडवीवर दिव्याची सोय आजच करून घेते.

मधू म्हणाला, आजी, आम्ही शालेय अभ्यास करता करताच अध्यात्मात भक्तीमार्गात पुढे यावे ही तुमची तळमळ पाहूनच आम्ही भारावून गेलो आहेत. हुंदडायला वाडा मोकळा आहे. कारंज्या भोवती फिरून शिवाशिवीला मजा येते. येवढाच आमचा वाडयात येण्याचा हेतू होता. या वाडयाने आम्हाला वेडच लावलं. तुमचे आभार----'

आजींनी नाकावर बोट ठेवून अंहं पुढचं नाही बोलायचं असे सुचवले बाळांनो, हे जे सगळं चाललंय ते गुण आत्मयाचे. तो आत्माराम काय करतो म्हणण्यापेक्षा काय करीत नाही? असं जर शोधायला गेलो. तर आपण शोधतो ते काम पण गुण आत्म्याचेच. म्हणून लक्षात ठेवायचं.

***. आत्मारामः उपासना । तेणें पावले निरंजना ।***
***निसंदेहे अनुमाना । ठावचि नाहीं ।।२०/९/३०।।***

जगातला, विश्वातला, ब्रह्मांडातला, त्या अनंत कोटी ब्रह्मांडातला कण नी कण अंतरात्म्याच्या सत्तेतच वावरत आहे. त्या अंतरात्म्याला दृश्यांत पहाणे हीच खरी उपासना. अशी उपासना करता करताच निरंजन परब्रह्माची भेट होते. उपासना फलद्रूप होऊ लागली की निःसंदेह, संशय रहित भ्रमरहित अशी अवस्था साधकाची होते. कल्पना नाही मायेच्या कक्षेत येते साधक कल्पनारहित अशी अवस्था साधकाची होते. कल्पना ही मायेच्या कक्षेत येते साधक कल्पनारहित झाला की ब्रह्मपदाला पोहोचला म्हणून समजावे.

मधू म्हणाला, 'हा ब्रह्मपदाचा अनुभव एकाएकी येणार नाही. त्या अनुभवाची १ली खूण कोणती?

'सांगते', आजी म्हणाल्या, 'समर्थांनी खूप दूर दृष्टीने दासबोध रचलाय. त्यात

इतकाही संशय कोणाला कधी राहू नये. ही ओवीच पहा---

***निश्चळ चंचळ आणी जड । पिंडी करावा निवाड ।***
***प्रत्यया वेगळें जाड । बोलणें नाहीं ।।२०/७/१३।।***

आजी म्हणाल्या, 'आपला देह तीन तत्वाचा. देह पंचमहाभूतांचा म्हणजे जड अंतरात्मा चंचळ, व परब्रह्म निश्चळ. या तिन्ही गोष्टी देहात कशा वावरतात. हा अभ्यास करणे आपल्या हातात आहे. फक्त त्यासाठी एकान्त व मननाची संवय हवी. मग अनुभव दूर नाही. अनुभवाचे बोलणे प्रभावी असते.

मधू, आता दुसरा टप्पा पहा. साधारणरणे जीव या दृश्यातल्या मोहकतेने आकर्षिला जातो. नानात्वाने भांबावतो, व तेथेच रेंगाळतो. त्यातून मन बाहेर काढणे आवश्यक. म्हणून समर्थ सांगतात---

***जें संव्हारामधें सांपडलें । तें सहजचि नासिवंत जालें ।***
***जाणते लोकीं उगवलें । पाहिजे कोडें ।।२०/७/२२।।***

जाणता म्हणजे ज्ञानी, कार्यकर्ता, महंत, पुढारी यांनी लक्षात ठेवावे की ज्याचा ज्याचा नाश होतो त्या नाशिवंतवरचे प्रेम पण नाश पावते. निर्माण होते ते नाश पावते. जडाचा नाश होतो तसा चंचळाचा पण नाश होतो. फक्त निश्चळ असणारे परब्रह्म तेवढे नाश पावत नाही. म्हणून उपासना करीत त्या दिव्य शक्तीशी एकरूप होण्याचा प्रयत्न व्हायला हवा.

विलास म्हणला, 'जन्मापासून ज्यांत मन गुंतलय ते बाहेर निघायचे कठीण. मग काय करावे?'

आजी म्हणाल्या, 'त्यासाठीच त्यागाची कल्पना पुढे आली. त्यागाने दोन गोष्टी साधतात. जी वस्तू आपण दान देतो त्यावरचे आपले स्वामित्व अर्थातच प्रेम कमी होते. व ज्याला देतो त्याच्याबद्दलचा ईश्वरभाव वाढीला लागतो. प्रेमाला प्रवाहीत करता येते. प्रेम जीवंत झऱ्याप्रमाणे ठेवणे आवश्यक आहे.

बाळांनो, आता तिसरा टप्पा नाशिवंत असले तरी शरीराच्या सहाय्यानेच कर्म करायचे म्हणून ईश्वराचे अलौकित्वं ध्यानात घ्यावे. किती गुंतागुंतीचे पण व्यवस्थित काम करील असे शरीर त्याने बनवले? कोणत्या मुशीत माल मसाला घातला?'



विलास म्हणाला, 'आजी, शरीर विज्ञान आरोग्य शास्त्रांत हा भाग विश्लेषणा सह आहे. प्रत्येक इंद्रियाची अंतर्रचना, त्यांचे कार्य शाळेत शिकवले त्यावेळी अभ्यास झाला पण----

मधू म्हणाला, 'तो अभ्यास फक्त चांगले गुण मिळवून पास होऊन पुढच्या वर्गात जाण्याकरिता म्हणून अभ्यासला. त्यात हे निर्माण करणारा कोण? तो आठवावा साठवावा हे कोठेच नव्हते. आता आपल्याला दोन्हींचा उपयोग होईल.'

आजी म्हणाल्या, 'अशी सांगड घालण्यासाठी समर्थ लिहितात----

***आस्तिमांशाची शरीरें । निर्माण केली जगदीश्वरे ।***
***विवेकें गुणविचारें । करूनियां ।।२०/८/१३।।***

या शरीराचा मानवाने कसा उपयोग करावा हे ठरवूनच अत्यंत खुबीदार रचना केली. विचार शक्ती दिली. तीच ज्ञान शक्ती. किती गुणांचा साठा दिला?

जया म्हणाली, 'तीन गुणांचा. सत्व, रज, तम.'

'बरोबर' आजी म्हणाल्या, 'या गुणांचा योग्य वापर करून तिसरा टप्पा यशस्वी करायचा. आस्थि म्हणजे हाडे, मास, रक्त, त्वचा, केस, नखे, इ.चा हा देह बनला. याचे सहाय्याने नाना कला शिकता येतात. ज्ञान मिळवता येते. यत्रांची आपण काळजी घेतो ना? तशी तेल पाणी योग्य आहार देऊन याचा योग्य तऱ्हेने वापर केला तर चौथा टप्पा सहज गाठता येईल.

'चौथा टप्पा कोणता?' विलासने विचारले. आजींनी त्यालाच ओवी दाखवली.

***देहेसामर्थ्यानुसार । सकळ करी जगदेश्वर***
***थोर सामर्थ्ये अवतार । बोलिजेती ।।२०/८/२१।।***

आजी म्हणाल्या, 'अंतरात्म्याचे सामर्थ्य सर्वही देहात आहेच आहे. लहान मोठया देहा प्रमाणे जाणीव शक्ती लहान मोठी इतकेच. त्यातले त्यांत मानव देहात विचाराचे सामर्थ्य अधिक आहे. म्हणून पशूसारखा व्यवहार न करता माणसाने माणसा सारखेच वागावे. ही सर्वच संतांची इच्छा. हाच तो चौथा टप्पा. विवेक नी विचार यांचा पुरेपूर उपयोग करून घेणाऱ्यानांच सामर्थ्य अधिक प्राप्त होते. त्यांचे कार्य अधिक मोलाचे होते. आदर्श असते. ते समजात उठून दिसतात. त्यांना अवतार म्हणतात. पण कार्य

झाले की कोठे गुंतून न पडता अवतार संपवतात. हे न गुंतणे ज्ञानाने साधता येईल. म्हणून आता पाचवा टप्पा 'तो कोणता?' गणपतीने विचारले.

आजींनी त्याला ओवीच दाखवली.गणपती वाचू लागला.

***आवाहान विसर्जन । हें चि भजनाचें लक्षण ।***
***सकळ जाणती सज्जन । मी काय सांगा ।।२०/८/३०।।***

विलास म्हणाला,'आवाहन विसर्जन मला कळलं, आपण गणेशोत्सवांत गणपतीच्या मूर्तीत ईश्वरी शक्ती आली असे समजून आवाहन म्हणजे त्याला बोलावतो. म्हणजे मंत्राने बोलवतो. उत्सव आटोपला की त्या मूर्तीचे विसर्जन करतो. कोणी विहीरीत कोणी नदीत. पण पाण्यातच विसर्जन करतात.

आजी म्हणाल्या,'ठीक सांगितलेस. हे व्यावाहारिक दृष्ट्या मूर्ती बाबत योग्य. आता आपण ज्ञानाच्या पातळीतले टप्पे पहात आहेत. मग जरा वरचा अर्थ लक्षात घेऊ याः या दृश्यांत जेवढ्या घटना घडतात त्या अंतरात्म्यामुळेच. असे बघण्याची संवय हीच साधना. अंतरात्म्याचे अस्तित्व सर्वत्र बघणे हे भजनाचे लक्षण.

'नामदेवाला कुत्र्यात पांडुरंग दिसला' तसेच ना? जया म्हणाली.

'आणी नाथांनी गाढवात रामेश्वर पाहिला' गणपती म्हणाला.

'बरोबर आहे' आजी म्हणल्या,'भजनाने, नामस्मरणाने, अंतःकरणातले प्रेम जागृत झाले की हे अंतरात्म्याचे अस्तित्व खोलवर जाणवते. त्याला आवाहन म्हणतात. अंतरीत्म्याचे मूळ कोण? निरंजन परब्रह्म. तेच त्याचे माहेर. तेच त्याचे स्वस्थान. त्याला त्याच्या मूळ स्थानावर पोहोचवणे हे विसर्जन. याचाच अर्थ आपण विवेकाने अंतरात्म्याच्या शक्ती बरोबर मूळ निरंजन परब्रह्म पर्यंत पोहोचणे. त्यांतच दडी मारणे. हे पाचव्या टप्पाचे मुख्य लक्षण.

आणि गंमत अशी की हे सारे या देहात असतानाच करायचे. त्यालाच एकान्त हवा. ही क्रिया प्रक्रिया हळूवारपणे पहाणे म्हणजेच 'पाहता पहाणे दूर करी.'

ज्यांना हे नित्य साधते ते संत. ते सज्जन. त्यांच्या सान्निध्यात हेच शिकायचे.

आजी एकदा पाचही टप्पे अभ्यासूया कां? गणपती म्हणाला, आम्ही नांवे



सांगतो. तुम्ही बरोबर आहे का पहा.

'मी पाचवा टप्पा सांगतो. तो आता माझ्या चांगला लक्षात आहे' विलास म्हणाला.

गणपती म्हणाला,'नाही सगळ्यांनी पाचही टप्पे आठवायचे. आजी १ला. २रा म्हणातील तसे सांगायचे.'

विलास म्हणाला,'चालेत नापास तर नापास अभ्यास तर होईल.'

आजी म्हणाल्या,'देह तीन तत्वांचा १) जड २) चंचळ ३) निश्चळ हे जाणणे म्हणजे १ला टप्पा

आजी - सुधा, २रा टप्पा.

सुधा - दृश्यावरचे प्रेम त्याग भावनेने कमी करून ईश्वर भावाकडे प्रेम प्रवाहीत करणे.

आजी - विलास तितसरा टप्पा?

विलास - (चाचपडत) गुंतागुंतीचे हे शरीर यंत्रासारखे. हे नाशिवंत असेल तरी त्याची योग्य देखभाल करून विवेकाने साधन म्हणून त्याचाच उपयोग करून घ्यायचा.

आजींनी शाबासकी दिली. आता मधू चौथा टप्पा?

मधू - अवतारी पुरूषांचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून अंतरात्म्याचे सामर्थ्य जाणायचे.

आजी - जया पाचवा टप्पा?

जया - आवाहन, विसर्जन, अंतरात्म्याच्या विसर्जना बरोबर 'मी' पणाचे विसर्जन करून परब्रह्म शक्तीत एकरूप होणे.

'छान छान' आजी म्हणाल्या,'म्हणून आता पथ्य पळायचे, कोणते?

***खोट्याचे वाटे जाऊं नयें । खोट्याची संगती धरूं नये ।***
***खोटे संग्रहीं करूं नयें । कांहींयेक ।।२०/९/१६।।***

आजी म्हणाल्या,'खोटे ते खोटेच ना? आपल्याला कक्षेत रोजच्या जीवनात जे खोटे डोकावत असेल त्याला बाजूला सारावे.'

मधू म्हणाला, 'पण आजी, दृश्य म्हणजे जग, जग मिथ्या म्हणजे खोटे, नाशिवंत. त्यातून आलिप्त कसे रहाता येईल ? जगाला बाजूला सारून आपण कोठे जायचे?'

'छान विचारलेस' आजी म्हणाल्या, 'जगातच रहायचे. जगातच वावरायचे. पण जगाचे व्हायचे नाही. असं जगायचं! जगांतच जन्माला आलो आहोत. हवा अन्न पाणी इथलेच सेवन करणार. कार्यही येंथेच करायचे. मग? फक्त कार्यावरचा आधिकार सोडायचा. हे करतो कोण?'

'अंतरात्मा' विलास म्हणाला.

'शाब्बास!' आजी म्हणाल्या.

***सूत गुंतलें तें उकलावें । तैसें मन उगवावें ।***
***मानत मानत घालावें । मुळाकडे ।।२०/९/१९।।***

आजी म्हणाल्या, 'सुताचे उदाहरण देऊन समर्थ पटवत आहेत. मनाला परब्रह्माकडे वळवावे. मन अंतर्मुख केले की संवय होते! हे सारे कां?

***पिंड पडता अवघेंचि जातें । परंतु परब्रह्म राहातें ।***
***शाश्वत समजोन मग तें । दृढ धरावें ।२०/९/३०।।***

शाश्वत तत्व दृढ धरिले की जीवनाची सार्थकता झाली. देह पडल्यावर सर्व जाणरच. म्हणून देह पडण्यापूर्वीच सावध रहावे. नापास होण्यापूर्वीच अभ्यास करावा.

***धरू जातां धरतां नयें । टाकू जाता टाकिता नये ।***
***जेथें तेथें आहेच आहे । परब्रह्म तें ।।२०/१०/१।।***

अशा परब्रह्माला कसे जाणावे?

विलास म्हणाला, 'सूक्ष्म होऊन जाणावे? 'ठीक' आजी म्हणाल्या.

***संत साधू महानुभावां । देवदानवमानवा ।***
***ब्रह्म सकळांसी विसावा । विश्रांतीठाव ।।२०/१०/१९।।***

सगळयांचे विश्रांती स्थान एकच परब्रह्म!

जयाने भजन सांगितले,



'इथे कुठे रहायचय । मुक्कामाला जायचंय । सुखरूप होण्यासाठी । हरिगुण गायचेय ।

मुलांनी ठेका धरून ४/५ वेळा म्हटले.

आनंद, आनंद आजी म्हणाल्या, 'ही पहा ओवी.'

***शुध्द सार श्रवण । शुध्द प्रत्ययाचें मनन ।***
***विज्ञानीं पावतां उन्मन । सहजचि होतें ।।२०/१०/२५।।***

आलं ना लक्षात श्रवण, मनन, ज्ञानाचे विज्ञान मग उन्मन होणारच. शेवटी तृप्तीचा ढेकर येतो.

***जाले साधनाचें फळ । संसार जाला सफळ ।***
***निर्गुण ब्रह्म ते निश्चळ । अंतरी बिंबले ।।२०/१०/२६।।***

आजींनी अश्रूपूर्ण नेत्रांनी वंदन केले. पाचही जण एकाच वेळी आजींना वंदन करण्याकरिता खाली वाकले. पाच मिनीटे निःशब्दता. आजी म्हणाल्या 'गुरू महाराज गुरू जय जय परब्रह्म सद् गुरू ।'

मुलांनी आनंदाने फेर धरला. भजन रंगले. देहभान गेले. आनंदी आनंद बराच वेळ ओसडला. आनंद सागरात सगळे डुबले!

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

